Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी विश्वविद्यालय
विषय संख्या 621/66 आगत नं० 43,686
लेखक
शीर्षक

दिनांक	सदस्य संख्या	दिनांक	सदस्य संख्या

गुरुकुल कांगड़ी विश्वविद्यालय
कृपया पुस्तक के ऊपर कोई निशान आदि न लगायें।

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म् ।

पुस्तकालय

गुरुकुल काँगड़ी विश्वविद्यालय, हरिद्वार

६२१/६६ आगत संख्या ४३,६४६

पुस्तक विवरण की तिथि नीचे अंकित है। इस तिथि सहित 30 वें दिन यह पुस्तक पुस्तकालय में वापस आ जानी चाहिए अन्यथा 50 पैसे प्रति दिन के हिसाब से विलम्ब दण्ड लगेगा।

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी विश्वविद्यालय
विषय संख्या ६२१ आगत नं० ४३,६४६
लेखक ६६
शीर्षक

दिनांक	सदस्य संख्या	दिनांक	सदस्य संख्या

गुरुकुल कांगड़ी विश्वविद्यालय
कृपया पुस्तक के ऊपर कोई निशान आदि न लगायें।

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुस्तकों पर सर्वप्रकार की निशानियां लगाना अनुचित है।

कोई विद्यार्थी पन्द्रह दिन से अधिक पुस्तक नहीं रख सकता।

५३,६५६

६२१
६६

स्टाक प्रमाणीकरण

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

THE

SADDARSHANA-CHINTANIKÂ

OR

STUDIES IN INDIAN PHILOSOPHY.

षड्दर्शनचिंतनिका.

मीमांसादर्शन

वृत्तिसहित

त्याचें मराठी आणि इंग्रजी भाषांतर.

पुस्तक १. जानेवारी १८७७. अंक १.

VOL. I. JANUARY, 1877. No. 1.

पुणें.

आवृत्ति दुसरी.

“ज्ञानप्रकाश” छापखान्यांत छापिलें.

(सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदली आहे.)

621,66

43646

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

THE

SADDARSHANA-CHINTANIKÂ

OR

STUDIES IN INDIAN PHILOSOPHY.

A MONTHLY PUBLICATION
STATING AND EXPLAINING
THE APHORISMS OF THE SIX SCHOOLS
OF
INDIAN PHILOSOPHY
WITH THEIR TRANSLATION INTO MARATHI AND ENGLISH.

(Registered under Act XXV. of 1867.)

CHECKED 1973
Initial

Poona:
PRINTED AT THE "DNYAN PRAKASH" PRESS.

January, 1877.

621.66
43646

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Man, speak the truth in form attractive sweet ;
Whate'er repels though true, do not repeat.
Whate'er attracts but false do not recite ;
The ancient sages fix this holy rite.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

षड्दर्शनचिंतनिका.

मीमांसादर्शन.

वृत्तिसहित

आणि

त्याचें मराठी आणि इंग्रजी

भाषांतर.

३२/२८

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदली आहे.

पुणें.

"ज्ञानप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

जानेवारी १८७७.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

॥ सत्यं ब्रूयात् प्रियं ब्रूयात् ॥
॥ न ब्रूयात् सत्यमप्रियं ॥
॥ प्रियं च नानृतं ब्रूयात् ॥
॥ एष धर्मः सनातनः ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

INTRODUCTION.

Chronological order of philosophical teachers.

We intend to interpret to our readers the systems of the well-known *six schools of philosophy* in India. We will first indicate the chronological order of the founders of schools of thought in India. The *Risi* had enthuastically sung his hymns, had fervidly prayed to God, had contemplated nature, and had enjoyed the exhilarating Soma-juice; the pleasant sensations which it caused filled his imagination and produced poetical sentiments which even at this distance of time do not fail to move those who can appreciate him. The Brahma-Vâdinas explained the utterances of the *Risi*, always from a sacrificial point of view, and gave an impulse to the thought of the age. The Âchâryas whose activities were many-sided, systematized the sacrificial dicta of the Brahma-Vâdinas, and proposed new interpretations of the original hymns of the *Risi*, cultivated etymology, developed grammar and psychology, and fixed and classified the advanced notions of the age, betaking themselves to the] recesses of forests, and there contemplating the essence of matter and spirit. Then teachers like Patanjali, almost the greatest exegetist in the world, taught their schools. The Yoga-system of philosophy followed as a matter of course. Buddism sprang up, which sapped the foundation of the superstructure raised with great assiduity during generations by the

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

*R*isis, Brahma-Vâdinas, and Âchâryas, and established its ascendancy. Opposition headed by teachers in whom the spirit of the Âchâryas had not become extinct. brought on a reaction. The latter Âchâryas like Ka*n*âda, Kapila and Bâdarâya*n*a attacked the Bouddhas, formulated the ideas and thoughts of the age, and developed psychology and theology which are *the spirit* and *motive power* of all nationalities in India. There is ample evidence for the chronological order here indicated. It will be discussed else-where at length.

The influence of the sixs schools of philosophy on the modern Indian mind.

We intend to interpret the speculations of these latter Âchâryas, whose classifications of qualities, notions of matter and spirit, of transmigration, and of salvation are now invariably adopted in India. Whether we examine the writings of Guru Nânaka in the Panjab, of Kabir on the banks of the Ganges, of Chaitanya in Bengal, or of Tukârâm and Jnânoba in Mahârâstra, of Svâmî Nârâya*n*a in Gujerâtha, or of Râmânuja in the Tâmil and Telagu nationalites in the Madras Presidency, we find the same devotional fervour, tinged partly with positive notions of God, such as Ka*n*âda taught, partly with the metaphysics, which Kapila systematized and developed, and partly with that pantheism which has sprung from the philosophy of Bâdarâya*n*a. The modern Hindu is the embodiment of the influences which we have succinctly enumerated. Yet the six schools of philosophy are decidedly in advance of him, and inculcate principles which have all the freshness of modern European thought and possess truths of which no nation ought to be ashamed.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Importance of exegetics.

As we begin our *serial* called *Saddarshana-Chintanikâ* with Jaimini's Mîmânsâ, a philosophical treatise on exegetics and its logic, we cannot better introduce our monthly magazine than by discussing the general principles of the theory of interpretation itself. The principles of interpretation are known in Europe as *exegetics* or *Hermeneutics*. In the extension as well as improvement of human knowledge, it plays a very important part. It springs from the conservative propensities of human nature. A genius alone can originate a thought. But its acceptance or rejection depends on the condescension of conservatism first to consider it, and then to see its power or necessity. But even when the power or necessity of a thought is clearly discerned, it is not easily adopted by a whole nation. It must undergo the ordeal of interpretation : its analogy to some already accepted thought must be pointed out : and its forms must be apprehended. We will give an illustration. Auguste Comte, a modern French thinker laid down a theory of the three stages of the development of history—theological, metaphysical, and positive. As a first great step towards an historical generalization, it is an hypothesis of considerable importance ; but the orthodoxy of Europe at first rejected it and condemned it. Yet in one form or an other as interpreted by the thinkers of Europe, it is adopted. Thus the importance of the study of exegetics is great.

Again, as it is never the lot of all thinkers or students of philosophy to originate large ideas, it is at least their duty to know them, and seek to develop them. Hence every student of philosophy cannot but be an interpreter of what is placed before him by his

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ancestors. Mr. Mill's Logic or his system of Political Economy is the fruit of the great exegetical powers the author possessed. Whenever he sees a thought, he studiously and critically attempts to interpret it, by looking at it from as many points of view as possible, and by discussing it in its different bearings.

Interpretation is also a necessity with those who simply seek knowledge, for no elaborate book can be easily understood. The questions it discusses, require to be properly and systematically interpreted: the canons of exegetics require to be applied : the statements made by the same author in the course of a discussion require to be collated : the conclusions drawn by him at different stages of the discussion require to be sifted : and the forms in which his thoughts appear require to be distinctly discerned.

Interpretation is a necessity with ordinary men of business. For example, a document conveying a valuable estate may be carefully drawn up. But whenever it is used for substantiating a claim founded upon it, its interpretation is of special importance. Important issues in law-courts are raised as to the interpretation of a passage, and important decisions are affected in proportion as the one or the other interpretation is adopted by a court of justice. We, therefore, attach great importance to the exegetical philosophy of Jaimini, and believe that as an instrument of reform, as a means of philosophical study or of the acquisition of knowledge, as a necessity of active public life, as a system of education, as a fact in the history of Indian philosophy, as an encyclopædia of sacrificial lore, as the logic of such discussions as were conducted by Raghunâtha Shâstrî Parvate of Puna or Râjârâm Shâstrî Kârlekara of

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Banâras, as a key to writings called Kalpa-Sûtras, Âranyakas, Patanjali's Mahâbhâsya or Mâdhava's voluminous commentaries on Vaidika authors, and as the source of all the dicta of logic and religion which obtain at present among the Hindus, the system of Jaimini's Mîmânsâ is of special importance.

Recognized scriptures—the subject of exegetics.

Before we enter upon our proper task of translating and annotating upon Jaimini's Mîmânsâ, we will present to our readers a short historical sketch of Indian exegetics. Before exegetical logic can come into existence, there must be some recognized scriptures to which exegetics can be applied. The utterances of the *Ri*s*is*, called Sanhitâs of the Vedas constitute these original scriptures. The *Risi* is the first original promulgator of thought in India—the eternal thought as it exists in the Divine Mind. The *Risi* saw it and revealed it. Now, the *Risi* was an energetic thinker. Absorbed in meditation, he prayed and sang; and his prayers and songs embody the highest religious aspirations of man. Full of faith, he sought the help of God on all occasions of life. He was conscious of the struggle between the good and evil influences in the mind of man. He fervidly prayed that the good influence, which he called the *good mind*, might prevail, and might be enabled to triumph over the evil influence called by him the *evil mind*. He believed in one God who always inspired his mind. He believed in the immortality of the soul, and spoke with raptures of the path of righteousness which his ancestors had followed. His description of heaven is pure and spiritual. Such a *Risi* in one sense originated the religious ideas of India, for every orthodox school of philoso-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

phy refers to him as the fountain-head of all its doctrines and reveres him. This reverence for the *Risi* is so thoroughly established in India that ideas even antagonistic to the *Risi* but popularly recognized are attributed to him. Often a stray-utterance of the *Risi* is quoted to support a system of thought that has nothing in common with the teachings of the *Risi*. The theory of exegetics is, therefore, specially developed in India.

Objective exegetics.

The authors of the Brâhma*n*as who followed the *Risis* were the first to develop and apply a method of interpretation. They generally called themselves Brahma-Vâdinas. By Brahma, they meant accumulated knowledge or learning. But Brahma was the name given by the *Risis* to a prayer they uttered or a hymn they chanted. When the power of the Brahma which moved the heart and inspired the intellect of the ancient Âryas for generations was established, the Brahma-Vâdinas were compelled by the circumstances in which they found themselves placed, to advance their sacrificial doctrines by interpreting the hymns of the *Risis* into their own dicta. Their method is called *objective*, for they always try to support their interpretation of the mantras into something sacrificial by referring to a natural phenomenon, such as the revolution of the sun, to an established social custom or to canons and rules of recognized literature. Illustrations based on the facts of the external world constitute their special *forte*. The whole Brâhma*n*a literature consists of sacrificial interpretations of the hymns of the *Risis*. Look into any chapter of the Aitareya, Taittirîya or Shatapatha Brâhma*n*a, and the general principles of this method

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

of interpretation will be at once seen. But three facts deserve special attention. I. They based their speculations on etymology, II. They saw the phenomenon of *generation* illustrated in their sacrifices as originally fire was produced by friction. III. They seriously narrated stories of battles between demons and gods. Etymology represents the psychical phase of objective exegetics; and natural phenomena, their physical phase; the stories supplied the traditional basis. It need not be remarked that every system of philosophy discovers these three phases. Engaged in applying the system of objective exegetics, generations of thinkers propounded their sacrificial dicta and passed away.

Subjective exegetics.

The system of objective exegetics necessarily ceased to interest the Brahma-Vâdinas. The sacrificial dicta were too material to continue to be powerful. The Brahma-Vâdinas gave way to another school of thinkers—the Âchâryas of the Âra*n*yaka-period. The system of exegetics was altered. The utterances of the *R*isis were now interpreted in a psychical way. Phenomena which have always inspired thinkers attracted attention. The soul, the spirit and the faculties of the mind, became the subjects of discussion and excogitation. The concrete had paved the way for abstract thought. The qualities of substances were examined. The characteristic feature of this school of exegetics was:—earnest and irrepressible search after the essence of whatever exists. Brahma now no longer meant either a prayer or learning. Its signification underwent a great change: it meant the essence sought. Among the ancient Greeks, a craving for the essence of all existence over-ruled their philosophical

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

speculations. The Greek sought the essence, but his method was different. He named a substance such as air or fire, and attempted to resolve all existing matter into it. His logic consisted in investigation, and he desired explanation of what he conceived to be different forms of one substance. The ancient Ârya in India studied the utterances of the *R*isis, and interpreted the forms mentioned by them into the essence of matter or mind. The first examined concrete natural substances. The last named abstract qualities, powers or generalities. The one was obliged by his position to investigate the actual properties of a material substance, and by combination or analysis, to establish his conclusion. The other simply philosophized about an abstract entity, and gave reasons. The former paved the way for the study of physics, and the latter rose to a sublimity of thought, and impelled by aspirations which rose superior to every thing worldly, and which presented a picture of eternal quietude and happiness, sought an ideal life. The Greek gradually became anxious to know the properties of matter and mind, and though often repulsed and often discomfited, was determined to know the cause and explanation of what he saw in nature either material or spiritual. The ancient Ârya in India, bent on securing the essence which resulted in quiet beatitude, developed the means and ends of contemplation. While some Âchâryas were absorbed in contemplation, others cultivated grammar and cognate sciences. This was partly attended and partly followed by great philosophical activities. A school of thinkers who styled themselves Aitihâsikas (historians in one sense) attempted the interpretation of the original mantras in their own way, and ad-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

vanced some doctrines of their own. Another school—that of linguists attempted the analysis of lingual forms, and insisted on some mantras being interpreted in a particular way. This school was represented by two classes of thinkers—grammarians (Vaiyâkara*n*as) and etymologists (Nairuktas). A school of Âchâryas cultivated what may be called the philosophy of a sacrifice, and constituted themselves Yâjnikas who interpreted the original mantras in their own way. Suffice it to remark that in the limited space at our disposal, full justice cannot be done to the many-sided activities of the Âchâryas who adopted the system of subjective exegetics, and developed it. These Âchâryas worked with an energy which systematized the exegetical logic about to be noticed.

Illustration of the schools of exegetics.

We will quote only one mantra of the *R*is*i* Dîrghatamâ Ouchathyas and present to our readers the different interpretations as offered by different schools of thought. The following is the literal translation of (I. 164, 45.) of the *R*ik-Sanhitâ.

> Definite four, the feet of speech ;
> The Brâhma*n*s who high wisdom reach
> Know them. Put in the heart are three
> Which common mortals do not see ;
> But these, the fourth of speech do speak.

The Vaidika exegetes give the following version of this mantra. The *four feet* are the three Vyâh*r*itis (Bhûr, Bhuvas, and Svar,) and Om—the well-known pra*n*ava. The objective school of exegetics—closely allied to, or almost identical with, the first—insists on the sacrificial sense of the *four feet*. The following occurs in a Brâhma*n*a-work—"Four-fold speech

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

was created : in these worlds (lokas), three kinds are found, and the fourth is to be found in beasts. That which exists on the earth is seen in fire and in the musical mode called the Rathantara-Sâma ; that which exists in the firmament is to be seen in the air, and in the musical mode called the Vâmadevya-Sâma; that which exists in the heavens is to be seen in the sun, in the musical mode called B*r*ihat-Sâma ; and that in the lightning andin beasts. In Brâhma*n*as they placed that which exceeds all these. Therefore, Brahma*n*as speak the speech, both of gods and men." This interpretation is based on a sacrificial arrangement. The Aitihâsikas interpret the mantra in the following way : "the *four feet* are the sounds of serpents, the sounds of beasts, those of insignificant animalcules, the fourth foot of speech is the language of common life." This interpretation deserves special attention, as it throws light on the method, which the Aitihâsikas followed. The grammarians considered the *four feet* to be nouns, verbs, prepositions (verbal prefixes), and particles. The Nairuktas or etymologists consider the *four feet* of speech to be the *R*ik, the Yajus, the Sâma, and the ordinary language. The Yâjnikas consider the *four feet* to be the Mantra, Kalpa, Brâhma*n*a, and the language of common life. The most important interpretation is that of psychologists, who pre-eminently employed the method of subjective exegetics—"Speech is eithar *parâ* (highest), *pashyantî* (seeing) *madhyamâ*, (intermediate), or *vaisvarî* (pre-eminently that of a sound). It is *parâ* when in the form of a sound, it originates : when conceived in the mind, it is *pashyantî* ; when it reaches the determining faculty (buddhi) and seeks to be expressed, it is *madhyamâ* : and when it is

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

expressed through the organs of speech, such as the palate or lips, it is *vaisvarî*. The real interpretation of the *R*ik already translated literally, ought to be determined by the rules of exegetical logic, that is, by the application of the principles of context (Sâhacharya) in its different bearings, of the particular subject (Prakara*n*a,) of the particular collocation (Sthâna) as developed in Jaimini's Mîmânsâ, and of exegetical inference. The principles of exegetical logic developed in the course of centuries and systematized by Jaimini, when carefully applied, necessitate or ought to necessitate only one interpretation of the poetical lines.

Exegetical logic.

This logic was gradually developed. While some thinkers were employed in actual interpretation, others sought to sift the rules of exegetics itself. Patanjali's Mahâbhâ*s*ya develops, discusses, and sums up the principles of exegetical logic. Certain philosophical treatises had established their claim to attention, and their reputation commanded respect. The Pâ*n*inîyam may be mentioned as an example. A number of teachers of celebrity were busied in its interpretation. The fundamental principle of their logic is the establishment of a rule by an inference based on the utterances of the author to be interpreted, and the rejection of his statements by the same method. A number of maxims, springing partly from close exegetical reasoning, and partly founded on the recognized procedure of the people, were laid down. This method is important as it was fraught with great consequences to India. Patanjali's Mahâbhâ*s*ya embodies all its principles. It is at once bold and submissive—at once for reform and for conservatism. In as much as it rejects a statement of

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

a recognized author, it is bold; but it attempts to accomplish this object by such exegetical principles as are inferred from the author attacked, and it is, therefore, submissive. It aids reform by depriving a celebrated author of any respect arising from his distinction, or of his pretensions to infallibility, and conciliates the orthodoxy by its exegetical method, which cannot but be sanctioned by the authorhimself. All this is expressed by the principles of what are known among us as Jnâpaka and Pratyâkhyâna. What followed the mental training such a system fostered can be easily guessed: the Buddhists came with weapons of their own, and attacked antiquity.

A revolution in method and thought.

In the mean-time, the intellectual training which the former Âchâryas had given, communicated a new impulse to thought, and produced a fearless independence, which set at defiance the *Ri*s*i*s, their utterances and the Brahma-Vâdinas. Influenced by the logic of subjective exegetics and its method, the Buddhists steadily advanced and asserted with a boldness and power, which astonished their contemporaries, that man and his powers explained all phenomena. Their logic was at once practical and philosophical :—practical in as much as they took special care of the morality and prosperity of the laity, who were considered to be mere disciples, and whose simple duties consisted in purity of life and attention and obedience to their instructors, and philosophical because the ascetics who spent their whole life in a convent, were subjected to a rigid course of spiritual discipline, and were trained to employ philosophy in their disquisitions and discussions. Revelation and its

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

pretensions were rejected; the sacrifices which occupied the whole life of a Brâhma*n*a, and excited in some cases national interest, were condemned, and practical rational duties were inculcated in the place of sacrifices. In philosophy, the authority of testimony was overthrown—such testimony as had advanced pretensions to infallibility. All arguments were built on ocular direct observation, inference, and analogy as based on the first two, for this logical analogy is to be distinguished from that which objective exegetics employed. The latter consisted in narrating traditional stories or tracing a connection between the conclusion to be established and recognized customs or dicta.

Revival of the orthodox method and thought.

The latter Âchâryas opposed, attacked, and paved the way for the final extinction of, Buddhism in India. Their action caused a great revival among the latter Âchâryas. As we seek to interpret these Âchâryas, we shall have to state much about them, as occasion arises.

The present prevailing method of interpretation.

The first maxim of the prevailing exegetics is to support customs and social institutions as they exist at present, without any attention to their origin, that is, without enquiring whether they are Buddhistic or Vaidika, by confounding all the dicta of the different schools of exegetics, of formal logic and of Boudhas. This method, originated by Shankarâchârya and his disciples, showed for some time a great power. The two systems of logic—formal logic for the investigation and ascertainment of truth, and exegetical logic for the interpretation of documents of recognized authority—

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

are generally confounded. The spirit of adjustment [Vyavasthâ] which can harmonize all the texts scattered throughout the voluminous literature developed by the ancient Âryas of India, characterizes this school. At the present time, however, when the spirit of thorough investigation exists or ought to exist, and when aspirations for the advancement of the nationalities in India require the investigation of the philosophy and logic of our ancestors, we have thought it proper to present the reader with a translation of the systems of philosophy in India.

The authors of the six schools of philosophy.

We have begun with Jaimini's Mîmânsâ, for it embodies all the principles of exegetics with their application. All the philosophical writers in India follow the method of enunciating their principles and demonstrating their practical application at the same time. The Yoga-system treats of the means, method and the end of contemplation. Goutama exhaustively explains the system of the dialectics of discussion, as it once took place in an organized assembly. Kanâda develops formal logic, and a system of physics and metaphysics. Kapila devotes his work to the elucidation of the evolution-theory of the creation of the world and resembles the school which Darwin leads in England. Bâdarâyana attempts to prove that the spirit [Chaitanya] alone exists, and that the phenomena of nature are its forms, its modification, its developments, and its manifestations. As these systems are orthodox at least in form, they recognize the authority of the Vedas; and because they recognize the authority of the Vedas, they are as a matter of course obliged to have recourse to exegetics. Hence we have discussed

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

the subject of exegetics at length in this introduction for which we beg our readers will kindly excuse us.

Editor.

*Sad*darshana-Chintanikâ-Office, Puna,

1*st January*, 1877.

N. B. It is our intention to indicate the modern philosophical ideas of Europe in foot-notes as occasion arises either by way of comparison or contrast so that they may be popularized in this country, and that our country-men may adopt them. We need not state that modern philosophy and the material prosperity of Europe are inseparably connected.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावना.

जगद्विख्यात षड्दर्शनांचें अर्थविवेचन करण्याचा आमचा उद्देश आहे. महान् ग्रन्थकार व शास्त्रव्यवस्थापक केव्हां झाले, या गोष्टीचें दिग्दर्शन प्रथम केलें असतां बरें पडेल.

अध्यात्म ग्रंथकारांचा कालक्रम.

ऋषिजन आल्हादकारक सामे गात; मोठ्या उत्साहानें ईश्वराचें स्तवन करीत, व त्याची प्रार्थना करीत; सृष्टिस्वरूपाचें अवलोकन करून मनन करीत; आणि आनंदलहरी उत्पन्न करणाऱ्या सोमरसाचें पान करून, आनंदांत दिवस घालवीत; तेणेंकरून त्यांच्या मनामध्यें कल्पनेचे तरंग उठत, आणि त्यांच्या मुखांतून असे विचार बाहेर पडत कीं, जरी आज हजारों वर्षे होऊन गेलीं आहेत, तरी ज्यांना त्यांच्या लेखांचें रहस्य समजतें त्यांच्या चित्तास त्या विचारांनीं स्फुरण होतेंच होतें. पुढें ब्रम्हवादिजनांनीं ऋषींच्या लेखांचा अर्थविचार केला. या ब्रम्हवाद्यांचा विशेष आशय श्रौतक्रियेचें प्रतिपादन करण्याचा होता. यांनीं सर्व देशभर लोकांच्या मनाला एक तऱ्हेचें वळण लावून दिलें. नानाप्रकारचे विचार करण्याला जे प्रवृत्त झाले अशा आचार्यांनीं ब्रम्हवादिप्रतिपादित श्रौतकर्मांची व्यवस्था केली, व ऋषिप्रणीत सूक्तांचा अर्थविचार केला; निरुक्त शास्त्राची रचना केली; व्याकरण आणि अध्यात्मविद्येचे वृक्ष प्रफुल्लित दशेस आणिले; आणि अरण्यामध्यें जाऊन आत्मिक व जड सृष्टीच्या तत्वाचें मनन आणि निदिध्यासन करून आपल्या वेळच्या प्रगल्भ शास्त्रविचाराची व्यवस्था केली. नंतर बहुधा सर्व जगतामध्यें अतिश्रेष्ठ वाक्यार्थमीमांसक जो पतंजलि, अशा सारख्या गुरूंनीं विद्यार्थ्यांचें अध्यापन केलें. नंतर योगशास्त्राची सहजच प्रवृत्ति झाली. पिढ्याच्या पिढ्या मोठ्या श्रमांनीं ब्रम्हवादि व आचार्य यांणीं जें विचारमंदिर रचलें होतें, त्याचा पाया खणून टाकणारे बौद्ध लोक उत्पन्न झाले, आणि त्यांनीं आपलें वर्चस्व स्थापिलें. मग मोठ्या विद्वान् गुरूंमध्यें व बौद्धाचार्यांमध्यें विरोध पडला. तेणेंकरून उलट परिणाम घडून आले. कणाद, कपिल, आणि बादरायण, यांच्या सारख्या

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आचार्यांनीं, बौद्धाचार्यांशीं वाद करण्यासाठीं कंबर बांधली. त्यांनींहि आपल्या वेळच्या शास्त्रविचाराची व्यवस्था केली. हिंदुस्थानांतील सर्व लोकांचें प्रवर्तन करण्याविषयीं जणों चालक आत्माच असें जें धर्मशास्त्र व अध्यात्मविद्या, त्यावरील आच्छादन काढून त्यांची योग्यता प्रकट केली. अशी कालव्यवस्था करण्यास सबळ प्रमाणें आहेत, परंतु या गोष्टीचा विचार दुसऱ्या एकाद्या स्थलीं पूर्णपणें करूं-

आर्वाचीन हिंदुलोकांवर षड्दर्शनांचा संस्कार.

ह्या उत्तर आचार्यांच्या लेखाचें तात्पर्यवर्णन करण्याचें आमच्या मनांत आहे. ह्यांनीं गुणविभाग करून व जड द्रव्याविषयीं विचार करून, चैतन्य, जन्मान्तर, आणि मुक्ति, याविषयीं प्रतिपादन केलें; आणि त्यांनीं जें प्रतिपादन केलें त्याच प्रतिपादनाच्या अनुरोधानें सर्व भरतखंडभर लोकांची आज प्रवृत्ति आहे. पंजाबदेशांत गुरुनानकशाह, किंवा गंगातीरीं कबीर, किंवा बंगालदेशीं चैतन्य, किंवा महाराष्ट्रदेशीं तुकाराम, आणि ज्ञानोबा, अथवा गुजरायदेशीं स्वामिनारायण, अथवा मद्रास इलाख्यांत रामानुज, अशा लोकांचे लेख नीट पाहिले असतां असें दिसून येतें कीं, या सर्वांमध्यें उत्कंठित भक्तिरस एकच प्रकारचा; आणि कणादासारख्यांनीं ईश्वरसंबंधी ज्या ज्या प्रबुद्ध विचारांचें प्रतिपादन केलें, ते विचार या भक्तिरसामध्यें अंशतः उतरले आहेत. कपिलासारख्यांनीं ज्या अध्यात्मविद्येची व्यवस्था केली आणि प्रगल्भता साधली, ती अध्यात्मविद्याहि या भक्तिरसांत उतरली आहे, आणि बादरायणाच्या दर्शनापासून जो वेदांत उत्पन्न झाला तो वेदांतहि अंशतः या भक्तिरसामध्यें उतरला आहे. म्हणजे संक्षेपानें आम्हीं ज्या ज्या गोष्टींचें वर्णन केलें आहे, त्या सर्व हल्लींच्या हिंदूंत अढळतात; तथापि षड्दर्शनांचा पोंच मोठा, आणि तेथपर्यंत हल्लींचा हिंदु पोंहचला नाहीं; व अर्वाचीन युरोपी लोकांच्या शास्त्राला जो तजेला चढला आहे तितका तजेला असणारे सिद्धांत षड्दर्शनांमध्यें अढळतात, व जगतांतील कोणत्याहि लोकांना कमीपणा येणार नाहीं, असें प्रतिपादनहि ह्या षड्दर्शनांत आहे.

वाक्यार्थमीमांसा व तत्संबंधी न्याय यांविषयीं जैमिनिकृत मीमांसे-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाक्यार्थमीमांसेचें माहात्म्य.

मध्यें प्रतिपादन आहे. त्याचेंच भाषांतर आम्ही या षड्दर्शनचिंतनिकेंत प्रथम करणार, म्हणून षड्दर्शनचिंतनिके सारख्या मासिक पुस्तकांत वाक्यार्थमीमांसेचे मुख्य सिद्धांत कोणते आहेत, त्यांचा या प्रस्तावनेंत विचार करणें योग्य आहे.

ज्ञानाची वृद्धि करण्याकरतां व संशोधन करण्याकरितां वाक्यार्थमीमांसा मोठी उपयोगी पडते. मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं, ज्या ज्या गोष्टींची त्यास संवय झाली असते त्या गोष्टी त्याला अवडतात. व या स्वभावामुळेंच वाक्यार्थमीमांसेची प्रवृत्ति होते. एखादा मोठा नवीन विचार शोधून काढणारा कल्पक बुद्धिवान् पुरुष फार विरळा; परंतु दुसऱ्यांचे सिद्धांत सर्वांस घ्यावे लागतात. आणि हा विचार टाकावा किंवा घ्यावा असा सिद्धांत प्रथम करण्याकरतां प्रतिष्ठित व संभावित लोकांनीं आरंभीं आग्रह टाकावा लागतो; मग त्या विचाराची योग्यता किंवा अवश्यकता स्पष्ट दिसून येते. परंतु योग्यता किंवा अवश्यकता नीट जरी दिसून आली तरी अशा नवीन विचाराची प्रवृत्ति सर्व लोकांत सहज होत नाहीं. वाक्यार्थ–मीमांसेच्या कसोटीस हा विचार उतरला पाहिजे. पूर्वींच गृहीत अशा एकाद्या सिद्धांताचें आणि या कल्पनेचें साम्य दाखविलें पाहिजे. या कल्पनेचे सारे आकार मनांत भरले पाहिजेत. पुढील दृष्टांताच्या योगानें हें सर्व विवेचन वाचकांच्या लक्षांत येईल. आगस्तकोम नामें फ्रेंच पंडित होऊन गेला. त्यानें ऐतिहासिक उत्पत्तीवर कल्पना काढली. ती अशी कीं, प्रत्येक देशाचे किंवा प्रत्येक मनुष्याचे इतिहासांत तीन कल्प असतात, म्हणजे धार्मिक, आध्यात्मिक, आणि प्रबुद्धव्यावहारिक. ऐतिहासिक अनुगमाच्या संबंधानें ही कल्पना बरीच उपयोगी आहे; व हिची योग्यताहि बरीच आहे. परंतु युरोपखंडांतील स्थापितमतानुयायी लोकांनीं ह्या कल्पनेचा प्रथम त्याग केला, व एक प्रकारें ती खोटी, असेंहि म्हटलें. तथापि युरोपांतील शास्त्री-लोकांनीं जो जो तिचा अर्थ बसविला त्या त्या अर्थीं ती गृहीत झाली. यावरून वाक्यार्थमीमांसेच्या रचनेची योग्यता किती मोठी आहे हें दिसेल.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणखी सर्व पंडितांच्या किंवा शास्त्रजिज्ञासूंच्या हातून मोठ्या मोठ्या कल्पना शोधून काढणें कधींहि होत नाहीं; परंतु ह्या कल्पना काय आहेत हें समजून घेणें व त्यांस प्रगल्भ दशेस नेण्यास झटणें असा सर्व शास्त्रजिज्ञासूंचा धर्म आहे, म्हणून जी जी गोष्ट शास्त्रजिज्ञासूंस अढळेल तिचें तिचें अर्थपरिस्फोटन त्यांनीं केलेंच पाहिजे. मिल्लनामें कोणी नैयायिक इंग्लंड देशांत होऊन गेला, व त्यानें "धनविषयक व्यवस्था" या विषयावर ग्रंथ केला. वाक्यार्थमीमांसेची शक्ति ह्या ग्रंथकाराचे अंगीं होती म्हणून एवढें काम त्याच्या हातून झालें. जेव्हां जेव्हां त्याला एखादा मोठा सिद्धांत अढळे तेव्हां तेव्हां मोठ्या श्रमानें व बारिक नजरेनें तो त्याची वाक्यार्थमीमांसा करण्यास श्रम करी व जितक्या निरनिराळ्या तऱ्हेनें त्याच्या हातून होईल तितक्या निरनिराळ्या तऱ्हेनें सिद्धांतांचे तो आलोचन करी, व सिद्धांताच्या निरनिराळ्या संबंधांकडे लक्ष देऊन त्या सिद्धांताचें परीक्षण करी.

ज्या लोकांस ज्ञान प्राप्त करून घेण्याची इच्छा आहे त्यांनींहि वाक्यार्थमीमांसा अवश्य पाहिली पाहिजे. विशेष अध्ययनयोग्य कोणतेंही पुस्तक सहज समजत नाहीं. त्यांत ज्या ज्या कोटींची परीक्षा केली असते, त्या त्या कोटींचा जपून व व्यवस्थेनें वाक्यार्थ झाला पाहिजे. वाक्यार्थमीमांसेचे नियम योजले पाहिजेत. एकाच ग्रंथकारानें जीं निरनिराळीं वर्णनें केलीं आहेत, तीं एका ठिकाणीं जुळलीं पाहिजेत. व विषयपरीक्षणाच्या निरनिराळ्या प्रसंगीं जीं अनुमानें त्यानें काढलीं आहेत तीं नीट पडताळून पाहिलीं पाहिजेत. व त्याच्या सिद्धांताच्या सर्व आकाराची स्पष्ट दृढ परीक्षा झाली पाहिजे.

वाक्यार्थमीमांसा काय हें प्रापंचिक जनानींहि समजून घेणें अवश्य आहे. यास दृष्टांत. पहा, एखादा दस्तऐवज फार जपून तयार झाला, परंतु त्या दस्तऐवजावरून आपला कोणताहि हक्क शाबित करते वेळीं त्या कागदाचा अर्थ करावा लागतो. त्या अर्थाची योग्यता मोठी आहे. न्यायाधीशापुढें त्या कागदांतील वाक्यार्थाविषयीं मोठे मुद्दे निघतात, व ज्या ज्या प्रकारचा अर्थ शाबित होईल, त्या त्या प्रकारें कोडताचे मोठमोठे ठराव फिरतात. यावरून जैमिनीच्या मीमांसादर्शनाची

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

योग्यता मोठी आहे असें आम्हांस वाटतें. कारण, विद्याध्ययनाचें ती एक साधनच आहे, व हिंदुस्थानच्या इतिहाससंबंधानें तिचें माहात्म्य मोठें आहे. ही मीमांसा सर्व श्रौतधर्माचें भांडारच आहे व पुणेंकर रघुनाथ शास्त्री पर्वते आणि काशीकर राजाराम शास्त्री कार्लेकर ह्यांसारखे गुरु ज्या रीतीनें वादविवाद करीत, त्या रीतीचें मुख्य साधन मीमांसाच आहे. वेद, आरण्यकें, कल्पसूत्रें, पतंजलीचें महाभाष्य, किंवा माधवाचें वेदभाष्य, अशा विद्यामंदिराचें कुलूप काढण्याची ती जणों किल्लीच आहे. तार्किकांचे आणि धार्मिकांचे जे सिद्धांत आहेत; व हल्लीं हिंदु लोकांमध्यें ज्या सिद्धांतांची प्रवृत्ति आहे, त्यांचें ती उत्पत्तिस्थान आहे, म्हणून जैमिनीची मीमांसा सर्व प्रकारें विशेष अवलोकनीय आहे. षड्दर्शनचिंतनिकेच्या प्रारंभीं आमचें मुख्य काम जैमिनिकृत मीमांसेचें भाषांतर करण्याचें व त्याचें तात्पर्य निरूपण करण्याचें आहे. त्याचा आरंभ करण्या पूर्वीं भरतखंडांतील वाक्यार्थमीमांसेचा संक्षेपतः इतिहासवर्णन करतों.

वाक्यार्थमीमांसेचा विषय—सर्वमान्य मूलग्रंथ.

वाक्यार्थमीमांसेची योजना करण्यापूर्वीं कांहीं सर्वमान्य ग्रंथ गृहीत केले पाहिजेत. हे गृहीत मूलग्रंथ ऋषिप्रणीत वेदसंहिता होत. आतां, ऋषिजन हे मोठे प्रबळ विचारी होते. ध्याननिमग्न होऊन ते ईश्वराची प्रार्थना करीत, आणि सामगान करीत. त्यांच्या प्रार्थनेमध्यें आणि गानामध्यें गहन धार्मिक विचार असत. त्यांचें मन भक्तिभावानें सद्गदित होत असे, आणि संसारामध्यें सर्व प्रसंगीं ते ईश्वराचें साहाय्य मागीत. मनुष्याच्या मनांतील पापबुद्धीमध्यें आणि पुण्यबुद्धीमध्यें जो सतत झगडा चालला आहे त्याविषयींचें ज्ञान त्यांस उत्तम असे. व सद्गदित हृदयानें ते ईश्वराचा धावा करीत, कीं "हे ईश्वरा! आमची पुण्यबुद्धि प्रबळ कर, आणि पापबुद्धीचा पराजय करून पुण्यबुद्धीला जय दे." ईश्वर एकच होता असें ते मानीत. तेणेंकरून त्यांच्या मनास स्फुरण चढत असे. आत्मा अनश्वर आहे असें त्यांचें मत असे. व पूर्वज ज्या सुकृतपथानें गेले, त्या सुकृतपथाचें मोठ्या आल्हादानें ते वर्णन करीत. त्यांचें स्वर्गवर्णन मोठें शुद्ध असून अंतःकरणास सद्गदित करणारें आहे

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हे ऋषिजन या भरतखंडांतील शुद्ध सिद्धांताचें मूलप्रतिपादक होत. तो शुद्ध सिद्धांत कसा म्हणाल, तर परमेश्वराच्या ठायीं निरंतर वास करणारा. हा शुद्ध सिद्धांत ऋषींच्या दृष्टीस पडला आणि त्यापासून जगतांत प्रकट झाला. अशा प्रकारचे ऋषिजन भरतखंडांतील लोकांच्या मनाचें प्रवर्तन अजून करतात. कारण कीं, आपल्या मतांचें उत्पत्तिस्थान ऋषिजनच असें षड्दर्शनकार मानतात, व त्याप्रमाणें त्यांची योग्यता आहे असें समजतात. ही गोष्ट भरतखंडांत इतकी गृहीत झाली आहे, कीं लोकमान्य पण ऋषिविरुद्ध अशाहि गोष्टी ऋषिप्रणीत आहेत असें लोक मानतात; आणि आपली सिद्धांतसरणि स्थापित करण्याकरितां ऋषींनें उच्चारिलेलें भलतीकडील एखाद्या वचनाचें प्रतिपादन करतात. या कारणामुळें भरतखंडामध्यें वाक्यार्थमीमांसा विशेष प्रगल्भ दशेस पोंचली आहे.

आधिभौतिक वाक्यार्थमीमांसा.

ब्राह्मणनामें ग्रंथकार ऋषिजनांच्या मागून झाले. त्यानीं प्रथमच वाक्यार्थमीमांसेची योजना केली. आपणास ते ब्रह्मवादी असें बहुधा म्हणवीत असत. ब्रह्मशब्दाचा अर्थ संचितविद्या असें ते समजत. ऋषिजनांचा ब्रह्मशब्दाचा अर्थ ईश्वराची प्रार्थना अथवा ईश्वरपर गान असा असे. पुष्कळ दिवसपर्यंत प्राचीन जनांची बुद्धि सद्गदित होत असे, आणि त्यांच्या चित्तवृत्तीस स्फुरण चढत असे, एवढी ब्रह्मशब्दाची शक्ति असे, म्हणून प्रसंगानुराधानें श्रौतकर्मसंबंधी सिद्धांताचें प्रतिपादन करण्याकरतां ऋषिप्रणीत मंत्रांचे अर्थ करून ब्रह्मवाद्यांनीं आपलें मत स्थापन केलें त्यांच्या वाक्यार्थसरणीस आधिभौतिक वाक्यार्थमीमांसा असें नांव दिलें आहे; कारण मंत्राचा अर्थ करतांना त्यांत कांहीं तरी श्रौतकर्म आहे असें त्यास वाटे; आणि सूर्यभ्रमणासारख्या एखाद्या स्वाभाविक सृष्टिस्वरूपाचें कथन करून, अथवा लोकांच्या एखाद्या चालीचें वर्णन करून, अथवा सर्वमान्य विद्येतील कांहीं गोष्टींचें अवलंबन करून ते वाक्यार्थ करीत. बाह्य जगताच्या आकारावरून त्याचे सर्व दृष्टांत बसविलेले असत, व असे दृष्टांत देण्यांतच काय तो त्यांचा मुख्य बाणा. ब्राह्मणनामें कोणताहि ग्रंथ घेतला असतां श्रौतकर्माच्या अनुरोधानें ऋषिप्रणीत मंत्रांचा अर्थ त्यांत अढळतो. ऐतरेय, तैतिरीय, किंवा शतपथ ब्राह्मण

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांतील कोणताहि अध्याय पाहिला असतां त्यांची वाक्यार्थमीमांसासरणि लक्षांत येईल. परंतु तीन गोष्टी विशेष लक्षांत बाळगल्या पाहिजेत. प्रथम, ते निरुक्तविचार फार करीत. दुसरी, पूर्वी काष्ठमंथनानें अग्नि ब्रह्मवादी उत्पन्न करीत म्हणून यज्ञकर्मीं प्राणोत्पत्तीचे प्रकार आहेत असें त्यांस वाटे. तिसरी, देव आणि दैत्य यांतील युद्धकथांचें ते विशेष वर्णन करीत. आधिभौतिक वाक्यार्थमीमांसेच्या संबंधानें, निरुक्त हा त्या मीमांसेचा अध्यात्म आकार आहे. सृष्टिस्वरूप हा तिचा भौतिक आकार आहे आणि कथा हा तिचा ऐतिहासिक आकार आहे. प्रत्येक शास्त्राचे हे तीन आकार असतात हें सांगणें नको. या आधिभौतिक वाक्यार्थमीमांसेमध्यें पंडितजन पिढ्यांच्या पिढ्या निमग्न झाले होते. आपल्या श्रौतसिद्धांतांचें प्रतिपादन करून ते लयास गेले.

आध्यात्मिक वाक्यार्थमीमांसा.

या आधिभौतिक वाक्यार्थमीमांसेचा ब्रह्मवादिजनांना सहजच कंटाळा आला. श्रौतसिद्धांत इतके ऐहिक वाटत कीं, त्यांचें प्राबल्य चालेना म्हणून ब्रह्मवादिजन जाऊन त्यांच्या ठिकाणीं दुसरे पंडित झाले. ते आरण्यकें ज्या वेळीं झालीं त्या वेळचे आचार्य होत. आतां वाक्यार्थमीमांसेची पद्धति बदलली. आध्यात्मिक रीतीनें मुळमंत्राचा अर्थ होऊं लागला. जेणेंकरून पंडितांस नेहमी स्फुरण येतें अशा आत्मिक स्वरूपाकडे लक्ष जाऊं लागलें. आत्मा, मनाच्या शक्ति, आणि चैतन्य, यांविषयीं वादविवाद व विचार होऊं लागले. जडसृष्टिस्वरूपाच्या विचारांनीं आत्मिक विचाराकरितां मार्ग तयार करून ठेवला होताच. पदार्थांच्या गुणांचें विवेचन होऊं लागलें या वाक्यार्थमीमांसेचें मुख्य स्वरूप हें असें कीं, जें जें कांहीं आहे त्याचें तत्व कोणास न जुमानतां उत्कंठेनें शोधून काढायाचें. आतां ब्रह्म म्हणजे प्रार्थना किंवा संचितज्ञान हा अर्थ नष्ट झाला. त्या शब्दाचें अर्थांतर झालें, व मूलतत्व असा त्याचा अर्थ झाला. ग्रीक लोकांमध्यें सर्व पदार्थांचें तत्व शोधण्याची आवड एक वेळीं माजली होती; आणि सर्व अध्यात्मविचारांमध्यें तिची प्रवृत्ति झाली. मग ग्रीकहि तत्व काय असा शोध फार करीत. परंतु त्यांची पद्धति भिन्न असे ते अग्नि किंवा वायु असा एखादा पदार्थ घेत, आणि सर्व जडसृष्टि त्याचा

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आकार आहे, असें सिद्ध करीत. त्यांचे तार्किक सिद्धांतहि स्वतांचेच असत. आणि जें जें त्यांना दिसे तें तें एकाच वस्तूचे निरनिराळे आकार आहेत असें समजून, ते त्या आकारांची उपपत्ति शोधण्यास लागत. भरतखंडांतील प्राचीन आर्य कांहीं ऋषिप्रणीत वचनें घेत, आणि जडाचें आणि चैतन्याचें तत्व काय हें त्या वचनांच्या अर्थावरून बसवीत. ग्रीक लोक हे सृष्ट जड पदार्थांचें विवेचन करीत. परंतु गुण अथवा शक्ति अथवा अनुगत तत्वें ह्यांचा विचार भरतखंडांतील प्राचीन आर्य करीत. ग्रीक ज्या स्थितींत होते तिच्यामुळें सहजच त्यांना पदार्थांच्या दृश्य गुणांचा विचार करावा लागे; आणि साधर्म्यवैधर्म्यांवरून आपलें अनुमान सिद्ध करावें लागे. भारतखंडीय प्राचीन आर्य लोक फक्त सोपपत्तिक तत्वविचार करीत. ग्रीक लोकांच्या विचारांपासून सृष्टपदार्थविज्ञान उत्पन्न झालें; आणि प्राचीन आर्यांचे विचार अति सूक्ष्म व गहन असत. तेणेंकरून त्यांच्या मनांची धांव मोठी असे. ही धांव तरी कशी म्हणाल तर सर्व संसाराचा ते त्याग करीत आणि पारमार्थिक चिरंतन शांति आणि सुख ह्यांचा आकार जणों त्यानां मूर्तिमंत दिसे, आणि ते आत्मिक संसारांत गढून जात. हळू हळू ग्रीक लोक जड सृष्टि आणि चैतन्य, यांच्या धर्मांचा विचार करूं लागले आणि जरी वारंवार त्यांचे श्रम व्यर्थ जात व त्यांची मति गुंग होई तथापि त्यांनीं पदार्थांचें सोपपत्तिक कार्यकारणभाव जाणण्याचा क्रम चालूं ठेवला. ज्या तत्वज्ञानाचे योगेंकरून शांति आणि सुख प्राप्त होतें तें तत्व जाणण्याविषयीं भरतखंडांतील प्राचीन आर्य झटत. त्यापासून ध्यानमार्ग म्हणजे त्याचा उद्देश व त्याचीं साधनें दाखविणारें योगशास्त्र उत्पन्न झालें. इकडे कांहीं आचार्य ध्यानमार्गांत निमग्न झाले असतां दुसऱ्या कांहीं आचार्यांनीं व्याकरणादि शास्त्रांवर श्रम केले. या श्रमांच्या योगानें त्याच वेळीं व त्यामागून अध्यात्म विचाराच्या निरनिराळ्या प्रकारची मोठी गर्दी उडाली. ज्यांचें नांव ऐतिहासिक असे कांहीं पंडित उत्पन्न झाले, व ते ऋषिप्रणीत वचनांचा अर्थ आपल्याच रीतीनें लावून आपलेच कांहीं सिद्धांत प्रतिपादन करूं लागले. दुसरे कांहीं पंडित निघाले त्यांनीं भाषेच्या परिस्फोटनाविषयीं विचार करून मूळमंत्राचे अर्थ करण्याची आपलीच प्रवृत्ति चाल-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विली. त्या पंडितजनांत दोन प्रकार असत. एक वैयाकरण, दुसरे नैरुक्त. कांहीं आचार्यांनीं श्रौतकर्माच्या मीमांसेकडे लक्ष दिलें. हे स्वतांस याज्ञिक म्हणवीत. हेहि मूळमंत्राचा अर्थ आपल्या तऱ्हेनें करीत. स्थलसंकोचामुळें आचार्यांनीं केलेल्या निरनिराळ्या उद्योगाचें निरूपण येथें करवत नाहीं. परंतु त्यांनीं वाक्यार्थमीमांसेची योजना करून ती प्रगल्भ दशेस आणिली, इतकें म्हणणें पुरें आहे. या आचार्यांनीं असा झटून उद्योग केला कीं, तेणेंकरून वाक्यार्थमीमांसा हें शास्त्र रूपास आलें.

वाक्यार्थमीमांसकाविषयीं उदाहरण.

आधिभौतिक वाक्यार्थमीमांसादिप्रकरणांचें जें आम्हीं विवेचन केलें आहे, त्याचें दृष्टांतानें थोडें निरूपण करणें अवश्य आहे. ऋग्वेदसंहितेंतील प्रथम मंडळाचें १६४ वे सूक्तांतील ४५ वे मंत्राचा विचार करूं या.

चत्वारि वाक्परिमिता पदानि तानि विदुर्ब्राम्हणा ये मनीषिणः ॥
गुहा त्रीणि निहिता नेङ्गयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति ॥

या ऋचेचें भाषांतर मराठींत केलें आहे तें असें—

॥ पदें वाचेचीं नियमित चार ॥ जाणती तीं थोर ब्राम्हण ज्ञाते ॥
॥ हृदयीं ठेविली तीन न जाणती, ॥ मनुष्यें बोलती चवथें मात्र ॥

" नेङ्गयंति " या पदाचे अर्थाविषयीं माधवाचें व आमचें मत भिन्न पडतें. या भेदाचीं कारणें अशीं आहेत कीं, " नेंगयंति " याचा चेष्टा असा अर्थ केला असतां वाक्यभेदरूप दोष येतो. दुसरें, या ऋचेंतील स्वारस्यहानि होते. तिसरें, अन्वय बिकट होतो; चवथें, मनुष्यें आणि मनीषिण ब्राम्हण यामध्यें विरूद्धोपन्यास आहे तो दुर्बल होतो.

आतां या ऋचेचा अर्थ निरनिराळे आचार्य निरनिराळ्या रीतीनें करितात. वेदवादी म्हणतात कीं, चार पदें म्हणजे " भूर्, भुवः, स्वः, " या तीन व्याहृति आणि " ओं " हा प्रणव. ब्रह्मवादी आधिभौतिक वाक्यार्थमीमांसेच्या साहाय्यानें असें म्हणतात कीं, " चार प्रकारची वाणी उत्पन्न

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाली. तिचे तीन प्रकार या तीन लोकीं अढळतात, व चवथा प्रकार पशूंत आहे. भूलोकांवर प्रथम प्रकार अग्नि आणि रथंतरसाम ह्यांमध्यें अढळतो. दुसरा प्रकार अंतरिक्षामध्यें आणि वामदेव्यसामामध्यें अढळतो. तिसरा प्रकार द्युलोकीं असून सविता आणि बृहत्साम यामध्यें अढळतो. चवथा प्रकार विद्युतेमध्यें आणि पशूंमध्यें आहे. आणि याशिवाय जी वाणी राहिली ती ब्राम्हणामध्यें आली, म्हणून मनुष्यांची आणि देवांची वाणी ब्राम्हण बोलतात." प्रकृत ऋचेचा हा अर्थ ब्राम्हणग्रंथांत दिला आहे. तो श्रौतकर्मव्यवस्थेच्या अनुरोधानें बसविला आहे. ऐतिहासिकपंडित ह्याच ऋचेचा अर्थ असा करितात कीं, "सापांची वाणी, पक्ष्यांची वाणी, क्षुद्र जीवजंतूंची वाणी, आणि नित्य मनुष्यें बोलतात ती चवथी व्यावहारिकी वाणी, हीं चार वाणीचीं पदें होत." ऐतिहासिकपंडित कोणत्या पद्धतीवर शास्त्रविचार चालवीत हें त्यांच्या ह्या ऋचेच्या अर्थावरून कळतें. हा अर्थ विशेष लक्षांत ठेवण्याजोगा आहे. वैयाकरणांस वाणीचे चार पाद कोणते म्हणून विचारलें तर ते म्हणतात कीं, "नामें, क्रियापदें, उपसर्ग, आणि निपात, हे आहेत." वाणीचे चार पाद नैरुक्तांच्या मताप्रमाणें म्हटले तर असे आहेत कीं, "ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि मनुष्याची व्यावहारिकी भाषा." याज्ञिकजनांच्या मताप्रमाणें वाणीचे चार पाद हे आहेत कीं, "मंत्र, कल्प, ब्राम्हण आणि मनुष्यांची व्यावहारिकी भाषा." ज्या आचार्यांनीं अध्यात्म वाक्यार्थमीमांसेची विशेष योजना केली त्या आत्मवादी आचार्यांनीं या ऋचेचा अर्थ असा केला आहे कीं. "परा, (म्हणजे अत्युच्च) पश्यन्ती, (म्हणजे पाहणारी) मध्यमा (म्हणजे मध्यें असणारी) आणि वैखरी (म्हणजे विशेष स्वरघटित झालेली) अशी चार प्रकारची वाणी आहे. त्यांत जेव्हां वाणीचा आकार अंतर्यामीं उत्पन्न होतो तेव्हां ती परा; पुढें तो आकार जेव्हां स्पष्ट बनतो तेव्हां तिचें पश्यंती हें रूप होतें. जेव्हां तो आकार बुद्धीमध्यें म्हणजे निश्चय करणाऱ्या मनःशक्तीमध्यें उठतो, आणि उच्चारघटित होतो, तेव्हां तिचें रूप मध्यमा; आणि ताल्वादिस्थानांतून तो उच्चार बाहेर पडला म्हणजे जो वाणीचा आकार होतो त्याचें रूप वैखरी."

आतां ज्या ऋचेचें पूर्वीं आम्हीं शब्दशः भाषांतर केलें आहे

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या ऋचेच्या खऱ्या अर्थाचा निश्चय वाक्यार्थमीमांसेच्या साहाय्यानें केला पाहिजे, म्हणजे निरनिराळ्या संबंधानें साहचर्यन्यायाची योजना केली पाहिजे. प्रकरणाचे निरनिराळे भेद आहेत त्यांची योजना केली पाहिजे. जैमिनीच्या मीमांसेंत स्थानविषयाचें निरूपण केलें आहे. त्याची योजना केली पाहिजे. आणि लैंगिकन्यायप्रयोगाची योजना केली पाहिजे. आचार्यांनीं मीमांसेचीं तत्वें शेंकडो वर्षें श्रम करून प्रगल्भ दशेस आणिलीं, व जैमिनीनें त्यांची व्यवस्था केली, या तत्वांची जपून योजना केली असतां आम्ही वर्णन केलेल्या मंत्राचा एकच अर्थ होणें अवश्य आहे.

वाक्यार्थमीमांसा-न्याय.

वाक्यार्थमीमांसेची अनुमानपद्धति प्रगल्भदशेस हळू हळू आली, कांहीं पंडित वाक्यार्थ करण्याचे कामीं गुंतले असतां, दुसरे कांहीं पंडित वाक्यार्थमीमांसेच्या सिद्धांताचा शोध लावण्यास प्रवृत्त झाले. पंतजलिकृतमहाभाष्यामध्यें वाक्यार्थमीमांसेचीं प्रधान तत्वें प्रकट केलीं आहेत, व त्यांवर वाद केला आहे, आणि जपून त्यांचें वर्णन केलें आहे. कांहीं शास्त्रीय ग्रंथांची योग्यता सर्वमान्य होऊन त्यांकडे लोकांचें लक्ष लागूं लागलें होतें आणि त्यांच्या लौकिकावरून त्यांच्याविषयीं पूज्य बुद्धि उत्पन्न झाली होती. दृष्टांताकरतां पाणिनिकृत अष्टाध्यायी घ्या. गुरुनामक पंडितजन तिचा वाक्यार्थ करण्याविषयीं उद्युक्त झाले. त्यांच्या न्यायपद्धतीचें मुख्य तत्व हें होतें कीं, ज्या ग्रंथकाराच्या वचनांचा अर्थ करावयाचा, त्याच्या वचनांवरूनच अनुमान काढून ते सिद्धांत बनवीत, आणि याच प्रकारें त्याच्या वचनांचा त्यागहि करीत. अंशतः मोठ्या सूक्ष्म रीतीच्या अनुमानांनीं आणि अंशतः लोकरूढीवरून ते कांहीं परिभाषा बसवीत. या न्यायपद्धतीचें माहात्म्य मोठें आहे. पतंजलीचें महाभाष्यांत या न्यायपद्धतीचे मुख्य सिद्धांत अढळतात. या न्यायपद्धतीमध्यें स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य हे दोन्हीहि गुण एकदम अढळतात, म्हणजे ही न्यायपद्धति सुधारणुकेस व रूढीस एकदम अनुसरे. सर्वमान्य ग्रन्थाच्या वचनाचा त्याग करून ती स्वातंत्र्य दाखवी. परंतु ज्या ग्रंथकाराच्या वचनाचा त्याग करायाचा त्याच ग्रंथकाराच्या लेखावरून

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुमान काढून ती त्याग करण्यास प्रवृत्त होई. म्हणून ह्या न्यायपद्धतीचे अंगीं पारतंत्र्य असे. परीक्षितग्रंथकार चुक्या करतो, असें दाखविल्यानें सुधारणुकेस साहाय्य होत असे, परंतु त्या ग्रंथकाराच्या अनुरोधानें ही न्यायपद्धति स्थापित झाली आहे, असें दाखवून ती रूढीला अनुसरणाऱ्या लोकांचें मन आपल्याकडे ओढून घेत असे. ज्ञापन आणि प्रत्याख्यान हे दोन शब्द आम्हां सर्व जनांस माहित आहेत. त्यावरून ह्या पद्धतीच्या तत्वाचें निरूपण होतें. अशा प्रकारचा विचार करण्याचा लोकांस अभ्यास झाल्यापासून काय परिणाम झाला हें सहजच लक्षांत येईल. बौद्धलोक उत्पन्न झाले. त्यानीं तर्कसाधनें आणि युद्धसामग्री स्वतांचीच काढिली आणि प्राचीन शास्त्रांचा पराजय मांडला.

विचार आणि पद्धतियांचें अन्वंतर.

इतक्यांत आचार्यांनीं जें अध्यापन केलें, तेणेंकरून बुद्धींत वैशद्य उत्पन्न होऊन विचारशक्तीस नवेच अंकूर फुटूं लागले. ज्या स्वातंत्र्यानें ऋषिजनांचीं आणि ब्रह्मवादिजनांचीं वचनें आणि त्यांचे इतिहास ह्या दोहोंसहि गुंडाळून ठेविलें, असें निर्भय स्वातंत्र्य उत्पन्न झालें. आध्यात्मिक वाक्यार्थमीमांसेच्या साहाय्यानें बौद्धाचार्य पुढें सरकले, आणि आपले सिद्धांत प्रतिपादन करण्यामध्यें जी त्यांनीं धैर्यशक्ति दाखविली, तेणेंकरून त्यांच्या वेळच्या पंडितांस चमत्कार वाटला. ते असें म्हणत कीं, मनुष्य आणि त्याच्या शक्ति ह्यांच्या योगानें सृष्टिस्वरूपसंबंधी सर्व दर्शनांची उपपत्ति होते. त्यांची वादविवाद करण्याची पद्धति व्यवहार व अध्यात्मशास्त्र ह्यांस अनुसरून असे. ते गृहस्थलोकांच्या आचरणाकडे आणि उत्कर्षाकडे विशेष लक्ष देत. हे गृहस्थ केवळ उपासक आहेत असें ते समजत. आणि बौद्ध उपदेशकांच्या आज्ञा पाळणें, त्यांस मान देणें, आणि शुद्धाचरण करणें इतके गृहस्थांचे धर्म आहेत, असें ते मानीत. हा त्यांच्या उपदेशांतील व्यवहारांश होय. बौद्धाचार्य स्वतः सर्व जन्मभर विहारांत राहत. व त्या ठिकाणीं आत्मिक व मोठें तीव्र असें त्यांस आचरण करावें लागत असे; म्हणून आपल्या वादविवादांत आणि व्याख्यानांत अध्यात्मविद्येची योजना करण्याचा त्यांस अभ्यास झाला. ईश्वरप्रणित श्रुति व तिचें माहात्म्य

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ते एकीकडे गुंडाळून ठेवीत. ब्राम्हण सर्व जन्मभर जे यज्ञ करीत, आणि ज्या यज्ञांचे योगें सर्व देशभर केव्हां केव्हां उत्साह उत्पन्न होई, त्या यज्ञांची ते निर्भर्त्सना करीत; कारण श्रौतकर्मांच्या बदलां सोत्पत्तिक व्यावहारिक धर्म ते सांगत. ते शाब्दप्रमाण मानीत नसत. ते फक्त प्रत्यक्ष, अनुमान आणि उपमान, हीं प्रमाणें मानीत. आणि उपमान देखील प्रत्यक्षांत किंवा अनुमानांत ते मोडीत. कारण लैंगिक उपमानामध्यें आणि आधिभौतिक वाक्यार्थमीमांसकांचे उपमानामध्यें भेद आहे. हे मीमांसक अभियज्ञगाथांचा उपयोग करीत. आणि स्थाप्य अनुमान, जनरूढि, आणि श्रौतसिद्धांत, यांमध्यें संबंध काढून त्यावरून उपमानें योजीत.

प्राचीन पद्धति व विचार यांचें उज्जीवन.

उत्तर आचार्यांनीं बौद्ध लोकांशीं विरोध केला, नंतर त्यांवर चाल केली आणि भरतखण्डांतून त्यांना समूळ काढून टाकण्याविषयीं सामग्री सिद्ध केली. येणेंकरून उत्तर आचार्यांमध्यें अध्यात्मविद्येचें मोठें उज्जीवन झालें. या उत्तर आचार्यांच्या ग्रंथांचें विवेचन आम्ही करणार म्हणून प्रसंगवशात् त्यांच्याविषयीं आम्हांस पुष्कळ वर्णन करावें लागेल.

अर्वाचीन चालू वाक्यार्थमीमांसापद्धति.

अलीकडे जिची योजना आमचे शास्त्री करितात त्या अर्वाचीन वाक्यार्थमीमांसेचें निरूपण केल्यावांचून ही प्रस्तावना पुरी करितां येत नाहीं. ह्या अर्वाचीन वाक्यार्थमीमांसेचा मुख्य सिद्धांत असा आहे कीं, ज्या ज्या सध्यां लोकांमध्यें रीति भाती चालू आहेत त्या सर्व योग्य आहेत, आणि त्यांचें प्रतिपादन करण्याकरितां निरनिराळ्या वाक्यार्थमीमांसकांचे सिद्धांत ते गोंधळून टाकतात. ही पद्धति शंकराचार्यांचे वेळीं उत्पन्न झाली आणि त्यांच्या शिष्यवर्गांनीं कांहीं कालपर्यंत मोठें सामर्थ्य प्रकट केलें. लैंगिक अनुमानाचे दोन भेद आहेत. एक प्रकार असा कीं, प्रमाण म्हणजे काय याचा शोध करून सत्याचा निश्चय करणें आहे. आणि दुसरा गृहीत व मान्य ग्रंथांचा वाक्यार्थ करणें आहे. या दोन्ही भेदांचा बहुधा गोंधळ होतो. या पंडितांचा मुख्य व्यावर्तक गुण काय आहे? हजारों वर्षेंपर्यंत भरतखंडांतील प्राचीन आर्यांनीं जी

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विद्या प्रगल्भ दशेस आणली, त्या विद्येभर विस्तृत झालेलीं जीं जीं वचनें अढळतात, त्या सर्व वचनांची एकवाक्यता करण्याकरितां व्यवस्था करणें हा होय. परंतु आतां विशेष संशोधन करण्याचा आग्रह लोकांमध्यें आहे, किंवा निदान असावा तरी, आणि सार्वजनिक उन्नति व्हावी म्हणून लोकांच्या मनाची धांवहि मोठी आहे. याकरितां आमच्या पूर्वजांची जी लैंगिकप्रयोगपद्धति व अध्यात्मविद्या त्यांचा शोध करणें विशेष अवश्य आहे. म्हणून आम्ही ह्या षड्दर्शनचिंतनिकेच्या द्वारा भरतखंडांतील षड्दर्शनांचें भाषांतर आणि तत्वें हीं वाचकांस सादर करितों. त्यांनीं कृपा करावी, अशी आमची विनंति आहे.

षड्दर्शनकार.

जैमिनीच्या मीमांसेमध्यें वाक्यार्थमीमांसेचीं सर्व तत्वें असून त्यांची लापिकाहि आहे म्हणून आम्ही प्रथम जैमिनीची मीमांसा घेतली आहे. भरतखंडांतील सर्व अध्यात्मशास्त्रकारांची पद्धति अशी आहे कीं, ते आपल्या सिद्धांताचें विवेचन करून तत्काळींच आपल्या सिद्धांताची प्रायोगिक लापिका करून दाखवितात. योगशास्त्रामध्यें ध्यानाचें साधन, सिद्धि, व हेतु, ह्यांचें वर्णन केलें आहे. एखाद्या पंडितसभेंत ज्या रीतीनें वादविवाद व्हावयाचा ती वादविवादाची रीति तार्किकप्रबंधासह गौतमाचार्यांनीं पूर्ण वर्णिली आहे. अध्यात्मविद्या, आणि आधिभौतिक विद्या यांचें निरूपण करतांना न्यायप्रयोगाची पद्धति कणादाचार्यांनीं प्रगल्भ दशेस आणिली आहे. आणि जसा डार्विन इंग्लंडदेशीं प्रधान आचार्य होऊन बसला आहे, आणि त्याचे अनुयायी लोक आहेत, त्याप्रमाणेंच कपिलाचार्यांनीं आपल्या ग्रंथांत जगदुत्पत्तीचें विवेचन केलें आहे. चैतन्यच काय तें मुख्य आहे, आणि सृष्टीमध्यें जीं जीं दर्शनें घडतात तीं तीं त्या चैतन्याचे आकार, विकार, प्रकार आणि प्रकटन आहेत, असें सिद्ध करण्यास बादरायणाचार्य प्रवृत्त झाले. आतां बाह्य दृष्ट्या तरी हीं सर्व दर्शनें स्थापित आचारास अनुसरून आहेत, म्हणून या दर्शनांमध्यें वेदाचा अधिकार पूर्ण मानला आहे. आणि त्यांनीं वेदाचा अधिकार मानला आहे, म्हणून त्यांना वाक्यार्थमीमांसेचें अवलंबन करावेंच लागलें. याच कारणास्तव या प्रस्तावनेंतच आम्ही वाक्यार्थमीमांसेच्या इतिहासाचा

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बराच विचार केला आहे. इतकी लांब प्रस्तावना लिहिल्याबद्दल आमचे वाचकांनीं आम्हांस क्षमा करावी, अशी विनंति आहे.

विशेष सूचना. युरोपी लोकांमध्यें पदार्थविज्ञान म्हणजे आधिभौतिक विचार फार झाला आहे, आणि हा विचारच त्यांच्या उत्कर्षाचें बीज आहे. आधिभौतिक आणि अध्यात्म ज्ञानाचा निकट संबंध आहे; आणि या दोन्हींविषयीं षड्दर्शनांत विशेष सिद्धांत आहेत. या सिद्धांतांचें विवेचन करतांना प्रसंगवशात् युरोपी लोकांच्या आधिभौतिक आणि आध्यात्मिक सिद्धांतांचा उपन्यास यथाशक्ति करूं; आणि हा उपन्यास युरोपी लोकांचें ज्ञान आपल्या देशांत येण्यास साधनीभूत व्हावा अशी निदान आमची इच्छा तरी आहे.

ग्रंथकर्ता.

षड्दर्शनचिंतनिका—आफिस, पुणें,
१ जानेवारी, १८७७.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

॥ मीमांसादर्शनम् ॥

(मूलपदानुवृत्तिसहितम्.)

सूत्राणि.

॥ अथातो धर्मजिज्ञासा ॥ १ ॥

पदानि । अथ, अतः, धर्म-जिज्ञासा ॥

पदार्थः । अथ=अनन्तरं । अतः=एतस्मात् कारणात् । धर्मजिज्ञासा= धर्मस्य जिज्ञासा (धर्माय जिज्ञासेति शबरः) । जिज्ञासा=ज्ञातुमिच्छा ॥

वाक्यार्थः । अनन्तरमेतस्मात् कारणात् धर्मस्य ज्ञातुमिच्छा ॥

भावार्थः । वेदाध्ययनानंतरं वेदवाक्यविचारद्वारा धर्मो जिज्ञासितव्यः ॥

प्रथमं ग्रन्थपद्धतिं दर्शयामः ॥ अत्र मूलसूत्रे स्फीतैरक्षरैर्लिखिते पदानि विभज्य पदार्थान् वाक्यार्थं भावार्थं च वर्णयामः। कुण्डलिकया स्पष्टाक्षरैश्च पद्धतिमिमां दर्शयामः ॥ पुनरपि यत्र यत्रानुवृत्तिःक्रियते ॥ तत्र तत्र कुण्डलिकया तां दर्शयिष्यामः ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

षड्दर्शनचिंतनिका.

मीमांसादर्शन.

१. आतां येथून धर्मविवेचन.

१. षड्दर्शनादिग्रंथांची प्रारंभ करण्याची सरणि एकच आहे. त्यांत प्रारंभीं "अथ" शब्द येतो, व टीकाकारांनीं "अथ" शब्दाच्या अर्थसामर्थ्याचें पुष्कळच विवेचन केलें आहे. कोणी "अथ" शब्द मंगलवाचक आहे असें म्हणतात; व मंगल केल्यावांचून ग्रंथांस आरंभ करूं नये असा सिद्धांत करून मंगलकथन व ग्रंथपरिसमाप्ति यांचा कारणकार्यसंबंध बसविण्यास व्यवस्था करितात. अशा भानगडींत न पडतां आम्ही 'अथ' शब्दाचा अर्थ 'आतां' असा केला आहे, व 'अथ' शब्दाचें सामर्थ्य फक्त आरंभसूचक आहे, असें आम्हांस वाटतें. "येथून" याहि पदाचें सामर्थ्य अशाच प्रकारचें आहे. या दोन पदांपासून अधिकारी कसा असावा याविषयीं ग्रंथकार अनुमानें काढतात. तशीं अनुमानें काढण्याची गरज आम्हांस वाटत नाहीं. ही गोष्ट स्पष्टच आहे कीं, अधिकारावांचून कोणत्याहि विषयाचें अध्ययन कोणाचेहि हातून होणार नाहीं. पुनः वृत्तिकार जिज्ञासापदाचा यौगिक अर्थ घेतात. असें

MÎMÂNSÂ-PHILOSOPHY.

1. Now then the investigation of duty.

1. All the schools of philosophy begin their investigation in the same manner. The first word is *atha*. The commentators always enlarge on the power of the word *atha*. Some maintain that the word *atha* signifies *auspiciousness*; that it is a rule not to begin a literary or philosophical work without propitiation; that propitiation at the beginning and the completion of the work are connected as cause and effect. We cannot sanction this interpretation of the word. We cannot approve of a disquisition on this sense of the word. We believe it means only *now*. The power of the word *atha* simply consists in showing a beginning. The signification of *atas* is *then* for the same reasons. The commentators infer from the use of these two words what sort of a person is qualified to learn a particular system of philosophy. We do not believe any inference is warranted by these words. It is plain enough that no person can learn anything without some previous preparation and some qualifications. The word *jijnâsâ* is etymologically interpreted. It then

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

॥ चोदनालक्षणोऽर्थो धर्मः ॥ २ ॥

पदानि । चोदना–लक्षणः, अर्थः, धर्मः ॥

पदार्थः । चोदना=यत् प्रवर्तयति तत् । लक्षणं=लक्ष्यते नाम साहचर्यं दर्श्यते येन तत् । अर्थः=इतिकर्तव्यता । धर्मः=(लक्षणेन-निरूपितः)

वाक्यार्थः । धर्मो नाम प्रवर्तकलक्षितेतिकर्तव्यता ॥

भावार्थः । यत्र यत्र वेदप्रणीतं प्रवर्तकं वचनमस्ति तत्र तत्र सहचरितेतिकर्तव्यता प्राप्नोति । तस्या नाम धर्मः । पुनः चोदनानिमित्तं धर्मस्य ज्ञानं ॥

केल्यानें "जाणण्याची इच्छा" अशीं पदें उत्पन्न होऊन कोणाची इच्छा, कशाची इच्छा, कशाकरितां इच्छा, अशी आकांक्षा उत्पन्न होते. मग या आकांक्षेचे साधनानें पुष्कळ विवेचन करावें लागतें. तसें न करितां जिज्ञासा या पदाचा आम्ही रूढ्यर्थ घेतला आहे.

signifies a desire of knowledge, and affords the means of asking these questions:—whose desire, the desire of what—the desire for what purpose. To answer these questions apparently so natural, much is written. Instead of this, we have used the word *jijnâsâ* in its established acceptation.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. (विधिजन्य) भावना नित्य जी इतिकर्तव्यता दाखविते तिचें नांव धर्म.

२. या सूत्रांत आचार्य धर्मशब्दाचें लक्षण बांधतात. या लक्षणास संस्कृतांत त्यांनीं तीन पदें घातलीं आहेत, तद्वाचक यथार्थ मराठी शब्द नाहींत म्हणून त्यांचें विशेष निरूपण करतों. तीं तीन पदें हीं आहेत कीं "चोदना," "लक्षण," आणि "अर्थ." लक्षण म्हणजे साहचर्य, जसें ज्या ज्या ठिकाणीं धूम आहे त्या त्या ठिकाणीं अग्नि आहेच. अर्थ म्हणजे प्रयोजन, प्रयोजन म्हणजे जें करावयाचें तें. आतां चोदनापदाचा अर्थ विशेष विचारयोग्य आहे. चोदनाशब्द आश्वलायन श्रौतसूत्रांत अढळतो. श्रौतसूत्र (१. ३, १७.) या ठिकाणीं बोलावलेली देवता असा अर्थ आहे. मूळ महागायत्रीमन्त्रामध्यें "चुद्" धातूचा प्रयोग आहे, आणि त्याचा अर्थ "प्रेरणें" असा आहे. प्रेरणें म्हणजे बुद्धि, आणि वृत्ति यांस प्रेरणें. जडाची प्रेरणा होत नाहीं. पुनः या मीमांसेंत वाक्यार्थ करते वेळीं भावना म्हणजे विचार याच्यावर वाक्यांतील सर्व पदांचा अन्वय करावा लागतो. जसें, "तो दान करतो" या स्थळीं "तो" हा कर्ता, "दान" हें कर्म. हीं दोन्ही करणें धातूनें जी भावना उत्पन्न होते तींत आकारीभूत होतात. पुनः भावना उत्पन्न होण्यास कांहीं प्रयोजक पाहिजे हें स्पष्टच आहे. विधिवाक्याचे योगानें भावना उत्पन्न होते. जेव्हां

2. Duty is a purpose which invariably follows (a conception produced by) a scriptural injunction.

2. By this aphorism, Jaimini defines *Dharma* or duty. There are three terms in this definition. There are, we believe, no words in English which exactly correspond to them. We will explain the original words. The terms are Chodanâ, Laks*a*n*a*, and Artha. Laks*a*n*a* means invariable sequence, as wherever there is smoke, there is always fire. Artha means a purpose, that is, a motive or that which is sought. The word Chodanâ is very important. It occurs in the Âshvalâyana Shrouta Sûtra. Vide (I. 3, 17.) It means what is invoked. In the celebrated Gâyatrî-verse repeated every day by every Brâhma*n*a, the verbal root *Chud* is used. It means to move, that is, to move the feelings and the faculties of the mind. A material substance is incapable of being moved in the sense of *Chud.* Again the Mîmânsâ-method of interpreting a proposition consists in connecting every part of the proposition with conception (Bhâvanâ). For example, "He makes a gift" is a proposition of which *he* is the subject and *makes a gift* is the predicate. Of the proposition under examination, the verb *makes* according to this Mîmânsâ is the most important part which when resolved, consists of a conception and action. The action, its agent, its object, its purpose, and its instruments are connected with the conception which forms a part of the predicate. Now the conception *must* have a cause. An

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

॥ तस्य निमित्तपरीष्टिः ॥ ३ ॥

पदानि । तस्य, निमित्त—परीष्टिः ॥

पदार्थः । तस्य (धर्मस्य), निमित्तं=बीजं, परीष्टिः=परीक्षा. निमित्तस्य परीक्षा=निमित्तपरीष्टिः ॥

वाक्यार्थः । धर्मस्य किं बीजमिति परीक्षा कर्तव्या ॥

भावार्थः । एषा सूत्रकारस्य विषयकथनरूपप्रतिज्ञा ॥

जेव्हां भावना उत्पन्न होते तेव्हां तेव्हां कांहीं तरी इतिकर्तव्यता असते. अशा इतिकर्तव्यतेचें नांव धर्म. आतां या ठिकाणीं थोडासा अध्यात्मविचार आहे. तो वैशेषिक शास्त्राचे अनुरोधानें करावयाचा. हत्ती मारायास येतो असें पाहिलें. यापासून हत्तीच्या येण्याचें ज्ञान झालें. त्यापासून चित्तांत दुःख उत्पन्न झालें. दुःखापासून द्वेष उत्पन्न झाला. मग पळून जाण्याविषयीं अंतर्यामीं प्रयत्न होऊन पळून जाण्याची क्रिया घडली. असेंच पुनः अंब्याचें झाड पाहिलें. त्यापासून अंब्याचें ज्ञान झालें. त्यापासून सुख प्राप्त होईल अशी वृत्ति उत्पन्न झाली, मग इच्छा उत्पन्न झाली, मग अंतर्यामीं अंबा मिळविण्याविषयीं प्रयत्न, मग क्रिया; म्हणजे ज्ञान, सुखदुःख, इच्छाद्वेष, आणि प्रयत्न, इतके आकार एकादी क्रिया करते वेळीं चित्तांत होतात. हे सारे आकार एका भावनापदानें समजतात. पुनः पुढें या गोष्टीचा विचार करावा लागेल. इतकें सांगितलें पाहिजे कीं अर्वाचीन हॅमिल्टनासारखे अध्यात्मशास्त्रकर्ते भावनेचें असेंच वर्णन करितात

original injunction is stated to be the cause. The conception, no matter, what the subject may be, is invariably accompanied by a purpose. *Such a purpose* is *a duty*. We must explain the psychology of this definition, and base it on the principles of Vaisheṣika philosophy. Any object presented produces knowledge. Knowledge produces the feeling either of pleasure or pain, followed either by desire or aversion. Then follows the internal effort or volition which results in an action. Hence an action involves knowledge, the feeling of pleasure or pain, desire or aversion, and volition. All these are the elements of conception called Bhâvanâ. We will return to this subject. It may be mentioned by the way that great European thinkers like Sir William Hamilton recognize these elements and their connection as we have stated.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Register No. 131 of 1877.

सूचना.

	रुपये.	आणे.
वर्षाची वर्गणी, अगाऊ	५	०
एका अंकास	०	८

पुण्याबाहेर राहणारांस टपाल हंशिलाबद्दल दर वर्षाचे ६ आणे खेरीज पडतील. मागाहून वर्गणी घेतली जाणार नाहीं.

ग्रंथकर्त्यास अथवा म्यानेजरास जीं पत्रें लिहावयाचीं, तीं "षड्-दर्शनचिंतनिका—आफिस, पुणें, सदाशिव पेंठ, घर नंबर ६४१" या पत्यावर लिहावीं. वर्गणी वगैरे संबंधी पत्रें याच पत्यावर पाठवावींत.

	Rs.	A.
For one year, in Advance... ...	5	0
Single copies.	0	8

Besides six annas for postage at the rate of half an anna for a copy.

N. B. The subscription is to be paid *in advance.* No accounts of arrears can be kept.

All letters should be addressed to the Manager of the *Saddarshana*-Chintanikâ-Office, Poona, Sadashive Petha, House Municipal No. 641.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

THE

SADDARSHANA-CHINTANIKÂ

OR

STUDIES IN INDIAN PHILOSOPHY.

षड्दर्शनचिंतनिका.

मीमांसादर्शन

वृत्तिसहित

त्याचें मराठी आणि इंग्रजी भाषांतर.

पुस्तक १. फेब्रुवारी १८७७. अंक २.

पुणें.

" ज्ञानप्रकाश " छापखान्यांत छापिलें.

(सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदली आहे.)

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

On earth, there is nothing great but man;
In man, there is nothing great but mind.

Arrangements for printing our magazine are in the way of being completed. Hereafter, our readers may expect thorough typography and *get up*.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. त्याच्या (धर्माच्या) निमित्ताची परीक्षा.

३. धर्माचें ज्ञान चोदनानिमित्त आहे असा मागील सूत्रांतून अर्थ निघाला. आतां ती चोदना काय, याचा विचार पुढें होणार. सूत्रपद्धति येथें संक्षेपतः वर्णिली पाहिजे. सहा प्रकारचीं सूत्रें असतात—१. संज्ञा, २. परिभाषा, ३. विधि, ४. नियम, ५. अधिकार, आणि ६. अतिदेश. यांचीं निरनिराळ्या प्रसंगीं लक्षणें करूं. वरील अधिकारसूत्र आहे. अधिकारसूत्रामध्यें पुढें कोणता विषय प्रतिपादन होणार याची सूचना असते, व पुढील सूत्रांशीं मिळून त्याचा अर्थ होतो.

3. The examination of its cause.

3. "Its" in the sûtra, stands for duty. The examination of the cause of duty is now to begin. The former aphorism declares that the cause of the conception of duty is chodanâ. What is this chodanâ is the subject of the examination to come. In this place, it is necessary to state what the method of aphorisms is. An aphorism or sûtra is of six kinds :—Sanjnâ or a definition, Paribhâsâ or key to interpretation, Vidhi or the statement of a general rule, Niyama or a restrictive rule, Adhikâra or the heading to which a number of rules belong, Atidesha or general application of a rule. These will be defined as occasion arises. The aphorism under examination is an adhikâra. It states the general subject to be investigated. It requires to be read and understood along with the statements which submit to it.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

सत्संप्रयोगे पुरुषस्येंद्रियाणां बुद्धिजन्म तत् प्रत्यक्षं अनिमित्तं विद्यमानोपलंभनत्वात् ॥ ४ ॥

पदानि । सत्–संप्रयोगे, पुरुषस्य, इंद्रियाणां, बुद्धि–जन्म, तत्, प्रत्यक्षं, अनिमित्तं, विद्यमान–उपलंभनत्वात् ॥

पदार्थः । सत्=सति । संप्रयोगे=संबंधे । पुरुषस्य=आत्मनः । इंद्रियाणां=चक्षुःकर्णादीनां । बुद्धेर्जन्म=बुद्धिजन्म=या बुद्धिर्जायते सा । तत्प्रत्यक्षं=तत् प्रत्यक्षज्ञानं । अनिमित्तं=न कारणं भवति । विद्यमानस्य उपलंभनत्वात्=सतोऽवधारणायाः=प्रकृतस्य प्राप्तेः ॥

वाक्यार्थः । सतींद्रियार्थसंबंधे या आत्मनि बुद्धिर्जायते तत्प्रत्यक्षं तेन यत् प्रकृतं तज्ज्ञायते तस्मात् प्रत्यक्षं धर्मस्य कारणं नास्ति ॥

भावार्थः । प्रत्यक्षप्रमाणेन धर्मो न निश्चीयते ॥

प्रत्यक्षपूर्वकत्वाच्चानुमानोपमानार्थापत्तीनामप्यकारणत्वमितिशबरः ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४ आत्मा आणि इंद्रियें यांचा संयोग झाल्यानें जें ज्ञान उत्पन्न होतें तें ज्ञान प्रत्यक्ष. हें प्रत्यक्ष प्रमाण धर्माचें कारण होत नाहीं; कारण जें जें आहे त्यात्याविषयीं मात्र प्रत्यक्षानें ज्ञान होतें.

4. Sensuous perception is the knowledge produced by the senses coming in contact with the soul; such perception is not the cause of duty, for (perception causes) knowledge of that which (already) actually exists.

---

४. या सूत्रानें प्रमाण काय व कोणतें या विषयाची परीक्षा आचार्य करतात. त्यांत प्रत्यक्ष प्रमाणाचें स्वरूपकथन केलें आहे. त्याची परंपरा:—आत्मा हें ज्ञानाधिकरण म्हणजे ज्याचे ठायीं ज्ञान रहातें तो, इंद्रियें म्हणजे ज्ञानेंद्रियें पांच आहेत—नेत्र, कर्ण, घ्राण, इत्या०. या दोहींमध्यें संबंध ठेवणारें झुरुक्यांतल्या कणा येवढें आणि जड असें मन हें इंद्रिय आहे. आतां ज्ञानेंद्रियांचा आणि बाह्य जड विषयांचा संयोग होऊन प्रथम इंद्रियांवर संस्कार घडतो. मग इंद्रियांचा आणि मनाचा संयोग होतो. मग मनाचा आणि आत्म्याचा संयोग होतो. अशी ही वैशेषिक शास्त्राची मांडणी आहे. वरील सूत्रांत जैमिनि आत्म्याचा आणि इंद्रियांचा संयोग होतो इतकेंच सांगतात. असें ज्ञान होण्याचे निरनिराळे शास्त्राचे निरनिराळे प्रकार आहेत. त्याचें उगीच येथें थोडें दिग्दर्शन केलें आहे. पुन: एकादे वेळीं ज्ञान कसें होतें या गोष्टीचा विचार केला पाहिजे. आतां शबरस्वामी धर्म हा अवर्तमान विषय आहे म्हणून त्याविषयीं प्रत्यक्षज्ञान कारण होत नाहीं अशा आशयानें सूत्र लावतात;

4. Jaimini examines the nature of proof in this sûtra. It explains sensuous perception (indriya-janya-pratyaksa) which is distinguished in our philosophy from mental perception (Mânasa-pratyaksa). The order of this perception. Soul or Âtmâ is the seat of knowledge. The senses (of knowledge) to be distinguished from their means are hearing, sight, taste, smell and touch. The senses which cause perception of an object and their organs that is, the eye and sight, the ear and hearing, are distinguished in Indian philosophy as Indriya and its instrument (Karana). This is a real distinction as the eye is the means of sight. The *mind* is an internal sense. It is as fine as an atom that dances in a ray of light. It conveys an impression caused by the senses to the soul. The objects first affect the senses which can directly come in contact with them. The mind comes in contact with the senses on the one hand and with the soul on the other. This is the way in which Vaishesika philosophy explains *perception*. In the sûtra under examination, Jaimini simply states that there is contact between the senses and the soul. Thus different schools ex-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व प्रत्यक्षावरूनच उपमान, अनुमान, आणि अर्थापत्ति हीं प्रमाणें साधतात, म्हणून तींहि प्रमाणें अकारण होतात असा सूत्राशय वर्णन करतात. परंतु मीमांसक निरनिराळीं प्रमाणें मानतात असें प्रसिद्ध आहे. तेव्हां ही गोष्ट येथें आलोचनीय आहे. माधवाचार्य आपल्या जैमिनीय न्यायमालाविस्तारांत प्रत्यक्ष, व अनुमान हीं धर्मविचारांत प्रमाणें नाहींत, असें म्हणतात. पण प्रभाकरभट्टादि मीमांसक मीमांसेंत सहा प्रमाणें आहेत असें प्रतिपादन करतात. तीं प्रमाणें प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शाब्द, अर्थापत्ति आणि अभाव. मीमांसकांमध्यें प्रमाणांविषयीं अशा विरुद्ध प्रतिपादनाचा अर्थ काय? असा प्रश्न उद्भवतो. याचें समाधान असें आहे कीं, कोणतें तरी एकादें पुस्तक सत्यवक्त्याचें आहे असें गृहीत केल्यावर त्या पुस्तकाच्या अर्थमीमांसेमध्यें हीं सहा प्रमाणें योजावयाचीं. त्या पुस्तकांत जें जें दिसतें तें तें प्रत्यक्षप्रमाणाचा विषय होतें. तसेंच त्याच पुस्तकांतलीं वाक्यें घेऊन तीं परस्परांचे संबंधानें जुळून त्यांतून जें अनुमान निघतें तें अनुमान ध्यायाचें. वाक्यार्थ करते वेळीं त्या पुस्तकांतील निरनिराळे वाक्यांच्या पदांच्या सादृश्याविषयीं विचार करून उपमान प्रमाणाची योजना करावयाची. दुर्घट व दुर्बोध अशा जुन्या लिपींत लिहिलेले शिळालेख किंवा ताम्रपत्रें आपल्या देशांत अढळतात. त्यांचा अर्थ लावते वेळीं व वर्णोद्धार करते वेळीं प्रिन्सेप्स् नामें इंग्रज पंडितानें या प्रमाणाची योजना मो-

plain the phenomenon of perception in their own ways. We have only indicated their theories. We will return to the subject of perception again. Now the commentator thus interprets this sûtra:—" duty is not the subject of that which exists at present, and is not affected by sensuous perception which is limited in its scope and cannot afford proof of duty. And inference or analogy as they spring from sensuous perception cannot prove duty." But this interpretation raises a difficulty as other Mîmânsakas than Shabara recognize the different kinds of proof in the examination of duty. Hence this interpretation of Shabara requires to be considered. Mâdhava also states in his work called the Nyâyamālâ-Vistâra that sensuous perception or inference cannot be recognized as proving duty. But the Prâbhâkaras and Bhâttas recognize six kinds of proof in the examination of the doctrines of Mîmânsâ. These are sensuous perception, inference, analogy, testimony, presumption, and absence. Now the question is natural : what is the explanation of these contradictory statements of the Mîmânsakas? This contradiction we believe can be explained. When some writing or statement is recognized as that of a truthful person, the application of these proofs comes into play in the interpretation of the writing or the statement. Then that which actually occurs in the statement or writing is the subject of sensuous perception : the inference which is based on the different parts of the statement or writing is to be recognized :

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठ्या चातुर्यानें केली आहे, व त्यापासून फलसिद्धि हि तशीच मोठी झाली आहे. शाब्दप्रमाणाविषयीं मीमांसकांमध्यें व नैयायिकांमध्यें भेद नाहीं, याच प्रमाणाचे योगानें न्यायाधीशापुढें सर्व कामें चालतात. साक्षपुराव्याचें मुख्य साधन हें प्रमाण आहे. अर्थापत्ति हें एक कायद्याचें विवेचन करतांना प्रमाण लावतात. सर्व वादविवादांत या प्रमाणावांचून निर्वाह लागावयाचा नाहीं. अभाव प्रमाणाचा उपयोग हि अर्थाचें दाढ्यं साधण्याकडे होतो. असे निरनिराळे प्रमाणांचे उपयोग वाक्यार्थमीमांसेंत होतात. वाक्यार्थमीमांसेच्या व नैयायिकांच्या प्रमाणयोजनेंत भेद आहे. या भेदाचें विशेष निरूपण व प्रमाणांचीं लक्षणें व स्वरूपकथन प्रसंगवशात् पुढें करूं. इतकें सांगणें पुरें आहे कीं, गृहीतोपदेश प्रथम अंगिकारून वाक्यार्थाविषयीं मीमांसक प्रवृत्त होतात, व नैयायिक स्वातंत्र्यानें आपले प्रमाणाची योजना करतात. सूत्रांत 'तत्प्रत्यक्षम्' अशीं पदें आहेत, त्यांच्या आधारावरून जगत् सत्य आहे हा मीमांसकांचा प्रसिद्ध सिद्धांत भाष्यकार स्थापितात. आणि या सिद्धांताचें प्रतिपादन करतांना जगत् मिथ्या असें म्हणणाऱ्या वेदांताचें खंडन करतात. ह्या खंडनसमयीं ज्या न्यायसरणीचा प्रयोग करतात, तिचें प्रथम निरूपण करतों. या न्यायसरणीचें नांव उपलक्षण असें आहे. आतां उपलक्षण म्हणजे काय? एका व्यक्तिवरून दुसऱ्या व्यक्तीविषयीं सामान्य अनुमान होय. सर्व अनुगत सामान्य ज्ञान याच न्याय-

the analogy is based on the comparison of the different parts of the original writing: Princeps has applied these kinds of proof in this way with great ingenuity in deciphering and interpreting inscriptions or copper-plates to be met with in our country and has achieved great results. So far as testimony is concerned, there is no difference between the Mîmânsakas and Naiyâyikas or exegetes and dialecticians. All the proceedings before a magistrate are based on testimony. It is the means by which the statements of witnesses are sifted and accepted or rejected. Presumptions are recognized when laws are explained. All discussions indispensably require this kind of proof. *Absence* is connected with opposition of statements and confirms interpretation. All these kinds of proof are used in exegetics. Exegetical proof differs from logical proof which seeks the investigation of truth in general. We will explain the nature and give definitions of the different kinds of proof as occasion arises. It is sufficient to state once more that exegetes can work only when some writing or statement is accepted generally as true and that Naiyâyikas apply their system independently as they do not base their speculations or theories on some scriptures.

In the sûtra, the words "such perception" are used. The commentators base on them the well known proposition of the Mîmânsakas that the world is real. In stating this proposition, an attempt is made to refute the doctrine of Vedânta that the world is a delusion. In this refutation,

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरणीवरून निघतें असें मिल्ल नामें प्रख्यात इंग्रज नैयायिकाचें मत आहे. पुढील वादावरून उपलक्षण न्यायसरणीचें स्वरूप नीट समजेल. स्वप्नांत जें ज्ञान होतें तें निराधार आहे, म्हणून सर्व ज्ञान निराधार आहे. याकरितां जाग्रत्समयीं जें ज्ञान होतें तें सहजच निराधार ठरलें, असा वेदांताचा पूर्वपक्ष आहे. यावर समाधान:–पण जाग्रत्समयीं ज्ञान निश्चयात्मक असतें, म्हणजे त्यांत विपर्यय होत नाहीं. यावर पूर्वपक्ष:–जागे होण्यापूर्वी स्वप्नांतील ज्ञानहि निश्चयात्मकच असतें, यावरून जाग्रदवस्था आणि स्वप्नावस्था ह्या दोहींमध्यें भेद नाहीं. यावर समाधान:–असें नव्हे. स्वप्नांतील ज्ञानांत विपर्यय होतो. जाग्रत् स्थितींतील ज्ञानांत विपर्यय होत नाहीं. यावर पूर्वपक्ष:–जाग्रदवस्था असो, कीं स्वप्नावस्था असो, उपलक्षणाच्या साहाय्यानें स्वप्नानुभवावरून सर्व ज्ञान मिथ्या असें म्हणणें आहे. या न्यायप्रयोगांत ज्ञान हा हेतु आहे. न्यायप्रयोगाची मांडणी ही:–जेथें जेथें ज्ञानत्व आहे, तेथें तेथें मिथ्यात्व आहेच; जसें स्वप्नांत. म्हणून जाग्रत्समयींचें ज्ञानहि मिथ्या आहे. यावर समाधान:–स्वप्नज्ञानाचा विपर्यय दिसून येतो, व त्या विपर्ययाची उपपत्तिहि करतां येते. निद्राग्रस्त मन झालें म्हणजे तें दुर्बल होतें. आणि या दौर्बल्यामुळें स्वप्नांतील ज्ञान विपर्यय पावतें. या कारणास्तव वरल्या न्यायप्रयोगांत स्वप्नज्ञानाचा दृष्टांत सदोष आहे. तसेंच सुषुप्तिकालीं कोणत्याहि प्रकारचें मुळींच ज्ञान नसतें. यास्तव जाग्रत्समयींचें ज्ञान मि-

a logical method is employed. We will explain and illustrate the method which is called Upalak*sa*n*a*. Now, what is Upalak*sa*n*a*? It is to generalize from particulars to particulars. Mr. Mill, a celebrated logician maintains that all universal propositions are based on this method. The chain of arguments which follows, will explain its nature. The Vedânta-system asserts that because the knowledge in a dream is unreal, therefore, all knowledge is unreal. Hence the knowledge in a waking state is unreal. The reply to this is as follows :— But the knowledge in a waking state is certain, that is, incapable of contradiction. Vedânta replies that before being awakened, the knowledge in a dream is real, therefore, there is no distinction between a dream and a waking-state. The Mîmânsaka observes:– While the knowledge in a dream can be contradicted, the knowledge in a waking state cannot be contradicted. Vedânta replies that all knowledge is unreal, and that this proposition as based on Upalak*sa*n*a* is true whether the knowledge in a dream or a waking state is considered. The middle term in this syllogism is knowledge. This syllogism can be stated fully as follows. Wherever there is knowledge, there is unreality as in a dream; therefore the knowledge in a waking state is unreal. The Mîmânsaka observes upon this:— the unreality of the knowledge in a dream is discernible and it can be explained. The mind as affected by sleep is feeble. And the knowledge in a dream is unreal on account of this feebleness. Therefore, the instance (Upalak-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

थ्या नाहीं. यावर पूर्वपक्षकाराचें म्हणणें:-कांहीं कारणामुळें ज्ञानाच्या करणरूपी साधनांत दोष होतो. जसें, डोळ्यांनीं नीट दिसत नाहीं. करणदोष जर झाला तर समजेल. स्वप्नसमयीं दोष समजत नाहीं, याकरितां स्वप्नसमयींच्या ज्ञानीं दोष नाहीं. यावरून स्वप्नसमयींचें ज्ञान मिथ्या नाहीं. यावर समाधान:-जागें झाल्यावर माझें मन निद्राग्रस्त होऊन सदोष झालें होतें, असें ज्ञान होतें, म्हणून दृष्टांतावरचा दोष कायम राहिला. याकरितां जाग्रदवस्थेंतील ज्ञान निश्चयात्मक आहे म्हणजे जग मिथ्या नाहीं. असें अनुमान सिद्ध होतें. हा वादविवाद आम्ही मासल्याकरितां घेतला आहे, आणि जगत् मिथ्या नाहीं पण सत्य आहे हा मीमांसकांचा सिद्धांतहि लक्षांत ठेवण्याजोगा आहे. एक संबंध ठाऊक आहे, तो कोठें तरी एके ठिकाणीं दिसला असतां, तेणेंकरून दुसऱ्या ठिकाणीं समीप नसणाऱ्या अर्थाचें जें ज्ञान तें अनुमान. हें दोन प्रकारचें आहे. एक "प्रत्यक्षतोदृष्ट," आणि दुसरें "सामान्यतोदृष्ट." यामध्यें पर्वतावर अग्नि आहे कारण तेथें धूर आहे. हें पहिल्या प्रकाराचें उदाहरण. सूर्य फिरतो, कारण स्थलांतर गतीवांचून होत नाहीं. हें दुसऱ्या प्रकाराचें उदाहरण आहे. शाब्द म्हणजे खऱ्या वक्त्याचे भाषणावरून दूर व अज्ञात अर्थाविषयीं ज्ञान. उपमान—सादृश्यावरून अज्ञात अर्थाविषयीं ज्ञान. ज्या स्थळीं पाहिलेल्या किंवा ऐकिलेल्या गोष्टीची एक उपपत्ति संभवते त्या स्थळीं त्या उपपत्तीस अर्थापत्ति असें म्हणतात. अ-

sana) based on the knowledge in a dream in the above syllogism is faulty. Again, in perfect sleep, there is no knowledge whatever. Therefore, the knowledge in a waking state is not unreal. Vedânta replies to this:—Some cause affects the instruments of knowledge, as eyes can not see. If an instrument of knowledge be affected, it can be known. In a dream, there is no knowledge of an instrument of knowledge being affected, therefore, the knowledge in a dream is not affected. Hence such knowledge is not unreal. The Mîmânsaka observes:—After being awakened, one knows that his mind was affected by sleep. Therefore, the example still remains to be faulty. Therefore, the inference that the knowledge in a waking state is real, that is, that the world is real is established. We have reproduced this style of argumentation as a specimen. The proposition of the Mîmânsakas that the world is real deserves special attention.

When a relation already known in one way is observed else-where, then the knowledge which it produces about an unknown fact is called inference. It is two-fold: as based on sensuous perception and as based on generality. That the mountain is fiery because it smokes is an example of the first kind. That the sun moves because whatever is known to change its place, moves, is an example of the second kind. Testimony is knowledge based on the statement of a truthful person. Analogy is based on resemblance. When only one explanation of a fact is possible, the explanation constitutes a presumption. Absence is knowledge that a thing

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

औत्पत्तिकस्तु शब्दस्यार्थेन संबंधस्तस्यज्ञानमुपदेशोऽव्यतिरेकश्चार्थेनुपलब्धे तत् प्रमाणं बादरायणस्यानपेक्षत्वात् ॥ ५ ॥

पदानि । औत्पत्तिकः, तु, शब्दस्य, अर्थेन, संबंधः, तस्य, ज्ञानं, उपदेशः, अव्यतिरेकः, च, अर्थे, अनुपलब्धे, तत्, प्रमाणं, बादरायणस्य, अनपेक्षत्वात् ॥

पदार्थः । औत्पत्तिकः=नित्यः ।तु=यस्मात् कारणात् । शब्दस्य=उच्चारितस्य । तद्बोधितेनार्थेन सह यःसंबंधः तस्यसंबंधस्य ज्ञानं=उपदेशः=विशिष्टस्य शब्दस्योच्चारणं । अव्यतिरेकः=अविपर्ययः । अर्थे अनुपलब्धे=अर्थे अप्राप्ते । तत्=तस्मात् । प्रमाणं=प्रमाणत्वेन-स्वीकरणीयं । बादरायणस्य=तस्यमतें । अनपेक्षत्वात्=प्रत्ययांतरं नेष्यते ॥

वाक्यार्थः । यस्मात् कारणात् शब्दस्यार्थेन सह यःसंबंधःस नित्यः । एतस्य संबंधस्य यज् ज्ञानं तदुपदेशः । उपदेशो न विपर्ययं प्राप्नोति । अर्थे अज्ञाते विपर्ययः । एतेन कारणेन उपदेशः प्रमाणं बादरायणस्यमते । प्रत्ययांतरं नापेक्षितं ॥

भावार्थः । चतुर्थे सूत्रे यत् प्रतिपादितं तस्यैतेन सूत्रेण प्रमाणं ददाति सूत्रकारः । सूत्रस्यास्य षड्दलानि । तै रुपपादितमेत त् । उच्चारितस्य शब्दस्य स्वार्थेन नित्यसंबंधः । उपदेशस्य लक्षणं दत्तं । उपदेशः । सत्यः । योविपर्ययो दृश्यते सोऽज्ञानात् । अतएव उपदेशस्य प्रामाण्यं । अवशिष्टं स्पष्टं । यदत्र वृत्तिकाराणां मतांतरं वर्तते तच्चिन्तनीयं ॥

भाव म्हणजे अमुकएक अर्थ नाहीं असें म्हटल्यानें जें ज्ञान होतें तें. हे सर्व ज्ञानप्राप्तीचे प्रकार सर्वांस विदित आहेत म्हणून धर्माच्या कारणाची परीक्षा नको असें वृत्तिकार म्हणतात. या प्रमाणाविषयीं फक्त दिग्दर्शन केलें आहे. प्रसंगवशात् पूर्ण व्याख्या करूं.

does not exist. All these varieties of proof are known. Therefore, the Vrittikârasstate that the cause of duty is not to be examined. The nature of proofs is only indicated here. It will be fully illustrated as occasion arises.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. या कारणास्तव शब्दाचा आणि अर्थाचा परस्पर संबंध नित्य आहे. या नित्य संबंधाचें जें ज्ञान तो उपदेश. या उपदेशाला कधीं विपर्यय नाहीं, (परंतु) अर्थाचें ज्ञान नसलें म्हणजे विपर्यय होतो. या कारणास्तव बादरायणाचे मतानें उपदेश प्रमाण आहे. प्रत्ययांतराची म्हणजे दुसऱ्या ज्ञानाची गरज नाहीं.

5. Therefore, the connection between a word and its sense is eternal. The knowledge of this eternal connection is a precept. Such a precept is never erroneous. (But) when the sense is unknown, then there is an error. Therefore, according to Bâdarâyana a precept is authoritative, (as) other knowledge is not needed.

---

५. या सूत्रांत शब्द नित्य आहे हें सिद्ध करण्याचा आचार्यांनीं उपक्रम केला आहे. या सूत्राचीं सहा दलें आहेत त्यांत प्रथम दलीं नित्यार्थी औत्पत्तिक पदाची योजना केली आहे. औत्पत्तिक पदाचा अर्थ उत्पत्तिकालीन, स्वाभाविक, उत्पत्ति झाली कीं बरोबर असणारा असा होतो. नित्यपद न योजतां औत्पत्तिकपदाचा उपयोग आचार्यांनीं कां केला अशी शंका उत्पन्न होते. त्यांत इतकेंच विशेष आहे कीं शब्दोच्चार होतांच अर्थ उत्पन्न होतोच होतो म्हणजे शब्दोच्चाराला अर्थावांचून गति नाहीं. दुसऱ्या दलांत उपदेशाचें लक्षण केलें आहे. आणि तिसऱ्या दलामध्यें उपदेशाला कधीं विपर्यय नसतो असें वर्णन केलें आहे हें वचन व याचें कारण हें विशेष लक्ष देण्याजोगें आहे. कारण तेणेंकरून मीमांसाशास्त्राचा कटाक्ष काय हें दिसून येतें. जेथें शब्दोच्चार तेथें अर्थ, व जो भ्रम उत्पन्न होतो तो अर्थ न जाणल्यापासून होतो. या भ्रमनिरासास अर्थज्ञान हें कारण आहे. परंतु नैयायिकमतें शिंप म्हणजे रुपें असा जो भ्रम उत्पन्न होतो त्या भ्रमनिरासास पुनरपि शिंपीचें अवलोकन क-

5. Jaimini seeks to maintain by this sûtra the eternity of a word. There are six parts of this sûtra. In the first part, the term Outpattika meaning eternal is used. The term signifies that which exists at the time of production (utpatti), that is, natural, that is that which co-exists with production. The question why Jaimini uses such a term instead of words signifying eternity arises :—The answer is—Jaimini seeks to show that the sense of a word is seen as soon as the word is pronounced, that is, a word cannot exist without its sense. In the second part, a precept is defined. In the third part, the nature of a precept is stated, that is, a precept can be never erroneous. This statement as well as its reason deserves special attention, because it explains the drift of Mîmânsâ philosophy. Wherever there is a word, there its sense exists. All delusion arises from the ignorance of the sense of a word. For removing this delusion, the knowledge of the sense of a word is indispensable. But

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

कर्मैके तत्र दर्शनात् ॥ ६ ॥ (पूर्वपक्ष १).

पदानि । (शब्दः*) कर्म, एके, तत्र, दर्शनात् ॥

पदार्थः । शब्दः (पूर्वसूत्रेणोक्तः) कर्म=कृतिः । एके=पंडिताः । तत्र=तस्मिन्कर्मणि । दर्शनात्=प्रकटनात् ॥

वाक्यार्थः । शब्दः कृतिरित्येके वदन्ति । कृतौ सत्यां शब्दस्य प्रकटनम् ॥

भावार्थः–पूर्वोक्तशब्दो नौत्पत्तिकः नाम न नित्यः । किं तर्हि । कर्मजन्यो नामानित्यः । कुतः । स शब्दोऽभिव्यज्यः सत्युच्चारे नाम सति प्रयत्ने । उच्चारकर्मजन्यत्वात् सोऽनित्यः ॥ एषा पूर्वपक्षोक्तिरिति ज्ञेयम् ॥

अस्थानात् ॥ ७ ॥ (पूर्व० २).

पदानि । (शब्दः) (कर्म) अस्थानात् ॥

पदार्थः । (शब्द उक्तपूर्वः) कर्म=अनित्यं । अस्थानात्=अस्थितेः ॥

वाक्यार्थः । शब्दो नित्यो न वर्त्तते स्थित्यभावात् ॥

भावार्थः । उच्चारिते शब्दे शब्दो विनश्यति ॥ अतएवानित्यःसः ॥ (पूर्वपक्षेणशंकैषा).

---

* ( ) इदृशाया कुंडलिकयानुवृत्तिर्दर्श्यते ॥

रणें व तिच्या गुणाचें परीक्षण करणें हें कारण आहे. म्हणजे एकीकडे शिंप ह्या वस्तूचें व तिच्या धर्मांचें विवेचन आहे आणि दुसरीकडे शब्दार्थावर सर्व तात्पर्य आहे. हें कोठपर्यंत म्हणाल तर प्रत्ययांतराची गरज नाहीं असें आचार्यांनीं सूत्रांत वर्णिलें आहे. वृत्तिकार म्हणून कोणी मीमांसाभाष्यकार आहेत, ते तिसऱ्या, चवथ्या, पांचव्या आणि सहाव्या सूत्रांचा निराळे रीतीनें अर्थ लावतात. इतकें सांगणें पुरें.

according to Naiyâyikas, the delusion that the mother of pearl is silver can be removed only by careful observation, and by the examination of its qualities. Now the latter seeks to obtain the knowledge of the real properties of the mother of pearl while the former philosophers are concerned with the sense as such of a word. How far is this carried? Jaimini distinctly states in the sûtra under consideration that other knowledge than the knowledge of the sense of a word is not necessary. It is enough to state that commentators on Mimânsâ called Vrittikâras do not interpret the third, fourth, fifth, and sixth sûtras as Shabara does.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. कोणी (असें म्हणतात कीं) शब्द कर्म आहे. उच्चारण केलें म्हणजे तो प्रकट होतो. (पूर्वपक्ष १.)

७. उच्चारतांच शब्दध्वनीचा नाश होतो; म्हणून शब्द अनित्य आहे. (पूर्वपक्ष २.)

6. Some (state) that a word is an action. It appears when pronounced. (This is a statement in opposition).

7. The sound of a word vanishes, the moment it is pronounced, therefore, it is transitory. (II. Statement of an opponent.)

---

६. शब्द अनित्य आहे असे आशयाचें हें सूत्र आहे, म्हणजे या सूत्रांत पूर्वपक्षाचें प्रतिपादन केलें आहे. जैमिन्याचार्यांचे सरणीचें माधवानें वर्णन करतांना एका प्रकरणाचें नांव अधिकरण असें ठेविलें आहे आणि या अधिकरणाचे पांच अवयव असतात.—१ विषय, २ संशय, ३ संगति, ४ पूर्वपक्ष, आणि ५ सिद्धांत. पूर्वपक्ष म्हणजे विरुद्ध पक्षाचें प्रतिपादन असें समजावें. शब्द कर्म आहे म्हणजे कृतीनें उत्पन्न होतो म्हणजे अनित्य आहे. आणि "तो प्रकट होतो" या पूर्वपक्षाचे पदांवर लक्ष ठेवावें, कारण उत्तरपक्षीं यावर कोटी आहे.

७. हें सूत्र समजण्यास सोपेंच आहे परंतु थोडा विचार केला पाहिजे. पहा आपण चन्द्र या शब्दाचा उच्चार केला म्हणजे 'चंद्र' हीं दोन्हीहि अक्षरें मुखांतून निघून जातात. चंद्र या दोन अक्षरांचा अर्थ मात्र मनुष्याच्या मनांत बिंबतो, व त्या अर्थाचे अनुरोधानें सर्व व्यापार होतात. तर हा असा शब्दांतील वर्णोच्चार नष्ट झाला, परंतु शब्दाचा अर्थ मात्र राहिला. पुनः यांत आणखी सूक्ष्म विचार असा आहे कीं चार अक्षरांचे शब्दाचा उच्चार केला असतां चारी वर्णांचा उच्चार एकदम तर होत नाहींच आणि अर्थ एकदम मनांत येतो. हें कसें? चंद्रकांत

6. This sûtra sums up an objection, and seeks to prove the transitoriness of a word. Mâdhava in describing the method of Jaimini says that a chapter called adhikara*n*a consists of five parts. 1. subject, 2. doubt, 3. connection, 4. an objection, and 5. the final established proposition. An objection is called the first side (Pûrva-pak*s*a) and is raised by a real or an imaginary opponent. The sense of a word being called an action is that it is an effect. The phrase—*it appears*—deserves attention, because the author refers to it when he enters on its refutation.

7. The sûtra is easy; it requires a little examination. When the word *purpose* is pronounced, the two syllables *pur* and *pose* come out of the mouth, after one another; but they at once impress the sense of *purpose* on the human mind, and this sense directs the conduct of man. Then the sounds of letters vanish but their sense alone remains. Again, when a word consisting of five syllables is used, the five syllables cannot be at once pronounced; but the sense of the word is impressed at once. How is this? There are five syllables in the

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

करोतिशब्दात् ॥ ८ ॥ (पू० ३).

पदानि । (शब्दः), (कर्म), करोतिशब्दात् ॥

पदार्थः । (शब्दः कर्म उक्तपूर्वं) करोतिशब्दात्=करोतिपदस्य प्रयोगात् ॥

वाक्यार्थः । शब्दोऽनित्यः करोतिक्रियापदयोगात् ।

भावार्थः । शब्दंकुरु । इत्यादि प्रयोगा व्यवहारे सन्ति । अतः शब्दः क्रियते । यक्रियते । तद् नश्यति । अतःशब्दो नश्वरो नामानित्यः (पूर्वपक्षेणशंकैषा)

सत्त्वान्तरे यौगपद्यात् ॥ ९ ॥ (पू० ४).

पदानि । (शब्दः) सत्व-अन्तरे यौगपद्यात् ॥

पदार्थः । (पूर्वोक्तशब्दः) (कर्म च) सत्वं=प्राणी । अन्तरे=अन्यस्मिन् । यौगपद्यात्=एककाले ॥

वाक्यार्थः । सशब्दोऽन्यस्मिन् प्राणिनि एककाले वर्त्तते । अतएवानित्यः ॥

भावार्थः । यत्किंचिन्नानादेशेषु नानासत्वेषु युगपद् वर्त्तते तदेकं नास्ति यदनेकं तदनित्यं । अत उपदशरूपशब्दोऽनित्यः ॥

या शब्दांत चार अक्षरें आहेत. "चं" या अक्षराचा उच्चार झाल्यानंतर 'द्र' या अक्षराचा, मग 'कां' या अक्षराचा, मग 'त' या अक्षराचा, असे उच्चार होतात. वर्ण नष्ट होत जातात आणि मग शब्दाचा अर्थ एकदम मनांत भासतो. हें कसें? या प्रश्नाचें उत्तर देतांना वैशेषिक सूत्रांत श्रवणोत्पत्तीचा प्रकार वर्णिला आहे तो आलोचनीय आहे व त्यामध्यें व युरोपी श्रवणशास्त्रामध्यें भेद नाहीं. शब्दश्रवण कसें होतें हा विचार शास्त्रदृष्ट्या मोठा उपयोगी आहे येवढेंच नाहीं, तर व्यवहारांत देखील याचा मोठा उपयोग आहे. गानवाद्यें तयार करणें इत्यादिकांमध्यें श्रवणशास्त्राचा मोठा उपयोग आहे इतकें सांगून ज्या सूक्ष्म विचारांचें या टिपेंत वर्णन केलें आहे, ते विचार श्रवणशास्त्रांत मुख्य आहेत येवढेंच सांगणें सध्यां पुरे.

word *justification*. First the sound of *jus*, then of *ti*, then of *fi*, then of *ca*, and last of *tion* vanishes away. The sense follows the pronunciation of all the syllables? How is this? In answering this question, the theory of acoustics as expounded in Vaishesika philosophy deserves attention. There is no difference between this theory and the theory of acoustics accepted in Europe at the present day. The theory of acoustics is important not only from a philosophical point of view, but in practical life. All musical instruments are prepared by the aid of the science of acoustics. Now suffice it to notice that the questions already raised are prominently discussed in acoustics as their solution constitutes its basis.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. शब्दसंबंधानें "करणें" या धातूचा प्रयोग होतो म्हणून (शब्द अनित्य आहे.) (पूर्वपक्ष ३).

९. निरनिराळ्या प्राण्यांस एकच शब्द एकदम ऐकूं येतो, म्हणून (शब्द अनित्य आहे.) (पूर्वपक्ष ४).

८. उदाहरणाशिवाय या सूत्राचा अर्थ स्पष्ट होणार नाहीं. शब्द करा असें वाक्य आपण बोलतों. शब्द करा असें म्हटल्यावर शब्द पूर्वी नव्हता हें स्पष्टच आहे, असें पूर्वपक्षवादी अनुमान काढून शब्द कृत्रिम आहे असें प्रतिपादन करतो. हें प्रतिपादन सूत्रांत वर्णिलें आहे.

९. यास उदाहरण 'चंद्र' असा शब्द म्हटला असतां पांच जणांस एकदम ऐकूं येतो, म्हणून चंद्र हा शब्द पांच ठिकाणीं उत्पन्न होऊन त्या ठिकाणीं टिकला. जें जें कांहीं निरनिराळ्या देशामध्यें एकदम दिसून येतें तें एकच आहे असें म्हणतां येत नाहीं, आणि जें एक नाहीं तें अनेक आहे, आणि जें अनेक तें अनित्य आहे, अशी परंपरा पूर्वपक्षकार लावून शब्द अनित्य असें प्रतिपादन करतो. "सत्वान्तरे" येवढ्या सूत्रस्थ संस्कृतपदाचा शबरानें मुळींच पदशः अर्थ केला नाहीं. "नाना देशेषु" असें त्यावर लिहून ठेविलें आहे. त्यावरून अर्थ नीट बसत नाहीं. आम्ही सत्त्व शब्दाचा अर्थ प्राणी केला आहे त्याचा वाचकांनीं विचार करावा.

8. The verb *to make* is used in relation to a sound; therefore, it is transitory. (III. Statement of an opponent).

9. Different animals simultaneously hear the same sound, therefore, it is transitory. (IV. Statement of an opponent).

8. An example is necessary to explain this sûtra, "Make a sound" is a sentence used. When one says "Make a sound," it is plain that the sound to be made is not in existence. Therefore, the opponent infers that a sound is an effect. This is what is advanced by the sûtra.

9. An example is necessary. When the word "moon" is pronounced, it is heard (say) by five persons. Therefore, the word is produced at the same time in five places where its sense is understood. Whatever appears in different places at the same time is not *one*. And whatever is not *one* is *many*. And whatever is *many* is transitory. The opponent insists on these propositions in this order, and on the transitoriness of a sound. Shabara has not literally and closely interpreted the phrase "Sattvântare" in the sûtra. He simply puts in "Nânâdeshesu." The last phrase does not materially aid the interpretation. We have interpreted the word "Sattva" into "an animal." Our readers can determine what "Sattva" means.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

प्रकृतिविकृत्योश्च ॥ १० ॥ (पू० ५).

पदानि । (शब्दः) (कर्म) प्रकृति-विकृत्योः, च ॥

पदार्थः । (उक्तपूर्वशब्दः कर्म च) प्रकृतिः=मूलस्थितिः । विकृतिः=स्थित्यन्तरं । चकारेण=समुच्चयः ॥

वाक्यार्थः । स शब्दोऽनित्यो यतः प्रकृतिर्विकृतिश्चवर्त्तते ॥

भावार्थः । यथा । दधि । अत्र । एतयोर्द्वयोःशब्दयोः संधिसमये । दध्यत्र । इतिरूपं भवति । तथा इकाररूपप्रकृतिर्विक्रियते ॥ तत्र इकारस्य यकारो भवति ॥ अतः शब्दोऽनित्यः ॥

वृद्धिश्चकर्तृभूम्नास्य ॥ ११ ॥ (पू० ६).

पदानि-(शब्दः) (कर्म) वृद्धिः, च, कर्तृ-भूम्ना, अस्य ॥

पदार्थः । (उक्तपूर्वं) वृद्धिः=वर्धनं । च=पूर्वोक्तकारणानां समुच्चयः । कर्तृ=यः करोति सः । भूम्ना=बाहुल्येन । अस्य=शब्दस्य ॥

वाक्यार्थः । अस्य शब्दस्य वर्धनं च भवति कर्तृबाहुल्येन । अतः शब्दोऽनित्यः ॥

भावार्थः । यतो बहुभिरुच्चारयद्भिर्महान् शब्दः श्रुयते ततः शब्दस्य वृद्धिर्भवति । यद् वर्धते क्षीयते वा तदनित्यं ॥

(षट्पूर्वपक्षाणां निरूपणं संवृत्तं । इत उत्तरपक्षाणामुपक्रमः)

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१० शब्दाची मूलप्रकृति असून पुनः विकृति होते म्हणून (शब्द अनित्य आहे.) (पू० ५)

११. शब्द करणारे पुष्कळ असले ह्मणजे त्याची वृद्धि होते. (पू० ६)

10. A word has an original form and a modified form, (therefore, it is transitory.) (v. Statement of an opponent).

11. By many making a sound, its increase (is seen.) (vi. Statement of an opponent).

---

१०. उदाहरणानें अर्थ स्पष्ट होतो. "प्रीति उत्तर" या दोन शब्दांचा संधि होऊन "प्रीत्युत्तर" असा नवा शब्द होतो. प्रीति या शब्दांतील इकार ही प्रकृति आहे म्हणजे "इ" शब्दाच्या मूलाकारांत आहे, तिच्या ठिकाणीं यकार झाला म्हणजे यकार हा नवा आकार उत्पन्न झाला. ज्याचा आकार बदलतो तें अनित्य म्हणून शब्द अनित्य आहे.

११. उदाहरण–दहा माणसांनीं एक शब्द उच्चारिला असतां एकानें केल्याच्या दसपट त्याचा उच्चार मोठा होतो, म्हणून शब्दाला वृद्धि आहे. ज्याची ज्याची वृद्धि होती किंवा क्षय होतो तें तें अनित्य आहे. सूत्रामध्यें "त्याची वृद्धि होते" अशीं पदें आहेत. "त्याची" म्हणजे शब्दाची असा अर्थ समजावयाचा. साहा पासून अकरा सूत्रापर्यंत पूर्वपक्षवादीनें आपल्या कोटया केल्या. त्या कोटया क्रमानें जमा करून जैमिन्याचार्य उत्तरें देतात. तीं उत्तरेंहि क्रमानें साहा आहेत. तीं पाहतांना त्या त्या पूर्वपक्षाशीं तें तें उत्तर लावून विचार केला असतां उत्तराची योग्यता नीट लक्षांत येईल.

10. An example will elucidate the sûtra. Take the two Sanskrita words *Priti* and *uttara* and combine them into *Prityuttara* by rules of grammar. In *Prityuttara*, the original *i* is changed into *y*. That is, a word has had two forms—original and modified. That which is capable of modification is transitory. Therefore, a word is transitory.

11. An example: when ten men make the same sound, it is ten times louder than the sound made by one man. Therefore, a word grows. Whatever waxes or wanes is transitory. Therefore, a word or sound is transitory. In the sûtra "its increase" are the words used. "By its increase," the increase of the sound or word is meant. Beginning from the 6th sûtra, the opponent advances his arguments against the doctrine of the eternity of a word. Jaimini takes stock of these arguments in the order in which they are advanced and gives replies which are as many as the arguments of the opponent. In examining the replies, it would be advisable to read along with each reply the corresponding argument of the opponent so that the cogency of the reply may be thoroughly seen.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५६५
५६५

५३,६८५

सुत्राणि.

समंतुतत्रदर्शनम् ॥ १२ (उत्तरपक्ष १).

पदानि–(शब्दः) (कर्म) समं, तु, तत्र, दर्शनं ॥

पदार्थः। (उक्तपूर्वम्) समं=तुल्यं । तु=न । तत्र=तस्मिन् । दर्शनं=विचारः ॥

वाक्यार्थः। शब्दो नानित्यः । तस्मिन् विषये विचारस्तुल्यः ॥

भावार्थः। यो विषयः प्रकृतः तस्मिन् विषये नाम प्रथमपूर्वपक्षस्यास्योत्तरपक्षविषये विचारसाम्यं निष्पन्नं । यदुच्चारणेनाभिव्यज्यते तदुच्चारणात् प्राग् वर्त्तते ॥ अतो विचारसाम्यम् ॥

सतःपरम् अदर्शनं विषयानागमात् ॥ १३ ॥ (उ० २).

(द्वितीयपूर्वपक्षस्यसमाधानमत्र)

पदानि। सतः, परं, अदर्शनं, विषय-अनागमात् ॥

पदार्थः। सतः=यदस्ति तस्मात् । परं=पाश्चात्यं । अदर्शनं=लोपः । विषय-अनागमात्=विषयस्य=(इंद्रियगोचरस्य) अप्राप्तेः ॥

वाक्यार्थः। यदा विषयो न प्राप्नोति तदा विद्यमानस्याप्यादर्शनं भाति ॥

भावार्थः। शब्दस्तु नित्यः । तस्य आकाशविषयत्वं–श्रोत्राकाशे यथा संयोगविभागौ भवतः तथा तस्य भानं–संयोगविभागाभावे लोपः केवलं भासते ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२. त्याविषयीं विचार साम्य आहे, म्हणून शब्द अनित्य नाहीं.

१३. विषय नसला म्हणजे विद्यमानवस्तूचेंहि दर्शन होत नाहीं.

१२. "त्या विषयीं" म्हणजे पूर्वपक्षांत जो विषय झाला त्या विषयीं विचार साम्य म्हणजे वादी प्रतिवादींच्या कोट्या सारख्याच लागू पडतात. ही एक वाद करण्याची विशेष शैलि आहे; तिकडे वाचकांनीं कृपा करून लक्ष द्यावें. विचारसाम्यामध्यें जी कोटि वादीनें काढली, तिचा अंगीकार केलासें दाखवून उत्तर असें द्यावयाचें कीं तेणेंकरून वादीची आणि आपली बरोबरी झाली, इतकेंच निष्पन्न व्हावें. उदाहरणावरून स्पष्ट होईल. "कांहो पूर्वपक्षकार, असें म्हणतांना? कीं उच्चार केल्यानंतर शब्द प्रकट होतो. बरें ठीक आहे; परंतु प्रकट होतो असें आपण म्हणतां त्यावरून तो गुप्त होता असें निष्पन्न होतें. आणि गुप्त होता असें म्हटल्यानें आम्हास कांहीं बाधक होत नाहीं. आपल्यासहि कांहीं बाधक होत नाहीं असें आपलें म्हणणें आहेच. या स्थळीं विचारसाम्य उत्पन्न झालें. पुनः शब्द उच्चारणाचे पूर्वी गुप्त होता असें अंगीकारल्यानें शब्द नित्य आहे या प्रतिपादनास कांहीं बाध येत नाहीं. म्हणजे मुख्य विषय प्रतिपादन जसेंच्या तसेंच आहे.

१३. शब्द हा गुण आकाशाचा आहे. कर्णांच्या ठायींहि आकाश आहे या

12. On this subject, there is parity of reasoning, therefore, a word is not transitory.

13. When not an *object* (of sensuous perception), (even) an existing substance is not cognized.

12. "On this subject" refers to the first argument of the opponent in the sixth sûtra. Parity of reasoning is a logical contrivance often adopted in our discussions. It is called Vichâra-sâmya. Our readers will kindly give heed to it. The special argument on which an opponent insists is granted, but a reply is given by which the contrary of the special argument comes to be established. This is the essential nature of the argument called parity of reasoning. An example will illustrate this logical contrivance. "Well" says Jaimini to his opponent—"you say :—a word appears when pronounced. Your statement implies that a word exists latent before its appearance. Well, its latent existence is not against me. Your statement shows that it is not against you." This is a case of "parity of reasoning." Again, it does not affect the proposition that a word is eternal, to take for granted that a word exists latent before its appearance when pronounced. That is to say, the original proposition is not rebutted at all.

13. A sound is a quality of æther (akâsha.) There is æther in the ears. As air affects this æther, a sound is cognized, and when air does not come in contact with it,

(२–३.)

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

प्रयोगस्यपरम् ॥ १४ ॥ (उ० २).

पदानि । (दर्शनं) प्रयोगस्य परं ॥

पदार्थः । पदार्थः स्पष्टः ॥

वाक्यार्थः । यदस्तितस्यकृते प्रयोगे दर्शनं भवति ॥

भावार्थः । शब्दोनित्यः (समाधानमिदंसुलभंज्ञायते)

आकाशावर जसजसे वायूचे संयोगविभाग घडतात, तसतसें शब्दज्ञान होतें; आणि संयोगविभाग न घडले, म्हणजे शब्द नाहीं, असें वाटतें मात्र. यावर विशेष विचार केला पाहिजे, आणि हा विचार करतांना वैशेषिक शास्त्रांतील श्रवणोत्पत्तीच्या प्रकाराचें अनुसंधान केलें पाहिजे. त्यांत प्रथम आकाश म्हणजे काय याचा विचार. वैशेषिक शास्त्रांत साहा पदार्थांचें विवेचन केलें आहे. ते पदार्थ हे. १ द्रव्य, २ गुण, ३ कर्म, ४ सामान्य, ५ विशेष, आणि ६ समवाय. त्या साहा पदार्थांमध्यें द्रव्याचें वर्णन करतांना त्याचे नऊ विभाग केले आहेत, ते असे. १ पृथ्वी, २ जल, ३ तेज, ४ वायु, ५ आकाश, ६ काल, ७ दिशा, ८ आत्मा, आणि ९ मन. या ठिकाणीं वायु आणि आकाश या दोहोंचाच आम्हास विचार करणें आहे. त्यांत वायु काय हें सर्वांस ठाऊक आहे. तेव्हां आकाशाचा विचार केला म्हणजे झालें. आकाश हें एक द्रव्य, विभु म्हणजे सर्वव्यापि, नित्य म्हणजे अविनाशि, आणि शब्दाचें राहण्याचें स्थान आहे. आतां श्रवणोत्पत्ति होते कशी? कांहींनिमित्तकारणानें वायूमध्यें लहरी उत्पन्न होतात. या

it is *felt only* that there is no sound. This deserves some special enquiry. In this enquiry, Vaishesika philosophy requires to be considered. Now, the first subject of inquiry is:—What is æther? Six substances are investigated in Vaishesika philosophy. These substances are:—entity; quality, action, generality, particularity, and inherent relationship. The substance (entity) is divided into nine classes:—earth, water, light, air, æther, time, direction, soul, and mana. (The word *dravya* is translated here by entity.) Dravya is that which is neither quality or any of the remaining five substances (such as action and the rest). In this enquiry, we have to consider air and æther. The substance *air* is generally known. Æther remains, therefore, to be considered. Æther is an entity which is everlasting, universal, and is the *seat* of sound. Now the question is, how is the knowledge of a sound produced? Some cause produces ripples in the air. These ripples are called Vîchîtaranga in Sanskrita. As concentric ripples are produced in water, and are well seen, so there are ripples in æther. Sound exists permanently in æther. It has two

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४. प्रयोग केल्यानंतर जें आहे त्याचें ज्ञान होतें. (उ० ३)

लहरींस वीचीतरंग असें संस्कृतांत म्हणतात. जसें पाण्यांत दगड टाकला म्हणजे वीचीतरंग उठतात, व स्पष्ट दिसतात, त्याप्रमाणें वायूमध्यें आघात केला म्हणजे आकाशाचा नित्यगुण जो शब्द तो स्पष्ट होतो. आकाशामध्यें शब्द नेहेमीं आहेच आहे. त्याचे दोन आकार असतात—एक व्यक्त आणि दुसरा अव्यक्त. आघाता सारख्या निमित्तकारणानें शब्द व्यक्त होतो. मग वायूंत वीचीतरंग उठतात. यांच्या योगानें कानांत जाऊन शब्द पोहंचतो. मग कर्णेंद्रियाचा आणि शब्दाचा संयोग होतो. मग कर्णेंद्रियापासून हा शब्द मनांत जातो. आणि मनापासून आत्म्यास शब्दाचें ज्ञान होतें. युरोपी श्रवणशास्त्रांत शब्दोत्पत्तीची जी परंपरा योजिली आहे, त्या परंपरेस ही परंपरा सोडून नाहीं. इतकेंच कीं युरोपी श्रवणशास्त्रांत वायूचें गुणनिरूपण खोल आणि मोठें सूक्ष्म आहे. आतां, सूत्रांतील पदांचा अर्थ स्पष्ट होईल. "सतः" म्हणजे आधीं असून, "परं" म्हणजे पुढें "अदर्शनं" म्हणजे लोप भासतो, "विषयानागमात्" म्हणजे विषय न प्राप्त झाल्यामुळें. या ठिकाणीं 'विषय' शब्दाचा विशेष अर्थ आहे. विषय म्हणजे ज्याचें ज्ञान होतें तो. शब्द आघातासारखा निमित्तकारणानें उघड होऊन कानांतील आकाशांत प्राप्त होतो. असा प्राप्त न झाला म्हणजे असूनहि नाहीं असा भासतो असा सूत्रार्थ आहे.

14. That which exists, is cognized (only) after (its) application. (Reply, 3.)

forms—distinct and indistinct or sensible and latent. Sound becomes sensible by the air being moved. Then ripples in the air arise. These convey a sound to the ears. The sense of hearing comes in contact with the mind which causes knowledge of the sound in the soul. This theory of the perception of a sound is identical with that which is propounded by thinkers of Europe with this difference that the latter possess deep and critical knowledge of the properties of air. Now the meaning of the terms of the sûtra will be distinctly understood. The term "satah" means "already existing;" "param," "after;" "adarshanam" means "disappearance." "Visayânâgamât" on account of the non-appearance of an *object*. Here the term Visaya, an *object*, has a special meaning. It is the correlate of the senses of knowledge, and is that which is cognized by means of the senses, because when a sound appears by a beat in the air, it reaches the æther in the ears. When it does not reach the ears in any way, though existing, it is yet considered not to exist. This is the sense of the sûtra.

14. In the original sûtra, the term *prayoga* is used. There is no corresponding term, we are afraid, in English. We have translated it by application. Its primary sense is *conjunction*, or *junction pre-eminently*, that is, combination as made. Its secondary sense is practical employment or application. Here a reply is given to the

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

आदित्यवद्यौगपद्यं ॥ १५ ॥ (उ० ४).

पदानि । आदित्यवत् । यौगपद्यं ॥
(पदार्थादीनि स्पष्टानि)

वर्णांतरमाविकारः ॥ १६ ॥ (उ० ५).

(पदादीनि स्पष्टानि)

॥ यथा सूर्य एकःसन् अनेकदेशावस्थित इव लक्ष्यते तथा शब्द एकोनित्यश्च॥ आकाशदेशःशब्दः ॥ एकंचपुनराकाशं ॥ अतोपि न नानादेशेषु ॥ अपिच ऐकरूप्ये सति देशभेदेन कामं देशा एव भिन्नाः । न तु शब्दः ॥ इति शबरः ।

पंचमपूर्वपक्षे वर्णविकारादनित्यत्वमिति प्रतिपादितं । वर्णांतरं विकारो नास्ति । न हि सादृश्यमात्रं दृष्ट्वा प्रकृतिर्विकृतिर्वा उच्यते । न हि यकारं प्रयुञ्जाना इकारमुपाददते । न हि दधिपिटकं दृष्ट्वा कुन्दपिटकंच । प्रकृतिविकारभावोऽवगम्यते । इतिशबरः ॥

---

१४. आतां प्रयोग म्हणजे कोणता ? या प्रश्नाचें उत्तर देतांना या तिसऱ्या उत्तरपक्षाशीं तिसरा पूर्वपक्ष जोडून वाचावा. ह्या तिसऱ्या उत्तरपक्षांत 'जा, ये,' असे जे, शब्दाचे प्रयोग बोलतांना आम्ही करतों, त्या अर्थी 'प्रयोग' शब्द योजिला आहे. व मागील सूत्राचें अनुसंधान केलें म्हणजे शब्द आहेच आहे, तो प्रयोगानें केवळ व्यक्त होतो, या प्रतिपादनाचा अर्थ समजेल; आणि यावरून शब्द नित्य आहे असें आचार्य स्थापन करतात.

opponent's statement as made in the 8th sûtra. When the two sûtras are read together, the application referred to will be apparent. Tbe word *Prayoga* is used in the 14th sûtra in the sense of "using" that is, using the words, for instance, *go* or *come* in conversation. The 8th sûtra when referred to will show that the use of a word makes it apparent only ; but that it already exists. Jaimini seeks to establish, by means of the argument in the sûtra, the eternity of sound.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१५. सूर्याप्रमाणें एककालीं (सर्वत्र) असणारा (शब्द आहे) म्हणून. (उ० ४).

१६. वर्णान्तर अविकार आहे. (उ० ५).

15. Because sound is simultaneous and (universal) like the sun. (Reply 4.)

16. The change of a letter is its non-modification. (Relpy 5.)

---

१५. जसा सूर्य एकच आहे तरी निरनिराळ्या ठिकाणीं आहे असा भासतो त्याप्रमाणें शब्दहि एक असून नित्य आहे. आकाशांत शब्द रहातो, म्हणून त्याला आकाशविषय, आकाशवृत्ति असें शास्त्रांत म्हणतात. शब्द हा आकाशाचा गुण असें वैशेषिक शास्त्रांत प्रतिपादन आहे. आकाश एक असून नित्य आहे, म्हणून शब्दहि एक असून नित्य आहे. या अनुमानाविषयीं एक दोन न्यायांचें उद्घाटन केलें पाहिजे. गुण आणि गुणी म्हणजे ज्याचे गुण तो या दोहोंचा विचार करतांना निरनिराळ्या शास्त्रकारांनीं निरनिराळ्या योजना केल्या आहेत. परंतु गुणसमुदाय म्हणजे गुणी म्हणजे द्रव्य असा सिद्धांत पतंजलीनें महाभाष्यांत वर्णिला आहे. आणि गुणीचा आणि गुणाचा संबंध नित्य असतो अशा बारिक गोष्टींचा विचार येथें करतां येत नाहीं. या सर्व गोष्टींचा विचार प्रसंगवशात् होईल. येथें फक्त दिग्दर्शन केलें आहे. आकाशाचे निरनिराळे भाग नाहींत, तसे त्याच्या गुणाचे म्हणजे शब्दाचे निरनिराळे भाग नाहींत, म्हणजे शब्द एकच आहे. तसेंच, आकाश नित्य आहे, तसाच त्याचा गुण, म्हणजे शब्द नित्य आहे. हा असा शबरांनीं सूत्राशय वर्णन केला आहे. आतां, सूर्याची उपमा घेतली आहे, आणि त्या उपमेच्या योगानें प्रतिपादन केलें आहे, या स्थळीं उपमान प्रमाणाची योजना झाली आहे. सूर्याचें वर्णन करून शब्दाविषयीं सादृश्य आणलें आहे, ह्या सादृश्यमूलक प्रमाणाचें नांव

15. As the sun being one is seen at the same time and in different places, so sound is heard at the same time and by different persons. It is, therefore, one and eternal. Because sound exists in æther, therefore, it is called Âkâshavritti or Âkâshavisaya in philosophy. Vaishesika philosophy states that sound is the essential property of æther. Because æther is one and eternal, therefore sound (its essential property) is one and eternal. Two logical methods are employed in support of this statement. Different principles are enunciated in the systems of philosophy in investigating the relation between a property and its substratum or between a quality and the qualified. But Patanjali states in the Mahâbhâsya that matter is an assemblage of qualities. The propositions that sound is the essential property of æther and that the relation between a property and its seat is eternal, are too subtle to be considered at this stage of our enquiry. Such principles will be explained as occasion arises. We have only indicated the nature of the principles involved. As æther cannot be separated into parts, so its property is one and indivisible. Again, as æther is eternal, so its property is eternal. That is, to sum up, sound is one, indivisible, and eternal. Commentator Shabara explains the gist of

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

नादवृद्धिपरा ॥ १७ ॥ (उ० ६).

पदानि । नाद–वृद्धि–परा (वृद्धिः) (षष्ठपूर्वपक्षादनुवृत्तमन्त्यंपदं)

पदार्थः । नादवृद्धिः=नादस्यवृद्धिः । तत्परा नादवृद्धिपरा ॥

वाक्यार्थः । नादवृद्धिमवलंबते या वृद्धिः सा वृद्धिः पूर्वपक्षे निरूपिता॥ तया शब्दनित्यत्वस्य हानिर्न सिध्यति ॥

भावार्थः । स्पष्टः । निरवयवो हि शब्दः । अवयवभेदानवगमात् निरवयत्वाच्च महत्वानुपपत्तिः ॥ अतो न वर्द्धते शब्द इतिशबरः ॥

उपमान. आणि हें सादृश्य जितक्या जितक्या अंशीं जुळतें, तितक्या तितक्या अंशीं तें सबळ होतें. या प्रमाणाची योजना युरोपीयपण्डित फार करतात. भूगर्भशास्त्राची उत्पत्ति याप्रमाणाचें अवलंबन केल्यानें झाली. तसेंच धर्मसिद्धांताचें प्रतिपादन करतांना बट्लर नामें इंग्रजानें या प्रमाणाची योजना मोठ्या चातुर्यानें केली आहे. अशीच आचार्यांनीं सूर्याची उपमा या ठिकाणीं घेतली आहे, व उपमानप्रमाण साधलें आहे. उपमानप्रमाण आचार्यांनीं या स्थळीं योजिलें आहे, त्यावरून उपमानप्रमाण मीमांसक घेतात कीं काय असा संशय उत्पन्न होतो. याचें समाधान इतकेंच कीं उपमानप्रमाणाची योजना युक्तिवादांत, गुणपरीक्षणांत व वाक्यार्थमीमांसेंत निरनिराळ्या अर्थीं होते, इतकेंच चिंतनीय आहे, असें आम्हीं पूर्वी सुचविलें आहे. पूर्वपक्षकार आणि आचार्य, यांचा सूत्रांमध्यें युक्तिवाद चालला आहे.

१६. सूत्राचा अर्थ पांचव्या पूर्वपक्षाचें अनुसंधान केलें म्हणजे सहज लागतो. इवर्णाच्या ठिकाणीं यवर्ण घातला असतां वर्ण बदललेसे होत नाहींत. केवळ वर्ण सादृश्यामुळें प्रयोग होतो, त्यांसच प्रकृति, आणि विकृति म्हणतां येत नाहीं. याव-

this sûtra in this way. Now the sun is compared to sound. Here the proof called analogy is employed. The force of analogy consists in pointing out points of resemblance between two things. The proof is strong in proportion as the points of resemblance are cumulated. This kind of proof is much employed in Europe. The science of geology is based on analogy. Butler, again, employs analogy with great ingenuity to establish principles of natural religion and Christianity. Jaimini, in the same manner, employs analogy in the sûtra with great power. Now the question is natural :—Do the Mîmâusakas sanction the use of analogy because it is employed by Jaimini? This question can be thus answered : Analogy is employed in different senses as in original investigation, in physics or natural philosophy and in exegetics. On this we have already dwelt cursorily. Jaimini, of course, uses analogy in his discussion with an opponent.

16. The sense of the sûtra is easily seen if it be read along with the fifth sûtra. The substi-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७. शब्दाची वृद्धि नादवृद्धीमुळें होते. (उ० ६).

रून वर्ण नित्य आहे असें स्पष्ट आहे. "अविकार" शब्द जो सूत्रांत योजिला आहे, त्याच्याच संबंधानें प्रकृति आणि विकृति हे शब्द आले आहेत. आणि यांची शास्त्रविचारांत नेहेमीं योजना होते, म्हणून यांच्या अर्थाकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. प्रकृति म्हणजे मळ स्वाभाविक रूप, त्यांत कांहीं फेर पडला म्हणजे त्यास विकृति म्हणतात. साही शास्त्रांत या शब्दांचा उपयोग होतो. त्यांत सांख्यशास्त्रांत हे शब्द प्रधान आहेत. या सूत्रसंबंधानें प्रकृतिविकृतिशब्दांचा प्रयोग व्याकरणानुरोधानें केला आहे. व्याकरणामध्यें शब्दाची प्रकृति आणि विकृति अशी मानली आहेत. शब्दाचें मूळरूप ती प्रकृति, असें आम्हीं वर्णिलें आहे आतां, सूत्राचा आशय इतकाच आहे कीं, पूर्वपक्षांतील 'प्रीत्युत्तर' या उदाहरणांत प्रीति हा शब्द विकृति पावून नेहेमीं प्रीत्यु असाच रहात नाहीं, म्हणून या भेदास विकार म्हणतां येत नाहीं. कार्यानुरोधानें वर्ण फिरलासा दिसतो. पण मुळप्रकृति जशीच्या तशीच रहाते.

१७. शब्द निरवयव आहे, म्हणजे ध्वनी केला असतां त्याची अवयवकल्पना निरनिराळे लोक निराळ रीतीनें करितात, म्हणून ध्वनीस अवयव नाहींत. आतां मोठा ध्वनि किंवा लहान ध्वनि ऐकूं येतो, परंतु स्वतः ध्वनि लहान किंवा मोठा नाहीं. श्रवणशास्त्राचा विचार केला म्हणजे ही गोष्ट स्पष्ट लक्षांत येईल. पूर्वी शब्दोत्पत्तीचा प्रकार वर्णिलाच आहे. जितका जितका ध्वनि कानांत प्रवेश करितो, तितका तितका तो मोठा असें भासतें मात्र. वायूंतील वीचितरंग द्वारें कर्णाकाशावर संस्कार घडून पुढें ध्वनीचें ज्ञान होतें. जि-

17. A word is augmented in proportion as sound is augmented. (Reply 6).

tution of *y* for *i* is changing of letters. The expressions *original form* and *modified form* cannot be used when one letter is substituted for another on account of their resemblance. The phrases *original form* and *modified form* are introduced on account of their connection with the term—*non-modification* in the sûtra. As they are used in philosophical discussions, their meanings deserve attention. An original form is the first natural form. When it is altered in any way, it is called a modified form. These phrases occur in all the systems of philosophy. They are specially important in the Sânkhya system of philosophy. The phrases *original form* and *modified form* are used grammatically in connection with this sûtra. Grammar recognizes these forms of a word. We need not state that the first natural form of a word is its original form. Now the gist of the sûtra is :—In the example —*prîtyuttara*, adduced by an opponent, *i* in *prîti* is not permanently changed, and the alteration cannot be called a modification. A letter though altered a little, retains its original form.

17. A word has no parts, because different nations fix on different forms, and consider them to be the constituent letters of a word. A sound is believed to be loud or low, but the sound itself is neither the one nor the other. A little attention to acoustics will elucidate this statement. The way in which a sound originates

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

नित्यस्तुस्याद्दर्शनस्य परार्थत्वात्॥ १८ ॥ सि० ॥

पदानि। नित्यः, तु, स्यात्, दर्शनस्य, पर-अर्थत्वात् ॥

पदार्थः। तु=तस्मात्। स्यात्=भवितुमर्हति। दर्शनस्य=उच्चारणस्य। पर-अर्थत्वात्=अन्यस्यप्रयोजनाय ॥

वाक्यार्थः। तस्मादन्यप्रयोजनाय शब्द उच्चार्यतेऽतः स नित्य इतिवक्तुमर्हति ।

भावार्थः। विनष्ट उच्चारणेपि तस्यार्थोऽवशिनष्टि । अतोन्यस्य प्रयोजन-प्रबलताऽतः शब्दस्यानित्यता ॥

तक्या जितक्या कर्णाकाशावर संस्कार होईल तेवढा तेवढा ध्वनि लहान मोठा भासेल. यास दृष्टांत, कानामध्यें एखादी कर्ण्यासारखी नळी घालून कर्णाकाशाचा प्रदेश वाढविला, तर मोठा ध्वनि ऐकूं येतो. पण कानाची पाळ दाबून कर्णाकाशाचा संकोच करून ऐकला म्हणजे तोच ध्वनि लहान आहेसा भासतो. यावरून कर्णाकाश व वायूंतील वीचितरंग यांचा जेवढा जेवढा संयोग होतो, तेवढा तेवढा मोठा किंवा लहान ध्वनि आहे असा भासतो. यावरून शब्दाला म्हणजे ध्वनीला अवयव नाहींत, म्हणून वृद्धि नाहीं; म्हणून तो नित्य आहे असा सूत्रकाराचा आशय आहे.

has already been explained. A sound is only believed to be loud in proportion as it enters the ears. A sound is perceived when the æther in the ears is affected by the ripples in the air. A sound is either loud or low as a larger or smaller portion of the æther in the ears comes in contact with the ripples of air. For example, if the extent of the æther in the ears be artificially increased by inserting a small trumpet in an ear, a loud sound is heard. When the æther in the ears is reduced by contracting the ears by means of pressure, a low sound is heard. Hence it is clear that a sound is either loud or low as the extent of æther in the ears comes in contact with the ripples of the air. Hence the gist of the sûtra is that sound has no parts, and is neither increased nor decreased, and that, therefore, it is eternal.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८. या कारणास्तव दुसऱ्या करितां शब्द उत्पन्न होतो म्हणून तो नित्य म्हणावा.

१८. साहा पूर्वपक्षांचें साहा सूत्रांच्या उपन्यासानें आचार्यांनीं समाधान केलें. आतां या सूत्रानें सिद्धान्तविवेचनाला आरंभ झाला. "या कारणास्तव" या वचनानें समाधान करतांना जीं कारणें दिलीं त्या कारणामुळें असें समजावें. "शब्द उत्पन्न होतो" या वचनाचा अर्थ मागील निरूपणावरून स्पष्ट आहे. "दुसऱ्या करितां" येवढीं पदें आतां बाकी राहिलीं, त्यांचा विचार. मूळ संस्कृत सूत्रांत "परार्थत्वात्" अशीं पदें आहेत. त्यांचा अर्थ "दुसऱ्याच्या प्रयोजनावरून" असा शब्दशः होतो. "परार्थत्वात्" हें पद तिसऱ्या अध्यायाच्या पहिल्या पादांतील दुसऱ्या सूत्रांतहि योजिलें आहे. याच्या अर्थाकडे या मीमांसेंत विशेष लक्ष दिलें पाहिजे. कारण, तेणेंकरून गुणगुणिभावाचा निश्चय होतो, आणि मीमांसाशास्त्राचा गुण कोण व गुणी कोण हें ठरविण्यावर विशेष कटाक्ष आहे. वरील सूत्रामध्यें जो आशय वर्णन केला आहे तो हा—उच्चारण करतांच शब्दध्वनि नाहींसा होतो, यावरून उच्चारणानेंच किंवा श्रवणानेंच शब्दध्वनीपासून कांहीं कार्य होत नाहीं, तर त्यापासून जें ज्ञान उत्पन्न होतें त्याच्या योगानें कार्य होतें. याप्रमाणें शब्दध्वनीला परार्थत्व आहे. आतां, एका प्रकारचे ध्वनीनें नेहमीं एकाच अर्थाचें ज्ञान होतें, याकरितां शब्द नित्य आहे, असें प्रतिपादन आहे. आतां, कोणी असें म्हणेल कीं, अर्थामध्यें आणि ध्वनींत कांहीं सादृश्य असतें त्याप्रमाणें ज्ञान होतें. परंतु हें बोलणें सयुक्तिक नाहीं. नेहमीं नव्या

18. Therefore, a word becomes manifest for others, therefore, it is eternal.

18. Jaimini removes the objections of his opponent in the preceding sûtras. Now, he begins in this sûtra to establish the final statement. The term *therefore* in the sûtra refers to the reasons offered in the six replies. "A word becomes manifest" is a phrase which the observations already made can explain. *For others* is a phrase used in the sûtra. It has to be explained. In the original Sanskṛita sûtra, the phrase is *parârthatvât*, consisting of two terms—*para* and *arthatvât*. It means *from the purpose of others*. The same phrase occurs in (III. 1, 2.) of this Mîmânsâ. This phrase deserves special attention so far as this Mîmânsâ is concerned, for it determines the relation between a quality and the qualified or gu*n*a and gu*nî*; and this Mîmânsâ particularly discusses such problems as arise from the investigation of the relation. The gist of the sûtra is that a sound disappears as soon as it is made, that pronouncing a word or hearing it does not answer a purpose, but that the knowledge it causes is fruitful and to the purpose. Thus a sound or a word is intended for others.

Now one and the same sound always causes the same knowledge. Therefore, it is stated that a word is eternal. Knowledge, it may be objected to, depends on the resemblance of a sound to its sense. But such an objection is not reasonable. One has always to ad-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

सर्वत्र यौगपद्यात् ॥ १९ ॥

पदानि स्पष्टानि ॥

पदार्थः । शब्दो नित्यः सर्वत्र यौगपद्यात् ॥

भावार्थः । एक एव आकृतिवचनः शब्दः तस्मिन्नुच्चारिते सर्वव्यक्तिषु युगपत् प्रत्ययो भवति ॥ अतएव शब्दो नित्यः ॥

संख्याभावात् ॥ २० ॥

पदानि । (शब्दः नित्यः) संख्या-अभावात् ।

पदार्थः स्पष्टः ॥

वाक्यार्थः । आकृतिवचनशब्दस्य संख्या नास्ति ॥

भावार्थः । यथा । अष्टकृत्वो गोशब्द उच्चारितः इति वदंति ॥ नाष्टौ-गोशब्दा इति ॥ अतएव शब्दो नित्यः ॥

नव्या लोकांशीं बोलण्याचा प्रसंग पडतो, म्हणून ध्वनिसादृश्य संभवतच नाहीं. आतां ध्वनीमध्यें आणि अर्थामध्यें कृत्रिम संबंध असावा असें म्हटल्यास एकवेळ उच्चार केल्यानें अनेक प्रकारचे व्यापार व्यवहार होऊन जातात, त्यावरून कृत्रिम संबंध आहे असेंहि म्हणवत नाहीं. याकरितां शब्द नित्य आहे, असें म्हणणें प्राप्त होतें. प्रथम दर्शनीं हें अनुमान कांहीं वाचकांस विचित्र वाटेल, परंतु शब्द उत्पन्न कसा होतो, अमकाच त्याचा अर्थ असावा असा ईश्वरी संकेत आहे कीं काय, इत्यादि गोष्टींचें विवेचन व त्यावर वाद युरोपी न्यायशास्त्राचे ग्रंथांत अढळतो, व याविषयीं सिद्धांत कांहीं अजून ठरला नाहीं.

dress his speech to new acquaintances, and, therefore, the resemblance is not possible. If it be stated that the relation between a sound and its sense is artificial, then one word once pronounced answers its purpose in many ways, and many transactions are directed. Therefore, the relation is not artificial. Therefore, the statement that a word is eternal cannot be avoided. This inference may appear strange to some of our readers. But even European thinkers moot such questions as—what is the origin of a language? and how far is it determined by the will of God? These are open questions still.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९. सर्वत्र एकदम शब्द प्रत्यय होतो म्हणून (तो नित्य आहे).

२०. संख्याभावामुळें (शब्द नित्य आहे).

19. From simultaneity every-where.

20. From the absence of number, (sound is eternal.)

---

१९. एक मृग शब्द उच्चारिला असतां सर्व मृगविषयक ज्ञान होतें, म्हणून शब्द आकृतिवाचक आहे, असा अर्थ शबरांनीं वर्णिला आहे. आकृति हा शब्द प्रथमच आला आहे, म्हणून त्याचें थोडेंसें विवेचन केलें पाहिजे. पदार्थांचा सामान्य धर्म दाखविणारे दोन शब्द आहेत—एक आकृति, व दुसरा जाति. आतां आकृति आणि जाति यांमध्यें काय भेद आहे, हें पाहिलें पाहिजे. जातीच्या योगानें स्वभाव उपलब्ध होतो. स्वभाव म्हणजे कोणतीहि वस्तु जेव्हां उत्पन्न होते, तेव्हांच तिच्या अंगीं जो विशेष गुण असतो तो. या गुणानें जातीचें भान होतें. 'जन्मतः' जो पदार्थांचा गुण ती त्याची जाति, इतकाच मात्र कटाक्ष आहे. नानावस्तूंचें अवलोकन करून त्यांच्या साधर्म्यवैधर्म्यांविषयीं विचार करून त्यांमधील अनुगत धर्मांचा निश्चय करून जे गुण भासमान होतात त्यास आकृति असें म्हणावें. आतां जाति आणि आकृति यांच्या संबंधानें एकाच वस्तूचें अवलोकन करतांना कटाक्ष दोन प्रकारचा असतो,—कोण्या वस्तूचा स्वाभाविक गुण कोणता म्हणजे तिच्या उत्पत्तिबरोबर उत्पन्न झालेला गुण हा एक कटाक्ष, आणि दुसरा त्या वस्तूचें वारंवार अवलोकन करून भूयोदर्शनानें अवलोकित व निश्चित झालेले गुण. आकृतिज्ञान साधर्म्यवैधर्म्यविचार करून अनेक वस्तूं विषयीं अनुगम करून उत्पन्न होतें. तर शब्द आकृति-वाचक आहे असें मीमांसकांचें म्हणणें आहे, आतां शब्द नित्य

19. Jaimini offers an additional reason, and uses the ablative. Yougapadyât is the term in the original. It is translated by *from simultaneity*. Now, when the word, *cow* is used once, it causes the knowledge of a cow in general. Therefore, a word expresses a form. This is the way Shabara explains the sûtra. The term, *form* (âkriti), is used for the first time, and therefore, it calls for some special consideration. There are two terms âkriti and jâti which mean generality. The question now is—what is the distinction between âkriti and jâti. Jâti refers directly to the knowledge of the nature of a thing, that is, a property which is inseparably connected with its origin itself,—*a property innate*. This property is the means of the knowledge of jâti. The drift of the observation is that the essential property constitutes jâti. Âkriti again is based on the knowledge of a generality as derived from the observation of many things and from marking the points in which they resemble as well as differ from one another. The generalized property constitutes âkriti. The terms jâti and âkriti discover two points of view from which the same thing is observed. The first seeks to determine the *innate property* of a thing and the last, a generality as determined by varied ob-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुत्राणि.

अनपेक्षत्वात् ॥ २१ ॥

पदार्थः । अनपेक्षत्वात्=अकारणत्वात् ॥

वाक्यार्थः । शब्दो नित्यः अनपेक्षत्वात् ॥

॥ नैवंशब्दस्य किंचित् कारणमवगम्यते यद्विनाशाद् विनङ्क्ष्यतीत्यवगम्यते ॥ इति शबरः ॥

आहे, आणि शब्द आकृति वाचक आहे. या दोन गोष्टींचा विचार मग करूं.

२०. आकृतिवचनशब्दाला संख्यावाचक विशेषण लागत नाहीं, म्हणून शब्द नित्य आहे. वीसवेळ मृग शब्द उच्चारिला असें कोणी म्हणेल, पण वीस मृगशब्द आहेत असें म्हणतां येणार नाहीं. आतां, वीस मृग आहेत असें म्हणतां येतें. या स्थळीं इतकाच विचार करण्याचा आहे कीं, मृगशब्दाची योजना एका व्यक्तीविषयीं होते, तरी त्यावरील आकृतीची हानि होत नाहीं.

servation. The use of the phrases *a priori* and *a posteriori* will explain the processes at once. Now the Mîmânsakas state that a word expresses a form. The question—how is this to be reconciled with the doctrine of the eternity of sound—will be answered in due course.

20. A word expressing a form cannot take a numeral adjective. Therefore, a word is eternal. One may say that the word—cow—has been pronounced twenty-times, but he cannot say that there are twenty words-cow. Now one can speak of twenty cows. Here what is to be noticed is that the word-cow is used as expressing an individual, and it does not lose its power of expressing a form. The Mîmânsakas hold that the essential property of a word is to impart the knowledge of a generality or âkriti.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२१. अनपेक्षत्वामुळें (शब्द नित्य.)

२१. सापेक्षत्व आणि अनपेक्षत्व म्हणजे काय, याचा पूर्वी विचार करून सूत्राशयाचें वर्णन केलें पाहिजे. दोन वस्तूंचा परस्पर संबंध असला, म्हणजे त्या वस्तु सापेक्ष आहेत, आणि या संबंधानें त्या वस्तूंवरील जो धर्म तो सापेक्षत्व होय. तसेंच एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूशीं कोणताहि संबंध नसला म्हणजे ती अनपेक्ष आहे. आणि या संबंधानें त्या वस्तुवरील जो धर्म तो अनपेक्षत्व होय. यास दृष्टांत. राजा ज्ञानाचा संभव प्रजाज्ञानावांचून व्हावयाचा नाहीं; म्हणून राजा आणि प्रजा हे सापेक्ष शब्द आहेत, आणि या दोन्ही शब्दांवर सापेक्षत्व हा धर्म आहे. तसेंच शब्द अनपेक्ष आहे असें सूत्रकार म्हणतात, म्हणजे शब्दध्वनीचा कशाशीं संबंध नाहीं. अमुकच पदार्थ असला म्हणजे शब्द आहे, आणि नसला म्हणजे शब्द नाहीं, असा संबंध अढळत नाहीं. म्हणून शब्द अनपेक्ष आहे. जें अनपेक्ष तें नित्य असा सूत्राचा आशय. अनपेक्षत्व शब्दाचा अर्थ शबर "अकारणत्व" असा करतात, तो चिंतनीय आहे.

21. From non-correlation, (a word is eternal.)

21. The terms correlation and non-correlation require to be explained first before the gist of the sûtra can be given. Two things which are essentially connected with each other, are correlative. In this relation the property of two things is called correlation. Again, the thing which is not in any way connected with another is non-correlative. In this relation, its property is called non-correlation. The latter property is expressed in English by the use of the word *absolute*. The knowledge of a prince is inseparable from the knowledge of his subjects. Therefore, the terms *prince* and his *subjects* are correlative, and the terms have the property called correlation. Now Jaimini maintains that a word is non-correlative, that is, the sound of a word is not connected with any thing. That a sound can exist when something exists, and that it ceases to exist when the same thing does dot exist, is not true so far as the relation of a word to other things is concerned. Therefore, a word is not correlative, that is, it is *absolute*. The gist of the sûtra is that whatever is *absolute* or non-correlative is eternal. The term *anapeksatva* is construed into the absence of a cause by Shabara. This sense of *anapeksatva* is questionable.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

प्रख्याभावाच्चयोगस्य ॥ २२ ॥

पदानि । प्रख्या-अभावात्, च, योगस्य ॥

पदार्थः । प्रख्या=प्रकटनं । अभावात्=अविद्यमानत्वात् । च=(समुच्चये) योगस्य=समुदायस्य ॥

वाक्यार्थः । अन्योहेतुः ॥ समुदायस्य नाम समुदायशब्दस्य प्रकटनाऽभावात् ॥

भावार्थः । शब्दसमुदाय आकृतिर्न परिसमाप्यते ॥ अतः शब्दसमुदाय आकृतिवचना शक्तिर्नास्ति ॥ अतः शब्दस्यैकैकस्याकृतिवाचकता ॥ अतएव शब्दो नित्यः ॥

सूत्रस्यास्य शबरोऽन्यथा तात्पर्यवर्णनं करोति ॥ तच्चिन्त्यं ॥ वायवीयश्चेत् शब्दो भवेत् । वायोः सन्निवेशविषयः स्यात् ॥ वायवीयान् अवयवान् शब्दे सतः प्रत्यभिजानीमः स्याच्चेदेवं स्पर्शनेनोपलभेमाहि ॥ नच वायवीयानवयवान् शब्दगतान् स्पृशामः॥ तस्मान्नवायुकारणकः । अतो नित्य इति शबरः ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२२. आणि समुदायशब्द न प्रकट होतो ह्मणून.

२२. सूत्रकारानें जो " आणि " शब्द योजिला आहे त्याचें तात्पर्य मागील सूत्रांतील कारण घेऊन हें दुसरें कारण पहावें. या सूत्रांत मुख्य तीन संस्कृत शब्द आहेत. त्यांचा विचार केला पाहिजे. ते तीन शब्द योग, प्रख्या आणि अभाव. त्यांत प्रख्या म्हणजे प्रकटन, किंवा प्रसिद्धि, अभावशब्दाचा अर्थ स्पष्टच आहे. आतां, अवशिष्ट योगशब्द राहिला, त्याचे अर्थाविषयीं विशेष विचार केला पाहिजे. योगशब्दाचा वेदामध्यें समुदाय असा मूळ प्रकृत्यर्थ असून मग त्याची नाना प्रकारें योजना होते; जसें योगक्षेम या स्थळीं योग याचा अर्थ ऐश्वर्य म्हणजे द्रव्यसमुदाय असा होतो. "योगं युज्यते ब्रम्हचारी" असे पतञ्जलीच्या महाभाष्यांत वाक्य आहे. पाणिनीचे व्याकरणांत "उपयोग" म्हणजे अध्यापन असा अर्थ होतो. योगशास्त्रांत योग म्हणजे चित्तवृत्तींचा निरोध असा अर्थ आहे. पतञ्जलि आपल्या महाभाष्यांत हजारो वेळां योगशब्दाचा उपयोग करतो. त्या त्या ठिकाणीं योगशब्दाचा अर्थ सूत्र असा होतो तें पतञ्जलीचें वाक्य ' योगस्तर्हिभिद्यते" हें आहे. आतां केव्हां केव्हां योगशब्दाचा अर्थ " समुदायशब्दस्यावयवार्थसंबंधे " असा होतो, म्हणजे प्रत्येक शब्दावयवाचा अर्थ करून त्यांचा संबंध जोडून जो शब्दसमुदायाचा अर्थ होतो तो. तेव्हां या ठिकाणीं देखील अवयवसंबंधास धरून समुदायशब्दार्थ असा घेतला आहे. जैमिनिकृत मीमांसेच्या पहिल्या अध्यायाचे तिसऱ्या पादाचे बाविसावे सूत्रांत "योगाख्य" हें पद अढळतें

22. And a word conveying the sense of a sentence does not appear. (Therefore, a word is eternal.)

22. The word *and* used by Jaimini adds a reason to the preceding. In the original Sanskrita sûtra, there are three terms which call for enquiry. These terms are—*yoga*, *prakhyâ* and *abhâva*. Now *Prakhyâ* means manifestation : The sense of *abhâva* is absence. The remaining word *yoga* deserves special attention. The word *Yoga*, the Vaidika general sense of which is an assemblage and which etymologically means conjunction, is used in various ways. As in *yoga Ksema*, *yoga* means in the Vedas prosperity, that is, collection of wealth. In Patanjali's Mahâbhâsya, the sentence *yogam yujyate Brahmachârí* occurs. Here *yoga* means a life of austerities. In the grammar of Pâṇini, *upayoga* means instruction. In the Yoga-system of philosophy *yoga* means the restraining of the feelings of the mind. Patanjali often uses the word *yoga* in his Mahâbhâsya, and means by it a sûtra. His favourite phrase is " *Yogas tarhi bhidyate*," that is, the sentence or sûtra is divided. Now, sometimes *yoga* means the relation of the senses of the parts of a collective word, that is, the sense of a sentence arising from the sense of each of its parts, and originating in the connection of the constituent words. *Yoga*, therefore, means the sentence with its sense based on the senses of its constituent words. Jaimini uses the phrase *Yogâkhya* in (I. 3, 22.) where *yoga* means the etymolo-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

लिंगदर्शनाच्च ॥ २३ ॥

पदानि । लिंग–दर्शनात्, च ॥

पदार्थः । लिंगं=हेतुः । तस्य दर्शनात् ॥ (८.७५,६.)

वाक्यार्थः । हेतुर्दृश्यते । पुनः तस्मात् ॥

यतो हेतुर्दृश्यते ततः शब्दो नित्यः ॥ वाचा विरूप नित्यया त. सं. (२.६,११,२.) इत्याकारकेण वेदवाक्येन शब्दस्यनित्यता अनूदिता ॥ इति शबरः ॥

तेथेंहि योग शब्दाचा अर्थ व्युत्पत्तिसंबंधानें शब्दार्थ असा होतो. असा योगशब्दाच्या निरनिराळ्या अर्थांचा विचार केल्यानें त्याचा अर्थ अवयव असा घटत नाहीं, म्हणून शबरांनीं केलेला "वायवीय अवयव" हा अर्थ आम्हांस घेतां येत नाहीं. पुनः या वायवीयसंयोगविभागांविषयीं पूर्वी सूत्रांत विचार झालाच आहे, तोच विचार पुनः सूत्रकार येथें करतात असें आम्हास वाटत नाहीं. पुनः वायवीयावयवाचा शब्द ऐकतांना कानास स्पर्श होत नाहीं; हें म्हणणें प्रत्यक्ष विरुद्ध आहे. पुनः "वायु शब्द बनतो." हें शिक्षाकाराचें वचन कायम राहतें. शबराला या वचनाचा त्याग करावा लागतो. या सर्व कारणांकरितां योगाचा अर्थ समुदाय म्हणजे शब्दसमुदाय असा आम्हीं केला आहे. आतां समुदायशब्द प्रकट होत नाहीं असा सूत्रार्थ लिहिला आहे. याचा अर्थ–सगळ्या वाक्याचा अर्थ आणि प्रत्येक शब्दाचा अर्थ हे निरनिराळे असे मीमांसक मानितात; त्यांत मीमांसक समुदायास म्हणजे सर्व वाक्यास अर्थशक्ति नाहीं असें मानितात, परंतु वाक्यरूप समुदायांतील प्रत्येक शब्दरूप व्यक्तीस अर्थशक्ति आहे म्हणजे शब्दाशब्दाचा अर्थ होऊन वाक्यार्थ होतो. शब्दार्थ स्वतंत्र

gical sense of a word. When the different applications of the word *yoga* are collated, it is plain that it cannot mean a word as such. We, therefore, cannot adopt the sense of *yoga* which Shabara construes into particles of air. Again the conjunctions and disjunctions of air are already explained in the preceding sûtras. We cannot, therefore, believe that Jaimini reproduces the same considerations in this sûtra. Again, it is contrary to direct sensuous perception to say that the particles of air do not come in contact with the ears ; the Shiksakâra states that air attains to the condition of a word. This statement cannot be ignored or set aside. Shabara is obliged to set it aside. For these reasons, we have construed *yoga* into an assemblage of words, that is, a sentence. Now, that a collective word is not manifested is the sense we have given, of the sûtra. The sense of this is —that the Mîmânsakas believe that constituent words of a sentence and the sentence itself have their own meanings..But they believe that a sentence by itself and independently of its constituent

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूचना.

	रुपये.	आणे.
वर्षाची वर्गणी, अगाऊ	५	०
एका अंकास	०	८

पुण्याबाहेर राहणारांस टपाल हंशिलाबद्दल दर वर्षाचे ६ आणे खेरीज पडतील. मागाहून वर्गणी घेतली जाणार नाहीं.

ग्रंथकर्त्यास अथवा म्यानेजरास जीं पत्रें लिहावयाचीं, तीं "षड्-दर्शनचिंतनिका—आफिस, पुणें, सदाशिव पेंठ, घर नंबर ६४१" या पत्त्यावर लिहावीं. वर्गणी वगैरे संबंधी पत्रें याच पत्त्यावर पाठवावीत.

	Rs.	A.
For one year, in Advance... ...	5	0
Single copies.	0	8

Besides six annas for postage at the rate of half an anna for a copy.

N. B. The subscription is to be paid *in advance.* No accounts of arrears can be kept.

All letters should be addressed to the Manager of the *Sad*darshana-Chintanikâ-Office, Poona, Sadashive Petha, House Municipal No. 641.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

[अ०१. ५

THE

SADDARSHANA-CHINTANIKÂ

OR

STUDIES IN INDIAN PHILOSOPHY.

षड्दर्शनचिंतनिका.

मीमांसादर्शन

वृत्तिसहित

त्याचें मराठी आणि इंग्रजी भाषांतर.

पुस्तक १. मार्च १८७७. अंक ३.

पुणें.

"ज्ञानप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

(सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदली आहे.)

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

On earth, there is nothing great but man ;
In man, there is nothing great but mind.

Such moneys as are due to us in Bombay may be paid to Anna Moreshvar Kunte B. A. M. D. Esqr., Kandevadi Bombay.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२३. आणि आधार हेतु दिसल्यामुळें.

आहे, वाक्यार्थ स्वतंत्र नाहीं. शब्दार्थ हें कारण आहे, वाक्यार्थ हें त्याचें कार्य आहे. याच प्रकारचें वचन पातञ्जल महाभाष्यांत आहे. तें वचन "शब्दसमुदाये आकृतिर्न परिसमाप्यते" म्हणजे "साऱ्या वाक्याला आकृतिवाचक शक्ति नाहीं." हा आकृतीचा विचार पूर्वी वर्णिलेल्या एकोणिसाव्या सूत्रांत शबरांनीं अंगीकारिला आहे. आणि आम्हीं केल्याप्रमाणें या सूत्राचा अर्थ केला असतां चोविसाव्या सूत्रांतील पूर्वपक्षास हें सूत्र योग्य अवतरण होतें, म्हणून आमचा अर्थ शबरांच्या अर्थापासून अगदीं भिन्न आहे. या दोन्ही सूत्रार्थांचा वाचकांनीं विचार करावा अशी विनंती आहे. वाक्यार्थमीमांसेंत साऱ्या वाक्यापेक्षां शब्द व शब्दार्थ यांची योग्यता मोठी आहे, हा सिद्धांत लक्षांत ठेवण्याजोगा आहे, परंतु या सिद्धांताकडे व्यवहारांत नेहमीं दुर्लक्ष होतें. पुनः वायुकारणक शब्द नाहीं, कारण वायु जर शब्दाचें कारण असतें तर नेहमीं शब्द ऐकूं यावा, कारण वायवीयावयवाचा आणि कर्णांचा नेहमी संबंध आहे. परंतु असें घडत नाहीं, म्हणून वायु हा केवळ शब्दवाहक आहे. म्हणून वायुकारणक शब्द नव्हे, म्हणजे शब्द नित्य आहे असा सूत्रार्थ करण्याकरितां पदाध्याहार करून शबरांनीं अर्थ केला आहे. आमच्या सारखा अर्थ करण्यास अध्याहार मुळींच करावा लागत नाहीं. अध्याहार करणें हा वाक्यार्थमीमांसेंत दोष गणिला आहे. शब्द नित्य आहे असें वैयाकरण मानतात. निरनिराळे वर्ण ऐकल्यानंतर मानसप्रत्यक्षानें पदज्ञान होतें. या ज्ञा-

23. And (a word is eternal) because of the appearance of a mark (of testimony).

words, has no sense of its own; but that every word has the power of conveying a sense for itself, that is, the senses of words cause the sense of a sentence. The sense of a word has the independent power, while a sentence has no independent power, of conveying a sense. The sense of individual words is the cause of the sense of a sentence. Such a proposition is laid down by Patanjali in his Mahâbhâsya:—*Shabdasamudâye âkritir na parisamâpyate.* Thus a sentence has not the power of a form. This view of âkriti is accepted by Shabara in the 19th sûtra already explained. The way in which we have explained this sûtra properly introduces the opponent's objection in the 24th sûtra. For these reasons, we have made bold to propose an interpretation though it differs from that of Shabara. Our readers will kindly consider our interpretation of the two sûtras. In this Mîmânsâ, a word and its sense are attached great importance to. This view deserves consideration. But it appears to be lost sight of in cases of practical application. Again, air is not the cause of a sound, for if the air be the cause, the same sound should be always heard, for the particles of air and human ears are always in contact. But this does not take place. Air, therefore, only conveys a sound. Now to interpret the sûtra into a sound being eternal, Shabara sup-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

उत्पत्तौवाऽवचनाः स्युरर्थस्यातन्निमित्तत्वात् ॥ २४ ॥ (पू०)

पदानि । (योगस्य) उत्पत्तौ, वा, अवचनाः, स्युः, अर्थस्य, अ-तत्-निमित्तत्वात् ।

पदार्थः । उत्पत्तौ=आविर्भावे । वा=न । अवचनाः=अद्योतकाः । अ-तन्निमित्तत्वात्=तेषां निमित्तं नास्ति तदतन्निमित्तं तस्यभावः अतन्निमित्तत्वं तस्मात् ॥

वाक्यार्थः । न । समुदायस्याविर्भावेऽवयवरूपाः पदार्था अर्थस्य द्योतका न भवेयुः । तेषां पदार्थानां समुदायार्थविषये निमित्तत्वं नास्ति ॥

भावार्थः । सूत्रस्थवापदेन पूर्वसूत्रैर्यच्छब्दनित्यत्वं स्थापितं तदस्मिन् सूत्रे पूर्वपक्षकारेण नाद्रियते । यदि समुदायस्य नाम वाक्यस्यार्थवाचकता स्यात् तर्हि पदान्यर्थस्य द्योतकानि न भवेयुः । कुतः । पदानां वाक्यार्थनिमित्तत्वं नास्ति ॥

नाचें कारण वर्णांशिवाय स्फोट म्हणून एक विशेष पदार्थ आहे. शब्द ऐकल्यानंतर हा स्फोट पदार्थ प्रकट होतो. हा स्फोट पदार्थ स्वतंत्र असून नित्य आहे. अशा प्रकारचा मीमांसकांचा जो सिद्धांत तो नैयायिकांस मान्य नाहीं. वर्णापासून एका पदाच्या अर्थाविषयीं ज्ञान उत्पन्न होतें. पदाच्या अर्थज्ञानात वर्ण कारण होतात, म्हणून स्फोटकल्पना करणें निरर्थक आहे. वर्णात्मक शब्द. वर्ण उच्चारानें उत्पन्न होतो व नष्ट होतो, म्हणून शब्द अनित्य आहे असें माधवानें न्यायमालाविस्तारांत नैयायिकांच्या मताचें निरूपण केलें आहे. त्यांत वायुकारणक ही शंका कोठें माधवानें घेतली नाहीं.

poses the existence of an ellipsis and thus supplies it:—air is not the cause of a sound. No ellipsis is necessary for our interpretation. An ellipsis is justly considered to be a fault in exegetics. Grammarians also believe in the eternity of sound. When the constituent letters of a word are heard, there is a direct mental perception of the sense of a word. The cause of this perception is an entity called sphoṭa different from the constituent letters. After a word is heard, the entity sphoṭa manifests itself. It exists independently and is eternal. This doctrine is not accepted by Naiyâyikas who hold that the constituent letters cause the knowledge

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२४. नव्हे. वाक्यार्थ प्रकटनसमर्थी पदें द्योतक न होत. समुदायार्थ करते वेळीं पदांचा अर्थ कारण होत नाहीं. (पू०)

24. No, the words should be meaningless when (the sense of) a sentence appears; (the constituent) words are not the efficient cause of (the collective sense of) a sentence. (Statement of the opponent.)

---

२३. या सूत्रांत "लिंगदर्शनात्" अशीं दोन पदें आहेत. लिंग शब्दाचा अर्थ हेतु असा करतात. दर्शन शब्दाचा अर्थ स्पष्ट आहे. "लिंगदर्शनात" या रचनेचें सूत्र निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या अर्थीं निरनिराळ्या संबंधानें येतें. हीच शैलि कात्यायन-श्रौतसूत्रांत प्रथम अढळते, आणि बादरायणवेदान्त सूत्रांतहि हाच प्रकार अढळतो. परंतु बादरायण "लिंगदर्शनाच्च" एवढ्याचा उपयोग करतात, आणि कात्यायन "दर्शनाच्च" एवढ्याचाच उपयोग करतात. सूत्राचा अर्थ असा शाब्द प्रमाण देते वेळीं जें वचन द्यायाचें तें वचन ग्रंथांतरीं अढळलें, त्यावरून प्रतिपादित सिद्धांत प्रमाण आहे. या ठिकाणीं असें कोणतें श्रुतीचें वचन घेतलें आहे असा प्रश्न उद्भवतो. ऋग्वेद संहितेच्या ८ मण्डळांतील ७५ सूक्तांतील ६ वा मंत्र पहावा. त्यांत "वाचा विरूप नित्यया" असें वर्णन आहे. त्यांत "हें विरूपनामकऋषे! नित्य अशी जी वाणी तिनें" असा अर्थ आहे ऋग्वेदासारख्या सर्वमान्य ग्रंथांत वाणीस नित्य म्हटलें आहे, हेंच लिंगदर्शन आहे. म्हणून शब्द नित्य आहे असा सूत्राचा अर्थ होतो.

२४. हा पूर्वपक्ष आहे. तो बाविसावे सूत्रांतील वचनाकडे लक्ष देऊन काढला आहे. मूळ संस्कृत सूत्रांत सहा पदें

of the sense of a word, and that, therefore, the supposition of the existence of sphota is simply to no purpose. A word consists of letters which are created by the act of pronunciation, after which they cease to exist; therefore, a word is transitory. This view of the doctrine of Naiyâyikas is given by Mâdhava in his Nyâya-Mâlâ-Vistâra, a work full of system. Mâdhava does not allude to the theory of the air being the cause of a sound.

23. In this sûtra, there are two terms:—*linga* and *darshana*. *Linga* means a reason or a mark. *Darshana* means appearance. The same or similar wording occurs under different circumstances, and in dissimilar connection, and discovers a variety of relations. This is first met with in the Shrouta-sûtra of Kâtyâyana. Bâdarâyana shows the same style of the sûtra in his system of Vedânta. But while Bâdarâyana uses the phrase *lingadarshanâch cha*, Kâtyâyana prefers only *Darshanâch cha*. The meaning of the sûtra is: there is an authoritative statement in a recognized book. This is produced in support of the doctrine advocated in the text. This is employing the proof called testimony. What is the text of the Vedas referred to here by a mark (*linga*) is the next

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

तद्भुतानां क्रियार्थेन समाम्नायोऽर्थस्य तन्निमित्तत्वात् ॥२५॥ (३०)

पदानि । तत्-भूतानाम्, क्रिया-अर्थेन, समाम्नायः, अर्थस्य, तत्-निमित्तत्वात् ।

पदार्थः । तत्=तेषु । भूतानां=वर्त्तमानानाम् । क्रिया-अर्थेन=क्रियायाः अर्थः क्रियार्थःतेन । समाम्नायः=समुच्चारणम् । स्पष्टमवशिष्टम् ॥

वाक्यार्थः । वाक्ये वर्त्तमानानां पदानां क्रियार्थेन समुच्चारणं । वाक्यार्थस्य पदार्थो निमित्तं । तस्मात् ॥

भावार्थः । पदार्थः स्वतन्त्रः । वाक्यार्थः स्वतन्त्रश्च । तयोः कार्यकारणभावो नास्तीति पूर्वपक्षकारो मन्यते । तत्खण्डनाय प्रवृत्तः सूत्रकारो ब्रवीति । वाक्यार्थः स्वतन्त्रो नास्ति । वाक्ये वर्त्तमानानि पदानि वाक्यार्थस्य कारणं ।

शोभते अस्य मुखं य एवं वेद ॥ आ अस्य प्रजायां वाजी जायते य एवं वेद (तै. सं. १.७,४,६.)

---

solar region. At night, the sun + + him." Again, "we do not know whether we are Brâhma*n*as or not." Again, "who knows whether it exists in this world or not." See the Taittirîya Sanhitâ (VI. 1, 1.) Such doubtful texts as well as texts which contradict the human senses are met with in the Vedas; and they can mean nothing. Therefore, the Vedas are to no purpose. This is the gist of the sûtra.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. तसें फळ होत नाहीं ह्मणून (वेद अनर्थक.) (पू० ३)

३. मूळ सूत्रांत "तथाफल" आणि "अभाव" हीं पदें आहेत. त्यांत तथाफल म्हणजे तसें फल असा अर्थ केला आहे. जसें फल वेदांत सांगितलें आहे तसें फल होत नाहीं असा सूत्रार्थ आहे. हा उदाहरणावरून स्पष्ट समजेल. "जो असें जाणतो, त्याचें, मुख शोभतें." पुन: "जो असें जाणतो त्याच्या वंशजांत वाजी उत्पन्न होतो." वेदांत वाजी या शब्दाचा अर्थ बलवान्, धनवान्, असा होतो तो घ्यावा, अश्व हा अर्थ घेऊं नये असें आम्हास वाटतें. आतां, या वाक्यांत भूतार्थाचें वर्णन केलें असा अर्थ बसविला असतां आज हीं वाक्यें निरर्थक आहेत असें निष्पन्न होतें. पुन: वेदाध्ययनाचें फल हें आहे असें म्हटल्यास हें मिथ्या प्रतिपादन आहे हें स्पष्टच आहे. पुढें फल होईल असें म्हटलें तर, यास प्रमाण काय? या वाक्यांत विधि म्हणावा तर विधान मुळींच नाहीं. अशा कारणामुळें या वाक्यांचें फल दिसत नाहीं म्हणून वेदवाक्यें अनर्थक आहेत, असा पूर्व पक्षकाराचा आशय आहे

3. (The Vedas are to no purpose) from the absence of the result mentioned. (III. Statement of the opponent.)

3. In the original Sanskrita sûtra, the terms *Tathâphala* and *Abhâva* are used. The term *Abhâva* is easily understood: the term *Tathâphala* is rendered into *that fruit*. The meaning of the sûtra is that the result of a sacrificial work as described in the Vedas, does not follow. The sûtra will be understood easily by an example. "His face shines who knows this" is a Vaidika text. Again, "he who knows this, sees a strong man among his descendants." The term Vâjî is used in the text. In the Vedas, it means a strong, or wealthy man and not a horse. If it be said that the past time is described in the text, then it follows that these texts are to no purpose to-day. Again, if it be said that the study of the Vedas produces the fruit mentioned in the text, then it is plain that the Vaidika texts are false, for every one knows that the study of the Vedas does not produce the fruit. Again, where is the proof to state that the fruit will be secured in future? These texts do not prescribe any thing. For these reasons, the texts are simply useless. The opponent, therefore, asserts generally that Vaidika texts are to no purpose.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अन्यानर्थक्यात् ॥ ४ ॥ (पू० ४.)

पदानि । (आम्नायस्यानर्थक्यम्) अन्य–आनर्थक्यात् ॥

पदार्थः । स्पष्टः ॥

वाक्यार्थः । अन्येषां कर्मणामानर्थक्यम् । अतो वेदस्यानर्थक्यम् ॥

भावार्थः । अन्येषां नाम प्रकृतप्रतिपादितेतरेषां कर्मणां निष्प्रयोजनत्वापत्तिः । अत्रोदाहरणम् । पूर्णाहुत्या सर्वान् कामानवाप्नोति । इत्यत्र पूर्णाहुत्या सर्वकामप्राप्तिश्चेदन्येषां कर्मणां निष्प्रयोजनत्वम् ॥

अनुसंधेयानि वेदवाक्यानि ॥

सर्वं॑ वै पू॒र्णाहु॑तिः । सर्व॑मे॒वाप्नो॑ति ॥ तै. ब्रा. (३.८,१०.) ॥

अभागिप्रतिषेधाच्च ॥ ५ ॥ (पू० ५)

पदानि । (आम्नायस्यानर्थक्यं) अभागिनः प्रतिषेधात्=अभागिप्रतिषेधात् । च ॥

पदार्थः । अभागिनः=नास्ति भागो नाम अंशो नाम सम्बधो यस्य तत्=अभागि । तस्य प्रतिषेधात् ॥

वाक्यार्थः । सामान्येन यस्य प्रतिषेधः कृतः । तस्यान्तःपातिनोऽपि प्रतिषेधःप्राप्नोति । यदान्तःपाति त्वप्रतिषेधनीयं तदा तस्य प्रतिषेधेऽप्रतिषेधनीयस्य प्रतिषेधः । इत्यनिष्टसिद्धिप्रसङ्गः ॥

भावार्थः । स्पष्टः ॥

अनुसंधेयानि वेदवाक्यानि ॥

ब्र॒ह्म॒वा॒दिनो॑ वदंति॒ न पृ॑थि॒व्यां नांतरि॑क्षे॒ न दि॒व्य॑ग्निश्चे॑त॒व्य॑ इति॒ ॥ तै. सं. (५.२,७,१.) ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. दुसऱ्याच्या (दुसऱ्या कर्मांच्या) निष्प्रयोजनामुळें, (वेद अनर्थक आहेत. (पू० ४.)

५. अप्रतिषेधनीय अर्थाचा प्रतिषेध आहे म्हणून (वेद अनर्थक आहेत.) (पू० ५.)

4. (The Vedas are to no purpose) because of the uselessness of other (works) (IV. Statement of the opponent.)

5. (The Vedas are to no purpose) because of the prohibition of that which can never be the subject of any prohibition. (V. Statement of the opponent.)

---

४. मूळ संस्कृत सूत्रांत अन्य-आनर्थक्यावरून अशा अर्थाचीं पदें आहेत. अन्य म्हणजे अन्यकर्मांच्या आनर्थक्यावरून म्हणजे निष्प्रयोजनामुळें असा आम्हीं मराठी सूत्रांत अर्थ केला आहे. आणि हें कारण पूर्वपक्षकार देऊन सर्व वेद निरर्थक आहेत असें सिद्ध करतो. पूर्वपक्षकाराचें म्हणणें उदाहरणावरून स्पष्ट समजेल. तै० ब्रा० (३.८,१०.) या ठिकाणीं पूर्णाहुतीचें वर्णन केलें आहे. "उत्तम पूर्णाहुतीचा होम करतो, पण सर्व (काय तें) पूर्णाहुति (च), (त्याला) सर्व प्राप्त होतें." हा मूळ ब्राम्हणमंत्राचा अर्थ आहे. तै० स० (५.३,१२.) या ठिकाणीं "(तो) मृत्यूपासून सुटतो, ब्रह्महत्येपासून सुटतो, जो अश्वमेधरूप याग करतो, आणि अरे! जो त्याला जाणतो." असा या संहितेंतील मंत्राचा अर्थ आहे. या वरील मंत्रापासून असें निष्पन्न होतें कीं, जो पूर्णाहुतिरूप याग करतो; त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. तर मग एक पूर्णाहुतियाग केला म्हणजे पुरे, मग बाकीचीं कर्मं करण्याची गरज नाहीं. असा कटाक्ष ठेवून पूर्वपक्षकारानें दोष दिला आहे. एक पूर्णहुतियागानें जर वेदाचे म्हणण्याप्रमाणें सर्व कार्य होतें, तर दुसरे

4. In the original Sanskrita sûtra, the phrase *Anyânarthakyât* is used. It literally means "from the uselessness of others." *Anya* refers to other sacrificial works. *Ânarthakya* is, of course, uselessness. The opponent seeks to prove from this statement the uselessness of the Vedas. The statement of the opponent will be understood by the following illustration. In the Taittirîya Brâhma*n*a (III. 8, 10.) a complete oblation is described. "I offer into the fire the last complete oblation; but all is the complete oblation; (he) gets all." This is the close translation of the text. In the Taittirîya Sanhitâ (V. 3, 12.) the following occurs:—(He) who sacrifices a horse-sacrifice, gets over death, gets over the murder of a Brâhma*n*a and oh, who knows it." This is the close translation of the above text. The conclusion from these texts is that he who offers a complete oblation has all his desires gratified. Then one sacrifice called "complete oblation" is quite sufficient: There is no need of any other sacrifice. The last sentence explains the phrase—"the uselessness of

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अनित्यसंयोगात् ॥ ६ ॥ (पू० ६)

पदानि । (आम्नायस्यानर्थक्यं) अनित्य–संयोगात् ॥
(१.१,२८.) सूत्रेण पदार्थवाक्यार्थौ स्पष्टौ ॥

भावार्थः । अनित्यानां वस्तूनां सम्बन्धो वेदवाक्येषु दृश्यते । तत्सम्बन्धाद् वेदवाक्यान्यप्यनित्यान्यनर्थकानि चेति पूर्वपक्षकारस्य प्रतिपादनम् ॥

यागांची आवश्यकता काय? ते नकोत. म्हणून वेद अनर्थक आहेत. कारण सहज एका यागानें इष्टसिद्धि होत असतां असा कोण शहाणा आहे, कीं जो जन्मभर यज्ञयागांचाच खटाटोप करीत बसेल?

५. कर्मनिषेध करणारीं जीं वेदांत वाक्यें अढळतात, त्या वाक्यांवर कटाक्ष ठेवून हा पूर्वपक्ष काढला आहे. उदाहरणावरून हें स्पष्ट होईल. तै. सं. (५.२, ७.) या ठिकाणीं असा मन्त्र आहे:–"ब्रम्हवादी म्हणतात पृथ्वीवर, अन्तरिक्षीं (म्हणजे वायुमण्डळीं,) आणि आकाशीं अग्निचयन करूं नये." आतां हें स्पष्टच आहे कीं अन्तरिक्षीं आणि आकाशीं अग्निचयन होणार नाहीं. पृथ्वीवर अग्निचयन करूं नये इतकें म्हटलें असतां पूर्णपणें अग्निचयनाचा निषेध होतो, मग अन्तरिक्षीं करूं नये, आणि आकाशीं करूं नये, अशा अशक्य, व निरर्थक प्रतिपादनांत काहीं अर्थ नाहीं, असें दाखवून पूर्वपक्षकार पूर्वपक्ष करतो. आतां सूत्रांतील पदांचा अर्थ:–मूळ सूत्रांत अभागि आणि प्रतिषेध अशीं दोन पदें आहेत अभागि म्हणजे नाहीं आहे अंश ज्याचा तें, म्हणजे निषेधाशीं सम्बन्ध नाहीं ज्याचा तें. प्रतिषेध म्हणजे निषेध. निषेधांत सांपडण्यास अशक्य अशाचा निषेध वेदांत अढळतो, म्हणून वेद अनर्थक आहे, हा पूर्वपक्षाचा आशय आहे.

other works" in the sûtra under consideration. If according to the Vedas, every desire is fulfilled, and every purpose, answered by means of one sacrifice named complete oblation, then there is no room for other sacrifices. They are simply not necessary. What sensible man is there that would be sacrificing all his life if one sacrifice be sufficient? None is the inevitable reply. Therefore, the Vedas are to no purpose.

5. The statement of the opponent is based on the Vaidika texts which prohibit certain actions. An example will elucidate the sûtra. In the Taittirîya Sanhitâ (V. 2, 7.) the following occurs:—"the Brahma-vâdinas say that altars of bricks should not be built for certain sacrifices (called Chayana) on the earth, in the firmament, nor in the heavens." It is plain that it is not possible to build altars in the firmament or in the heavens. To prohibit the construction of altars of bricks for fire (Agnichayana), it is simply necessary to speak of the earth. There is no sense in speaking of such impossibilities as the construction of brick-altars in the firmament or in the heavens. The last named altars can never be the subject of any pro-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. नाशवन्त अर्थ वेदांत अढळतात, (म्हणून वेद अनर्थक आहेत.) (पू० ६.)

६. पूर्वी या मीमांसेच्या (१.१,२८.) या सूत्रीं याच पूर्वपक्षाचा दुसऱ्या संबंधानें विचार झाला आहे. त्या ठिकाणीं टिपेमध्यें नाशवन्त अर्थ ते कोणते, यांचें वर्णन केलें आहे. मूळ संस्कृत सूत्रांत "अनित्य" आणि "संयोग" अशीं दोन पदें आहेत. त्यांत पुष्कळ अंशीं अनित्यपदाचा अर्थ स्पष्ट आहे. अनित्याचा अर्थ आम्ही नाशवन्त असा केला आहे. "संयोग" याचा अर्थ प्राप्ति म्हणजे अढळणें असा केला आहे. परन्तु अर्वाचीन ग्रन्थांत संयोग पदाचा सम्बन्ध विशेष" असा अर्थ होतो. उदाहरणावरून सूत्रार्थ स्पष्ट होईल. तै० सं० (७.१,१०.) या ठिकाणीं "प्रावाहणि बबर (प्रवाहण याचा पुत्र बबर) इच्छा करता झाला." असा मंत्र आहे. या स्थळीं बबर प्रावाहणि याचें वर्णन आहे. पण बबर प्रावाहणि नश्वर आहे, कारण कीं तो मनुष्य आहे. कशावरून म्हणाल तर प्रावाहणि म्हणजे प्रवाहणाचा पुत्र असें त्याचें वर्णन आहे. प्रावाहणीसारखे नाशवंत अर्थ वेदांत अढळतात, म्हणून वेद अनित्य एवढेंच नव्हे, तर अनर्थक व अप्रमाण आहेत. असा पूर्वपक्षाचा आशय आहे.

6. (The Vedas are to no purpose) because transitory things occur (in the Vedas). (VI. Statement of the opponent.)

hibition. The opponent refers to such absurd rules when he takes exception to Vaidika texts. We will consider now the terms used in the original Sanskrita sûtra. They are *Abhâgi* and *Pratisedha*. *Abhâgi* means "that which does not partake" of a prohibition, and *Pratisedha* means a prohibition. Such acts as can never be prohibited, or as are incapable of being prohibited, are found to be prohibited in the Vedas. Therefore, the Vedas are to no purpose. This is the drift of the opponent's statement in this sûtra.

6. This statement of the opponent has been considered in a particular relation in the sûtra (I. 1, 28.) The question what things are transitory is fully answered in the foot-note on that sûtra. In the original Sanskrita sûtra the terms *Anitya* and *Sanyoga* are used. The sense of the first term is sufficiently plain: it means that which decays, that is, that which is transitory. The second term literally means conjunction. It is equivalent to inseparable association. We have translated *Sanyoga* by *occurring*; but in modern works on philosophy it means a particular relation. An example will explain the sûtra thoroughly. In the Taittirîya Sanhitâ (VII. 1, 10.) the following occurs:—"Babara Prâvâhani, (Babara, son of Pravahana) wished." In this text Babara, son of Pravahana is mentioned. But Babara

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

विधिनात्वेकवाक्यत्वात् स्तुत्यर्थेन विधीनां स्युः ॥ ७ ॥

(सिद्धान्तसूत्रम्)

पदानि । विधिना, तु, एकवाक्यत्वात्, स्तुति–अर्थेन, विधीनाम्, स्युः ॥

पदार्थः । विधिना=कर्मविधायकवाक्येन सह । तुपदम्=(पूर्वपक्षाणां निरासाय) । एकवाक्यत्वात्=(स्पष्टम्) । स्तुत्यर्थेन=स्तुतिप्रयोजनेन स्तुतिप्रतिपादनेन वा । विधीनाम्=अङ्गिनामङ्गानि । स्युः=(स्पष्टम्) ॥

वाक्यार्थः । न । स्तावकवाक्यानि विधिना सहैकवाक्यत्वाद् विधिरूपाङ्गिनामङ्गानि भवेयुः ॥

भावार्थः । वेदवाक्यानामानर्थक्यसिद्धये पूर्वपक्षपद यत् प्रतिपादितं तस्य तस्य समाधानाय ब्रवीत्याचार्यः ॥ स्तुत्यर्थाभिव्यञ्जकानां वाक्यानांमङ्गरूपत्वेन मुख्यविधिवाक्येन सहैकवाक्यतायां कृतायां स्तुत्यर्थप्रतिपादकानां वाक्यानां विधि-वाक्यैः सहाङ्गाङ्गिसम्बन्धः । कोनामाङ्गाङ्गिसम्बन्धः । तस्य रूपं किं । तस्याकारः क इत्येतेषां विचाराणां विवेचनमागमिष्यत्सु सूत्रेषु विद्यते ॥

अनुसंधेयानि वेदवाक्यानि ॥

वायव्यं श्वेतमालभेत भूतिकामः । वायुर्वै क्षेपिष्ठा देवता । वायुमेव स्वेनभागधेयेनोपधावति । सएवैनंभूतिंगमयति ॥ तै. सं. (२.१,१,१.)

Prâvâhani is liable to decay, because he is described as a son of Pravahana. Then such mortal persons as Prâvâhani are mentioned in the Vedas. Therefore, the Vedas, instead of being eternal, are simply transient, and are useless and false. This is the drift of the opponent's statement as made in the sûtra under examination.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पांच.

नांव.	रुपये.	आणे.	प्रति.
आनेरबल नानाभाई हरीदास, मुंबई हायकोर्टातील जज्ज...	२५	१२	५
शेट दोराबजी पदमजी एस्क्वायर	१०	०	२
रा० रा० गंगाधर रामकृष्ण किराणे	५	६	१
,, ,, डाक्तर विश्राम रामजी घोलें	५	०	१
,, ,, गोपाळ बाबाजी हिरफाटक	५	०	१
,, ,, बळवंत अनंत देव...	५	०	१
,, ,, रामचंद्र नारायण जोगळेकर	५	६	१
,, ,, राघो नारायण कोंढवीकर...	५	६	१
,, ,, रामदास सेन	५	६	१
,, ,, नारायण [illegible]	५	६	१
,, ,, गजानन दाजी नितळ	५	६	१
,, ,, गोपाळराव हरी भिडे	५	६	१
G. W. Forest, Esqr.	5	6	1
रा० रा० नारायण रामचंद्र सोहोनी...	५	६	१
,, ,, नवलराम लक्ष्मीराम	५	६	१
,, ,, रामचंद्र सदाशिव जोगळेकर	५	६	१
,, ,, वामन केशव भट...	५	०	१
,, ,, नवलतराम कन्ट्राक्टर	५	०	१
,, ,, सेक्रेटरी नेटिव लायब्ररी वेंगुर्लें...	५	६	१
,, ,, रामभाऊ ओक	५	६	१
,, ,, जगजीवनदास भवानीशंकर	५	६	१
,, ,, मोतीलाल लालभाई	५	६	१
,, ,, बहिरो आपाजी वकील	५	०	१
,, ,, परशराम बाळकृष्ण गोडबोले	५	६	१
श्री० रा० रा० पंत सचीव	५	०	१
रावबहादूर महादेव गोविंद रानडे	५	०	१
रा० सा० रंगराव कृष्ण कुळकर्णी...	५	६	१
Edulji Munjibhai Modi Esqr.	5	6	1
रा० रा० वल्लभराम वाजीराम मेहते	५	६	१

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूचना.

	रुपये.	आणे.
वर्षाची वर्गणी, अगाऊ	५	०
एका अंकास	०	८

पुण्याबाहेर राहणारांस टपाल हंशिलाबद्दल दर वर्षाचे ६ आणे खेरीज पडतील. मागाहून वर्गणी घेतली जाणार नाहीं.

ग्रंथकर्त्यास अथवा म्यानेजरास जीं पत्रें लिहावयाचीं, तीं "षड्-दर्शनाचिंतनिका—आफिस, पुणें, सदाशिव पेठ, घर नंबर ६४१" या पत्यावर लिहावीं. वर्गणी वगैरे संबंधी पत्रें याच पत्यावर पाठवावींत.

	Rs.	A.
For one year, in Advance... ...	5	0
Single copies.	0	8

Besides six annas for postage at the rate of half an anna for a copy.

N. B. The subscription is to be paid *in advance.* No accounts of arrears can be kept.

All letters should be addressed to the Manager of the *Sad*darshana-Chintanikâ-Office, Poona, Sadashive Petha, House Municipal No. 641.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

THE

SADDARSHANA-CHINTANIKÂ

OR

STUDIES IN INDIAN PHILOSOPHY.

षड्दर्शनचिंतनिका.

मीमांसादर्शन

वृत्तिसहित

त्याचें मराठी आणि इंग्रजी भाषांतर.

पुस्तक १. एप्रिल १८७७. अंक ४.

पुणें.

"ज्ञानप्रकाश." छापखान्यांत छापिलें.

(सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदली आहे.)

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Truth is not local.

☞ We beg that our Subscribers will kindly remit the amount of their subscription which is 5 rupees besides six annas for postage (*to be paid in advance*).

The following gentlemen will receive subscriptions for us.

Anna Moreshwar Kunte B. A., M. D., Esqr., Bombay.

Rao Saheb Mahiput Rao Rupram, Principal Training College, Ahmedabad.

Rao Saheb Gopal Govind Ghate, Sub-judge Kotree, Sindha.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. (अर्थवादाचें) आणि विधिवाक्याचें एकवाक्यत्व झाल्यानें विधिवाक्य अंगी होऊन अर्थवादानीं अंगें व्हावें. (सि०)

7. (Particular explanatory statements) and the main original statement harmonize; the former then ought to be subordinate, and the latter, to be principal. (Final statement.)

---

७. मूळ संस्कृत सूत्रांत "एकवाक्यत्व," "स्तुत्यर्थ," आणि षष्ठीचे अनेक वचनीं विधिशब्द अशीं पदें आहेत. एकवाक्यत्व म्हणजे अंगांगिसंबंधानें निरनिराळ्या वाक्यांचा प्रधान वाक्याशीं जो संबंध तें. उद्देश्य आणि विधेय हीं दोन असलीं म्हणजे वाक्य पुरें झालें. कधीं कधीं विधेय एकाच पदाबद्दल दोन चार पदें मिळून होतें. केव्हां केव्हां एकच क्रियापद पूर्ण विधेय होतें. याप्रमाणेंच सकर्मक क्रियापद असलें म्हणजे त्याच्या कर्माविषयीं आकांक्षा उत्पन्न होते. ती आकांक्षा पुरी होई तोंपर्यंत सकर्मक क्रियापद हें अपूर्ण विधेय होय. अकर्मक क्रियापदाला कर्मविवक्षा नसते, म्हणून तें पूर्ण विधेय होतें. उदाहरणः—रामा गाय बांधतो. या स्थळीं "रामा" उद्देश्य आहे, "बांधतो" हें प्रधान विधेय आहे, याची पूर्णता करण्या करितां "गाय" या पदावरहि विधेयत्व येतें. पदाच्या योगानें, वाक्यांशाचे योगानें, किंवा पूर्ण वाक्याचे योगानें उद्देश्य किंवा विधेय यांचें जें विशेष वर्णन होतें, त्यास स्तुत्यर्थ असें नांव सूत्रकारानें दिलें आहे. उदाहरणः—चपळ रामा घाईनें सुंदर गाय बांधतो. या स्थळीं शुद्ध पदांनीं उद्देश्य आणि विधेय यांचें विशेष वर्णन झालें आहे, म्हणू-

7. In the original Sanskrita sûtra, the terms, *Ekavâkyatva*, *Stutyartha* and the genitive plural of the word *Vidhi* occur. *Ekavâkyatva* is harmony between the different parts of a writing based on the relation of subordinate statements to the principal statement, literally the quality of being one sentence or rather one passage. A sentence is complete when its subject (Uddeshya) and its predicate (Vidheya) are expressed. Sometimes, one or more words form the predicate. Sometimes a verb is a complete predicate. When a transitive verb is used, the mind naturally expects some word or phrase to complete its sense. This expectancy (Âkânksâ) requires to be fulfilled. An intransitive verb is a complete predicate for it conveys a complete notion. An example :—*Râmâ* ties a cow. In this sentence *Râmâ* is the subject, and *ties* is the main predicate. The word *cow* is a part of the predicate for it completes the notion expressed by the verb. The author of Mimânsâ calls the enlargement—either of the subject or predicate by means of simple words, phrases or sentences—*Stutyartha* which literally means the *purpose of praise*. An example again:—prompt *Râmâ* hastily ties a beautiful cow. In this sentence,

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न "चपल, घाईनें, आणि सुंदर" हीं पदें स्तुत्यर्थ आहेत. आणि यांवर जो धर्म आहे, तो स्तुत्यर्थत्व आहे. दुसरें उदाहरण:—हातामध्यें काठी बाळगणारा चपल रामा घाईनें धांवत धांवत येऊन पळून जाणारी आणि वासरास पाजणारी गाय बांधतो. या स्थळीं उद्देश्य आणि विधेय यांचें पूर्ण वर्णन वाक्यांशांचे योगानें झालें आहे. या वाक्यांशांवर स्तुत्यर्थत्व हा धर्म आहे. पुन: तिसरें उदाहरण:—जो रामा हातांत काठी बाळगतो, तो घाईनें पळत पळत आला म्हणजे जी गाय पळते, आणि वासरास पाजते, तीस बांधतो. या स्थळीं पूर्ण वाक्यावर स्तुत्यर्थत्व हा धर्म आहे. पूर्णवाक्य व वाक्यांश यांत भेद काय? वाक्यांशामध्यें उद्देश्य आणि विधेय यांचें स्पष्ट वर्णन नसतें. वाक्यामध्यें उद्देश्य आणि विधेय यांचें स्पष्ट वर्णन असतें. अशा प्रकारें उद्देश्याच्या किंवा विधेयाच्या संबंधानें स्तुत्यर्थत्वधर्माचें निरूपण आहे. जीं पदें, जे वाक्यांश, किंवा जीं वाक्यें स्युत्यर्थत्वसंबंधानें येतात, ते सर्व अर्थवाद समजावेत. हे अर्थवाद प्रधान विधिवाक्यरूप अंगीचीं अंगें होतात. षष्ठीचे अनेक वचनीं विधिशब्दाचें रूप मूळ सूत्रांत आहे, त्याचा विचार. मूळ सूत्रांत "व्हावें" या अर्थीं जें अनेकवचनीं क्रियापद आहे, त्याच्या उद्देश्याचा मुळींच उल्लेख नाहीं. तर तें उद्देश्य काय, हा विचार सहजच उत्पन्न झाला. विधेयाजवळ षष्ठी आहे, तिचा अर्थ अंगांगिभाव असा केला असतां साहचर्यावरून अंगें हें उद्देश्य होईल.

the subject and the predicate are enlarged by means of simple words. Therefore, the words *prompt*, *hastily*, and *beautiful* are for the purpose of enlarging (Stutyartha) the subject and the predicate. Another example:—having a stick in his hand, prompt *R*âmâ, running in haste, ties a cow, apt to run away, and to suckle her calf. In this sentence, the subject and the predicate are enlarged by means of phrases (Vâkyânsha) such as—having a stick in his hand, running in haste, apt to run away and to suckle her calf. These phrases are for the purpose of *Stuti* which includes censure, as well as praise, being used in its large sense. The third example :—*R*âmâ who has a stick in his hand, ties the cow who runs away and suckles her calf as he comes running in haste. In this passage, complete sentences enlarge both the subject and the predicate. What is the distinction between phrases and complete sentences? In phrases (Vâkyânsha), the subject and the predicate are not expressed, while in a sentence, they are expressed. The enlargement of the subject or predicate (Stutyarthatva) by means of simple words, phrases or sentences has thus been fully explained. Words, phrases, or sentences introduced in a passage to enlarge the subject or predicate of the principal sentence are *Arthavâda* or explanatory statements which bear to the principal sentence the relation of parts to a whole or of limbs to the body. Now the genitive plural of the word *Vidhi* as used in the original Sanskrita sûtra is to be considered. The verb meaning *ought to be* is used,

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"विधिवाक्य अंगी होऊन, अर्थवादांनीं अंगें व्हावें." असा आम्ही "विधीनाम्" या षष्ठ्यन्त पदाचा अर्थ केला आहे. संस्कृत सूत्राच्या खालीं दिलेल्या वेदवाक्याचा अर्थ देतों. "ऐश्वर्याची इच्छा करणाऱ्या यजमानानें पांढऱ्या वायव्य (वायु संबन्धी) पशूला (दर्भ आणि पिंप्रीच्या शाखा यांनीं) स्पर्श करावा; कारण वायु अतिशय चपल देवता आहे. आपल्या भागानें वायूलाच (यजमान सेवतो.) तोच त्याला ऐश्वर्याप्रत पोहंचवितो." या स्थळीं कारण जें दिलें आहे, तें स्तुत्यर्थ आहे, म्हणजे विधेयाचें उपोद्बलक आहे, किंवा प्ररोचनार्थ आहे. म्हणजे मुख्य विधेयाचीं अंगें होऊन अर्थवादवाक्यें विधेयाच्या अर्थाला दृढता आणतात. याविषयीं पुढें विचार करावा लागेल.

but its subject is not mentioned at all. The question what is the subject in the sentence is natural. Only the genitive is used, and it is grammatically proximate to the predicate. The genitive sometimes expresses the relation of parts to a whole. The genitive being analyzed, *the parts* will be the nominative to the plural verb *ought to be.* The genitive is thus interpreted:—the original statement (Vidhi) is the principal sentence (angi) and the explanatory statements are subordinate(anga). Thus, the three terms used in the originalSanskrita sûtra are explained. The Vaidika texts quoted in the Sanskrita portion of this work are translated here. " The white beast sacred to the deity of air is to be touched (with the *darbha*-rush and the twigs of the tree belonging to the genusHibscus populneoides), because air is a brisk deity. (The sacrificer) serves air with his portion. He (the deity) reaches to him prosperity." In this passage of the Taittirîya Sanhitâ (II. 1, 1.), the reason expressed by the sentence—"because air is a brisk deity &c."is the enlargement of the predicate—"is to be touched" as it supports it with reasons. Commentators use the term *Prarochanârtha* for enlargement and say that the Arthavâda or explanatory statements in the above passage become the parts of the principal predicate, and confirm and strengthen its signification. Though we have discussed this subject rather at length, yet we shall have to return to it on some other occasion.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

तुल्यंचसाम्प्रदायिकम् ॥ ८ ॥ (उ० १)

पदानि । तुल्यम्, च, साम्प्रदायिकम् ॥

पदार्थः । तुल्यम्=समम् । च=(अवधारणे) साम्प्रदायिकम्=सम्प्रदायो यस्यास्ति तत् । सम्प्रदायस्तु प्रयोजनम् ॥

वाक्यार्थः । विधिवाक्यानां तदङ्गानां च प्रयोजनं तुल्यम् ॥

भावार्थः । साम्प्रदायिकपदेन प्रयोजनं येषामस्ति तानि नाम विधिवाक्यं तदङ्गानिच साकाङ्क्षाणि । इतिप्राप्तम् ॥ साकाङ्क्षत्वात् तेषामङ्गाङ्गिनां वाक्यार्थे प्रयोजनं तुल्यम् ॥

(सप्तमसूत्रभाष्यांशः) किमर्था स्तुतिरितिचेत् । कथं रोचेत ? नोऽनुष्ठीयेत । इति । 'ननु प्राक् स्तुतिवचनात्, अनुष्ठानं भूतिकामान्तात् सिद्धं स्तुतिवचनमनर्थकम्' । न हि; यदा स्तुतिपदाऽसन्निधानं, तदा पूर्वेणैव विधिः, यदा स्तुतिपदसंबंधः, न तदा भूतिकामस्यालंभो विधीयते । यथा, पटो भवति–इति, पट उत्पद्यते इत्यर्थः, निराकांक्षंच पदद्वयम् । यदा च तस्मिन्नेव 'रक्तः' इत्यपरं श्रूयते, तदा रागसंबंधो भवतीत्यर्थः, भवति च रक्तं प्रत्याकांक्षा । एवं यदा न स्तुतिपदानि, विधिशब्देनैव तदा प्ररोचना, यदा स्तुतिवचनं, तदा स्तवनेन ॥ ननु 'एवं सति, किं स्तुतिवचनेन ? यस्मिन् सति अविधायकम्, मा भूत्, तत् तदभावेऽपि पूर्वविधिनैव प्ररोचयिष्यते'–इति । सत्यं, विनाऽपि तेन, सिध्येत् प्ररोचनम्; अस्ति तु तत्. तस्मिन् विद्यमाने योऽर्थो वाक्यस्य, सोऽवगम्यते स्तुतिप्रयोजनं, तयोस्तस्मिन्नविद्यमाने विधिना प्ररोचनम् ॥ इति शबरः ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. आणि (विधिवाक्य आणि त्याचीं अङ्गें) यांचें प्रयोजन तुल्य आहे. (उ० १.)

8. And the purpose of the original statement and of its limbs (explanatory statements) is equally valuable. (1. Reply.)

८. मूळ संस्कृत सूत्रांत साम्प्रदायिक असें पद आहे, त्याचा विशेष विचार केला पाहिजे. सम्प्रदाय म्हणजे प्रयोजन. साम्प्रदायिक म्हणजे ज्यांचें प्रयोजन तीं. विधिवाक्य आणि त्याचीं अङ्गें म्हणजे अर्थवाद इतका अर्थ वरील "तीं" या पदांतून निघाला. त्यांचें प्रयोजन तुल्य आहे, असा सूत्रार्थ झाला. वेदाला निरर्थकता आहे, असा जो प्रथम पूर्वपक्ष केला आहे, त्याचें या सूत्रानें आचार्य समाधान करतात. मुख्य वाक्याची अर्थवादता गौण वाक्यावर येण्याकरतां त्या दोहोंमध्यें साकांक्षत्व हा धर्म असला पाहिजे. जेव्हां विधिवाक्यानें अर्थ पुरा होत नाहीं, तेव्हां अर्थ पुरा करण्याविषयीं वाचकाच्या मनांत जी इच्छा उत्पन्न होते, त्या विशेष इच्छेचें नांव आकांक्षा असें आहे. आकांक्षा ज्याला आहे, तें साकांक्ष, आणि अशा अर्थावरील जो धर्म, त्याचें नांव साकांक्षत्व. सापेक्ष म्हणजे काय तें पूर्वीं वर्णिलेंच आहे. ३४ वे पानांतील (१. १,२१.) सूत्रावरील टीप पहा. सापेक्षत्व हा धर्म विधि आणि अर्थवाद यांवर असतो, म्हणून विधिवाक्याचें आणि अर्थवादाचें प्रयोजन तुल्य आहे, असें आचार्यांनीं वर्णन केलें आहे.

8. In the original Sanskrita sûtra, the term Sâmpradâyika is used. It deserves to be specially considered. Sampradâya means a purpose. Sâmpradâyika means that which has a purpose, and refers to the principal (original) statement which has a purpose which is expressed by subordinate statements or Arthavâda. The purpose of both is equally valuable. This is the gist of the sûtra. By means of this sûtra, the author of this Mîmânsâ seeks to refute the statement of the opponent that the Vedas are to no purpose. That some sentences may be considered explanatory of the main proposition, it is necessary that they should possess the relationship based on what is called expectancy (Âkânksâ). When the main sentence (Vidhi-vâkya) fails to express the complete sense, the reader naturally feels a desire to see the sense some-how completed; this desire is called expectancy (Âkânksâ). That which excites this expectancy is called the *desirable* (Sâkânksa). The quality of being thus desired is called the relationship as based on expectancy (Sâkânksatva). We have already explained *correlation* (Sâpeksatva) in the foot-note to a sûtra of the first pâda of this Mîmânsâ. See the 34th page. The subordinate statements possess the quality of *being desired* or *desirability* called Sâkânksatva. Correlation is a quality common to

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अप्राप्ताचानुपपत्तिः प्रयोगेहिविरोधःस्याच्छब्दार्थस्त्वप्रयोगभूतस्तस्माद्धुपपद्येत ॥ ९ ॥ (उ० २)

पदानि । अप्राप्ता, च, अनुपपत्तिः, प्रयोगे, हि, विरोधः, स्यात्, शब्द–अर्थः, तु, अप्रयोगभूतः, तस्मात्, उपपद्येत ॥

पदार्थः । अप्राप्ता=न प्राप्नोति । च=पुनः (पूर्वपक्षसम्बन्धेन) । उपपत्तिः =कार्यकारणान्वयान्वय्यादिसम्बन्धानां युक्तायुक्तत्वनिरूपणं । न उपपत्तिः अनुपपत्तिः (टिप्पनी द्रष्टव्या) । प्रयोगे=वाक्यार्थयोजनायाम् । हि=यस्मात् । विरोधः=सम्बन्धहानिरूपदोषः । स्यात्= (स्पष्टम्) । शब्दार्थः=शब्दस्य अर्थः । तु=यस्मात् । अप्रयोगभूतः । न वाक्याकारः । तस्मात्=(स्पष्टम्) । उपपद्येत= उपपत्तियुक्तं भवेत् ॥

वाक्यार्थः । पुनः । (द्वितीयपूर्वपक्षस्था) अनुपपत्तिर्न प्राप्नोति । यतोवाक्यार्थयोजनायां विरोधरूपदोषः स्यात् । यतः शब्दार्थो न वाक्याकारः । तस्मादुपपत्तिः कर्तुं शक्यते ॥

भावार्थः । द्वितीयपूर्वपक्षे शास्त्रदृष्ट्या प्रत्यक्षदृष्ट्याच विरोधरूपदोषोदत्तः । तस्य निराकरणाय चतुर्दलेन सूत्रेण ब्रवीति सूत्रकारः । (प्रथमदलेन)अनुपपत्तिर्नास्तीत्युक्तम् । नाम वाक्येऽङ्गाङ्गिनामन्वयो वर्णयितुं शक्यते । कुतः । (द्वितीयदलेन) अङ्गाङ्गिनां परस्परसम्बन्धो नाङ्गीकृतश्चेद्वाक्यार्थः सयुक्तिकः प्रबद्धश्च न भवेत् । कुतः ।(तृतीयदलेन) केवल शब्दार्थो न वाक्याकाराः (चतुर्थदलेन) अतएवोपपत्त्या पूर्वपक्षोक्तदोषस्य निराकरणं भवति । वाक्यार्थे विरोधापत्तिः शब्दा न वाक्याकाराश्चेति सूत्रकारेण कारणद्वयनिरूपणेन पूर्वपक्षस्तु निराकृतः ॥

---

the principal and subordinate statements. Therefore, the purpose which the two kinds of statements serve is equally valuable. This is the way commentators explain this sûtra.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. (आणि) अनुपपत्ति प्राप्त होत नाहीं; कारण वाक्य-प्रयोगामध्यें विरोध उत्पन्न होईल. कारण शब्दांचे जे अर्थ, तीं कांहीं वाक्यें नव्हत. म्हणून (अर्थवादाची) उपपत्ति होते. (उ० २.)

९. मूळ संस्कृत सूत्रांत "अनुपपत्ति," आणि "प्रयोग" असे दोन शब्द विचार करण्याजोगे आहेत. दुसऱ्या पूर्वपक्षांत "तो रडला" इत्यादिक अर्थवादाला निरर्थकता पूर्वपक्षकारानें आणली होती. ती निरर्थकता व्यर्थ आहे, असें या सूत्रानें आचार्य दाखवतात. अर्थवादत्वधर्मांचा स्वीकार केल्यानें द्वितीय पूर्वपक्षांतील विरोधाचा निरास होतो, आणि पूर्वपक्षांतील वाक्याची उपपत्ति होते. ही उपपत्ति कशी होते, हें दाखविण्यास आचार्य दोन कारणें सांगतात. प्रथम कारण वाक्यार्थांत विरोध उत्पन्न होईल असें आहे. द्वितिय कारण केवळ शब्दार्थ वाक्य नाहीं; शब्दांचा जो परस्पर सम्बन्ध असतो, त्या सम्बन्धाचे योगानें वाक्यार्थ उत्पन्न होतो. साकांक्षत्व, आणि सापेक्षत्व या दोन धर्मांनीं या सम्बन्धाचें स्वरूप समजतें. जसा एका वाक्यांत शब्दार्थांचा परस्पर सम्बन्ध असतो, तसाच मुख्य वाक्यार्थ आणि गौण वाक्यार्थ, या दोहोंमध्यें सम्बन्ध असतो. या सम्बन्धामुळें गौण वाक्याचें अर्थवाद असें नांव पडलें आहे. साकांक्षत्व, आणि सापेक्षत्व या दोन धर्मांनीं वाक्यार्थ आणि वाक्यार्थ यांचेमधील सम्बन्धाचें स्वरूप समजतें. पुढील सूत्रांचे विवेचनानें हें वर्णन स्पष्ट कळेल.

9. And there is no want of explanation, because there will be absurdity in sentences used, (and) because the senses of words are not sentences. Therefore, (the recognition) of subordinate sentences is explained. (2. Reply.)

9. In the original Sanskrita sûtra, two terms are used which deserve to be specially considered. They are *Anupapatti* and *Prayoga*. The author of this Mîmânsâ proves in this sûtra that in the second statement of the opponent the uselessness assigned to subordinate statements such as " he wept" is not valid. If subordinate statements be recognized, the argument of contradiction brought forward in the second statement of the opponent is successfully rebutted, and the statements on which the opponent insists are explained. How they are explained, is shown by the author by offering two reasons in the sûtra under consideration. The first reason is that there will be absurdity in the sentences used, and the second reason is that the senses of words are not sentences ; but that the sense of a sentence is produced by the relation which the words bear to one another. The nature of this relation is explained by the two qualities *correlation* and *desirability* (Sâkânksatva). As in a sentence, the senses of words are connected with one another, so the sense of the principal sentence and the senses of subordinate senten-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

गुणवादस्तु ॥ १० ॥ (उ० ३)

पदानि । गुणवादः तु ॥

पदार्थः । गुणवादः=गौणोवादः । तु=यस्मात् । यस्माद् गौणोवादोस्ति ॥

वाक्यार्थः । वाक्यरूपाङ्गिनोऽङ्गानि सन्ति । तानि गौणान्यप्याङ्गिनोऽर्थोपोद्बलकानि । कुतः । अङ्गाङ्गिनां सापेक्षत्वात् । साकांक्षत्वाच्च । अङ्गैर्विनाऽङ्गिनोऽर्थो न दृढो भवति । अतो वाक्याङ्गानां गुणवादत्वेन स्वीकारः कृतश्चेदुपपत्तिर्भवति ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

अपांवाएतत्पुष्पंयद्वेतसोऽपां शरोऽवका वेतसशाखयाचावकाभिश्च विकर्षत्यापोवैशान्ताः । तै. सं. (५.४,४.)

गौणएषवादो भवति यत्संबंधिनि स्तोतव्ये संबध्यंतरं स्तूयते अभिजनो ह्येष वेतसावकयोः ततस्ते जाते अभिजनसंस्तवेन चाभिजनी स्तुतो भवति। यथाऽस्मकाभिजनो देवदत्तोऽस्मकेषु स्तूयमानेषु स्तुतमात्मानं मन्यते । एवमत्रापिद्रष्टव्यमितिशबरः ॥

ces are connected with one another. On account of this connection, subordinate sentences are Arthavâda. Correlation and desirability explain also the nature of the relation between the senses of sentences. This will be thoroughly elucidated by the examination of the following sûtra.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०. कारण (अंग) गुणवाद (होईल.) (उ० ३.)

10. (The recognition of subordinate sentences is explained), because subordination may be descriptive of a quality. (3. Reply.)

१०. या सूत्राचा अर्थ करते वेळीं गुणवाद शब्दाची व्याख्या केली पाहिजे. आणि गुणवाद व अर्थवाद यांमध्यें भेद काय, हें दाखविलें पाहिजे. अर्थ जेणेंकरून कळतो तो अर्थवाद. गुण जेणेंकरून कळतो तो गुणवाद. अर्थवादाचा पोटभेद गुणवाद आहे. अर्थवादरूप अङ्ग गुणवाद होऊन आणि तेणेंकरून पूर्वपक्षकारानें दाखविलेल्या विरोधाचा निरास होऊन वाक्याची उपपत्ति होईल. “ज्या सम्बन्धीचें विशेष वर्णन करायाचें आहे, त्यास सोडून त्याचाच जो दुसरा सम्बन्धी त्याचें वर्णन झालें म्हणजे त्यास गुणवाद म्हणावा अशी शबरांनीं व्याख्या केली आहे. संस्कृत सूत्राखालीं दिलेल्या वेदवाक्याचा अर्थ केला असतां शबरांची व्याख्या स्पष्ट होईल. “अथवा जें परळ, पाण्याचें फूल आहे. पाण्याची साय शेवाळ आहे. परळाच्या फांदीनें आणि शेंवाळांनीं रेघा काढतो. कारण पाणी शान्त आहे.” या स्थलीं मुख्य विधेयाशीं परळ आणि शेवाळ यांचा निकट सम्बन्ध आहे. परन्तु परळाचे आणि शेवाळाचे वर्णनांत जीं वाक्यें आलीं आहेत, त्या वाक्यांत पाणी हा शब्द आहे. पाणी शान्त आहे, असें त्या पाण्याचें वर्णन आहे. विधेयाचा मुख्य सम्बन्धी परळ, आणि परळाचें सम्बन्धी पाणी. अशा परम्परेनें सम्बन्धीच्या सम्बन्धीचें वर्णन झालें, म्हणजे त्यास गुणवाद म्हणावा, असें शबर म्हणतात. तैत्तिरीय आरण्यकाचे पहिल्या प्रपाठकाचे. बाविसावे अनुवाकाचे प्रारम्भीं “योऽपांपुष्पं वेद”

10. In explaining this sûtra, the term Gu*n*avâda used in the Sanskrita sûtra should be explained, and the distinction between a subordinate sentence (Arthavâda) and an indirect subordinate sentence (Gu*n*avâda) must be pointed out. That which explains the sense of the principal sentence is a subordinate sentence (Arthavâda). That which explains a quality is an indirect subordinate sentence (Gu*n*avâda.) *Gunavâda* is a subdivision of *Arthavâda*. Subordination may be of two kinds:—direct and indirect. The latter is called Gu*n*avâda. A subordinate sentence being recognized as indirect, and the absurdity pointed out by the opponent being removed, the use of sentences such as *he wept* can be explained. An indirect subordinate sentence enlarges the sense of a direct subordinate sentence which enlarges the sense of the principal sentence. Shabara thus comments on the sûtra. The explanation of the distinction between direct and indirect subordinate sentences will be clearly perceived by considering the Vaidika texts, which we have translated here. “The plant (which grows on the banks of rivers or in shallow water and is called *Vetasa* in the Vaidika language), is a flower of waters, and moss is the cream of waters; (he) draws lines with the twigs of the plant and moss, because waters are peaceful.” The original text occurs in the

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

रूपात्प्रायात् ॥ ११ ॥ (उ० ४)

पदानि । (गुणवादः) रूपात्, प्रायात् ॥

पदार्थः । रूपात्=धर्मसादृश्यात् । प्रायात्=बहुधा ॥

वाक्यार्थः । गुणवादो धर्मसादृश्याद् बहुधादर्शनाच्च वर्ण्यते ॥

भावार्थः । गुणवादस्य किं बीजमितिप्रश्नः । तत्र द्वे बीजे वर्त्तेते । प्रथमम् । धर्मसादृश्यं । द्वितीयम् । प्रायोदर्शनं ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

हिरण्यं हस्ते भवति अथ गृण्हाति ॥ स्तेनं मनः ॥ अनृतवादिनी वाक् ॥

दूरभूयस्त्वात् ॥ १२ ॥ (उ० ५)

पदानि । (गुणवादः) दूर-भूयस्त्वात् ॥

पदार्थः । दूर=दूरे । भूयस् (नपुंसकनाम)=भवनम् । भूयस्त्वात्=भवननिष्ठधर्मात् । दूरभूयस्त्वात्=दूरदर्शनात् ॥

वाक्यार्थः । गुणवादो दूरभूयस्त्वाच्च वर्ण्यते ॥

वाक्यार्थः । अङ्गिसम्बन्धिनामङ्गानां यान्यङ्गानि तेषामङ्गिनिरूपणप्रसङ्गेऽदर्शनं दूरभूयस्त्वं वा चेदीदृशानामङ्गानां गुणवादत्वेन वर्णनं भवति ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

तस्माद् धूम एवाग्नेर्दिवा ददृशे (नार्चिः)तस्मादग्निर्दूरान्नक्तं ददृशे ॥ तै० ब्रा० (२.१,२,१०.) अग्निर्ज्योति ज्योतिरग्निः स्वाहा ॥ सं० वा० (३.९.)

“ जो पाण्याचें फूल जाणतो ” असें वाक्य आहे. यावर भाष्यकार म्हणतात, चन्द्रमा पाण्याचें फूल आहे कारण तो पाण्याचा बनलेला आहे.

Taittiriya Sanhitâ (V. 4, 4.) In this passage the plant and the moss are directly connected with the principal predicate—“draws lines.” But in the sentences used

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

११. बहुधादर्शनावरून किंवा रूपावरून (गुणवाद कळतो.) (उ० ४.)

१२. दूर असल्यानें (गुणवाद कळतो.) (उ० ५.)

11. (An indirect subordinate sentence is known) either by the nature (of a thing) or by its frequent observation. (4. Reply.)

12. (An indirect subordinate sentence is known) by the remoteness (of the object described). (5. Reply.)

---

११. पुन: गुणवादाचें स्वरूप आचार्य दाखवतात. "हातांत सोनें असतें, मग धरतात." या वेदवाक्याचे सम्बन्धानें "मन चोर" आहे, आणि "वाणी मिथ्या भाषण करणारी आहे," हीं वाक्यें अढळतात. "मन चोर आहे" या वाक्याचा भावार्थ असा आहे कीं, चोर जसा छपून रहातो, तसें मन छपून रहातें. हें मनाचें स्वरूपवर्णन झालें. सूत्रांतील "बहुधा" या पदाविषयीं बहुधा जिव्हा मिथ्या बोलते, म्हणून बहुधा जी गोष्ट घडून येते, तेणेंकरून हि गुणवाद कळतो. रूपावरून किंवा बहुधा दर्शनानें गुणवाद कळतो.

१२. पुन: या ठिकाणीं दुसऱ्या पूर्वपक्षांत दृष्टविरोध येतो म्हणून जो दोष दिला आहे, त्याचें आचार्य निराकरण करतात. दुसऱ्या पूर्वपक्षांत तैत्तिरीय ब्राम्हणाच्या मन्त्राचें भाषान्तर केलें आहे, तें पहावें. त्या स्थळीं सूर्यादिकांचें जें वर्णन केलें आहे, तें दूर प्रदेशाविषयीं वर्णन आहे; म्हणून सूर्यादि अर्थांचें अदर्शन आहे. म्हणून दृष्टविरोध नाहीं. तसेंच "सूर्य ज्योति आहे, ज्योति सूर्य आहे" या ठिकाणीं दोन मन्त्रांच्या चिन्हांचें मिश्रण झालें आहे, म्हणून दृष्टविरोध नाहीं, अशा आशयानें शबर या

in describing the plant and the moss, the word *waters* is used, and waters are described as calm and are connected with the moss which is connected with the predicate. Therefore "waters are calm" is an indirect subordinate sentence. Thus the nature of an indirect subordinate sentence is explained. In the Taittirîya Âra*n*yaka (I. 22.), the text—"who knows the flower of waters" occurs. As to this, commentator Mâdhava observes:—"The Moon is a flower of waters." This is a parallel passage for fixing the sense of the phrase—"a flower of waters."

11. The sûtra again explains the nature of an indirect subordinate sentence. The Vaidika texts are thus translated:—"There is gold in his hand, and then takes." In connection with this Vaidika text, the texts that "mind is a thief" and "the tongue is an utterer of falsehood" are seen. The text that "mind is a thief" means that the mind remains concealed in the human body as a thief remains concealed. Thus the nature of the human mind is described. The last text is, therefore, an indirect subordinate sentence. The tongue is frequently observed to utter false-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अपराधात्कर्तुश्च पुत्रदर्शनम् ॥ १३ ॥ (उ० ६)

पदानि । अपराधात्, कर्तुः, च, पुत्र-दर्शनम् ॥ कर्तुः=क्षेत्रिणः। (अन्यपदार्थः स्पष्टः)

वाक्यार्थः । पुनः । अपराधाद्धेतोः क्षेत्रिणः पुत्रदर्शनम् ॥

भावार्थः । स्त्र्यपराधेन कर्तुश्च पुत्रदर्शनेन । इत्याकारकेण वाक्येन शबरस्वामिना भावार्थो वर्णितः ॥ परंतु भावार्थस्तु कथं निष्कासितः । इति स्पष्टं न दृश्यते । पुनः कुमारिलभट्टः स्व-तन्त्रवार्तिके वक्ति । तच्चस्त्र्यपराधनिमित्तम् सत्यपि च स्त्र्यपराधे यदि मातुरेव क्षेत्रिणो वा पुत्रः स्यात् । ततस्तयोः प्रसिद्धजातित्वात् नैव दुर्ज्ञानता भवेत् तयोरप्येवमेवं तत्पूर्वजयोरित्यनादिन्यायेन जातिरवधार्यैतैव । यतस्तु माता भस्त्रा पितुः पुत्र इति स्मर्तृणां दर्शनम् । जनयितुश्च नानाजातित्वोपपत्तिस्तेन वर्णसंकरः । वेदेऽपिचाप्रमत्ता रक्षत तन्तुमेनमिति जातिविच्छेददर्शनम् स्त्र्यपराधकर्तृपुत्रनिमित्तमेवोपपद्यते । अन्यथा ह्यपरिरक्ष्यमाणेऽपि नैव स्वजातितन्तुविच्छेदो भवेत् तेनास्ति प्रशंसावकाश इति निरूढब्राम्हण्यप्रवरसंकीर्तनात् तत् प्रभवोऽयमितिज्ञानाद् ब्राम्हणः कृती भवति ॥

अस्य सूत्रस्योदाहरणत्वेन स्वीकारःकृतश्चेत् प्रकरणवशात् प्राप्तस्थलत्वोपपत्तिर्भवति नान्यथा ॥ (टिप्पनी द्रष्टव्या)

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

न चैतद् विद्मः प्रवरप्रव्रियमाणे देवाः पितर इति ब्रूयात् अब्राम्हणोऽपिब्राम्हणः प्रवरानुमन्त्रणेन स्यात् अप्रमत्ता रक्षत तन्तुमेनम् ॥

सूत्राचें वर्णन करतात. परन्तु दुसऱ्या पूर्वपक्षांत दृष्टविरोध दिला आहे, त्याचें या स्थळीं समाधान होण्यासारखें उत्तर झालें नाहीं. याचा वाचकांनीं विचार करावा. इन्द्रियजन्य जें जें ज्ञान होतें, तें प्रत्यक्ष. तेंच काय तें अनुभव. या

hood. Therefore the text that "the tongue is an utterer of falsehood" is an indirect subordinate sentence. An indirect subordinate sentence is thus known in two ways—either by the nature of the thing described or by what is frequently seen.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३. (स्त्रीच्या) अपराधामुळें बापालाच पुत्रदर्शन होतें. (उ० ६.)

13. On account of the fault (of the mother), the father gets (literally *sees*) a son. (6. Reply.)

अनुभवामध्यें आणि वेदवाक्यामध्यें विरोध येतो, असा दुसरा पूर्वपक्ष आहे. या दुसऱ्या पूर्वपक्षाची योग्यता मोठी आहे. अलीकडे कांहीं प्रख्यात युरोपी वाक्यार्थमीमांसकांनीं आपल्या धर्मशास्त्रावर असाच पूर्वपक्ष करून अध्यात्मविद्येचे नवे साम्प्रदायच स्थापन केले आहेत. जर्मनी देशामध्यें क्यांट यानें अध्यात्म वाक्यार्थमीमांसेचा साम्प्रदाय स्थापिला आहे. आणि इंग्लंडदेशीं हेंच मत प्रकट करणारे वेस्ट्-मिनिस्टर-रिव्हु म्हणून एक त्रैमासिक पुस्तक आहे. हे दोन्हीं निरनिराळा कटाक्ष ठेवून असाच पूर्वपक्ष करतात. आमचे गरीबीचें असें मत आहे कीं, वरील सूत्राचा भाष्यकार जो अर्थ करतात, तो नीट बसत नाहीं. पुस्तकाचा अर्थ करतांना पदार्थ दूर आहे, किंवा जवळ आहे याचा विचार वाचक करीत नाहीं. त्याची काय ती नजर त्याच्या पुढें जो लेख आहे त्याच्यावर असते. ज्याचें वर्णन झालें आहे तो पदार्थ दूर आहे, म्हणून त्याचें वर्णन प्रत्यक्षविरुद्ध असलें तरी चालेल, असें कोणीहि वाचक पत्करणार नाहीं. खालीं लिहिलेल्या रीतीनें सूत्राचा अर्थ लावला तर बरें. (प्रधानविधेयापासून कांहीं वर्णन) दूर असल्यानें (तें वर्णन गुणवाद होतें.) परन्तु दुसऱ्या सूत्रांतील पूर्वपक्ष असा सूत्रार्थ केल्यानेंहि हलत नाहीं. कारण निरनिराळ्या रीतीनें तो पूर्वपक्ष प्रबळ होऊन रहातो. इतकेंच सांगणें पुरें आहे कीं सहस्रावधि लोक जें धर्मपुस्तक आज पत्करतात, आणि तें ईश्वरप्रणीत आहे असें मानतात, त्या धर्मपुस्तकावर हा पूर्वपक्ष

12. Again, Jaimini removes the objection brought against him in the second statement of the opponent that Vaidika texts contradict sensuous perception. We have already translated some Vaidika texts in the foot-note to the second sûtra of this chapter. They are referred to here. The description of the sun in the foot-note mentioned applies to an object far distant. Therefore, objects such as the sun are not thoroughly seen. Therefore, there is no contradiction of sensuous perception. Again, "the sun is a flame and a flame is the sun" occurs in the Vajasaneya Sanhitâ (3. 9.) In this text, two statements are made at once. Therefore, there is no contradiction of sensuous perception. Commentator Shabara thus interprets this sûtra. But the objection in the second sûtra based on the contradiction of sensuous perception is not removed satisfactorily. Our readers can consider this. The objection that our experience as founded on sensuous perception and the Vaidika texts conflict, is very important. Some distinguished exegetes have often urged it in Modern Europe, and have succeeded in founding schools of philosophy. The psychological school of Kant in Germany, and the school which Westminister-Review represents in England urge the same objection only from different points of view. We humbly believe that the interpretation of

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

आकालिकेप्सा ॥ १४ ॥ (उ० ७.)

अकालिकेप्सा ॥ इति सूत्रपाठान्तरं दृश्यते ॥

पदानि । (गुणवादः) आकालिक–ईप्सा ॥

पदार्थः । आकालिका=प्रकृष्टकाला ॥

वाक्यार्थः । विशेषकाले प्राप्तुमिच्छा यावर्तते तया गुणवादः प्राप्नोति॥

भावार्थः । गुणवादस्य साकांक्षत्वदर्शनायाकालिकेप्सारूपहेतुरत्र वर्णितः ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

कोहितद् वेद । दिक्ष्वतीकाशान् करोति ॥

दोन हजार वर्षांपूर्वी निघाला, आणि उत्तराविषयीं पंचाइत पडली, ही गोष्ट मनुष्याच्या स्वभावाचें अन्तरंग काय आहे, हें दाखविण्यास उत्कृष्ट उपयोगी पडते.

१३. हें सूत्र लावण्यांत जराशी कटकट आहे. मूळ संस्कृत सूत्रांत "अपराधात्" "कर्तुः" आणि "पुत्रदर्शनम्" अशीं पदें आहेत. "अपराधात्" म्हणजे "अपराधामुळें" असा अर्थ केल्यानें कोणाचा अपराध अशी आकांक्षा उत्पन्न होते. आणि "कर्तुः" म्हणजे "कर्त्यांचे" म्हणजे बापाचे या पदाचे सापेक्षत्वामुळें स्त्रीचा अपराध असा अर्थ निष्पन्न होतो. सूत्राचा भावार्थ इतकाच कीं, स्त्री कोणत्याहि जातीची असेना, मुलगा बापाचे जातीचा असें म्हणायाचें, म्हणजे पुत्राचे जातीचा निर्णय करतांना बापाची जात प्रधान, आणि आईची जात गौण आहे. हा प्रकार आर्य लोकांच्या इतिहासास अनुलक्षूनच आहे. पूर्वी क्षत्रियाचे कन्येशीं ब्राम्हणाचे पुत्राचें लग्न होत असे. तसेंच वैश्यकन्येशीं क्षत्रियपुत्राचा विवाह होत असे. याप्रमाणें

the sûtra as given by commentators is not correct. In interpreting a book, a reader does not consider whether an object is remote or proximate. It is the description with which he has to do. Nor is he prepared to allow that a description may contradict his experience because the object described is remote. We should put the sûtra in the following way: (An indirect subordinate sentence is known) by its remoteness (from the principal predicate). But the objection in the second sûtra is not removed by this interpretation, for it can be urged in different ways. Suffice it to remark that it is important as it was raised at least two thousand years ago against a system of revelation which is still recognized by millions and as it was with difficulty combated—a fact strongly illustrative of important principles of human nature.

13. In interpreting this sûtra, considerable difficulty is experi-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४. विशेष कालीं (कांहीं एक) प्राप्तीची इच्छा (तेणेकरून गुणवाद सिद्ध होतो.) (उ०७)

14. (An indirect subordinate sentence is known) by a desire of acquisition at a particular time. (7. Reply.)

वैश्यपुत्राचा आणि शूद्रकन्येचाहि विवाह होत असे. या प्रकारास अनुलोम असें म्हणत. अनुलोम विवाह करणें शास्त्रविहित होतें. उत्तम वर्णानें कनिष्ट वर्णास आपली कन्या दिली असतां तें प्रतिलोम होई. हा प्रतिलोम विवाह शास्त्रविहित नव्हता. या प्रकारास अनुलक्षून हें सूत्र लिहिलें आहे. महाभारतांतहि "माता केवळ भात्या आहे, बापाचाच पुत्र" असें वाक्य आहे. "मत्त न झालेल्या जनानें ज्ञातितन्तूचें रक्षण करावें," असें वाक्य आहे. ब्राम्हण नसला तरी प्रवराचें स्मरण करून ब्राम्हण होतो." अशा या वाक्यावरून पूर्वीचा ज्ञातिविवेक भिन्न होता. त्या रीतीस उद्देशून आचार्यांनीं हें सूत्र रचिलें आहे. दृष्टान्ताचे रीतीनें हें सूत्र लावलें असतां याचा अर्थ नीट बसतो. जशी पुत्राविषयीं बापाचीच मुख्य ज्ञाति, तसें अर्थाविषयीं प्रधानवाक्याचीच मुख्य योग्यता. जसा स्त्रीकडे पुत्राविषयीं भात्याप्रमाणें सहाय होण्यापेक्षां दुसरा अधिकार नाहीं, तशीच अर्थवादादि गौण वाक्यांची योग्यता प्रधान वाक्यास केवळ साहाय्य करण्याची; परन्तु हें गौण वाक्य बिघडल्यामुळें प्रधान विधेय बिघडत नाहीं. असा अर्थ बसविल्यानें या सूत्राच्या प्रकरणात व स्थानास दोष येत नाहीं. नाहीं तर उगीच या ठिकाणीं भलतेंच वर्णन केलें असा सूत्राचा भावार्थ दिसूं लागतो. आचार्यांनीं व्यामोह उत्पन्न होईल असें सूत्र कां केलें असें विचारलें तर एक उत्तर आम्हांस सुचतें. तें असें कीं, एकाच कामांत दोन कामें

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३५. ज्यांना ज्ञान नाहीं, अशांविषयीं कर्माचें प्रतिपादन केलें आहे, म्हणून (मंत्रार्थ निष्प्रयोजन.) (पू० ५.)

खला बांधावी लागते. त्यावेळीं "हे मेखले०" हा वरील मंत्र येतो. मेखला हिंसा करणार कशी ? तर असले भलते भलते अर्थ समजून घेण्यापेक्षां मन्त्र तोंडपाठ करावेत, आणि यज्ञाचे वेळीं ते म्हणावेत, हें बरें. असा पूर्वपक्षकाराचा आशय आहे.

३५. उदाहरणावरून सूत्रार्थ स्पष्ट होईल. "हे ओषधे, त्याचें त्राण कर." तै. सं. (१.२,१.) "हे दगडानो, तुम्ही विद्वान् आहां म्हणून ऐका." तै. सं. (१. ३,१३.) पूर्वपक्षकार असें विचारतो कीं, दगड ऐकणार कसे ? दगड विद्वान् होणार कसे ? ओषधी त्राण करणार कशी ? हे असले भलभलते, अप्रयोजक, असंभाव्य अर्थ समजून घेण्यापेक्षां फक्त वेदमंत्र तोंडपाठ करावेत हें बरें. त्यांच्या अर्थाविषयीं भानगड करून उपयोग नाहीं. असा पूर्वपक्षकाराचा आशय आहे.

35. (The Vedas are to no purpose) because objects incapable of knowing are described (as performing sacrifices). (v. Statement of the opponent.)

text referred to is pronounced. How can a girdle kill a sacrificer? Instead of attempting to know such absurd texts, it is reasonable to learn the texts by mere rote and quietly to use them in a sacrifice without understanding their sense. This is the gist of this statement in opposition.

35. An illustration will explain the sûtra. "Oh vegetable, save him." This text occurs in the Taittirîya Sanhitâ (I. 2, 1.) "Being learned, oh, stones ! listen." This text occurs in the Taittirîya Sanhitâ (I. 3, 13.) The opponent asks—how can the stones listen and how can they be learned ? How can a vegetable save man ? Instead of knowing the sense of such absurd texts, it is reasonable to get up the texts by heart by mere rote. There is no use in endeavouring to know their sense. This is the gist of this statement of the opponent.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अर्थविप्रतिषेधात् ॥ ३६ ॥ (पू० ६)

पदानि । (मन्त्रानर्थक्यम्) अर्थ-विप्रतिषेधात् ॥

पदार्थः । अर्थः=प्रतिपादितविषयः । विप्रतिषेधात्=विरुद्धोपन्यासात् ॥

वाक्यार्थः । विषयस्य विरुद्धोपन्यासादुच्चारणार्था मन्त्राः ॥

भावार्थः । एकस्य विषयस्यैककालीनो विरुद्धोपन्यासो दृश्यते । यथा अदितिर्द्यौरदितिरन्तरिक्षम् । अस्मिंलक्ष्येऽदितेर्द्योत्वेन वाऽन्तरिक्षत्वेन युगपद् वर्णनं कृतम् । तद् विरुद्धम् । अतएव मन्त्राणामर्थे तात्पर्यं नास्ति । क्व तर्हि । केवलोच्चारे तात्पर्यम् ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

अदि॑ति॒र्द्यौरदि॑तिर॒न्तरि॑क्ष॒म् । वाजसनेयसंहिता (२५,२३.) ॥ एक॑ए॒वरु॒द्रो न द्वि॒तीया॑यतस्थे । तै. सं. (१.८,६.) स॒हस्रा॑णि सहस्र॒शो ये रु॒द्रा अधि॒भूम्या॑म् ॥ तै. सं. (४.५,११)

स्वाध्यायवदवचनात् ॥ ३७ ॥ (पू० ७.)

पदानि । (मन्त्रानर्थक्यम्) स्वाध्यायवत्-अ-वचनात् ॥

पदार्थः । स्वाध्यायवत्=स्वाध्यायवतः । अवचनात्=अर्थस्याप्रतिपादनात् ॥

वाक्यार्थः । स्वाध्यायकर्मसम्बन्धिनो ये मन्त्रास्तेषामर्थप्रवचनं न क्रियते । अत उच्चारणार्था मन्त्राः ॥

भावार्थः । स्वाध्यायाध्ययनस्य कर्मार्थत्वाद् यत् कर्मण्युपयोक्ष्यते तदभ्यसितव्यम् । तच्च चैवं विद्वांसः सन्तो वृद्धाः शिष्यानक्षरावधारण एव प्रवर्त्तयन्ति । सन्निहितेऽप्यर्थे न तद्वचनाभ्यासे । तेनावश्यं तेषामुच्चारणमेवाङ्गत्वेनाभिप्रेतमिति कुमारिलभट्टः परिपाटीं दर्शयति । अतएव मन्त्राणामर्थे तात्पर्यं नास्ति । क्व तर्हि । केवलोच्चारे तात्पर्यम् ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३६. ज्या विषयाचें प्रतिपादन केलें आहे, त्याच विषयाचा विप्रतिषेध होतो, म्हणून (मंत्रार्थ निष्प्रयोजन.) (पू०६.)

३७. (स्वाध्यायकाळीं) स्वाध्यायकर्मसंबंधी मंत्राचें अर्थप्रतिपादन नाहीं, म्हणून (मंत्रार्थ निष्प्रयोजन.) (पू० ७.)

36. (The Vedas are to no purpose) because there are in it contradictory statements on the same subject. (VI. Statement of the opponent.)

37. (At the time of learning under a preceptor as prescribed by sacred canons) the sense of the texts (in this connection) is never taught, therefore, (the Vedas are to no purpose.) (VII. Statement of the opponent.)

---

३६. उदाहरणावरून सूत्रार्थ स्पष्ट होईल. "अदिति आकाश आहे, अदिति वायुमंडल आहे." हा मंत्र वाजसनेय संहिता (२५.२३.) एथें आला आहे. त्या ठिकाणीं अदितिच आकाश, आणि अदितिच वायुमंडल असें वर्णन आहे. हें कसें ? एकाच मंत्रामध्यें एकमेकांशीं न जुळणाऱ्या अर्थांचें वर्णन केलें आहे. हें कसें ? दुसरें एक उदाहरण घ्या. "रुद्र (जगतामध्यें) एकच आहे, दुसरा रुद्र कोणीहि नाहीं." असा मंत्र तै. सं. (१.८,६.) एथें आहे. पुन: "हजारोंच्या हजारो जे रुद्र भूमीवर आहेत." असा मंत्र तै. सं. (४.५,११.) एथें आहे. या मंत्रामध्यें जे अर्थ वर्णिले आहेत, ते परस्पर विरुद्ध आहेत. वेदाच्या अर्थावर तात्पर्य आहे असें म्हटलें, तर जो विरोध आम्ही दाखविला तो अंगावर येतो म्हणून वेदाचे अर्थ करण्याची अवश्यकता नाहीं. केवळ वेद तोंडपाठ केले म्हणजे झाले. आणि तोंड-

36. An illustration will explain the sûtra. "The firmament is infinity, and the heavens are infinity." This text occurs in the Vâjasaneya Sanhitâ (25, 23.) How can two things like the firmament and the heavens be infinite at the same time? How are such contradictory statements made in the same text? Take another example :—"There is only one Rudra (in the universe) and there is none second." This text occurs in the Taittirîya Sanhitâ (I. 8, 6.) Again the text, "there are thousands of Rudras on the earth" occurs in the Taittirîya Sanhitâ (IV, 5, 11.) These texts are evidently contradictory. If it be said that the knowledge of the sense of Vaidika texts is important, the contradictions, says the opponent, are inevitable and have to be admitted. The latter proposal of merely remembering them obviates all the objections based on the texts being self-contradictory; because, when there is no knowledge of

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अविज्ञेयात् ॥ ३८ ॥ (पू० ८.)

पक्षादीनि स्पष्टानि ।

वाक्यार्थः । केचिन् मन्त्रा ज्ञातुं न शक्यन्ते । अतएव तेषामानर्थक्यम् ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

सृण्येव जर्भरी तुर्फरी तू नैतोशेव तुर्फरी पर्फरीका ॥ ऋ. सं. (१०.१०६,६.) अम्यक्सा त इन्द्र ऋष्टिरस्मे सनेम्यभ्वं मरुतो जुनन्ति ॥ ऋ. सं. (१.१६९,३.) इन्द्रः सोमस्य काणुका ॥ ऋ. सं. (८.७७,४.)

पाठ मन्त्र केले म्हणजे मन्त्रामन्त्राच्या अर्थांत जो विरोध अढळतो त्यापासून कांहींच अडचण उत्पन्न होणार नाहीं. म्हणून वेदाचा अर्थ करणें निरुपयोगी आहे, व वेद तोंडपाठ करणें हें सयुक्तिक आहे.

३७. कोणीहि पुरुष गुरूपाशीं अध्ययन करतेवेळीं मन्त्र तोंडपाठ मात्र करतो, त्यांत ज्या क्रियेचें वर्णन केलें असतें तशी क्रिया हातानें करीत नाहीं. किंवा ती क्रिया कशी करावी हें समजूनहि घेत नाहीं. केवळ एकामागून एक मंत्र तोंडपाठ करतो. म्हणून वेद तोंडपाठ करण्याचीच परिपाठि आहे. या करितां वेदमंत्र तोंडपाठ करावेत. अर्थ समजून घेण्याची अवश्यकता नाहीं. ही वेद तोंडपाठ करण्याची परिपाठि आहे असें पूर्वपक्षकार म्हणतो. पण ही परिपाठि केवळ जैमिनीच्याच वेळीं उत्पन्न झाली होती असें

the texts themselves, there can be no knowledge of their being self contradictory. The meaning of Vaidika texts is, therefore, unnecessary. It is reasonable to get up the Vedas by heart by means of mere rote.

37. A student, while with his preceptor, only learns to repeat Vaidika texts, and never actually performs the works described in them nor does he learn the way in which the works are to be performed, but quietly learns to repeat the texts in order. From this practice it is to be inferred that it has been a custom to learn only to repeat Vaidika texts. The custom proves that Vaidika texts are to be repeated without any knowledge of their sense. There is no necessity whatever of apprehending their sense. The opponent says that it is a custom to get up Vaidika texts by heart. Now, this custom did not come into existence just at the time of

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३८. (कांहीं मंत्राचा) अर्थ समजणें अशक्य, म्हणून (मंत्रार्थ निष्प्रयोजन) (पू० ८.)

नाहीं. ही परिपाठि फार प्राचीन आहे, असे दिसतें. ऋ. सं. (१.१६४,३९.) एथें हा मंत्र पहावा. "ऋचो अक्षरे॑ प॒रमे व्यो॑मन्यस्मि॒न्देवा अधि॒ विश्वे॑ निषे॒दुः। यस्तन्न वेद॒ किमृ॒चा क॑रिष्यति॒ य इत्तद्वि॒दुस्त इ॒मे सम॑सते॥" या मंत्राचा अर्थः—ऋचेचा उत्तम (अविनाशी) अक्षररूप जो स्वर्ग, त्यामध्यें सर्व देव वास करतात. हें जो न जाणतो तो (नुस्त्या) ऋचेनें काय करील? जे असेंच जाणतात ते हे असा वास करतात. पुनः, यास्काचार्य आपल्या निरुक्तांत असें म्हणतात कीं जो अर्थ न जाणतो, पण वेद तोंडपाठ करतो तो केवळ भार वाहणारा खांब आहे.

या वचनांवरून पूर्वी वेद तोंडपाठ करण्याची परिपाठि होती, त्याच परिपाठीस अनुलक्षून पूर्वपक्षकारानें पूर्वपक्ष केला आहे. शबरानें एक उदाहरण दिलें आहे, त्यांत " पूर्णिका कांडते, माणवकनामक विद्यार्थी तिच्यापाशीं मन्त्राचें अध्ययन करतो. त्याला मन्त्राचा अर्थ काय हें समजून घेण्याची इच्छा नाहीं. ती पूर्णिका स्त्री त्याला सांगत नाहीं, कारण तिला ठाऊक नाहीं." अशा प्रकारच्या कथेचें दिग्दर्शन आहे. माधवानें याच कथेचा चांगला उल्लेख केला आहे. सर्व भाष्यकार ही कथा कां सांगतात हें आम्हांस समजत नाहीं. वेदमन्त्र नुस्ते पाठ करण्या-

38. (The Vedas are to no purpose) because it is impossible to know the sense (of some Vaidika texts.) (VIII. Statement of the opponent.)

Jaimini. It appears that it is an ancient custom. See the *Rik* Sanhitâ (I. 164, 39.), where the following text occurs:—"In eternal heaven (as it were) of a verse, all the gods abide. What can he who does not know this do with a (mere) verse? Those only who know this, thus abide." There is evidently a pun on the word Aksara in this text. Again Yâska in his Nirukta says that "he who learns merely to repeat the Vedas is like a post which only bears a burden." These texts prove that the practice of repeating Vaidika texts without knowing their sense existed and was recognized long before the time of Jaimini. The opponent who bases his objection on an ancient custom is one of those who preferred repeating to learning the Vedas. Commentator Shabara gives the following illustration:—A woman named Pûrnikâ pounds in a mortar. A student named Mânavaka learns there. He does not care to know the sense of what he repeats. Pûrnikâ does not explain it to him for she does not know it." We do not see why all commentators tell this story. The purport of the sûtra seems to be to found an argument on the existence of an ancient custom.

38. There are such Vaidika texts as none can understand. It is, therefore, unreasonable to attempt to know their sense. It is, therefore, necessary to learn to

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अनित्यसंयोगान् मन्त्रानर्थक्यम् ॥ ३९ ॥ (पू० ९.)

पदार्थः । अनित्यसंयोगात्=अनित्यस्य संयोगः अनित्यसंयोगः तस्मात् । मन्त्र-आनर्थक्यम्=मन्त्राणामनभिधानार्थता ॥

वाक्यार्थः । अनित्यार्थानां सम्बन्धान् मन्त्राणां किंचिदभिधानार्थता नास्ति ॥

भावार्थः । वेदेऽनित्यवस्तूनां वर्णनमस्ति तस्माद् वेदार्थानामनित्यता । अतो वेदार्थेषु कालक्रमोऽवगम्यते । कालक्रमादननुभूतपूर्वत्वम् । अतएव मन्त्राणामर्थे तात्पर्यं नास्ति । क्क तर्हि । केवलोच्चारणे तात्पर्यम् ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

किं ते कृण्वन्ति कीकटेषु गावो नाशिरं दुह्रे न तपंति घर्मं । आ नो भर प्रमंगंदस्य वेदो नैचाशाखं मघवन् रंधया नः । ऋ.सं. (३.५३,१४.)

विषयीं प्राचीन परिपाठीपासून अनुमान काढावें, एवढाचया सूत्राचा आशय दिसतो.

३८. वेदांत कांहीं कांहीं मन्त्र आहेत, त्यांचा अर्थ कोणालाहि होत नाहीं. म्हणून वेदमन्त्रांचा अर्थ करणें हें सयुक्तिक नाहीं. म्हणून नुस्ते वेदमन्त्र तोंडपाठ करावेत, असें पूर्वपक्षकाराचें म्हणणें आहे. आतां, ज्यांचा अर्थ कधींहि होणार नाहीं असे मन्त्र तरी कोणते? असें विचारलें तर संस्कृत सूत्राखालीं वेदवाक्यांचें अनुसंधान अशी सदर घालून वेदमन्त्र दिले आहेत, ते पहावे. तेथें फक्त नमुन्या करतां दोन तीन मन्त्र घेतले आहेत. अशा मन्त्रांचा अर्थ बसविण्याकरतां

repeat Vaidika texts from memory. This is the gist of this statement of the opponent who mentions such Vaidika texts as can not be understood. Such texts are quoted by way of illustration, in the Sanskrita portion of this work. Different commentators have endeavoured to discover and settle the meaning of the texts. But it is rather too much to say that their endeavours have been crowned with success. We have already mentioned that the school of those who insist on the Vedas being to no purpose is ancient. The Naigama Kânda of the Nirukta of Yâska throws light on the history of this school. Âchârya Koutsa argues that the Vedas have no sense. In the course of his arguments, he

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३९. नाशवन्त वस्तु वेदांत अढळतात, म्हणून (मंत्रार्थ निष्प्रयोजन.) (पू० ९.)

भाष्यकारांनीं पुष्कळ खटपट केली आहे. परंतु ती खटपट सफल झाली असें म्हणण्यास जरा कठीण खरें. वेद अनर्थक आहेत, असें म्हणणाऱ्या पंडितांचा सांप्रदाय फार प्राचीन आहे, असें आम्ही पूर्वी वर्णन केलेंच आहे. हे प्राचीन पंडित कसे होते, हें नीट समजून घेण्या करतां यास्काचार्यांनें केलेल्या निरुक्ताचें नैगमकांड (१.१५.) प्रकरण पहावें. तेथें मन्त्राला अर्थ नाहीं, असा पूर्वपक्ष कौत्सनामें पंडित करतो. आणि ह्या पूर्वपक्षाचें प्रतिपादन करतांना त्यानें जे आठ नऊ हेतु दिले आहेत ते हेतु, आणि मीमांसा (१.२,३१–३९) सूत्रांत जे पूर्वपक्ष केले आहेत, त्यांत जे हेतु आहेत ते, हे शब्दशः जुळतात. कौत्स हा वेदार्थ नाहीं म्हणणारा, आणि कोणी उलटा वेदार्थ आहे असें म्हणणारा, या दोघांमध्यें वादविवाद आहे. त्या वादविवादावरून अति प्राचीन काळीं वेदाचे अर्थ होत नाहींत, असा पूर्वपक्ष करणारे महापंडित होते असें सिद्ध होतें. या महापंडितांचा नायक कौत्स होता. ही गोष्टहि लक्षांत ठेवण्याजोगी आहे. पुनः गुरुपरंपरेमध्यें कौत्साचें नांव गणिलें आहे. पाणिनीच्या लेखावरून कौत्स हा मोठा प्रबळ आचार्य होता असें सिद्ध होतें. हें इतिहास-

39. (The sense of the Vedas is to no purpose,) because transitory objects occur in the Vedas. (IX. Statement of the opponent.)

lays down eight grounds which exactly correspond to the eight statements of the opponent in the foregoing sûtras (I. 2, 31-39.) Yâska who holds that Vaidika texts have some sense or other is opposed to Koutsa who holds that they are without any sense. The arguments of Koutsa place it beyond doubt that in ancient times there were rationalistic free-thinkers like Koutsa who was perhaps the leader of the Âchâryas who thought as he did. The history of Koutsa in this connection deserves attention. Again, the name of Koutsa is included in the list of renowned teachers. Pâṇini's sûtras give grounds for believing that Koutsa was a distinguished teacher about the middle of the Âchârya-period. We have given this history to show that the opponent mentioned in the sûtra is not a man of straw and that his objections are not imaginary; but that such arguments as Jaimini notices were actually advanced and rebutted.

39. We have examined the significance of the phrase—"transitory objects occuring in the Vedas" in the sûtra (I. 1, 28.) This will be fully explained again by the following example. We will translate the Vaidika text quoted in the Sanskrita portion of this work. Oh (Indra) "What do the cows do for thee in the countries

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अवशिष्टस्तु वाक्यार्थः ॥ ४० ॥ (सि०)

पदानि । अवशिष्टः, तु, वाक्य-अर्थः ॥

पदार्थः । अवशिष्टः=निरपेक्षः । तु=न । वाक्यार्थः=वाक्यस्य अर्थः ॥

वाक्यार्थः । न । वाक्यार्थो निरपेक्षः ॥

भावार्थः । मन्त्राणामानर्थक्यं नास्ति मन्त्राणां सार्थता वर्तते । मन्त्राणामर्थे सफलतायां गृहीतायां न किञ्चिदन्यदपेक्षितम् । उच्चारणे सफलतायां गृहीतायां किञ्चिदप्यपूर्वरूपं फलमपेक्षितम् । सार्थत्वरूपफलं दृष्टम् । अपूर्वरूपफलमदृष्टम् । दृष्टादृष्टयोरदृष्टकल्पनाऽन्याय्या । अतोऽन्यफलनैरपेक्ष्यात् मन्त्राणामर्थे तात्पर्यम् । नतूच्चारणे ॥

अनुसंधेयानि वेदवाक्यानि ॥

अग्निरसि नार्यसि । वाजसनेय संहिता (११.१०) तां चतुर्भिराभ्रिमादत्ते ॥

षर्णन अशाकरितां केलें आहे कीं जैमिनीच्या मीमांसेंत जे पूर्वपक्ष आहेत ते केवळ कपोलकल्पित आहेत, असें समजूं नये. असे पूर्वपक्ष पूर्वी पंडित खरोखर करीत असत व ते सर्व जमा करून जैमिनीनें आपल्या शास्त्रमालिकेंत ओवून ठेवले आहेत, असें सिद्ध होतें.

३१. नाशवंत वस्तु म्हणजे काय याचा आम्ही पूर्वींच (१.१,२८.) एथें विचार केला आहे. पुनः, उदाहरणावरून स्पष्ट होईल. आम्हीं जो मन्त्र संस्कृतांत घेतला आहे त्याचा अर्थ सांगतों "कीकट नामें नास्तिक देशामध्यें हे (इंद्रा) गाई तुझा उपयोग करतात काय? सो-

called Kîkatas? They do not give milk enough to prepare Soma for thee. They do not give milk sufficient to fill a vessel called a *Mahâvîra* so that we may heat it. Therefore, grant us the wealth of the prince *Pramangada* and of the country called *Naichâshâkha*." This text occurs in the *R*ik-sanhitâ (III. 53. 14.) In the original text the verb *tapanti* is used. We are doubtful as to its meaning. In this text, the infidels—*Kîkatas*, the prince—*Pramangada* and the country called *Naichâshâkha* are mentioned. If the Vedas be eternal, all these—the infidels, the prince and the country would be eternal. But these infidels and the rest do not exist.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नांव.	रुपये.	आणे.	प्रति.
रावसाहेब रघुनाथ भास्कर गोडबोले	५	०	१
रा० सा० विनायकराव वासुदेव	५	०	१
रावसाहेब अमृत श्रीपत नागपूरकर.	५	६	१
रा० रा० रामचंद्र गोविंद अनगळ...	५	६	१
रावबहादूर हरी रावजी चिपळुणकर.	५	०	१
Gopalji Gulabhai Desai Esquire.	5	6	1
Shivalal Nathubhai Esquire...	5	6	1
Babu Aditya Ram Bhattacharya. ...	5	6	1
रावसाहेब कृष्णाजी बापूजी बाळ.	५	६	१
रा० सा० गोविंदराव गोरे....	५	६	१
Arthur Oliphant Esquire...	10	12	2
रावसाहेब चिंतामण सखाराम चिटणीस...	५	६	१
श्री० रा० रा० वासुदेवराव अण्णासाहेब जहागिरदार.. ...	५	४	१
Sashiah Shastri Esquire	5	6	1
Sivanath Shah Esquire	5	6	1
रा० सा० विठल वासुदेव गुरजर.	५	६	१
रा० सा० कृष्णराव सदाशीव जोगळेकर.	५	६	१
रा० सा० महादेव विष्णु काणें.	५	४	१
रा० सा० विष्णु बाळकृष्ण सोहोनी.	५	६	१
रा० सा० बापाजी बाळकृष्ण.	५	६	१
रा० सा० गोविंद जगन्नाथ.	५	६	१
रा० सा० शांताराम नारायण.	५	६	१
Dr. Shivaram Bhau...	5	6	1
Rev. Robert Squires...	5	6	1
रा०सा० बाळाजी पांडुरंग....	५	६	१
,, ,, विष्णु मोरेश्वर महाजनी.	५	६	१
,, ,, कारभारी संस्थान जव्हार.	५	६	१
Dosabhai Framji Esquire.	5	6	1
K. Ramchandrarao Esquire....	5	6	1
K. Raghunathrao Esquire.	5	6	1

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Register No. 131 of 1877.

सूचना.

	रुपये.	आणे.
वर्षाची वर्गणी, अगाऊ	५	०
एका अंकास	०	८

पुण्याबाहेर राहणारांस टपाल हंशिलाबद्दल दर वर्षाचे ६ आणे खेरीज पडतील. मागाहून वर्गणी घेतली जाणार नाहीं.

ग्रंथकर्त्यास अथवा म्यानेजरास जीं पत्रें लिहावयाचीं, तीं "षड्दर्शनचिंतनिका—आफिस, पुणें, सदाशिव पेठ, घर नंबर ६४१" या पत्यावर लिहावीं. वर्गणी वगैरे संबंधी पत्रें याच पत्यावर पाठवावींत.

	Rs.	A.
For one year, in Advance... ...	5	0
Single copies.	0	8

Besides six annas for postage at the rate of half an anna for a copy.

N. B. The subscription is to be paid *in advance.* No accounts of arrears can be kept.

All letters should be addressed to the Manager of the *Sad*darshana-Chintanikâ-Office, Poona, Sadashive Petha, House Municipal No. 641.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

THE

SADDARSHANA-CHINTANIKÂ

OR

STUDIES IN INDIAN PHILOSOPHY.

षड्दर्शनचिंतनिका.

मीमांसादर्शन

वृत्तिसहित

त्याचें मराठी आणि इंग्रजी भाषांतर.

पुस्तक १. जून १८७७. अंक ६.

VOL. 1. JUNE, 1877. No. 6.

पुणें.

"ज्ञानप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

(सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदली आहे.)

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राचीनशाल औपमन्यवः सत्ययज्ञः पौलुषिरिन्द्रद्युम्नो भाल्लवयो जनः शार्कराक्ष्यो बुडिल आश्वतराश्विस्ते हैते महाशाला महाश्रोत्रियाः समेत्य मीमाꣳसाञ्चक्रुः को न आत्मा किं ब्रम्हेति ॥ छान्दोग्य । ५.११,१. ॥

The following gentlemen will receive subscriptions for [illegible].

Anna Moreshwar Kunte B. A., M. D., Esqr., Bombay.

Rao Saheb Mahiput Rao Rupram, Principal Training College, Ahmedabad.

Rao Saheb Gopal Govind Ghate, Sub-judge Kotree, Sindha.

Govind Moreshwar, Hasubnis Esquire, B. A., Sanskrit Teacher High School, Baroda.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४०. नव्हे. वाक्यार्थ स्वतंत्र आहे. (सि०)

म तयार करण्याजोगें दूध त्या देत नाहींत, महावीरनामक पात्र भरण्या जोगें दूध देऊन तें पात्र तापवीत नाहींत. (म्हणून) प्रमगंदाचें धन आम्हांस दे. हे इंद्रा नैचाशाखाचें धन आम्हांस दे." ऋ. सं. (३.५३, १४.) तपंति असें मूळ मन्त्रांत पद आहे, त्याच्या अर्थाची आम्हांस आशंका आहे. "या मन्त्रांत नैचाशाखनामक नगराचें, आणि प्रमगंदनामक राजाचें वर्णन आहे, आणि कीकटादि नास्तिकांचेंहि वर्णन आहे. वेद नित्य आहेत असें म्हटलें असतां कीकटादि नास्तिक, आणि प्रमगंदादि राजे, आणि नैचाशाखादि नगरें, हीं सर्व नित्य होऊन बसतील. पण हीं नगरें आणि राजे आहेत कोठें? तीं तर लयास गेलीं आहेत. आणि हे राजे, आणि हीं नगरें जर अनित्य आहेत, तर वेदहि अनित्य आहेत. म्हणजे हें अनुमान सिद्धांती आचार्यांचे अंगावर आलें, व पूर्वपक्षकाराची कडी चढली. असे अनर्थ होतात म्हणून वेदाचा अर्थ करूं नये. वेद फक्त तोंडपाठ करावेत. असा पूर्वपक्षकाराचा आशय आहे.

४०. संस्कृत सूत्रांत अविशिष्ट असें पद आहे, त्याचा अर्थ स्वतन्त्र असा आम्ही केला आहे. वाक्यामध्यें क्रियापद असलें, व त्या क्रियापदाचा अर्थ पूर्ण करणारीं कारकें असलीं, म्हणजे वाक्यार्थ पूर्ण समजून येतो. एखाद्या क्रियेचें वर्णन कर-

संस्कृतसूत्रेऽवशिष्टपदं प्रामादिकं ॥ तत्राविशिष्टपदं शुद्धं ॥

40. No, the sense of a sentence is independent. (Final statement.)

These have long ceased to be. If the infidels like the *Kikatas*, the princes like Pramaganda and the countries like Naichâshâkha be transitory and liable to decay, the Vedas are doubtless transitory. This hypothetical inference thus turns the tables against Jaimini as the opponent makes good his statement. No attempt to interpret the Vedas ought to be made at least simply to obviate such difficulties as the hypothetical inference raises. They ought to be quietly repeated without knowing their sense.

40. The term *Avishista* is used in the original Sanskrita sûtra which we have interpreted into *independent*. The full sense of a sentence is seen when its verb (action) and the means of the action are expressed. On whom is an action performed? With what is it performed? For whom, from what motive, when and where is it performed? These questions naturally call for an answer. The answers to these questions and the performance of the action are *correlated* to each other. The relation between action and its means is called *Kâraka* in Sanskrita and is known to Europeans as the theory of *grammatical government*. When these questions are fully answered, the sense of a sentence is apprehended. In common life, a sentence is intended to be understood. In like manner, in Vaidika matters, a text is certainly intended to be apprehended. This

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

गुणार्थेन पुनःश्रुतिः ॥ ४१ ॥ (उ० १).

(पूर्णार्थेन पुनःश्रुतिरिति पाठान्तरम्)

पदानि । गुण-अर्थेन, पुनः-श्रुतिः ॥

पदार्थः । गुणः=द्रव्यसंस्कारविशेषः (अत्र द्वितीयाध्याये द्वितीयपादस्य गुणकर्मलक्षणकमष्टमसूत्रं गुणपदस्यार्थनिरूपणायानुसन्धेयम्) अर्थेन=प्रयोजनेन । पुनःश्रुतिः=पुनर्मंत्रोच्चारणम् ॥

वाक्यार्थः । पौनःपुन्येन मंत्रोच्चारणं ग्रहणीयम् संस्कारविशेषप्रयोजनाय ॥ यदि समुच्चयार्थः शब्दो नास्ति येन वाक्यानां सम्बन्धोऽवगम्येत तर्हि गुणप्रयोजनेन वाक्यसम्बन्धो ग्रहणीयः । एकेन मन्त्रेण वाक्यार्थं गृण्हन् न यथाश्रुतं गृण्हीयादिति शबरः॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

तां चतुर्भिरादत्ते ॥

तांना सापेक्षत्वसंबंधानें ती क्रिया कशानें झाली, कशा करतां झाली, कोणत्या कारणावरून झाली, कोठें झाली, आणि केव्हां झाली, या गोष्टींचें प्रसंगानुरूप जें वर्णन करावें लागतें त्या वर्णनाचा आणि क्रियापदाचा जो संबंध त्या संबंधास कारक असें म्हणतात. ह्या संबंधाचें पूर्ण रीतीनें वर्णन केलें म्हणजे वाक्यार्थ समजतो. लौकिकव्यवहारामध्यें वाक्याचा उपयोग वाक्यार्थ समजावा एवढाच असतो. तसेंच वैदिक प्रकरणींहि वाक्याचा उपयोग वाक्यार्थ समजावा एवढाच आहे. आणि हाच उपयोग सर्व प्रकारें योग्य व स्वीकारायाजोगा आहे. ज्या फळा-

every way deserves to be accepted. When two fruits of the same thing can be seen—the one which serves a purpose in common life—really and directly in this world while we live—and the other fruit is to be enjoyed in future after death, the first fruit should be preferred to the last, the former being at once accepted and the latter in every way disregarded. When Vaidika texts are got up by heart by means of mere rote and repeated, no direct worldly fruit is to be had. But when the sense of Vaidika texts is explained and understood, the sense itself is a direct fruit to be enjoyed in this life. Hence it is absolutely necessary to know the Vaidika texts rather

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४१. गुणवर्णनाकरतां पुनः मंत्र अढळतो. (उ० १.)

चा अनुभव ह्या जन्मींच दिसून येतो तें प्रत्यक्ष फळ, व ज्याचा अनुभव ह्या जगतामध्यें आतां घेतां येत नाहीं, परंतु ज्याचें फळ जन्मांतरीं कधींहि होईल असें सांगतां येतें, तें अप्रत्यक्ष फळ. जेव्हां एखाद्या कर्मापासून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अशीं दोन फळें आहेत असें सांगतां येतें, तेव्हां प्रत्यक्ष फळाचा सर्व प्रकारें स्वीकार करावा, अप्रत्यक्ष फळाचा त्याग करावा. वेदमन्त्र नुस्ते तोंडपाठ केल्यापासून आज कोणतेंहि फळ अनुभवास येत नाहीं. वेदमन्त्रांचा अर्थ समजून आज अर्थज्ञान हेंच फळ प्राप्त होतें. म्हणून वेदमन्त्रांचा अर्थ समजून घेण्याविषयीं सर्व प्रकारें कटाक्ष ठेवावा हें योग्य आहे. प्रत्यक्ष, आणि अप्रत्यक्ष असें ज्या न्यायाचें आम्ही वर्णन केलें आहे त्याकडे वाचकांनीं विशेष लक्ष द्यावें अशी आमची विनंती आहे. जो वेदमन्त्र आम्ही संस्कृतांत घेतला आहे त्याचा अर्थः—"तूं पावडें आहेस, तूं स्त्री आहेस" वाजसनेय संहिता (११.१०.) पुनः ब्राम्हणामध्यें "त्या पावडयाला चोहोंनीं घेतो" असा मन्त्र आहे. अशा सर्व वाक्यांचा स्वतन्त्र अर्थ होतो. म्हणून वेदमन्त्रांचा अर्थ करावा असा या सिद्धांतसूत्राचा अर्थ आहे.

४१. या सूत्रांत गुणशब्द विचार करण्या जोगा आहे. जैमिन्याचार्यांनीं मीमांसा (२.२,८.) सूत्रांत गुणशब्दाचें

41. Vaidika texts occur again for describing a quality. (1. Reply.)

than repeat them without understanding them. We humbly ask our readers to pay special attention to the logical maxim based on direct and indirect fruits to which Jaimini is said to refer in the course of the argument. Now the translation of the Vaidika text else-where quoted. "Thou art a spade. Thou art a female." This text occurs in the Vâjasaneya Sanhitâ (XI. 10.) Mahîdhara explains the word Nârî either as a female or as having no adversary by splitting *Nârî* into *na* (not) and *ari* (an enemy), the termination—long î—being explained away as Vaidika. Again, in the Brâhma*n*a the following occurs. "(He) takes the spade with four." Thus every sentence has an independent sense. Jaimini from this statement draws the conclusion that Vedas deserve to be understood.

41. The term Gu*n*a in the Sansk*r*ita sûtra deserves special attention. Jaimini explains fully the term Gu*n*a in (2. 2, 8.) sûtra of the Pûrva-Mîmânsâ. In performing sacrifices, it is necessary to sprinkle water on sacrificial grass (Darbha). When any thing sacrificial like the Darbha is thus treated, the treatment is supposed to induce a new quality in the thing. Such a quality is called a gu*n*a. This sûtra gives a reply to the statement made by the opponent in (1. 2, 31.) The opponent brings in that sûtra the argument that Sanhitâ-texts are unnecessarily repeated and described in the Brâhma*n*as. Such

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

परिसंख्या ॥ ४२ ॥ (उ० २.)

पदानि । (पुनःश्रुतिः) परिसंख्या ॥

पदार्थः । परि=त्यागे । सङ्ख्या=विशेषकथनं । परिसंख्या=त्यागेन विशेषकथनम् ॥

वाक्यार्थः । परिसंख्यया स्वार्थत्यागः परार्थकल्पना प्राप्तबाधश्च प्राप्नुवन्ति ॥

भावार्थः । पुनर्मन्त्रोच्चारणं परिसंख्या भवति ॥ यत्र प्रत्यक्षमेव वचनं विद्यते तत्रानुमानिकं वचनं न गृह्यते। इति सूत्राशयं शबरो वर्णयाञ्चकार ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

इमामगृभ्णन् रशनामृतस्य । इत्यश्वाभिधानीमादत्ते ॥ तै० ब्रा० (५.१,२.)

यदा त्वनेन वाक्येन प्रत्यक्षेण नैराकांक्ष्यादविशेषविनियोगसमर्थवाक्यानुमानं निषिद्धं तदा केवलाश्वाभिधानीविषयत्वसिद्धिरित्यपौनरुक्त्यादर्थवद् वाक्यम् ॥ इति कुमारिलभट्टः ॥

निरूपण केलें आहे. कांहीं याग करतांना दर्भादि द्रव्यावर पाणी शिंपडतात. यज्ञकर्मसंबंधानें कोणत्याहि द्रव्यावर जो अशा प्रकारचा संस्कार घडतो, त्या संस्कारास गुण असें म्हणतात. (१.२.३१.) सूत्रांत जो पूर्वपक्ष केला आहे, त्या पूर्वपक्षाचें उत्तर या सूत्रांत आचार्य देतात. त्या पूर्वपक्षामध्यें पूर्वपक्षकारानें अशी कोटी काढली आहे कीं संहितेंत जे मन्त्र असतात, त्याच मन्त्रांचें ब्राम्हणग्रंथांत पुनः वर्णन असतें. या वर्णनाचें कांहीं प्रयोजन नाहीं. आचार्य असें म्हणतात

a description is useless. Jaimini points out the use of such a description. The Sanhitâs do not contradict the Brâhmanas, because the latter describe the qualities of sacrificial things. Jaimini produces more arguments in the following sûtras to justify the descriptions in the Brâhmanas which appear redundant to the opponent.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४२. (पुनर्वर्णनाचें कारण) परिसंख्या. (उ० २.)

कीं या वर्णनाचें प्रयोजन आहे. पुनः ब्राम्हणांत जो मन्त्र अढळतो, तेणेंकरून गुणाचें वर्णन होतें, म्हणून ब्राम्हणांत आणि संहितेंत विरोध नाहीं. ब्राम्हणादि ग्रंथांत पुनः जें वर्णन आहे, त्याविषयीं आणखी कारणें पुढील सूत्रांत आचार्यांनीं दिलीं आहेत.

४२. या सूत्राचें माहात्म्य मोठें आहे. नेहमी शास्त्रार्थ करते वेळीं हें वाक्य विधिवाक्य आहे, कीं नियमवाक्य आहे, कीं परिसंख्यावाक्य आहे अशी पंचाईत पडते. जेव्हां पूर्वी ठाऊक नाहीं अशा गोष्टीचें वर्णन होतें, तेव्हां त्यास विधि म्हणावा असें आम्हीं पूर्वी सांगितलेंच आहे. आतां नियमविधि तो कोणता, व परिसंख्याविधि तो कोणता व त्यांच्यांत भेदाभेद काय, हा विचार करणें आहे. नियम आणि परिसंख्या यांचें स्वरूपकथन आणि भेदाभेद वर्णन करण्यापूर्वी मीमांसादि ग्रंथांमध्यें या विषयासंबंधी एक प्रसिद्ध कारिका आहे, तिचें भाषांतर करतों. "जेव्हां अर्थ अत्यंत अप्राप्त असतो, तेव्हां त्यास विधि म्हणावें, हा अर्थ घ्यावा कीं तो अर्थ घ्यावा असें पक्षांतर प्राप्त झालें असतां त्यास नियम म्हणावें; तेथें आणि दुसरीकडे जो अर्थ प्राप्त होतो त्यास परिसंख्या म्हणावें." या कारिकेवरून नियम- आणि परिसंख्या यांच्या स्वरूपकथनाचा आणि भेदाभेदाचा स्पष्ट निर्णय होत

42. (The reason of repetition) is the principle of exclusive specification. (2. Reply.)

42. This is a very important sûtra. In deciding cases of dubious ruling in sacred texts, it is necessary to determine whether a particular proposition is original (Vidhi) or a restriction (Niyama) or a case of exclusive specification (Parisankhyâ). We have already defined a Vidhi to be an original statement, that is a statement of what is not already known. The questions to be answered are: what is a restriction, and what is a case of exclusive specification and what is the distinction between these two? We will translate verses well-known to all the Mîmânsakas before we particularize the nature of exclusive specification and point out the distinction between it and a restrictive rule. The verses called Kârikâ are :—"when what is not already known at all is stated, it is an original statement (Vidhi)—when one of the two senses is to be taken by way of an alternative, it is a restrictive rule. And when something is stated there and in other places, it is called a case of exclusive specification." This Kârikâ does not determine their nature nor does it distinguish the one from the other. Mádhava attempts to explain the nature of exclusive specification but does not distinguish a case of restriction from that of exclusive specification. Bhâttadîpika and a work by Âpadeva give a particular description of the two; but the author of the Shâstra-dîpikâ distinctly states that the discussion about the na-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. माधवानें परिसंख्येचें स्वरूपकथन मात्र केलें आहे, परंतु परिसंख्या आणि नियम यांच्यांतला भेद दाखविला नाहीं. भाट्टदीपिकाकार व आपदेव यांनीं नियम आणि परिसंख्या यांच्या भेदाचें विशेष वर्णन केलें आहे. शास्त्रदीपिकाकारानें असें म्हटलें आहे कीं या विचारापासून क्लेश उत्पन्न होतो. क्लेश उत्पन्न होतो खरा, तरी विचार केला पाहिजे. हें घ्यावें कीं तें घ्यावें अशी पंचाईत पडून दोहोंमधून एकच घ्यावें असा जेथें निर्णय होतो, त्या स्थळीं नियम आहे असें म्हणावें. यास उदाहरण. भाताचें फोल काढणें आहे, आणि तांदूळ तयार करणें आहेत. मग तें फोल कांडून निघेल अथवा नखानें भात सोलून निघेल अथवा दुसऱ्या कोणत्याहि उपायानें तें फोल निघेल. मग कांडूनच भाताचें फोल काढून तांदूळ सिद्ध करावेत, असा निर्णय केला असतां तो नियम झाला. नियम करते वेळीं पुष्कळ निरनिराळे जे उपाय असतात, त्यांतून एकच घ्यायाचा असतो, आणि तोच घ्यावा असें सांगितलें असतें. परिसंख्या करते वेळीं सामान्य वर्णन केलेलें असतें, आणि त्या सामान्य वर्णनामुळें दोन चार उपाय घेण्याजोगे असतात. त्या दोन चार उपायांमधून एक उपाय करावा असें वर्णन असतें. यास उदाहरण. पांच पांच नख्यांच्या पशूंचें मांस खावें, असें सांगितलें आहे. यावरून ज्या पशूंना पांच पांच नख्या नाहींत, त्यांचें मांस खाऊं नये, असें निष्पन्न झालें. पहिल्या वाक्याचें नांव परिसंख्या. परिसंख्येमध्यें नेहमी निश्चय

ture and characteristics of these two principles is vexatious. Though the discussion be vexatious, it is our duty to examine them. A case of restriction is that in which two things being offered for acceptance, it is determined to take the one in preference to the other. An illustration will throw some light on this statement. Rice is to be separated from husk, which may be removed by mere pealing it with our nails, or by pounding it or by other means. . Under these circumstances, the rule is laid down that the husk should be separated by pounding rice. Such a rule is *restrictive.* In a case of restriction, out of the different means of performing an action, one only is to be adopted. In a case of exclusive specification only a general statement is made which includes four or five remedies or principles fit for our acceptance. Out of these different remedies or principles, only one is to be adopted. An illustration will explain the nature of exclusive specification. "The flesh of animals having five nails is to be eaten." Hence the flesh of those animals which have not five nails is not to be eaten. The first statement is an example of exclusive specification, the characteristic mark of which is finality of statement. Commentators speak of three defects of exclusive specification. They are :—1. disregarding its own signification or disregarding what is distinctly heard, that is, what is distinctly stated in a text ; 2. conception of another sense; 3. setting aside the sense that offers itself for our acceptance. As to the first defect :—when the statement—" the flesh of animals

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असतो, हें तिचें लक्षण. या परिसंख्येमध्यें तीन दोष आहेत, असेंहि ग्रंथकार वर्णन करतात. ते तीन दोष हे:—आपल्या स्वतःच्या अर्थाचा त्याग, दुसऱ्या अर्थाची कल्पना, व जो अर्थ घ्यावा म्हणून प्राप्त होतो त्याचा बाध. पांच पांच नख्या ज्यांना नाहींत त्या पशूंचें मांस खाऊं नये असा अर्थ निष्पन्न झाल्यावर पांच पांच नखें ज्यांना आहेत त्या पशूंचें मांस खावें हा जो पुढें आलेला अर्थ, आणि ज्या अर्थाचें श्रवण झालें आहे तो अर्थ एकीकडे राहतो. आणि ज्या पशूना पांच पांच नख्या नाहींत त्यांचें मांस खाऊं नये असा दुसराच अर्थ पुढें येतो. अशा दुसऱ्याच अर्थाची कल्पना होते. आणि पांच नख्यांचे पशू असोत, कीं अधिक नख्यांचे असोत, त्यांचें मांस खावें असें जें मनुष्यास सहज वाटतें त्यावरून प्राप्त झालेल्या सर्व पशूंचे मांसभक्षणाचा बाध होतो. या तीन दोषांचीं नांवें, १. श्रुतत्याग किंवा स्वार्थहानि, २. परार्थकल्पना, आणि ३. प्राप्तबाध अशीं आहेत. पांच पांच नख्या ज्या पशूंस आहेत त्यांचें मांस खावें या परिसंख्येस मीमांसक लाक्षणिकी परिसंख्या म्हणतात. कारण ही परिसंख्या अनुमानबलानें उत्पन्न होते. दुसरें उदाहरण. तै० सं० (४. १,२.) या स्थळीं "यज्ञाचीही दोरी त्यांनीं घेतली". असा अग्निचयनयज्ञसंबंधी मन्त्र आहे. पुनः तै. ब्रा. (५.१,२.) या स्थळीं याच मन्त्रावर व्याख्या करतांना "घोड्याची दोरी" असें वर्णन आहे. घोड्याची ही दोरी घ्यावी असें म्हटल्यानें गर्दभादिकांची दोरी घेऊं नये असें नि-

having five nails is to be eaten"—is heard, the statement that the flesh of animals not having five nails is not to be eaten, is inferred. In view of the second statement, the first statement directly made is, as it were, disregarded. Again as to the second defect, the inferential statement that "the flesh of animals not having five nails is not to be eaten" explains the second defect in as much as it is a conception of a sense different from that of the original statement directly made. As to the third defect, man is naturally inclined to eat the flesh of all animals whether they have five nails or not. This natural inclination is totally set aside by the rule under examination. The three defects are called Shrutatyâga or Svârthahâni, Parârthakalpanâ and Prâptabâdha respectively. The case of exclusive specification that the flesh of animals having five nails is to be eaten is called *indirect* or Lâksanikî, for this specification is based more on inference than on a direct statement. An illustration:—"they took this string of the sacrifice." See the Taittirîya Sanhitâ (IV. 1, 2.) Again, the Taittirîya Brâhmana (V. 1, 2.) referring to this text explains the string to be that of a horse. The translation of the text is:—"he takes the string of the name of a horse." When the string of a horse is to be taken, the inference is that the string of asses or other animals of draught is not to be taken. The first statement is a case of exclusive specification as well subject to three defects as that in the former example. When a particle having a determinative sense distinctly occurs in a text, then the

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अर्थवादो वा ॥ ४३ ॥ (उ० ३).

पदानि । (पुनःश्रुतिः) अर्थ-वादः, वा ॥

पदार्थः । अथवा । पुनःश्रुतिरर्थवादो भवति ॥

वाक्यार्थः । अर्थवादस्तु विध्यर्थप्ररोचनाय ॥*

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

ऊरु प्रथस्वोरु ते यज्ञपतिः प्रथताम् ॥ तै.सं. (१.१,८.) यजमानमेव प्रजया पशुभिः प्रथयति ॥ तै. सं. (६.२,७.) किंवा तै. ब्रा. (३.२,८.)

अविरुद्धं परम् ॥ ४४ ॥ (उ० ४.)

पदानि । अ-विरुद्धम्, परम् ॥

पदार्थः । अविरुद्धम्=यन्न बाधकं भवति तत् । परम्=अन्यत् ॥

वाक्यार्थः । अन्यत् (अदृष्टकल्पनम्) न बाधकं भवति ॥

अर्थवादस्य स्तुत्यर्थत्वेन निरूपणं पूर्वोत्तरपक्षक्रमेण पूर्वं संवृत्तम् ॥ * "सर्वस्तुतीनां किञ्चित् शब्दगतमर्थगतं वाऽऽलम्बनमुक्तं" ॥ इति कुमारिलभट्टः ॥

अदृष्टार्थोच्चारणवादिनोऽपि सन्नियमादपरमवश्यं कल्पनीयमदृष्टम् । तन्न ममापि (मन्त्रार्थवादिनोऽपि) प्रत्यायननियमाद् भविष्यतीत्यविरोधः ॥

त्पन्न झालें. पहिल्या परिसंख्येवर तिन्ही दोष येतात. तसे घोड्याचीही दोरी घ्यावी या हि परिसंख्येवर तिन्ही दोष येतात. निश्चयार्थी "च" सारखें अव्यय ज्या परिसंख्येंत असतें, त्या परिसंख्येस मीमांसक श्रौती परिसंख्या असें म्हणतात. या विषयाचे विचारामध्यें पुष्कळ भानगड आहे. निरनिराळे ग्रंथ पाहिले असतां त्या भानगडीचा उलगडा उत्कृष्ट होत नाहीं. असें असतां जितका उलगडा होईल तितका आम्ही एथें केला आहे; आणि परिसंख्या आणि नियम यांच्यामधी-

exclusive specification is called *direct*. The determinative particles in Sanskrita are such as *eva*. In the second illustration, the string of a horse is directly stated to limit the general statement made in the Taittirîya Sanhitâ (IV. 1, 2.) The discussion on this subject is necessarily involved in considerable confusion. Reference to different works on the Pûrva-Mîmânsâ does not throw sufficient light on the subject. Though such is the nature of this discussion, we have attempted as much as we can to remove the confusion, and to point out the distinction between a restrictive

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४३. अथवा (पुनः मंत्र अढळला तर तो) अर्थवाद. (उ०३.)

४४. अदृष्ट प्रयोजनाची कल्पना (दोन्ही पक्षांला) विरुद्ध नाहीं. (उ० ४.)

43. Or (if a mantra recurs), it is an explanatory statement. (3. Reply).

44. The theory (of a supernatural cause) is not against (both the sides.) (4. Reply.)

ल भेद दाखविला आहे. वाचकांनीं याचा विशेष विचार करावा, कारण विधि म्हणजे काय, नियम म्हणजे काय, परिसंख्या म्हणजे काय, सामान्य वचन कोणतें, विशेष वचन कोणतें यांचा विचार जितका जितका करावा तितकें तितकें शास्त्राचें स्वरूप अधिक समजून येतें. कारण पतंजलीचें असें म्हणणें आहे कीं, "अशा पद्धतीनें अर्थाची जी व्यवस्था करणें तिचेंच नांव शास्त्र आहे."

४३. प्रथम पूर्वपक्षांत पुनः मन्त्र अढळतो अशी कोटी केली आहे, तिचें हें उत्तर आहे. संस्कृत सूत्राखालीं दिलेल्या वेदवाक्यांचा अर्थ केला असतां हें स्पष्ट लक्षांत येईल. तै. सं. (१.१,८.) एथें (हे पुरोडाशा) मोठा हो. तुझा यजमान हि मोठा होवो." असा मन्त्र आहे. या मन्त्राचें दोन स्थळीं पुनर्वर्णन आहे-तै. सं. (६.२,७.) आणि तै. ब्रा. (३.२,८.) तें पुनर्वर्णन असें कीं "(हे पुरोडाशा) मोठा हो. तुझा यजमानहि मोठा होवो, म्हणजे यजमानालाच संततीनें आणि गुराढोराच्या योगानें मोठा करतो." हें पुनर्वर्णन अर्थवाद आहे, हें स्पष्टच आहे.

४४. मूळ संस्कृतसूत्रांत "आविरुद्धम्" आणि "परम्" अशीं दोन पदें आहेत.

rule and a case of exclusive specification. Our readers will kindly give special attention to this subject, for a philosophical subject essentially partakes of such distinctions as are based on the nature of an original statement, of a restrictive rule, of the principle of exclusive specification, of a generality or an universal statement, of an individuality or a particular or specific statement, since a shâstra or a system of philosophy, says Patanjali, is an adjustment based on these principles.

43. This sûtra replies to the argument that a mantra recurs, adduced in the first statement of the opponent. The translation of the texts quoted in the Sanskrita portion of the work will elucidate this statement. In the Taittiriya Sanhitâ (I. 1, 8.) the following occurs :—" (Oh, Cake !) wax. Let thy sacrificer prosper !" This text (mantra) again occurs in two places. Vide the Taittirîya Sanhitâ (VI. 2, 7.), and the Taittirîya Brâhmana (III. 2, 8.) It occurs again in the following form :— " (Oh, Cake) wax. Let thy sacrificer prosper ! that is (he) blesses the sacrificer himself with children and cattle." It is plain that such a repetition is only explanatory.

44. There are two terms in the original Sanskrita sûtra:—*Param*

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

सम्प्रैषे कर्मगर्हाऽनुपालम्भः संस्कारत्वात् ॥ ४५ ॥ (उ० ५.)

पदानि । (पुनःश्रुतिः) सम्प्रैषे, कर्म-गर्हा-अनुपालम्भः, संस्कारत्वात् ॥

पदार्थः । सम्प्रैषे=अनुज्ञाविशेषे । कर्मगर्हा=कर्मणो गर्हा । गर्हा=निन्दा । अन्—उपालम्भः=न उपालम्भः=निराकरणं । संस्कारत्वात्=द्रव्यादीनां गुणाधानात् (टिप्पनी द्रष्टव्या) ॥

वाक्यार्थः । सम्प्रैषविषये पुनःश्रुतिः कर्मणो गर्हानिराकरणाय । द्रव्यादीनां गुणाधानात् ॥

भावार्थः । यदा सम्प्रैषः क्रियते तदा तेन यज्ञकर्मणो गर्हादिदुष्टत्वं निराक्रियते । कथम् । कर्मसम्बन्धिद्रव्यादीनि संस्क्रियन्ते तत्-संस्कारद्वारा ॥ (तृतीयपूर्वपक्षसमाधानमिदम्) पूर्वपक्षस्तूच्चारणाददृष्टम् । तन्न न । कर्तव्यमित्यपि विज्ञातेऽनुष्टानकाले स्मृत्या प्रयोजनम् । उपायान्तरेणापि सा प्राप्नोति । अतोऽनेनोपायेन कर्तव्येति । नियमार्थमाम्नानम् । संस्कारत्वात् । इति शबरः ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

प्रोक्षणीरासादय ॥ तै. ब्रा. (३.२,९.)

त्यांत "ऽविरुद्धम्" पदाचा अर्थ स्पष्टच आहे. "परम्" म्हणजे दुसरें. दृष्टप्रयोजन आणि अदृष्टप्रयोजन या दोहोंचें विवेचन पूर्वी (१.२,४०.) सूत्राच्या टिपेंत केलें आहे. दृष्टप्रयोजन म्हणजे प्रत्यक्षप्रयोजन. दृष्टप्रयोजन घ्यावें असाच आग्रहधरून इतका वेळ जैमिनीनें वाद केला. परंतु जैमिनी या सूत्रांत असें म्हणतो कीं "कांहो पूर्वपक्षकार, वेदमन्त्र तोंडपाठ केल्यानें पुण्यादिक कांहीं अप्रत्यक्ष फल प्राप्त होतें असें तुमचें म्हणणें आहेना ? त्यावर वेदमन्त्राचा अर्थ समजल्यानें कांहीं अप्रत्यक्ष

and *Aviruddham.* The sense of the last term is sufficiently plain. *Param* means *other.* The explanation based on experience as well as that based on the notions of the supernatural is dwelt upon in the foot-note to (I. 2, 40.) sûtra. The Sanskrita terms for the two methods of explanation are *Drista* and *Adrista.* They may be respectively identified with the *positive* and *metaphysical explanations* as these terms are now understood in Europe. Jaimini discusses the question under consideration, insisting on the first method being preferred to the last.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४५. प्रैष दिला म्हणजे (यागसंबंधी द्रव्यांवर) संस्कार होऊन यागसंबंधी उणीव पुरी होते. (उ० ५.)

45. When the special sacrificial order called Praisa is given, some *effect* is produced on (sacrificial) things, and it supplies the defects (of a sacrifice.) (5. Reply.)

फळ होतें असें आम्हांसहि म्हणतां येईल. एतावता तुमचें आमचें विचारसाम्यच झालें." विचारसाम्याचे अर्थाविषयीं पूर्वमीमांसेंतील (१.१,१२.) सूत्र पहा. हें दुसऱ्या पूर्वपक्षाचें उत्तर.

४५. याच पादाचे ४१ सूत्राचे टिपेंत गुणशब्दाचें वर्णन करतांना द्रव्यसंस्कार म्हणजे काय हें सांगितलें आहे. प्रैष म्हणजे "अमुक कर" म्हणून जो एक ऋत्विज् दुसऱ्या ऋत्विजास आज्ञा करतो तो. गर्हा (निंदा) या शब्दाचा अर्थ उणीव असा आम्ही केला आहे. एकंदर सूत्रार्थ इतकाच कीं जेथें जेथें वेदमन्त्रांत प्रैष दिलेले अढळतात, तेथें तेथें यज्ञसंबंधी द्रव्यांवर विशेष संस्कार घडतो. तेणेंकरून यज्ञाची उणीव पुरी होते, म्हणून जेथें प्रैष असतो तेथें पुनर्वर्णन होतें, या कारणाकरतां पुनर्वर्णनांत विशेष हेतु आहे. म्हणून पुनर्वर्णन दोषास्पद होत नाहीं. वेदमन्त्राचा अर्थ केला म्हणजे हें लक्षांत येईल. यज्ञद्रव्यावर शिंपडण्या करतां पाणी ज्या पात्रांत ठेवतात, त्या पात्रास प्रोक्षणीपात्र असें म्हणतात. "प्रोक्षणीपात्रास मांड" असा मन्त्र तैत्तिरीय ब्राम्हणांत (३.२,९.) एथें आहे. या ठिकाणीं हा प्रैषरूप मन्त्र आहे. तैत्तिरीय ब्राम्हणांत (३,६,२.) याचें नांव प्रैषा-

But Jaimini for the sake of argument admits in this sûtra that some supernatural merit (such as righteousness) occurs when Vaidika texts are got up by heart, and says to his opponent that it may be as well said on his behalf that some supernatural merit occurs when the sense of Vaidika texts is understood. Thus there is parity of reasoning. The sûtra (I. 1, 12.) explains the application of parity of reasoning as made by the Mîmânsakas. The sûtra under consideration is a reply to the second statement of the opponent.

45. In the foot-note to the 41st sûtra of this pâda, the term Dravyasanskâra is explained in connection with the term gu*n*a. Dravyasanskâra is translated in the above sûtra by *effect.* When a *R*itvij, gives an order to another *R*itvij for doing something connected with a sacrifice, it is called Praisa. The term Garhâ (literally censure) is translated in the above sûtra by *a defect.* The gist of the sûtra is that whenever sacrificial orders happen to be given in Vaidika texts, there some special effect is to be produced on sacrificial materials. The effect supplies the defects of a sacrifice. Hence there is the repetition of a text where such sacrificial orders occur. There is, therefore, some special object in repeat

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अभिधानेऽर्थवादः ॥ ४६ ॥ (उ० ६.)

पदानि । अभिधाने, अर्थवादः ॥

पदार्थः । अभिधाने=शब्दैरर्थप्रतिपादने । अर्थवादः=स्तावकं वचनम् ॥

वाक्यार्थः । अभिधानविषये पुनःश्रुतिरर्थवादो भवति ॥

भावार्थः । अतोऽभिधानं नाम भाष्यकारमतेन रूपकाद्यलंकारद्वाराऽर्थवर्णनमिति भाति ॥ चतुर्थपूर्वपक्षस्य समाधानमिदम् ॥

अनुसन्धेयानि वेदवाक्यानि ॥

चत्वारि शृङ्गा त्रयो अस्य पादा द्वे शीर्षे सप्त हस्तासो अस्य । त्रिधा बद्धो वृषभो रोरवीति महो देवो मर्त्याँ आविवेश । ऋ. सं. (४.५,५८.)। ओषधे त्रायस्वैनम् तै. सं. (१.२,१.) शृणोत ग्रावाणः ॥ तै. सं. (१.३,१३.)

अर्थवादः क इत्यनेन लक्षणेन वर्णयति सूत्रकारः । परन्तु लक्षणाच् चत्वारि शृङ्गेति रूपकद्वारेण यागस्तुतिः कर्मकाल उत्साहं करोतीति कुमारिलभट्टः ॥

यज्ञसमृद्धये साधनानां चेतनसादृश्यमुपपादयितुकाम आमन्त्रणशब्देन लक्षयति । इति शबरः ॥

ध्याय आहे. अध्वर्यु मैत्रावरुण नांवाच्या ऋत्विजाला प्रैष देतो, आणि मैत्रावरुण होत्याला प्रैष देतो, अशी त्या अध्यायाची मांडणी आहे. प्रोक्षणीपात्र मांड हा प्रैष अध्वर्यु अग्नीध्राला देतो. तिसऱ्या पूर्वपक्षाचें या सूत्रानें समाधान केलें.

ing Vaidika texts. The repetition, therefore, is not to blame. The translation of Vaidika texts quoted in the Sanskrita portion of this work will elucidate the sûtra under examination. The vessel in which water is kept to be sprinkled on sacrificial materials is called Proksanî. The text—"Put the Proksanî" occurs in the Taittirîya Brâhmana (III. 2, 9.) The whole adhyâya (III. 6, 2.) of the Taittirîya Brâhmana is called the adhyâya of sacrificial orders (Praisâdhyâya) which consists of the orders which a priest called Adhvaryu gives to a priest called Maitrâvaruna and which the last gives

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४६. अभिधान असलें म्हणजे अर्थवाद होतो. (उ० ६.)

46. Whatever gives an explanation is a subordinate statement. (6. Reply.)

2. No, (though whatever is not to be found in the Vedas is not to be accepted, yet) from their author (of the Vedas and Smṛitis) being common, it is to be inferred that what is not in the Vedas is to be accepted. (Final statement.)

आहे. आतां ते शिष्ट तरी कोण असें विचारिलें असतां आतांशा या गोष्टीचा मुळींच थांग लागत नाहीं. जो उठतो तो मी शिष्ट असें म्हणतो. अंगांत गर्व असला, आणि साधुपणा मिरविला, आणि गळ्यांत सांप्रदायाचें चिन्ह असलें, आणि विद्या असो किंवा नसो थोडी अक्कल लढवून लोकांस झुकविण्याची शक्ति असली, म्हणजे पुरे. ज्याला शिष्टाचा आव घालतां येतो तो शिष्ट. असे शिष्ट गांवोगांवीं माजले आहेत, आणि केवळ पोट जाळण्याकरितां ते ज्या गप्पा मारतात त्यानांच शाब्दप्रमाणाची योग्यता आली आहे. अस्तु. एथें इतकें निर्भीडपणें सांगितलें पाहिजे कीं असे लोक मुळींच शिष्ट नाहींत. तर शिष्ट ते कोण? गृह्यसूत्रादि ग्रंथांत ज्या ऋषींचीं आणि आचार्यांचीं नांवें सांगितलीं आहेत, आणि ज्यांच्या नांवानें ब्रम्हयज्ञ करतांना नित्य तर्पण करावें लागतें, ते शिष्ट. मग या शिष्टमंडळींत कौत्साचार्य, यास्काचार्य, जैमिनि, गौतम हे सर्व येतात. म्हणून या शिष्टांची योग्यता काय हा विचार करणें अवश्य आहे. शाब्दप्रमाणाचे

people. Every one constitutes himself a *shista*. The necessary qualifications are: vanity, title to the name of a Sâdhu from being strangely dressed or rather undressed, a sacred batch worn round the neck, and cunning enough to influence the common people. A person so qualified is a *shista* no matter if he is innocent of knowledge of any kind. Now-a-days he who can pretend to be a *shista* is a *shista*. Such leaders of society abound in every place from a hamlet to a city. Whatever they state, simply from the selfish motive of earning a livelihood is considered by the common people to be authoritative. It is absolutely necessary to state here without fear or favour that such persons are not *shistas* in any sense of the word, and that their statement cannot be in any way authoritative. Then who are the *shistas* entitled to the leadership of the people? Those Âchâryas and *Ṛ*isis who are mentioned in ancient works like the G*ṛ*ihya Sûtras, to whom water and sesamum are offered every day at the time of Brahmayajna (sacrifice to knowledge) are the real *shistas* or the educated who include among their number such

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

योगानें यांचें म्हणणें कितपत यथार्थ ठरतें ही गोष्ट पूर्वपक्षकारानें काढली आहे. त्यांत सामान्यतः जें यथार्थ वचन तें शाब्द. हें घ्यावें, पण जें शाब्द नाहीं तें टाकावें इतकेंच पूर्वपक्षकाराचें म्हणणें आहे. पण पूर्वपक्षकारास असें म्हणू दिलें असतां स्मृति टाकाव्या लागतात, असें निष्पन्न होतें, कारण त्या वेदांत गणल्या नसून अनादि नाहींत. स्मृतिच काय त्या साऱ्या आचाराचा आधार आहेत, असा कटाक्ष ठेवल्यामुळें स्मृत्यादि ग्रंथांची योग्यता काय, हें या वादविवादावरून ठरतें. भाष्यकार स्पष्ट असें म्हणतात कीं एका अंधळ्यानें दुसऱ्या अंधळ्यास मार्ग दाखविला, आणि दुसऱ्या अंधळ्यानें तिसऱ्या अंधळ्यास मार्ग दाखविला अशी गत होते. शबरांचें असें म्हणणें आहे कीं स्मृतींतूनच जर असें निघतें कीं त्यांचा आधार दुसरे प्राचीन ग्रंथ आहेत, तर स्मृतींचें म्हणणें घ्यावें कसें? त्यांनीं दृष्टांत दिला आहे, तो असाः—कोणी वांझ म्हणाली हें माझ्या पोरीचें आहे. वांझेला पोर कुठली आणि हें म्हणणें काय! अशीच दशा स्मृतींची होते. कुमारिलभट्टानें तर स्मृतींची दुर्वांवडी उडवून दिली आहे. तो असें म्हणतो कीं "स्मृतींचें मूळ काय? ज्या वेदाच्या शाखा नाहींशा झाल्या आहेत त्या नां? वरें यावरून ज्यास जें रुचतें तेंच तो प्रमाण म्हणून बसतो. मन्वादि स्मृतिकारांनीं आपलें म्हणणें काय हें नीट जपून सांगितलें आहे. परंतु त्या म्हणण्याचा आधार काय हें मुळींच दाखविलें नाहीं. ज्यांस जें नीट वाटतें ते

venerable persons as Koutsâchârya, Yâskâchârya, Jaimini, and Goutama. Now the question is important: what is the authority of these persons? The sûtra under consideration raises the question: how far are the statements made by thinkers like Yâska or Koutsa reliable when they are put to the test of testimony? Now the question as raised by the opponent is circumscribed: whatever is to be established by testimony is acceptible and whatever cannot be proved by trustworthy testimony is to be rejected. But the position taken by the opponent points to the invalidity of works called Smritis, for they are never recognized as handed down from time out of memory, and they never pretend to be the *word* or Shabda. But at present sanction for all actions in life is sought from the Smritis. Hence this description is important as it determines the validity and authority of the Smritis; for commentators distinctly state that "the Smritis are like a blind man leading the blind." Commentator Shabara observes that Smritis are not authoritative, because they themselves declare their dependence on some ancient works. His illustration is:— "A barren woman once said that this belonged to her daughter." The statements of the Smritis are like those made by the barren woman about the possessions of her daughter. Kumârila-bhatta boldly rejects the Smritis with disdain. He asks "what is the origin of the Smritis? Is it not some lost recension of the Vedas? Hence one accepts as true whatever he likes. Writers like Manu carefully state what their opi-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहींशा झालेल्या शाखांच्या दाळक्यावर तें लादतात. लादोत बापडे." सारांश–स्मृत्यादि ग्रंथांचा आधार काय तें अनुमान असें प्राप्त झालें आहे. या गोष्टीचा पुढील सूत्रांत विचार केला आहे.

२. मागील पूर्वपक्षाचें समाधान या सूत्रांत आहे. या सूत्रांत विचार करण्याजोगें एक पद आहे. तें "कर्तृसामान्यात्." हें पद सूत्रांत आल्यामुळें सूत्रार्थ करण्यास अडचण पडते. जैमिनीसारखा मीमांसक वेदाचा कर्त्ता आहे असें कसें म्हणेल? मीमांसकांच्या मतें वेद अपौरुषेय आहेत. दुसरी अडचण अशी कीं सामान्य या शब्दाचा अर्थ काय करायाचा? त्याचा अर्थ भाष्यकारांनीं ऐक्य असा केला आहे. परंतु असा अर्थ करण्यास सबळ साधन नाहीं. सामान्य ह्या पदाचा अर्थ सारखेपणा असा होतो. परंतु हा अर्थ घेतल्यानें सूत्रार्थ बरोबर बसत नाहीं, कारण सूत्रामध्यें न्यायप्रयोगाची योजना केली आहे. आणि त्या न्यायप्रयोगांतील हेतु कर्तृसामान्य हा आहे. "उपमान" असें पद जर मूळ सूत्रांत असतें तर अर्थ नीट बसवितां येता. भाष्यकार असें म्हणतात कीं स्मृतींत दोन प्रकारचा अर्थ असतो. ज्याचें प्रयोजन इहलोकीं स्पष्ट दिसतें, आणि ज्याचा अनुभव घेतां येतो, अशा प्रकारचा एक अर्थ; ज्याचा अनुभव घेतां येत नाहीं आणि ज्याचें प्रयोजन इहलोकीं स्पष्ट दिसत नाहीं, अशा प्रकारचा दुसरा अर्थ. स्मृतींतील पहिल्या अर्थाविषयीं मुळींच

nions are but never point out the source of their information. Some father whatever they like best on the lost recensions of the Vedas. Pity! Let them do so." The conclusion from these statements of commentators is that works like Smṛitis are based on inference and not on direct statements of the Vedas. All this is discussed in the following sûtras in which a Smṛiti is styled an inference (anumâna).

2. This sûtra seeks to refute the statement made by the opponent in the former sûtra. In this sûtra there is only one term deserving consideration. It is *Kartrisâmânyât* which renders the interpretation of the sûtra difficult. How can a Mîmânsaka like Jaimini who holds the Vedas to be *impersonal* speak of their author? Again, it is difficult to ascertain the sense of the word *Sâmânya.* It means literally and actually what is common, but commentators interpret it into identity. We cannot see what grounds they have for this rendering. But the sûtra cannot be interpreted if the literal and actual meaning of Sâmânya be accepted, for the sûtra employs a syllogism, the middle term of which is the *Kartri-Sâmânya.* The interpretation of this sûtra would have been much helped if Jaimini or the author of the sûtra had used the term *analogy* (*upamâna*). Commentators state that Smṛitis inculcate a two-fold purpose, the first of which accrues and can be directly experienced in this life; and the other which can be neither understood nor experienced in this life. There is no difficulty so far as the

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अथ श्रुतिप्राबल्याधिकरणम् ॥

विरोधे त्वनपेक्ष्यं स्यादसति ह्यनुमानम् ॥ ३ ॥

पदानि । विरोधे, तु, अन्-अपेक्ष्यम्, स्यात्, अ–सति, हि, अनुमानम् ॥

पदार्थः । स्पष्टः

वाक्यार्थः । यस्माच् छब्दाशब्दयोर्विरोधेऽशब्दं न स्वीकरणीयम् । तस्मादसति विरोधेऽनुमानद्वारा तत् स्वीकरणीयं स्यात् ॥

भावार्थः । श्रुतिस्मृतिविरोधे श्रुतिर्बलीयसीति न्यायः सर्वत्र प्रसिद्धः । विरोधाभावे तु स्मृतेर्ग्रहणम् । यतः स्मृतेर्वेदमूलकत्वमनुमीयते ॥

अथ दृष्टमूलकस्मृत्यप्रामाण्याधिकरणम् ॥

हेतुदर्शनाच्च ॥ ४ ॥

पदानि । (अशब्दमनपेक्ष्यम्) हेतु-दर्शनात्, च ॥

पदार्थः । हेतुदर्शनात्=हेतोर्दर्शनं हेतुदर्शनं तस्मात् । च=पुनः ॥

वाक्यार्थः । यत्र किंचिदैहिकं प्रयोजनं दृश्यते तत्राशब्दस्य (स्मृतेः) न स्वीकारः ॥

भावार्थः । स्पष्टः ॥

स्मृतिवाक्यमनुसन्धेयम् ॥

वैसर्जनहोमीयं वासोऽध्वर्युर्गृह्णाति ॥

अडचण राहिली नाहीं. दुसऱ्या प्रकारचा अर्थ आला कोठून हा विचार करतांना अशा अर्थाचें वर्णन एखाद्या नष्ट वेदशाखेमध्यें असेल असें अनुमान करावें. असा भाष्यकाराचा अभिप्राय आहे.

first purpose of the Smritis is concerned. In considering the origin of the second purpose, commentators state that it may be mentioned in a portion of the Veda now lost.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां श्रुतीच्या प्राबल्याविषयीं विचार.

३. कारण शब्द आणि अशब्द (म्हणजे श्रुति आणि स्मृति) यांचा विरोध असला म्हणजे अशब्दाचा (म्हणजे स्मृतीचा) त्याग करावा. (दोहोंचा) विरोध नसला म्हणजे अनुमान करावें.

ज्या स्मृतींत स्वार्थ असतो, ती स्मृति अप्रमाण, हा विचार.

४. हेतु दिसल्यामुळें (अनुमान म्हणजे स्मृति टाकावी.)

---

३. या सूत्राची योग्यता मोठी आहे. नेहमीं शास्त्रार्थ करतांना श्रुति-स्मृतींच्या योग्यतेविषयीं विचार करावा लागतो. मग जें श्रुतींत आहे तें स्मृतींत असलें तर ठीकच आहे. कारण मग वादविवाद करण्यास अवकाशच रहात नाहीं. परंतु श्रुतीमध्यें एक आणि स्मृतीमध्यें एक असें अढळलें म्हणजे श्रुति घ्यावी आणि स्मृतीचा त्याग करावा असें करण्याचा निदान प्रघात पडला आहे, आणि शास्त्रार्थ करण्याची एक तऱ्हेची पद्धति या सूत्रावरून बसविली आहे. परंतु या सूत्राचा यथायोग्य विचार केला म्हणजे ही पद्धति सर्वथैव निर्मूळ आहे असें दिसूं लागतें. सूत्राचा

NOW THE SUBJECT OF THE POWER OF THE SHRUTIS.

3. For, when that which is established by testimony (Shabda or Shruti) is opposed to that which is not so established (Ashabda or Smriti), the latter is not to be recognized. (And) when the two are not opposed, inference (Smritis) is to be recognized.

NOW THE SUBJECT OF THE INVALIDITY OF THE SMRITIS WHICH ARE BASED ON HUMAN MOTIVES.

4. (Inference (Smritis) is to be discarded) when its worldly motive is patent.

---

3. This is a very important sûtra. In all cases of discussions about the rules of life, the Shrutis or Vedas and Smritis or traditions are to be considered. There is no difficulty when the Shrutis and Smritis are not opposed, for there is then no room for a discussion. But when the one differs from the other, the first is accepted, and the last rejected. This is at least the existing custom, on which a system of interpretation is based. A critical examination of this sûtra discovers that the system is altogether groundless. The sûtra insists on first applying the principles of testimony, that is, on first accepting what is stated in the Vedas and on inferring what is

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अथ पदार्थप्राबल्याधिकरणम् ॥

शिष्टाकोपेऽविरुद्धमितिचेत् ॥ ५ ॥ पूर्वपक्षे पूर्वपक्षः ॥

पदानि । [अशब्दम्] शिष्ट-अ-कोपे, अ-विरुद्धम्, इति, चेत् ॥

पदार्थः । शिष्टम्=वैदिकम् । स्पष्टमवशिष्टं ॥

वाक्यार्थः । यत्र वैदिकं किंचिन् न कुप्यति तत्र [अशब्दम्] अविरुद्धमित्युक्तं चेत् ॥

भावार्थः । क्रियमाणे पूर्वपक्षे शंकैषा । अस्याः समाधानमुत्तरसूत्रे क्रियते ॥

कटाक्ष इतकाच आहे कीं शाब्दप्रमाण लागू करून जो अर्थ पाहिजे तो निष्पन्न होतो कीं नाहीं हा विचार अधीं करावा. म्हणजे जें जें वेदांत वर्णिलें आहे, त्याचा त्याचा स्वीकार करावा, आणि जें जें वर्णिलें नाहीं त्याविषयीं अनुमान काढावें. स्मृतीची योग्यता सर्वथैव अनुमानावर अवलंबते, ती इतकी कीं जैमिनि सूत्रामध्यें केव्हां केव्हां स्मृतीलाच अनुमान म्हणतो. अस्तु. आतां आम्हांस असें विचारणें आहे कीं जैमिन्याचार्यांस जर श्रुतिस्मृतींच्या योग्यते विषयीं आणि बलाबलाविषयीं विचार करणें आहे, तर श्रुति आणि स्मृति हीं पदें सूत्रांत कां घातलीं नाहींत? आणि मुद्दाम शब्द आणि अशब्द अशीं सामान्य पदें कां घातलीं आहेत? आम्हांस असें वाटतें कीं वाक्यार्थमीमांसेमध्यें अनुमानाची योग्यता काय, हा विचार सूत्रकार करतात. एखाद्या दस्तऐवजाचा अर्थ करतांना त्यामध्यें जें स्पष्ट लिहिलें अढळतें ते शब्द. आणि त्यामध्यें

not directly stated in the Vedas. Thus the pretensions of the Smritis depend on inference so much that Jaimini in his sútras calls a Smriti —an inference. Now the questions are natural—if Jaimini examines the relative validity of the Shrutis and the Smritis, how is it that he does not directly use the terms *Shruti* and *Smriti* in his sûtras? And why does he use such indefinite terms as *Shabda* (word) and *Ashadda* (other than a word)? We believe that Jaimini examines in the sûtra under consideration the importance of inference in a system of exegetics. In interpreting a document, that which is directly and distinctly stated is *Shabda* or a *word*, that is, testimony; and that which is not directly and distinctly stated is *Ashabda* or *other than a word*, that is, not testimony. The examination of the relative importance of direct and distinct statements and inferential and indirect statements is essential to a system of exegetics which does not attach so much importance to inference as testimony. But inference is

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां पदार्थांच्या प्राबल्याविषयीं विचार.

५. (जेथें) शिष्टाच्या वचनास बाध येत नाहीं, तेथें अनुमित वचन घेतलें तर. (पूर्वपक्षांस पूर्वपक्ष.)

NOW THE SUBJECT OF THE SENSE OF TERMS.

5. If an inferential statement which does not contradict an authoritative statement, be accepted, then + + +—(An objection against a statement of an opponent.)

जें स्पष्ट लिहिलेलें अढळत नाहीं, तें अशब्द. या दोहोंच्या तारतम्याचा विचार वाक्यार्थमीमांसेमध्यें अवश्य आहे. वाक्यार्थमीमांसेमध्यें केवळ अनुमानाची योग्यता शाब्दप्रमाणाएवढी नाहीं, परंतु अनुमानाचा सर्वथैव त्याग नाहीं. इतकेंच सूत्राचें तात्पर्य आहे, असें आम्हांस वाटतें.

४. या सूत्रांत हेतुशब्दाचा अर्थ व्यावहारिक घेतला आहे. या स्थळीं हेतु म्हणजे स्वार्थ. स्मृत्यादि ग्रंथांमध्यें किंवा कोणत्याहि ग्रंथाचा अर्थ करतांना त्यामध्यें कोणाचाहि स्वार्थ साधायाजोगा मतलबी लेख असला, तर त्या लेखाचा सर्वथैव त्याग करावा असा सूत्रार्थ आहे. हें सूत्र विशेष लक्ष देण्याजोगें आहे, कारण या सूत्रावरून हिंदूलोकांच्या धर्मपुस्तकांच्या व्यवस्थेंत थोडी अडचण उत्पन्न होणार आहे, आणि व्यावहारिक वाक्यार्थमीमांसेंतील मोठा उपयोगी न्याय या सूत्रापासून निष्पन्न होतो. अडचण ती अशी. कौत्साचार्यासारख्या बुद्धिवाद करणाऱ्यांना थोडी मोकळीक दिली म्हणजे पुरे, चं-

not to be altogether discarded. This seems to us to be the gist of this sûtra.

4. The term Hetu is used in the sûtra in its ordinary acceptation. And it means selfishness. If in interpreting a document, a statement which is based on selfish motives be met with, it deserves simply to be discarded. This is a very important sûtra; for a very important rule in practical exegetics can be derived from this sûtra which doubtless involves the *accepted arrangement* of all the religious books of the Hindus in a difficulty which is this:—Rationalists, like Koutsa who can easily apply the rule—give an inch and he takes an ell—only seek a loop-hole through which to act on the accepted scriptures, for it is the function of the logical faculty to determine whether the interpretation of a passage is self-interested or not. The *Risi* of the logical faculty (Tarkarsi) thus gets a footing in all exegetical discussions. Hence the principles of modern exegetics—that whatever is directly met with in scriptures is to be recognized, that such an adjustment of scriptures as logic warrants, is to not be made; and that au-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

न शास्त्रपरिमाणत्वात् ॥ ६ ॥ (पू०)

पदानि । [अविरुद्धम्] न, शास्त्र-परिमाणत्वात् ॥

पदार्थः । शास्त्रम्=व्यवस्था । परिमाणत्वात्=परिच्छेदात् ॥

वाक्यार्थः । यदशब्दं तत् न स्वीकरणीयम् व्यवस्थापरिच्छेदात् ॥

भावार्थः । यदशब्दं नाम स्मृत्यादिप्रतिपादितं तत् न स्वीकरणीयं व्यवस्थापरिच्छेदात् ॥

शास्त्रशब्दस्य व्याख्याऽत्र विचारणीया । यद् यद् व्याप्यव्यापकविचारद्वारा कार्यकारणसंबंधविवेचनेनानुमानादिप्रमाणपरीक्षितानुगमैश्चोपपद्यते तत् तच् छास्त्रमिति पूर्वपक्षकारस्याभिप्रायोऽस्मिन् दर्शने दर्शनान्तरे च शास्त्रपदार्थनिगमनेन भाति ॥

चुप्रवेशो मुशलप्रवेशः म्हणजे चोंच घालायाला सांपडली कीं मुसळ आंत ढकललें, या न्यायानें बुद्धिवाद करतां येईल. ग्रंथाचा जो अर्थ केला, तो आपमतलबी आहे किंवा कसा, हें ठरविणें तर्कशक्तीचें काम आहे. म्हणून तर्कऋषि पुनः मीमांसेंत शिरले. मग ग्रंथांत नाहीं तें घ्यायाचें नाहीं, आणि तर्काच्या साहाय्यानें ग्रंथांत जें अढळतें त्याची व्यवस्था करायाची नाहीं, परंतु शिष्टांचीं वचनें आणि संप्रदाय हेच काय ते सबळ असें समजावयाचें, हा जो हल्लींच्या वाक्यार्थमीमांसाविचाराचा बाणा तो एकीकडे ठेवावा लागतो, असा बुद्धिवाद करणाऱ्यांमधील आणि वाक्यार्थमीमांसकांमधील वादविवादाचा परिणाम होतो. म्हणजे कसें ना कसें हि तर्कऋषीचें साहाय्य घ्यावें लागतेंच. स्मृतींतील जें वाक्य संस्कृतांत घेतलें आहे, त्याचा अर्थ एथें करून दाखविला पाहिजे. "विसर्ज-

thority and customs are always to overrule logical propriety in every case of doubt—cannot but be set aside. Thus exegetics which is the bulwork of dogmatism, is sometimes forced in spite of itself to yield to the logic of rationalists, that is, dogmatism finds it necessary to recognize logic and its methods personified by Yâska as the *Tarkarsi*. We will translate now the passage quoted from a Smriti in the Sanskrita portion of this work. "A priest called Adhvaryu takes a piece of cloth connected with a sacrifice called the Visarjana-homa." The commentators distinctly state that this Smriti is to be at once rejected, because it sanctions the selfishness of the priest.

5. This sûtra embodies a preliminary objection against the statement which an opponent is yet to make. The form of the former does not much differ from that of the latter. This sûtra is in-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६. (घेऊं) नये. कारण शास्त्राचें परिमाण आहे. (पू०)

6. No, because a system (Shâstra) has its limits. (A statement of the opponent.)

नहोमसंबंधी वस्त्र अध्वर्यु घेतो" अशी स्मृति आहे. वस्त्र घेण्यानें अध्वर्यूंचा स्वार्थ साधतो, म्हणून ही स्मृति अप्रमाण आहे असें भाष्यकार स्पष्ट लिहितात.

५. या सूत्रांत पुढें जो पूर्वपक्ष करावयाचा आहे, त्या पूर्वपक्षावरच ही शंका आहे. पूर्वपक्षाचें आणि या शंकेचें स्वरूप एकच आहे. पुढील सूत्रास या सूत्रानें अवतरण होतें. जें कांहीं बुद्धिवाद करणाऱ्यांनीं अनुमान केलें त्या अनुमानानें शिष्टवचनास कांहीं अडचण न आली, तर तें अनुमान घ्यावें किंवा नाहीं, असें पूर्वपक्षकारास कोणी विचारतात. त्यावर पूर्वपक्षकार पुढील सूत्रांत उत्तर देतो.

६. या सूत्रांत "शास्त्रपरिमाण" हीं पदें विचार करण्याजोगीं आहेत. या स्थळीं शास्त्रशब्दाची योजना पूर्वपक्षकारानें केली आहे. पूर्वमीमांसक अमुक पुस्तक अपौरुषेय आहे, म्हणून त्याचा अंगीकार केला पाहिजे, असें मानितात. तसें पूर्वपक्षकार मानीत नाहीं. तसें जर पूर्वपक्षकार मानूं लागला, तर पूर्वपक्षकाराचा आणि मीमांसकांचा तंटाच मिटला. विलायतेचे मुख्य कारभारी ग्लाड्स्टन यांसारखे राजकारस्थानकुशल गृहस्थ असा विचार करतात कीं धर्मप्रकरणीं शिष्टाचा अधिकार कितपत चालावा. याविषयीं इंग्लंडदेशीं अजून वादविवाद होत आहे,

tended to introduce the next. The opponent is asked if the inference of the rationalists which does not contradict an authoritative statement (*shista-vachana*) is to be accepted. He answers the question in the next sûtra.

6. The term Shâstra-parimâna in this sûtra deserves to be particularly examined. Jaimini uses the term Shâstra in the sense recognized by the opponent, for his school advocates the doctrine of an *impersonal* revelation. But his opponent rejects such a doctrine. If the latter accepted the doctrine, he would cease to be an opponent. Experienced statesmen like Mr. Gladstone discuss the question of the influence of authority in matters of opinion, and thus state the question of the power of those who are called *Shistas* in India. Thus such topics are examined in a civilized country like England in the nineteenth century, and divide the nation into two sections. The discussion of such questions elicited as much interest from the ancient Âryas of India which was also divided into two sections—the one accepting authority as the guide of human beliefs and the other rejecting it. The opponent belonged to the latter section. Hence he could not consider the doctrines prevalent among the people to be the *shâstra*. The Bouddhas consider a *shâstra* to be a system of thought developed by man. Pa-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अपिवा कारणाग्रहणे प्रयुक्तानि प्रतीयेरन् ॥ ७ ॥

पदानि । अपि, वा, कारण-अ-ग्रहणे, प्रयुक्तानि, प्रतीयेरन् ॥

पदार्थः । अपि=तथापि । वा=न । कारणाग्रहणे=अनुमानादिसाधितव्यवस्थायाः स्वीकारे न कृते । प्रयुक्तानि=व्यवहृतानि । प्रतीयेरन्=अनुभवविषयाणि भवेयुः ॥

वाक्यार्थः । अशब्दं न स्वीकरणीयं । कुतः । अनुमानादिसाधितव्यवस्थायां न स्वीकृतायां व्यवहृतान्यनुभवविषयाणि भवेयुः ॥

भावार्थः । पूर्वपक्षकारोक्तव्यवस्थाऽवलम्बनं न करणीयम् । कुतः । व्यवस्थाऽनवलम्बने यथाप्रयोगं पदार्थानां ज्ञानं भवति ॥

ननु (व्यवस्था प्रमाणानि) क्रमकालौ विरुद्धन्ति (विरुन्धन्ति) । विरुद्धन्तु (विरुन्धन्तु) । नैष दोषः । आचमनं पदार्थः । पदार्थानां च गुणः क्रमः । न च गुणानुरोधेन पदार्थो न कर्तव्यो भवति । अपि च प्राप्तानां पदार्थानामुत्तरकालं क्रम आपतति । यदा पदार्थः प्राप्नोति तदा क्रम एव नास्ति । केन सह विरोधो भविष्यति । तस्मादाचमनादीनां प्रामाण्यमिति शबरः ॥

आणि या वादविवादामुळें इंग्लंडदेशच्या लोकांमध्यें दुफळी झाली आहे. तशीच दुफळी हिंदुस्थानांतील प्राचीन आर्यलोकांमध्यें होती, म्हणून पूर्वपक्षकार शिष्टाला शास्त्र असें कधींहि म्हणणार नाहीं. बौद्धलोक शास्त्रशब्दाचा अर्थ व्यवस्था असा करीत होते. आणि पतंजलिहि आपल्या महाभाष्यांत शास्त्र म्हणजे व्यवस्था असें प्रतिपादन करतो. ती व्यवस्था कशी? व्याप्य आणि व्यापक यांचा विचार करून कार्यकारणसंबंध बसवून अनुमानादि प्रमाणांच्या योगानें जे जे अनुगम साधतात आणि ज्या ज्या अनुगमांची उपपत्ति होते, त्या त्या अनुगमसं-

tanjali often uses the term Shâstra in his Mahâbhâsya in this sense. The question now is, what is the distinctive nature of such a system? A Shâstra was a system which attempted the analysis of a phenomenon in relation to its general characteristics as distinguished from its individual nature, and in relation to its operation as a cause distinguished from an effect, and sought the statement of a general rule, adequately supported by different proofs such as inference and offered explanations. We have based our definition of the term on the statements scattered throughout the Mahâbhâsya of Patanjali. Now the examination

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

७. (तसें) नव्हे, कारण व्यवस्थेला सोडूनहि जसा जसा पदार्थांचा प्रयोग अढळेल तसें तसें ज्ञान होतें. (सि०)

7. Not (so); for the senses of words can be known (as they are) used without a system being accepted. (Final statement.)

बंधी व्यवस्थेस शास्त्र असें नांव दिलें आहे. आणि ही शास्त्रशब्दाची व्याख्या आम्ही पतंजलीच्या महाभाष्यावरून केली आहे. आतां परिमाणशब्दाचा अर्थ करायाचा. परिमाण म्हणजे मोजदाद, इयत्ता, बंधन. एकंदर सूत्रार्थ असा आहे कीं जरी कांहीं एक शिष्टजनांच्या विरुद्ध नसलें तथापि आम्हांस तें घेतां येत नाहीं, कारण आम्हांस शास्त्राचें बंधन आहे असें पूर्वपक्षकाराचें म्हणणें आहे. आणि या सूत्रावर कटाक्ष ठेवून पुढील सूत्रीं जैमिन्याचार्यांनीं उत्तर दिलें आहे.

७. या सूत्रांत दोन पदें विचार करण्याजोगीं आहेत, एक "कारणाग्रहणे" आणि दुसरें "प्रयुक्तानि." पहिल्या पदाचा अर्थ "कारण न घेतलें असतां." या सूत्रांत आचार्य पूर्वपक्षकारास असें म्हणतात कीं "बाबा तुझें शास्त्रबंधन आम्हांस नको. कां तर 'कारण न घेतलें असतां' म्हणजे कार्यकारणादि व्यवस्थेचा विचार न केला असतां प्रयोगावरून च काम चालतें." आतां दुसऱ्या "प्रयुक्तानि" या पदाचा विचार. प्रयुक्तानि हें प्रयुक्तपदाचें अनके वचन आहे. प्रयोगांत जें स्पष्ट अढळतें तें प्रयुक्त, म्हणजे शिष्टजनांचा आचार असा त्यापासून अर्थ निष्पन्न होतो. पुनः सूत्रकार पू-

of the sense of the word—Pari*mâna*—as used in the text. Pari*mâna* means measuring, or restricting. Now, the gist of the whole sûtra is plain:—whatever is not against authority (*shistas*) cannot be accepted, for we are bound by a Shâstra (a system built on human experience by means of human ingenuity). This is a statement of the opponent; and in the next sûtra, Jaimini seeks to refute it.

7. There are two terms in this sûtra which deserve attention:—the one *Kâranâgrahane* and the other *Prayuktâni*. The first means—a cause not being accepted. Jaimini says to his opponent:—"Sir, your restrictions as based on your system are not required. Why? Because we are able to regulate our life by means of what is used in the texts or in other words, facts as they are perceived, are sufficient for our guidance without going into the examination of causes and effects, that is to say, without philosophizing." The second term *Prayuktâni*—the plural of Prayukta—means that which accompanies *what is used* (a prayoga), and implies the sanctions as derived from facts in the actual lives of the great men whose authority is binding. Again, Jaimini says to his opponent:—"Sir, let your

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

शास्त्रप्रसिद्धपदार्थप्रामाण्याधिकरणम् ॥

तेष्वदर्शनाद् विरोधस्य समा विप्रतिपत्तिः स्यात् ॥८॥ (पू०)

पदानि । तेषु, अ-दर्शनात्, विरोधस्य, समा, विप्रतिपत्तिः, स्यात् ॥

पदार्थः । तेषु=प्रयुक्तेषु । समा=तुल्या । विप्रतिपत्तिः=संशयः ॥

वाक्यार्थः । प्रयुक्तेषु पदार्थेषु यदा विरोधो नास्ति तदोभयपक्षयोः संशयस्तुल्यः ॥

भावार्थः । एष वा स वा पदार्थो ग्रहणीय इति संशयाकारः । "तत्रोभयथा पदार्थविगमाद् विकल्पः" इति शबरः ॥

र्वपक्षकारास म्हणतात "बाबा, तुझी शास्त्रबंधनाची भानगड एकीकडे राहूंदे. शिष्टाचारावरून पदार्थांचें ज्ञान यथायोग्य होतें, म्हणून शिष्टाचार घेतला म्हणजे पुरे." पदार्थ म्हणजे काय यावर भाष्यांत थोडा विचार आहे. आचमन हा पदार्थ आहे. आणि आचमनानंतर प्राणायाम हा जो पदार्थांचा क्रम, तो पदार्थांचा गुण आहे. अधीं पदार्थ आणि मग त्याचे गुण, कारण आचमनादि पदार्थ असतांहि क्रमादि गुण नसतात म्हणून पदार्थसंबंधी जें कार्य तें अधीं करावें. तचें प्रबळ आहे. तें अधीं प्राप्त होतें म्हणून तें मुख्य आहे. असें भाष्यकार क्लिष्ट कल्पना काढून पांडित्य दाखवितात, तें मासल्याकरतां एथें दिलें आहे.

restrictions as based on your system be set aside, for the knowledge of things or the sense of words can be ascertained by the customs as recognized by great men or by tradition. It is sufficient, therefore to accept the binding power of tradition (*shistâchâra*). Commentator Shabara discusses the meaning of a *padârtha.* He calls an act a Padârtha [the sense of a word] such as sipping water (say) at the time of ablutions. The breath is restrained after the water is sipped. The one follows the other. This sequence is called a quality of the two acts (sipping water and restraining the breath,—Âchamana and Prânâyâma). First the *padârthas* and then their qualities, for acts (Padârthas) can exist independently of their qualities such as the sequence in time. Therefore, all actions based on Padârthas ought to be performed before all actions based on their qualities; the former is valid, because it is first thought of. This style of commenting is re-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शास्त्रदृष्ट्या जे प्रसिद्ध पदार्थ त्यांचें प्राबल्य.

८. (योजलेल्या) पदाच्या निरनिराळ्या अर्थांत विरोध नसला म्हणजे (त्याचा हा अर्थ घ्यावा कीं तो अर्थ घ्यावा असा) सारखाच संशय पडेल. (पू०)

८. आतां पूर्वपक्षकार असें म्हणतो कीं एकाच शब्दाचे दोन तीन अर्थ होतात. वेदामध्यें "वाराही उपानहौ" असें सांगितलें आहे; याचा "वराहाच्या वाहणा" असा अर्थ होतो. आतां वराह शब्दाचे दोन तीन अर्थ होतात. वराह म्हणजे डुक्कर; वराह म्हणजे काळा पक्षी; वराह म्हणजे ढग. "वाराही उपानहौ" हें वाक्य लावतांना कोणता अर्थ घ्यावा असा संशय पडेल. या सूत्राचा एवढाच आशय आहे कीं कांहीं पदांचा अर्थ निश्चयानें करतां येणार नाहीं, म्हणून वाक्यार्थ अमुकच असें म्हणतां येणार नाहीं. अशी वाक्यार्थमीमांसेंत धांदल आहे, असें पूर्वपक्षकार दाखवितो.

THE VALIDITY OF THE PADÁRTHAS WELL-KNOWN IN THE SHÁSTRAS OR WORKS RECOGNIZED AS RELIGIOUSLY BINDING.

8. When the different senses of a word (used in a text) are not opposed, (it) will be equally doubtful (whether this or that sense of the word is to be taken.) (Statement of the opponent.)

produced here only as a specimen. It is full of a kind of hair-splitting, and of a kind of mysticism which deserves the contempt even of *metaphysics*.

8. The opponent states that one and the same word has two or three senses. The phrase—*Vàrâhî upânahou* is used in the Vedas. It means sandals made of *Varâha*. Now the word *Varâha* has three senses—a hog, a black bird, and a cloud. It is doubtful as to what sense of the word Varâha is to be taken in interpreting the Vaidika phrase quoted. The gist of the sûtra is, that there are terms the sense of which as used in a text cannot be ascertained. It is, therefore, difficult sometimes to state the exact sense of a passage. The opponent thus seeks to point out that the system of exegetics is full of confusion and uncertainty.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

शास्त्रस्था वा तन्निमित्तत्वात् ॥ ९ ॥ (सि०)

पदानि । शास्त्रस्थाः, वा, तत्-निमित्तत्वात् ॥

पदार्थः । शास्त्रस्थाः=शास्त्रप्रतिपादिताः (पदार्थाः)। तत् नाम शास्त्रं निमित्तं येषां (पदार्थानाम्) ते=तन्निमित्ताः । तेषां भावः=तन्निमित्तत्वम् । तस्मात्=तन्निमित्तत्वात् ॥

वाक्यार्थः । न । शास्त्रप्रतिपादिताः (पदार्थाः) ग्रहणीयाः। तेषां शास्त्रनिमित्तत्वात् ॥

भावार्थः । यः शास्त्रस्थानां स शब्दार्थः । के शास्त्रस्थाः । शिष्टाः । तेषामविच्छिन्ना स्मृतिः । शब्देषु वेदेषु च तेन शिष्टा निमित्तं श्रुतिस्मृत्यवधारणे । इति शबरः ॥

अथ म्लेच्छप्रसिद्धार्थप्रामाण्याधिकरणम् ॥

चोदितं तु प्रतीयेताविरोधात् प्रमाणेन ॥ १० ॥

पदादीनि स्पष्टानि ॥

भावार्थः । चोदितमशिष्टैरपि शिष्टानवगतं प्रतीयेत । यत् प्रमाणेनाविरुद्धं तदवगम्यमानं न न्याय्यं त्यक्तुम् । इति शबरः ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

९. नव्हे. शास्त्रांत जसें असतें (तसा पदाचा अर्थ घ्यावा,) कारण पदार्थ करण्याविषयीं शास्त्रच निमित्त आहे. (सि०).

9. No, (the sense of a word is to be taken as) it is explained by traditional usage, because traditional explanation fixes the senses of a word. [Final Statement.]

म्लेच्छ लोकांत जे प्रसिद्ध अर्थ त्यांच्या प्रामाण्याविषयीं विचार.

THE SUBJECT OF THE VALIDITY OF THE NAMES WELL-KNOWN AMONG THE MLECHCHHAS.

१०. पुनः प्रमाणाशीं अविरुद्ध जो उपदेश तो धर्मच समजावा.

10. Again, that which is not opposed by any valid argument is to be known as a duty.

---

९. या सूत्रांत दोन पदें विचारयोग्य आहेत, एक "शास्त्रस्थ," आणि दुसरें "तन्निमित्तत्वात्." शास्त्रस्थ तें काय? हा विचार करतांना शिष्टजनानीं केलेलें प्रतिपादन तेंच शास्त्रस्थ असा भाष्यकार अर्थ करतात. तन्निमित्तत्व तें कोणतें हा विचार करतांना श्रुति किंवा स्मृति यांच्या अर्थाविषयीं शिष्टजनांनीं केलेलें प्रतिपादन हेंच निमित्त असेंहि भाष्यकार म्हणतात. परंतु शिष्टजन उगीच यांत घुसवले आहेत, असें भाष्यकाराच्या लेखावरूनच सिद्ध होतें. मग सूत्रार्थ तरी काय? ज्या ग्रंथाचा अर्थ करावयाचा, त्यांत निरनिराळ्या प्रसंगीं एकच पद कोणत्या अर्थीं योजिलें आहे हें नीट पडताळून पाहून त्यावरून त्या पदाचा अर्थ बसवावा. प्राचीन आर्यलोक अशा प्रकारच्या शोधास निगम म्हणत असत, असें आम्ही पूर्वीं वर्णिलेंच आहे. हें जैमिन्याचार्यांचें सूत्र अ-

9. In this sûtra there are two terms deserving examination :—the one is Shâstrastha and the other Tannimittatvât. In answering the question—what is *Shâstrastha*—the commentators state that it is the traditional explanation. In answering the question—what is *Tannimittatva* which consists of two parts—tan or tad (that) and nimittatva (cause)—the commentators state that the traditional explanation is the cause. But we believe that the introduction of "traditional" by commentators into this sûtra is groundless. If so, how is the Sûtra to be interpreted ? The sense of a word as used in the text is determined by the collation of the different senses in which the same word may be used in the same discourse. Collation was known among the ancient Âryas by the name of Nigama as we have already stated. See the foot-note on (I. 2, 49.) As this is a statement of Jaimini

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सत्यामुळें शास्त्र म्हणजे वेदादिग्रंथ असा अर्थ होतो. सूत्राचा पदशः अर्थ इतकाच आहे कीं (पूर्वपक्षकार म्हणतो तसें) नव्हे. वेदादि ग्रंथांत असलेल्या पदांचा अर्थ वेदादि ग्रंथांच्याच आधारावरून करावा. जीस निगम असें नांव दिलें आहे, आणि जीस पतंजलि आपल्या महाभाष्यांत ज्ञापक असें म्हणतो त्या अर्थ लावण्याच्या पद्धतीची योग्यता मोठी आहे असें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

१०. या सूत्राची योग्यता फारच मोठी आहे. पहिल्या पादाच्या दुसऱ्या सूत्रांत धर्मशब्दाचें जें लक्षण केलें आहे, तें पहावें. "धर्म जाणावा" असा या सूत्राच्या पहिल्या दलाचा अर्थ आहे. दुसऱ्या दलानें धर्म कसा जाणावा या निमित्ताचें वर्णन केलें आहे. तें निमित्त असें कीं जें जें प्रमाणाशीं जुळतें त्या त्यावरून. एकंदर सूत्रार्थ जें जें प्रमाणाशीं जुळतें त्या त्यावरून धर्म जाणावा. पूर्वमीमांसकांनीं विचार करतांना एवढें स्वातंत्र्य दाखविलें, हें वाचकांनीं लक्षांत ठेवण्या जोगें आहे. प्रमाण तें काय हा विचार करतांना निगम, निरुक्त, व्याकरण, किंवा धातु यांच्या आधारानें पदाचा अर्थ करावा, अथवा म्लेच्छ लोकांत जो पदाचा अर्थ चालू आहे, तो घ्यावा; म्हणजे शिष्टाचार प्रमाण मानावा, कीं अशिष्टाचार प्रमाण मानावा ? असें शबर विचारतात. आणि पुढें तेच असें उत्तर देतात कीं एखादा धर्म आचरावा असें अशिष्टलोकांनीं सांगितलें, आणि तो धर्म शिष्टलोकांस ठाऊक नाहीं, परंतु त्या धर्माला प्रमाणाचा

himself or of his school, the word Shâstra means the recognized scriptures. The sûtra simply states that the former statement of the opponent does not hold true, but that the senses of words as they are used in the scriptures are to be fixed by means of the scriptures themselves. The method of interpretation which authors like Yáska designated Nigama and which Patanjali characterizes as Jnâpaka is important and deserves attention.

10. This is a very important sûtra. See the definition of a duty in (I. 1, 2.) of this Mimânsâ. The first part of the sûtra means that a duty is to be known. The second part mentions the characteristic mark which is—that which cannot be demonstrated to be false. The whole sûtra states that to be a duty which different proofs establish. The dogmatists led by the Pûrvamimânsakas thus show a marvellous independence of thought and a candour which cannot be too much admired. In considering the nature of proof, commentator Shabara asks which is valid,—authority or reason (no authority)—that is whether the sense of a word is to be determined by collation, analysis, grammar or etymology or as it is known and recognized by non—Âryan barbarians called Mlechchhas. He thus answers the question :—"It is unauthoritatively (not by *shistas*) stated that such and such a duty is to be performed. The duty however is not known to a *shista*, but it is strongly supported by reason and logic. Then such a duty is to be recognized and it is unjust to ignore it." Even Shabara shows such a marvel

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आधार आहे अशा धर्माचा स्वीकार केला पाहिजे, आणि त्याचा त्याग करणें हें वाजवी नाहीं. शबरांनीं हि विचार करतांना एवढें स्वातंत्र्य दाखविलें आहे हेंहि वाचकांनीं लक्षांत ठेवण्याजोगें आहे. जैमिनि ज्या वेळीं झाला, त्या वेळीं पंडित मंडळींत ज्ञानाची चर्चा फार होत असे, म्हणून जैमिनीसारख्या आचार्यांचे लेखांत दुराग्रह, कोता समज, उत्संगळपणा असे दुर्गुण बहुधां अढळत नाहींत; परंतु उलटें विचाराचें स्वातंत्र्य, बुद्धीचें औदार्य, आणि अंतःकरणाची शांतता असे गुण अढळतात. आतांशा युरोपखंडांतील किंवा भरतखंडांतील विद्वान् असें मानतात कीं, जैमिनीसारख्याच्या लेखांत कांहीं तात्पर्य नाहीं, परंतु त्यांच्या असें म्हणण्याचें कारण केवळ पंडितजनांचें अज्ञान आहे, असें म्हणणें आम्हांस भाग पडतें. अहो, प्रमाणास अनुसरला म्हणजे म्लेच्छांचा देखील धर्म घ्यावा, अशी मोकळीक अर्वाचीन शबरांनीं दिली, आणि वराहमिहिरासारख्या महापंडितांनीं यवन लोकांपाशीं ज्योतिःशास्त्राचें अध्ययन करून त्यांची विद्या आपल्या देशांत आणिली असें इतिहासांत प्रसिद्ध आहे. मग आतांशा प्राण गेला तरी यवनी भाषा बोलूं नये हें जें थोतांड माजलें आहे तें आलें कोठून ? याचा वाचकांनीं विचार करावा.

lous candour of feeling and an independence of thought as decidedly deserves to be admired. At the time of Jaimini, all subjects were enthusiastically discussed, hence such intellectual and moral defects as obstinacy, biased judgment, a narrow understanding, or habits of wantonness of expression, are not met with in Âchâryas like Jaimini; but on the contrary, a reader meets with independence of judgment, generosity of thought and dispassionate feelings. Now-a-days, those who consider themselves to be thinkers, whether they are Europeans or natives believe that the writings of ancient Âryan scholars like Jaimini are worthless. But we are constrained to state that the belief is the result of ignorance. Mark what Shabara says—that though inculcated by barbarians, ideas or notions, established to be righteous or true by logic and its methods, are to be accepted. Shabara, a modern commentator, grants such liberty. And it is a historical fact that scholars like Varâhamihira learnt a system of astronomy from Yavana scholars, and introduced it into their country. Hence, we do not see the origin of such absurd doctrines as for instance, that one should not utter a Yavana word even on peril of death.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अथ कल्पसूत्रास्वतःप्रामाण्याधिकरणम् ॥

प्रयोगशास्त्रमिति चेत् ॥ ११ ॥ (पू०)

पदादीनि स्पष्टानि ॥

भावार्थः । कल्पसूत्रादीनि प्रयोगशास्त्राणि प्रमाणम् । कुतः । तान्याचार्यप्रणीतानि । आचार्यवचः प्रमाणमिति श्रुतिः । तस्मात् सत्यवाच आचार्याः । सत्यवाचामेतानि वचनानि । यदि प्रत्यक्षतः प्रामाण्यं न ज्ञायेत तर्हि प्रमाणान्तरेण वचनेन तज् ज्ञेयम् । इति यदेतेन सूत्रेण पूर्वपक्षकारो ब्रवीति तदुत्तरसूत्रेणाचार्यः समाधत्ते ॥*

न । असन्नियमात् ॥ १२ ॥ (सि०)

पदानि । न, अ-सन्नियमात् ॥

पदवाक्यार्थौ स्पष्टौ ॥

भावार्थः । प्रयोगशास्त्रं न प्रमाणम् । कुतः । तत्र स्वरादिसन्नियमो नास्ति । स्वरादीनि वेदत्वलिंगानि । इति भगवान् पतंजलिरप्यभिप्रैति ॥

---

* वैदिकैरेषां संवादो भवति । य एव हि वेदे ग्रहास्त एवेह या एव वेद इष्टकास्ता एवेह । तस्मात् सत्यवाच आचार्याः । आचार्यवचः प्रमाणमिति च श्रुतिः । प्रत्यक्षतः प्रामाण्यमनवगतमिति यद्युच्येत, प्रमाणांतरेण वचनेनावगतमिति न दोषः । वेदवाक्यैश्चैषां तुल्य आदरस्तस्मात् प्रमाणमिति पूर्वपक्षकारस्याशयं वर्णयाञ्चकार शबरः ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कल्पसूत्रादिकांस स्वतांचें प्रामाण्य नाहीं याविषयीं विचार.

THE SUBJECT OF THE KALPA-SÛTRAS NOT HAVING INDEPENDENT VALIDITY.

११. प्रयोगशास्त्र (घ्यावें असें म्हटलें) तर. (पू०)

11. If (it be said that) practical treatises (on sacrifices like the Kalpa-sûtras be accepted)—(Statement of an opponent.)

१२. नव्हे. (कल्पसूत्रांत) नीट प्रबंध नसतो, म्हणून (तीं स्वतःप्रमाण नाहींत.) (सि०)

12. No, (the Kalpa-sûtras have no independent validity,) because of the absence of true restrictions (or system). (Final statement.)

---

११. हा पूर्वपक्ष मोठा विचार करण्या जोगा आहे. आचार्यजनांनीं नाना प्रकारचे विचार केले. त्यांचें बुद्धिवैशद्य, त्यांचें पांडित्य, त्यांचें गांभीर्य, त्यांचा शास्त्रप्रवेश, त्यांची अनुमानशक्ति, त्यांचे व्यवस्थित लेख, आणि त्यांनीं केलेले दृढ अनुगम यांचा पगडा या देशीं असा बसला कीं जसे वेद तशींच आचार्यांचीं सूत्रें असें सर्व लोक म्हणूं लागले. आचार्यांचीं वचनें प्रमाण, आचार्य सत्य बोलणारे, असें लोकांमध्यें प्रसिद्ध झालें. "छन्दोवत् सूत्राणि" असें पतंजलि आपल्या महाभाष्यांत वारंवार म्हणतो. हे आचार्य कोण, व ते केव्हां झाले, हें वर्णन आम्ही प्रस्तावनेंत आध्यात्मिक वाक्यार्थमीमांसा या सदरेखालीं केलें आहे, तें वाचकांनीं पहावें. पुढील सूत्रांत ह्या आचार्यांच्या लेखांची

11. This statement of the opponent deserves attention. The Âchâryas discussed a variety of subjects; and their penetrating intellect, their scholarship, their gravity, their familiarity with philosophical pursuits, their logical powers, their systematic writings, and their thorough generalizations—all these established their influence in India so much that their sûtras began to be considered as important as the Chhandas themselves, and that the common people believed in them and thought that the Âchâryas were always truthful. Patanjali often states in his Mahâbhâsya that the sûtras are like the Chhandas themselves. We have referred to the time when the Âchâryas flourished and given a short account of them in the paragraph about subjective exegetics in the Introduction. In the following sûtras, Jaimini dis-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अवाक्यशेषाच् च ॥ १३ ॥ (सि० यु०)

पदादीनि स्पष्टानि ॥

भावार्थः । शेषत्वं निरूपितमस्माभिः । विध्यर्थवादवाक्येषु यो गुणगुणिसंबंधः स प्रयोगशास्त्रेषु न घटते । अत एव प्रयोगशास्त्रं प्रमाणं नास्ति । योऽर्थांश्चिनोति स आचार्यः । वैदिकार्थापेक्षमाचार्यवचनम् । शबरो ब्रवीति । सत्यवाचामेतानि वचनानीति तन् नेति ॥

सर्वत्रच प्रयोगात् सन्निधानशास्त्राच् च ॥ १४ ॥

पदानि । सर्वत्र, च, प्रयोगात्, सन्निधान-शास्त्रात्, च ॥

पदार्थः । प्रयोगः=अनुष्ठानं तस्मात् । सन्निधानम्=यत् सन्निधीयते तत् (संग्रहः) । सन्निधानं च शास्त्रंच सन्निधानशास्त्रम् तस्मात् ॥

वाक्यार्थः । न । सर्वत्र अनुष्ठानानिर्देशात् संग्रहाद् व्यवस्थायाश्च ॥

भावार्थः । यतः केवलानुष्ठाननिर्देशः संग्रहो व्यवस्थाच सर्वत्र क्रियंते ततः कल्पसूत्रादिद्वाराऽचार्यवचनं स्वतः प्रमाणं नास्ति ॥

योग्यता काय हा विचार जैमिन्याचार्य करतात.

१२. नीट प्रबंध म्हणजे वेदासारखा स्वरादि प्रबंध त्यांत नाहीं.

cusses the subject of the validity of the writings of these Âchâryas.

12. By true restrictions is meant—such restrictions as accents. For instance the Kalpa-sútras are not accented, and therefore, they have no independent validity, but they are based on the Vedas or other works.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३. पुनः त्यांत वाक्यशेष नसतो, म्हणून (कल्पसूत्रें स्वतः प्रमाण नाहींत.) (सि० यु०)

13. Again, (the Kalpa-sûtras have no independent validity) because of the absence of subordinate statements. (An argument in support of the final statement.)

१४. सर्वस्थळीं (कल्पसूत्रांत) प्रयोगवर्णन असतें, आणि संग्रह असतो, म्हणून (कल्पसूत्रें स्वतःप्रमाण नाहींत.)

14. Again because in all parts (of the Kalpa-sûtras we find) practical directions and compilations.

---

१३. वाक्यशेष म्हणजे काय याचें वर्णन केलें आहे. (१.२,२२.) सूत्रावरील टीप पहा. जीं वाक्यें कल्पसूत्रांत अढळतात, त्यांचा परस्परांशीं विशेष्यविशेषणसंबंध अढळत नाहीं म्हणून कल्पसूत्रें प्रमाण नाहींत असा सूत्रकार या सूत्राचा आशय वर्णन करतात. परंतु आचार्यवचन खरें कसें नाहीं हें यावरून कसें सिद्ध होतें हें समजत नाहीं.

१४. अमका यज्ञ कसा करावा इतकेंच वर्णन कल्पसूत्रांत असतें, आणि वर्णन करतांना प्रयोगांवर सर्व कटाक्ष ठेवला असतो, आणि दुसऱ्या पुस्तकांतील अर्थाचा त्यांत संग्रह केला असतो, म्हणून कल्पसूत्रें स्वतःप्रमाण नाहींत.

13. The term Vákyashesatva is used in the sûtra. We have fully explained it. See the foot-note on (I. 2, 22.) The statements in the Kalpa-sûtras do not bear to each other the relation which subordinate statements bear to an original statement. Therefore, the works known as Kalpa-sûtras are not in any way authoritative. We do not see how the absence of accents or of syntactical relation between subordinate sentences and their principal sentence proves the statement of Jaimini.

14. The Kalpa-sûtras merely prescribe the manner and the form of a sacrifice. Their descriptions seek to teach the practical knowledge of a sacrifice. The Kalpa-sútras are again mere compilations from other works. Therefore, they are not independently valid.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अथ होलाकाधिकरणम् ॥

(सामान्यश्रुतिकल्पनाधिकरणम्)

अनुमानव्यवस्थानात् तत्संयुक्तं प्रमाणं स्यात् ॥ १५ ॥ (पू०)

पदानि । अनुमान-व्यवस्थानात्, तत्-संयुक्तम्, प्रमाणम्, स्यात् ॥

पदार्थः । अनुमानव्यवस्थानात्=अनुमानं च व्यवस्थानं च अनुमानव्यवस्थानम् तस्मात् । तत्संयुक्तम्=(तत्=अशब्दम्) अशब्दसंबंधि ॥

वाक्यार्थः । यदशब्दसंबंधि तत् प्रमाणमनुमानाद् व्यवस्थायाश्च ॥

भावार्थः । यद् यदनुमानेन व्यवस्थया चाशब्दं नामावैदिकवचनं साध्यते तत् तत् प्रमाणम् । अनुमानेन व्यवस्थया च येऽर्थाः सिध्यंति तेऽर्था ग्रहणीयाः । तेषां वैदिकत्वं नापेक्षितम् ॥

अपिवा सर्वधर्मः स्यात् तन्न्यायत्वाद् विधानस्य ॥१६॥ (सि०)

पदानि । अपि, वा, सर्व-धर्मः, स्यात्, तत्-न्यायत्वात्, विधानस्य ॥

पदार्थः । अपि=तथापि वा=न । सर्वधर्मः स्पष्टः । तन्न्यायत्वात्=(तत्=धर्मः) स न्यायो यस्य तन्न्यायः तस्यभावः=तन्न्यायत्वम् । तस्मात् । विधानस्य=चोदनायाः ॥

वाक्यार्थः । यद् यच् चोदितं कर्म तस्य तस्य धर्मन्यायत्वं वर्तते । अत ईदृक् सर्वकर्माचरणीयम् ॥

भावार्थः । अनुमानं व्यवस्थाच नादरणीये । यत् सामान्येन श्रुतिचोदितं तदादरणीयम् ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होळीविषयीं विचार.
कांहीं सामान्य श्रुति आहे या कल्पने विषयीं विचार.

१५. अनुमानानें किंवा व्यवस्था केल्यानें जें जें सिद्ध होतें, तें तें अवैदिक असलें तरी प्रमाण आहे. (पू०)

१६. नव्हे. (अनुमान आणि व्यवस्था घेऊं नये) जो वेदामध्यें सामान्यतः धर्म सांगितला आहे, तो धर्म घ्यावा. कारण वेदप्रतिपादनानें धर्म न्याय्य होतो. (सि०)

THE SUBJECT OF THE HOLI OR INDIAN SATURNALIA.
THE SUBJECT OF THE THEORY OF A GENERAL REVELATION.

15. Whatever is established) by inference or adjustment can be valid (though) not confirmed by testimony. (Statement of an opponent.)

16. No, (inference and adjustment are not to be accepted.) A duty generally laid down ought to be performed, because statements of (the scriptures) justify it. (Final statement.)

---

१५. अनुमान याचा अर्थ स्मृति, शिष्टाचार, असा भाष्यकार करतात. परंतु जैमिनीनें शिष्टाचार न म्हणतां अनुमानपदाचा उपयोग केला, यावरून त्याचें कांहीं विशेष धोरण आहे याचा वाचकांनीं विचार करावा. पूर्वेकडील लोकांनीं होळी करावी, आणि उत्तरेकडील लोकांनीं पोळा हिंडवावा आणि कुलाचाराप्रमाणें व शिष्टाचाराप्रमाणें चालावें असें या सूत्राचें तात्पर्य नाहीं. तथापि अशी व्यवस्था भाष्यकार बसवितात. हें पूर्वपक्षसूत्र आहे. याचें उत्तर पुढील सूत्रीं आहे. व्यवस्थाशब्दाच्या अर्थाकरितां (१.३,६.) सूत्राची टीप पहा.

१६. (१.१,३१.) सूत्र पहावें. जसें

15. The commentators interpret the term inference (*Anumâna*) into authority such as of the *smritis* or of the *shistas*. But Jaimini uses the word—inference —instead of the words Smriti and Shistâchâra, and, therefore, the interpretation of commentators deserves to be cautiously accepted. The commentators base on this sûtra such local customs as that of the Holi in the east of India, and of the parading and killing a bull in the north of India, and state that this sûtra sanctions local customs and family-customs. Yet this is the statement of an opponent. In the next sûtra, a reply is given to it. For the explanation of the term adjustment see the foot-note. (I. 3, 6.)

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

दर्शनाद् विनियोगः स्यात् ॥ १७ ॥ (उ० १)

पदादीनि स्पष्टानि ॥

भावार्थः । यस्य कर्मणश्चोदना वेदे प्रत्यक्षं प्राप्नोति तत् कर्माचरणीयम् ॥

लिंगाभावाच् च नित्यस्य ॥ १८ ॥ (सि० यु०)

पदादीनि स्पष्टानि ॥

भावार्थः । यत्र नित्यं विधानमिति गमकं न प्राप्नोति । तत्र व्यवस्था नादरणीया । टिप्पनी द्रष्टव्या ॥

या सूत्रांत आचार्यांनीं पूर्वपक्षाचें समाधान केलें आहे, तसेंच वरील सूत्रांत समाधान करणें चालविलें आहे. "विधान" "तन्यायत्व" आणि "सर्वधर्म" हीं पदें सूत्रांत आहेत. विधान पदाचा अर्थ असुक धर्म आचरावा, असें सांगणें. हें सांगणें कां ऐकावें? कारण त्याच्यावर तन्यायत्व हा धर्म आहे. तन्यायत्व म्हणजे काय? धर्माचें योग्य वर्णन केलें असतें, म्हणून अमुक करा अशी जी अनुज्ञा ती मानावी. आणि सर्वधर्म काय तो हा. प्रत्येक पदाकडे लक्ष देऊन जपून अर्थ केला म्हणजे इतका अर्थ निष्पन्न होतो. पुढें सामान्यतः धर्म घ्यावा अशी एक कोटी आहे. तिचें तात्पर्य असें कीं वेदासारख्या पुस्तकांत जें व्यक्तीचें वर्णन असतें, तें व्यक्तीचें वर्णन न समजतां सामान्य जातीचें वर्णन समजावें. पुनः स्मृतींत आकृतीचें वर्णन आहे, असें म्हणणें योग्य नाहीं. "सगळ्या कर्म करणाऱ्यांस लागू पडेल असा कांहीं एखादा

16. The reply which Jaimini makes to the opponent in this as well as in (1. 1, 31.) is almost the same. The terms—Vidhâna, Tannyâyatva, and Sarva-dharma,—are used in the sûtra and deserve to be examined. The term Vidhâna means the statement that such and such a duty is to be performed. Why is the statement to be accepted? Because it possesses the quality of Tannyâyatva. What is Tannyâyatva? The adequate enunciation of a duty. Sarva-dharma means a duty which ought to be performed by all. Because a duty is adequately enunciated, the injunction that such and such a duty is to be performed ought to be acted upon, and this by all. This is the literal sense of the sûtra when every term in it is carefully considered. The sûtra is also interpreted into an argument that a general revelation is to be accepted. Its application is thus made:—"all particular statements made in **the Veda** ought to be considered **general.**" "Again, it is not pro-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७. जें जें अढळतें त्याचा विनियोग करावा. (उ० १.)

17. (As a duty) is seen (to be directly laid down in the scriptures), it ought to be performed. (1. Reply.)

१८. ज्या स्थळीं हें विधान नित्य असा निश्चय करण्याचें साधन नसतें, त्या ठिकाणीं व्यवस्था घेऊं नये. (सि० यु०)

18. There being no ground (for considering a duty to be immutable and permanent,) (no adjustment can be made.) (An argument in support of the final statement).

विशेष वेद आहे, आणि त्यापासून अनुमान होतें असेंहि नाहीं. म्हणून विधिवचन असलें म्हणजे सर्व-धर्म योग्य आहे." असें शबरस्वामीचें भाष्य आहे. एथें जें जें सांगितलें तें विस्खलित दिसतें; कारण होळीसारखे कुळाचार आणि देशाचार योग्य आहेत, असें दाखविण्यास पूर्वपक्षकार दुराग्रहानें झटतो. भाष्यकाराचाहि पूर्वपक्षकारास आश्रय देण्याचा झोंक दिसतो. परंतु जैमिनीच्या मतें देशाचारास, आणि कुळाचारास मुळींच थारा नाहीं. जो धर्म आचारायाचा तो वेदविहित असला म्हणजे सर्वांनीं आचरावा. यावरून कुलाचार आणि देशाचार जे आमच्या देशांत माजले आहेत त्यांची योग्यता कितपत आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल.

१७. याच पादाच्या ११ व्या सूत्रीं जो पूर्वपक्ष काढला आहे त्याचें हें उत्तर आहे. वरील सूत्रांत अनुमान काढण्याला किंवा व्यवस्था करण्याला कांहीं आधार असावा, असें आचार्यांनीं दर्शविलें आहे.

per to state that works called smritis lay down general propositions based on the immutable, eternal and essential property of a genus called an Âkriti. There is an essential general Veda which applies to all particular sacrificers. And this Veda cannot admit of any inference. Therefore, every duty is based on an original scriptural injunction." This is the comment of Shabara on this sûtra. All the statements made appear to be disconnected, because the opponent obstinately attempts to justify local customs such as Holi, and commentators seek to support him. But according to Jaimini, no local customs are to be recognized. A duty if enunciated in the recognized scriptures, ought to be performed by all. Hence a conclusion as to the importance and propriety of all local customs, such as the Holi, so rampant in this country, can be easily drawn. They are not sanctioned by Jaimini or his predecessors.

17. This is a reply to the statement made by the opponent in the eleventh sûtra of this chapter.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

आख्या हि देशसंयोगात् ॥ १९ ॥ (सि० आ० नि०)

पदादीनि स्पष्टानि ॥

भावार्थः । क्वचित् क्वचित् कर्माख्याविशेषो दृश्यते तस्या बीजं देशविशेषः । देशनाम्नः कर्मनामानि भवन्तीति तात्पर्यम् ॥

न स्याद् देशान्तरेष्विति चेत् ॥ २० ॥ (सि० आ०)

पदादीनि स्पष्टानि ॥

भावार्थः । देशविशेषात् कर्माख्याविशेष इति न । कुतः । देशान्तरे कर्माख्यांतरं भवेदिति चेदुत्तरसूत्रेणाचार्यः समाधत्ते ॥

---

१८. सर्वजणांनीं सर्वस्थळीं आणि सर्वप्रसंगीं जो धर्म आचरायाचा तो नित्य. धर्म नित्य आहे असें अनुमान जेव्हां काढतां येत नाहीं, तेव्हां देशाचारावरून किंवा कुळाचारावरून जी व्यवस्था बसवतात, ती योग्य व्यवस्था नाहीं असें समजावें. या सूत्रावरून कुळाचार आणि देशाचार यांची योग्यता काय आहे, हें विशेष स्पष्ट झालें.

In the sûtra under consideration Jaimini states that an inference to be drawn or an adjustment to be made, ought to be based on some direct scriptural statement.

18. An immutable and permanent duty is that which ought to be performed by all men without any restriction of time or place. The adjustment which consists in accepting local customs or customs peculiar to certain families only, is not proper, when no inference can be drawn as to the immutability or permanence of a duty. This sûtra invalidates all local customs.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९. देशावरूनच नांव पडतें, म्हणून देशाचार करावा. (सि० आ० नि०)

२०. नाहीं. देश बदलला कीं नांव हि बदलेल, तर मग- (सिद्धांतावर आशंका.)

19. Because a custom is named after a country, (local customs are valid.)

20. No, (a local custom is not named after a country.) If it be said that the change of one's country ought to change the name of a work, then—(An objection against the final statement.)

---

१९. पूर्वेकडील लोक होळी करतात, आणि उत्तरेकडील लोक पोळा हिंडवितात, या चालीस अनुलक्षून पूर्वपक्षकार असें म्हणतो कीं देशावरून देशाचाराचें नांव पडतें. त्यावर जैमिनीचें म्हणणें असें आहे कीं देशाचाराचा आणि ज्या स्थळीं जो रहातो त्याचा विशेष संबंध नाहीं. कां ? हें पुढील सूत्रावरून स्पष्ट होईल. आतां इतकेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं नांवावरून कुलाचाराची किंवा देशाचाराची व्यवस्था करतां येत नाहीं. या सूत्रास आभासाचा निरास असें कां म्हटलें आहे, तें आम्हांस समजत नाहीं.

२०. जो पुण्यांत राहतो, तो पुणेंकर. त्यानें पुणें सोडलें आणि दुसऱ्या देशीं गेला, तरी त्यास पुणेंकरच म्हणतात. म्हणून देशांत रहाणें झालें, म्हणजेच नांव पडतें असें म्हणतां येत नाहीं. यावरून देशाचाराशीं आणि ज्या देशांत तो रहातो त्याच्याशीं कांहीं संबंध नाहीं. म्हणून १९ व्या सूत्रीं जें वर्णन केलें आहे, तें घेण्यासारखें नाहीं.

19. The opponent states that a custom is named after a country as he observes a custom like the *Holi* among the Easterns, and the custom of parading a bull and killing it among the Northerns. Jaimini in reply states that there is no essential relation between a local custom and the place where one resides. The next sûtra will throw light on this statement. Suffice it to remark that no legitimate basis for local customs can be established, from their mere names. This sûtra it is stated, removes an objection against the final statement. We do not see this.

20. He who is a native of Poona, is a Poonite. When he leaves Poona and goes to some other place, he is still called a Poonite. Hence there is no connection whatever between a local custom and the place of one's residence. Therefore, the statement made in the 19th sûtra is not to be accepted.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

स्याद् योगाख्या हि माथुरवत् ॥ २१ ॥ (आ० नि०)

पदादीनि स्पष्टानि ॥

भावार्थः । यथा माथुरशब्दो यौगिकः मथुरायां यो न वसति सोऽपि माथुरः । तथा कर्माख्या यौगिकी । देशविशेषसंबंधे नष्टेऽपि देशविशेषात् प्राप्ता कर्माख्याऽवशिष्यते ॥

कर्मधर्मो वा प्रवणवत् ॥२२॥ (आ०)

पदानि स्पष्टानि ॥

पदार्थः । प्रवणः=निम्नदेशः (यज्ञमंडपे प्राक्प्रवणत्वं)

वाक्यार्थः स्पष्टः ॥

भावार्थः । यथा प्रवणभेदेन कर्मधर्मो भिद्यते तथा देशभेदेन कर्माख्या भिद्येत । अतः कर्माख्या न यौगिकी । इत्याभासः ॥

अनुसंधेयं वेदवाक्यं ॥

प्राचीनप्रवणे वैश्वदेवेन यजेत ॥

तुल्यं तु कर्तृधर्मेण ॥ २३ ॥ (आ० नि०)

पदादीनि स्पष्टानि ॥

भावार्थः । कर्त्ता यजमानः । तस्य धर्मेण (श्यामत्वादिना) यथा कर्म न भिद्यते तथा देशभेदेन कर्म न भिद्यते । इति सूत्रस्थतुल्यतुपदयोरर्थः ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२१. मथुरावासी हें नांव पडलें, तशींच यौगिक नावें पडतात. (आ० नि०)

21. Because a work is to be etymologically named as a Mathurâ-man(is named though he does not reside in Mathurâ.) (Objection removed.)

२२. नव्हे. खोल प्रदेशाविषयीं जशी व्यवस्था आहे, तशीच कर्मसंबंधी धर्माविषयीं असावी. (आ०)

22. No, as (there is a special arrangement about) a sloping place, so (there ought to be one about) a sacrificial duty. (An objection.)

२३. नव्हे. कारण धर्म आचरणाऱ्याच्या गुणांमध्यें आणि देशामध्यें साम्य आहे.

23. No, because there is an analogy between the qualities of a sacrificer (and a country).

---

२१. सूत्रांतील योगाख्या हा शब्द विचार करायाजोगा आहे. पदाचा अवयवार्थावरून जो अर्थ होतो, त्यास यौगिक असें म्हणतात. वरील चार पांच सूत्रांत जो विचार चालला आहे, तो समजण्या करतां थोडा इतिहासाचा विचार केला पाहिजे. प्राचीन काळीं आर्यलोकांत दोन संप्रदाय प्रसिद्ध होते. एका सांप्रदायाचे लोक म्हणत कीं भाषेंतील सर्व शब्द व्युत्पन्न आहेत. आणि दुसऱ्या सांप्रदायाचे लोक म्हणत कीं ते अव्युत्पन्न आहेत. असा या दोन सांप्रदायांचा बरेच दिवस पर्यंत वादविवाद चालला होता. वैयाकरण शाकटायन दुसऱ्या सांप्रदायाचा नायक होता. यावर वैयाकरण पाणिनीनें एक तोड काढली. ती अशी. ज्या पदाचा व्युत्पत्तीनें अर्थ बसत नाहीं तें पद सांकेतिक आहे असें समजावें. अध्यात्मिक जे जे वाद उत्पन्न होतात ते ते

21. The term Yogâkhyâ deserves to be examined. The sense of a term based on its etymology is called Yougika. It is necessary to go into the history of the ancient Âryas that this controversy may be understood. There were two well-known schools of grammarians among the ancient Âryas. The one stated that all words in Sanskrita or any language are derivative. The other school stated that they were not derivative, that is, they were conventional. A controversy was carried on between these two schools for a long time. The latter was led by Shâkaṭâyana, a great grammarian. Pâṇini, another distinguished grammarian, proposed a compromise:—that term the sense of which can not be etymologically fixed, is conventional. All philosophical dissensions were necessarily mixed up with the theological controversies in early ages. This con-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अथ साधुपदप्रयुक्त्यधिकरणम् ॥

प्रयोगोत्पत्त्यशास्त्रत्वाच्छब्देषु न व्यवस्था स्यात् ॥२४॥ (पू०)

पदानि । प्रयोग-उत्पत्ति-अ-शास्त्रत्वात्, शब्देषु, न, व्यवस्था, स्यात् ॥

पदार्थः । प्रयोगेणोत्पतिविषये नास्ति शास्त्रं येषां ते प्रयोगोत्पत्त्यशास्त्राः । तेषां भावः तत्त्वम् तस्मात् । अन्यानि पदानि स्पष्टानि ॥

वाक्यार्थः । प्रयोगेण शब्दा उत्पद्यंते । तेषु शास्त्रं नास्ति । अतस्तेषां प्रयोगे व्यवस्था नास्ति ॥

भावार्थः । प्रयोगसामर्थ्यात् शब्दानां ज्ञानं भवति । अर्थश्च प्रतीयते । प्रतीतेऽर्थे शब्दानां साधुत्वम् । यैर्यैः शब्दैरर्थः प्रतीयते ते शब्दाः साधवः । अतः केचिच्छब्दाः साधवः । इतरेऽसाधवः । इति व्यवस्था न घटते । सर्वशब्दानां साधुत्वे तेषामनादित्वापात्तिः । इति पूर्वपक्षः ॥

धर्मविचारांत शिरतातच शिरतात. त्याप्रमाणें हा हि वाद धर्मविचारांत शिरला. या वादाप्रमाणें पूर्वपक्षाचें म्हणणें पडलें कीं देशाचारास देशावरून नांव पडतें. नांवाची योग्यता मोठी आहे. नांवावरून जें प्रमाण निघतें त्यास समाख्या असें म्हणतात याकरितां कर्माच्या नांवावरून व्यवस्था करून ज्या देशावरून तें नांव पडलें त्या देशीं तो धर्म आचरावा असें अनुमान निघतें. यावर आचार्य असें म्हणतात. पंचवटी असें नांव पडलें आहे. पण तेथें पांच वड कोठें आहेत? पुणेंकर असें ज्याचें नांव पडतें तो नेहमीं पुण्यांतच कोठें राहतो? यावरून

troversy was, therefore, both philosophical and theological. Starting from this controversy, the opponent insisted that certain customs were local because they were only named after particular places, and that the importance of a name in itself was great, for proof based on a name itself is called Samâkhyâ. Hence due importance being attached to this proof, it is to be inferred that a custom is to be practised in a country from which its name is derived. In reply to this, Jaimini observes that a certain place is called Panchavati (a place of five Banian trees), where there are no five Banian trees, and that a Poonite does not always stay in Poona. Hence no arrange-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्धपदाच्या प्रयोगाविषयीं विचार.

२४. प्रयोग केल्यानें शब्द उत्पन्न होतात, म्हणून शब्दामध्यें शास्त्र नाहीं म्हणजे व्यवस्था नाहीं. [पू०]

THE SUBJECT OF THE USE OF PROPER WORDS.

24. Words are produced by their being used, therefore, there is no adjustment about them. (Statement of an opponent).

नांवावरून कांहीं व्यवस्था करतां येत नाहीं. म्हणून जो धर्म आचरायाचा तो सर्वांनीं आचरावा. समाख्या म्हणजे काय; आणि तिचा संबंध हें या मीमांसेचे (३.३,१२.) सूत्रीं सांगितलें आहे.

२२. "प्राचीन प्रवणे वैश्वदेवेन यजेत" असें बाद्धायनश्रौतसूत्रांत वचन आहे असें म्हणतात. याचा अर्थ "पूर्वेकडील खोल प्रदेशीं वैश्वदेव याग करावा." या स्थळीं वैश्वदेव आणि पूर्वेकडील खोल प्रदेश, यांचा संबंध आहे. म्हणून कर्माचा आणि देशाचा संबंध असतो. यावरून देशाचार करावा असें अनुमान निघतें असें पूर्वपक्षकाराचें म्हणणें आहे.

२३. धर्म आचरणाराचा वर्ण काळा असला किंवा गोरा असला म्हणजे कांहीं त्याच्या कर्मांत अंतर पडत नाहीं. तसेंच देशावरूनहि कर्मांत अंतर पडत नाहीं. म्हणून अमका धर्म अमक्या देशीं आचरावा ही व्यवस्था करणें योग्य नाहीं. असा शबरानें सूत्रार्थ स्पष्ट वर्णिला आहे. आणि कोणत्याहि प्रकारें विचार केला तथापि देशाचार करावा असें सिद्ध

ment can be based on a mere name. Hence a duty ought to be performed by all. The nature and bearings of exegetical evidence called Samâkhyâ are explained in (III. 3, 14.) of this Mìmânsâ.

22. "In the eastern slope of the sacraficial ground one ought to perform the Vaishvadeva-sacrifice." This text is said to be in the Bouddhâyana shrouta-sûtra. This text mentions a relation between the Vaishva-deva-sacrifice and the eastern slope. Therefore, there is a relation between a sacrificial work and a locality. Hence the conclusion that local customs are valid is to be drawn. This is the way, the opponent argues.

23. As the complexion of a sacrificer, that is, the black or white colour of his face does not make any change in his duties, so his residence in a country does not impose upon him any special duty. Therefore, the arrangement that certain customs are peculiar to a particular locality, is totally improper. This is the way commentator Shabara distinctly interprets this sûtra and establishes that the discussion, no matter how it is carried on, points

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

शब्दे प्रयत्ननिष्पत्तेरपराधस्य भागित्वम् ॥ २५ ॥ (सि०)

पदानि । शब्दे, प्रयत्न-निष्पत्तेः, अपराधस्य, भागित्वम् ॥

पदार्थः । प्रयत्नः=आभ्यंतराक्रिया ॥

भावार्थः । शब्दे क्रियमाण उच्चारयिता प्रयतते । यत्र प्रयत्यते तत्रा-पराध्यते । अतः शब्दकृदपराध्नोति । कृतेऽपराधेऽसाधुत्वम् । अतः केचिच्छब्दाः साधवः । इतरेऽसाधवः ॥

महता प्रयत्नेन शब्दमुच्चरन्ति । वायुर्नाभेरुत्थितः । उरसि विस्तीर्णः । कंठे विवर्तितः । मूर्द्धानमाहत्य परावृतः । वक्त्रे विचरन् विविधान् शब्दानभिव्यनक्ति । इति शबरः ॥

होत नाहीं हें आपलें म्हणणें स्थापन केलें आहे. याचा आमच्या वाचकांनीं विचार करावा.

२४. या पूर्वपक्षापासून दुसरा विषय लागला. संस्कृतांत जीं पदें आहेत, तींच शुद्ध किंवा प्राकृत भाषेतीलहि पदें शुद्ध, असा वादविवाद उत्पन्न झाला, इतिहाससंबंधानें या वादविवादाची योग्यता मोठी आहे. कारण युरोप देशीं असाच वाद उत्पन्न झाला होता. पुष्कळ दिवसपर्यंत पाद्री लोकांचें असें म्हणणें होतें कीं मूळ खिस्तीधर्मपुस्तक ज्या ल्याटिन भाषेमध्यें होतें, ती ल्याटिन भाषाच काय ती शुद्ध आणि ग्राह्य. आणि तिजपासून उत्पन्न झालेल्या अर्वाचीन युरोपी भाषा व्यवहाराच्या मात्र उपयोगीं पण धर्म किंवा शास्त्र याविषयीं विचार करण्यास योग्य नव्हत. आपल्या लोकांत सर्वत्र अजून असाच समज आहे. कसलेंहि वाक्य संस्कृत असलें म्हणजे पुरे, तें ग्राह्य होतें. बुद्धिवाद करणाऱ्या लोकांना ही गोष्ट रु

to the same conclusion that local customs are not to be recognized. This is important and deserves attention.

24. This sûtra introduces a new subject of discussion. A controversy, as to whether Sanskrita or Prâkrita words were pure, was originated. This controversy is historically very important for the question was vehemently discussed about three hundred years ago in Europe. The clergymen of Europe maintained for a long time that Latin alone in which the Bible was read was pure and acceptible, and that modern European languages were fit only for common life, but that they would not be used as vehicles of philosophical or theological thought. Our country men still believe that Sanskrita alone is pure. A text, no matter what it is, if it be in Sanskrita is to be accepted. Ancient rationalists could not recognize this. They boldly asserted that the words are known as they are used. No sooner is the sense of a word known than its purity or impurity is ascertained. All those

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Register No. 131 of 1877.

सूचना.

	रुपये.	आणे.
वर्षाची वर्गणी, अगाऊ	५	०
एका अंकास	०	८

पुण्याबाहेर राहणारांस टपाल हंशिलाबद्दल दर वर्षाचे ६ आणे खेरीज पडतील. मागाहून वर्गणी घेतली जाणार नाहीं.

ग्रंथकर्त्यास अथवा म्यानेजरास जीं पत्रें लिहावयाचीं, तीं "षड्-दर्शनचिंतनिका–आफिस, पुणें, सदाशिव पेंठ, घर नंबर ६४१" या पत्यावर लिहावीं. वर्गणी वगैरे संबंधी पत्रें याच पत्यावर पाठवावींत.

	Rs.	A.
For one year, in Advance... ...	5	0
Single copies.	0	8

Besides six annas for postage at the rate of half an anna for a copy.

N. B. The subscription is to be paid *in advance.* No accounts of arrears can be kept.

All letters should be addressed to the Manager of the *Saddarshana*-Chintanikâ-Office, Poona, Sadashive Petha, House Municipal No. 641.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

THE

SADDARSHANA-CHINTANIKÂ

OR

STUDIES IN INDIAN PHILOSOPHY.

षड्दर्शनचिंतनिका.

मीमांसादर्शन

वृत्तिसहित

त्याचें मराठी आणि इंग्रजी भाषांतर.

पुस्तक १. आगस्ट १८७७. अंक ८.

VOL. 1. AUGUST, 1877. No. 8.

पुणें.

" ज्ञानप्रकाश " छापखान्यांत छापिलें.

(सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदली आहे.)

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राचीनशाल औपमन्यवः सत्ययज्ञः पौलुषिरिन्द्रद्युम्नो भाल्लवयो जनः शार्कराक्ष्यो बुडिल आश्वतराश्विस्ते हैते महाशाला महाश्रोत्रियाः समेत्य मीमा॰सां चक्रुः को न आत्मा किं ब्रम्हेति ॥ छान्दोग्य । ५.११,१. ॥

The following gentlemen will receive subscriptions for us.

Anna Moreshwar Kunte B. A., M. D., Esqr., Bombay.

Rao Saheb Mahiput Rao Rupram, Principal Training College, Ahmedabad.

Rao Saheb Gopal Govind Ghate, Sub-judge Kotree, Sindha.

Govind Moreshwar, Hasubnis Esquire, B. A., Sanskrit Teacher High School, Baroda.

We have sent a copy (suppliment to No. 8) of testimonials and the opinions of the Press. We are much obliged to learned scholars and gentlemen of Europe as well as to hundreds of native gentlemen who have subscribed to this periodical.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२५. शब्द करते वेळीं (बोलणारास) प्रयत्न करावा लागतो. प्रयत्न झाला कीं अपराध घडतो. (सि०)

25. In pronouncing a word (a speaker) makes an effort; an effort (necessarily) partakes of a mistake. (Final statement.)

चली नाहीं. ते असें म्हणूं लागले कीं प्रयोग केला म्हणजे शब्दार्थाचें ज्ञान होतें. अर्थ कळला कीं शब्द योग्य किंवा अयोग्य हें कळतें. ज्या ज्या शब्दांनीं अर्थ कळतो, ते ते शब्द योग्य. आणि कांहीं शब्द योग्य आणि कांहीं अयोग्य अशी व्यवस्था संभवत नाहीं. म्हणून सर्वशब्दांना योग्यता आहे. आणि असें म्हटलें तर मीमांसकांचे मताप्रमाणें सारेच शब्द अनादि होऊन बसतात. बुद्धिवाद करणारा पूर्वपक्षकार अशा कोट्या करतो.

२५. सूत्रार्थ स्पष्ट आहे. फक्त सूत्रसंबंध दाखविला म्हणजे पुरे. ज्या ज्या प्रसंगीं अपराध घडतो, त्या त्या प्रसंगीं अयोग्यता उत्पन्न होते. बोलणारा चुकतो; चुकी पडली कीं शब्द अशुद्ध होतो. याकरितां कांहीं शब्द शुद्ध आणि कांहीं शब्द अशुद्ध असें म्हणणें भाग पडतें. शबरस्वामींनीं आपल्या भाष्यांत असें म्हटलें आहे कीं बोलणारे मोठ्या प्रयासानें शब्द उच्चारतात. बेंबीपाशीं वायु उत्पन्न होतो, तो उरामध्यें येऊन पसरतो, कंठामध्यें येऊन फांकतो, मग टाळूवर आदळून मागें परततो, मग जेव्हां तो तोंडामध्यें घोळतो तेव्हां अनेक प्रकारचे शब्द प्रकट होतात. शब्दोत्पत्तीविषयीं ही एक उपपत्ति आहे. शब्द उत्पन्न कसा होतो याविषयीं वाचकां-

words which convey some sense are pure. Therefore, the division of words into pure and impure is impossible. Therefore, all words are pure. But such a statement, if based on the arguments of the Mimânsakas, would render all words eternal. This is the way, the rationalistic opponent argues.

25. The sûtra is perspicuous enough. It is, however, necessary to justify its collocation. Whenever a mistake is committed, impurity or impropriety is an inevitable consequence. A speaker necessarily commits a mistake which renders a word uttered improper or impure. Hence it is necessary to recognize the division of words into pure and impure or correct and incorrect. Commentator Shabara observes:—"Speakers make an effort in pronouncing a word. Air is raised at the navel. It spreads in the chest. It becomes broad in the throat. It glances against the palate and is thrown backwards. When it revolves in the mouth, it manifests a variety of words." This is a theory of the origin of words. This subject deserves attention. The purport of Shabara's remarks is to prove that because words are produced in this way, some are pure and correct, and others, impure and incorrect.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अन्यायश्चानेकशब्दत्वम् ॥ २६ ॥ [सि० यु०]

पदादीनि । स्पष्टानि ॥

भावार्थः । यदनेकशब्दत्वं पूर्वपक्षेण प्रतिपादितं तदन्याय्यम् । अनेकेषु शब्देष्वेकोऽनादिः । अन्येऽपभ्रंशाः । इति सम्यग् व्यवस्था ॥

तत्र तत्त्वमभियोगविशेषात् स्यात् ॥ २७ ॥ [आ० नि०]

पदानि । तत्र, तत्त्वम्, अभियोग-विशेषात्, स्यात् ॥

पदार्थः । तत्र=तस्मिन् विषये=व्यवस्थाविषये । तत्त्वम्=निर्णयः । अभियोगविशेषात्=उपदेशविशेषात् ॥

वाक्यार्थः । उपदेष्टारो विशेषेण याञ् छब्दान् पठंति त एव साधव इति व्यवस्थाविषये निर्णयो भवेत् ॥

भावार्थः । पाणिन्यादयः शब्दशास्त्रमुपादिशन्ति । तेन शब्दानां साधुत्वासाधुत्वव्यवस्था निर्णेतुं शक्यते । अतः केचिच् छब्दाः साधव इतरेऽसाधव इति सिध्यति ।

नीं विचार करावा. शबरांच्या म्हणण्याचें इतकेंच तात्पर्य आहे कीं असें घडतें म्हणून कांहीं शब्द योग्य आणि कांहीं अयोग्य आहेत.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२६. (एका अर्थाचे) अनेक शब्द आहेत, असें म्हणणें अन्याय आहे. (सि० यु०)

२७. (उपदेशक शब्दाचें) विशेष वर्णन करतात, म्हणून निर्णय करतां येतो. (आ० नि०)

26. (It is unjust to maintain that there are) many words (having one and the same sense). (An argument in support of the final statement.)

27. From particular dissertations (on words) their essential form (can be ascertained.) (An objection removed.)

---

२६. अनेक पर्यायशब्दांमध्यें एकच शब्द खरा असतो. बाकी सर्व अपभ्रंश. पतञ्जलीच्या वेळीं संस्कृत भाषा असतां प्राकृत भाषा उत्पन्न होऊं लागल्या होत्या. जैमिनीच्या वेळीं प्राकृत भाषा प्रबळ झाल्या होत्या. मूळ शब्द संस्कृत होता, परंतु जी भाषा लोकांत चालत होती, तिजमध्यें त्या एका शब्दाबद्दल पुष्कळ निरनिराळे शब्द होते. पूर्वपक्षकाराचें म्हणणें कीं हे सारे निरनिराळे शब्द ग्राह्य आहेत. जैमिनीचें म्हणणें कीं एक मूळ संस्कृत शब्द शुद्ध, आणि बाकी सर्व अपभ्रंश अशुद्ध आहेत

२७. पाणिनीसारखे शब्दव्यवस्थापक झाले, म्हणून कांहीं शब्द योग्य आणि कांहीं अयोग्य असे आहेत. मूळ संस्कृत सूत्रांत "अभियोग" हें पद आहे. त्याचा अर्थ शिक्षण, उपदेश असा होतो. पाणिनीच्या अष्टाध्यायीमध्यें उपयोगशब्दाचाहि असाच अर्थ अढळतो.

26. Only one word is correct, when there are many words having the same sense. The rest are mere corruptions. At the time of Patanjali, though Sanskrita was generally spoken, yet the modern Prâkrita dialects had begun to spring up. At the time of Jaimini, they had grown up, and commenced to predominate. The original word was Sanskrita; but in a Prâkrita dialect, its different corrupted forms were prevalent. The opponent holds that the latter are acceptible. Jaimini on the contrary, holds that the original Sanskrita word alone is pure, correct, and acceptible, and that the corruptions are impure, incorrect, and not acceptible.

27. A great teacher like Pânini had systematized words. Therefore, such words are correct and others, incorrect. In the original Sanskrita sûtra, the term *Abhiyoga* is used. It means a dissertation. In the Astâdhyâyî of Pânini, the term Upayoga has a similar sense.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

तदशक्तिश्चानुरूपत्वात् ॥ २८ ॥ [उ० १]

पदानि । तत्-अ-शक्तिः, च, अनुरूपत्वात् ॥

पदार्थः । तदशक्तिः=तेषामशक्तिः । तेषाम्=अनेकशब्दानाम् । च=पुनः । अनुरूपत्वात्=रूपसादृश्यात् ॥

वाक्यार्थः । पुनः । रूपसादृश्यात् तेषां नामापभ्रंशानां (अर्थद्योतने) शक्तिर्नास्ति ।

भावार्थः । अपभ्रंशानां स्वतंत्राऽर्थशक्तिर्नास्ति । कुतः । साधुशब्दानां रूपसादृश्यात् तेषामर्थशक्तिः । इत्यपभ्रंशानां याऽर्थशक्तिर्भासते सोपपद्यते । इति जैमिन्याचार्योऽभिप्रैति ॥

एकदेशत्वाच्च विभक्तिव्यत्यये स्यात् ॥ २९ ॥ [उ० यु०]

पदानि । (तत्त्वं नामार्थः) एक-देशत्वात्, च, विभक्ति-व्यत्यये, स्यात् ॥

पदार्थः । देशः=अंशः । एकदेशः=एकांशः । तस्य भावः=तत्त्वम् । विभक्तिव्यत्यये=विभक्तिव्यतिक्रमे सति ॥

वाक्यार्थः । पुनः । सत्यपि विभक्तिव्यतिक्रमेऽपभ्रंशानामेकदेशत्वादर्थः स्यात् ॥

भावार्थः । पुनः । अपभ्रंशानामर्थः प्रतीयते तस्य किं बीजम् । अपभ्रंशे साधुपदस्यांशो वर्त्तते । तेन सत्यपि विभक्तिव्यतिक्रमेऽर्थो ज्ञायते ॥

गाव्यादिदर्शनाद गोशब्दस्मरणं ततः सास्नादिमानवगम्यते । इति शबरः ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२८. पुनः (अपभ्रंशाचें) रूप सारखें असतें म्हणून अपभ्रंशामध्यें अर्थ प्रकट करण्याची शक्ति नाहीं. (उ०)

२९. पुनः (मूळ संस्कृत) शब्द एक खरा, (त्याच्या) विभक्ति फिरल्यानें (अपभ्रंशापासून अर्थ निष्पन्न होतो.) (सि० यु०)

28. Again, [the corruptions have] a similar form, therefore, [they have] not that power (of manifesting a sense .) (A reply.)

29. Again, though the original Sanskrita word is one, yet being its modifications, (the corruptions have some sense.) (Argument in support of the final statement.)

---

२८. अपभ्रंशाचे अंगीं अर्थ नाहीं. प्राकृत शब्दाचा जो अर्थ होतो, तो संस्कृत शब्दाच्या आधारानें होतो. सारे प्राकृत शब्द संस्कृत शब्दांपासून उत्पन्न झाले, असें जैमिनीचें म्हणणें आहे. म्हणून त्यांच्या अंगीं स्वतंत्र अर्थशक्ति नाहीं, म्हणून ते योग्य नाहींत. जगतामध्यें हजारो भाषा आहेत, त्या सर्वांची आदिमाता संस्कृत भाषा आहे, असें म्हटलें तर एकपरी साजेल आणि एकपरी साजणाराहि नाहीं. जैमिनीचें म्हणणें असें खरें कीं प्राकृत आणि संस्कृत शब्दांत सादृश्य आहे, म्हणून प्राकृत शब्दाला अर्थ आहे.

२९. संस्कृत शब्दांचे अपभ्रंश होऊन प्राकृत शब्द झाले. मग प्राकृत शब्दांला अर्थ कोठून आला ? असा संशय उत्पन्न झाला. या संशयाचें निवारण जैमिनि असें करतो कीं अपभ्रंशामध्यें मूळ संस्कृत पदाचा कांहीं अंश असतो. यामुळें अपभ्रंश उच्चारतांच मूळ संस्कृत शब्दाची

28. The corruptions of a word have no sense. Their sense in the Prâkrita dialects is based on the original Sanskrita word from which they are derived. Jaimini maintains that all Prâkrita words are derived from original Sanskrita words. Therefore, they have no independent sense of their own. Therefore, they are impure and incorrect. It is partially proper to maintain that Sanskrita is the original mother of the hundreds of languages spoken in the world. Jaimini believes that the Prâkrita words have some sense or other, because they resemble some original Sanskrita words.

29. The original Sanskrita words were corrupted into Prâkrita words. The question is, how have the Prâkrita words got some sense? Jaimini thus answers this question :—a part of the original Sanskrita word is seen in its corrupt form. Hence the sound of the corrupt form puts the hearer in mind of the original Sanskrita word. Hence a

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अथ लोकवेदयोः शब्दैक्याधिकरणम् ॥

आकृतिशक्त्यधिकरणप्रारंभश्च ॥

प्रयोगचोदनाभावादर्थैकत्वमविभागात् ॥ ३० ॥ (पू० १)

पदानि । प्रयोग-चोदना-भावात्, अर्थ-एकत्वम्, अ-विभागात् ॥

पदार्थः । प्रयोगस्य चोदना=प्रयोगचोदना । तस्याः भावात्=प्रयोगचोदनाभावात् ॥

वाक्यार्थः । प्रयोगचोदना भवति । अतोऽर्थैकत्वम् । कुतः । यतो विभागो नास्ति तस्मात् ॥

भावार्थः । अपभ्रंशैर्वा साधुपदैर्वा प्रयोगचोदना संभवति । अतस्तेषामेतेषांचार्थैकत्वम् । अर्थैकत्वे को हेतुः । अपभ्रंशाः साधुपदेभ्यो भेत्तुं न शक्यन्ते तस्मात् ॥

यदि लौकिकास्त एवार्थाः । तदा संदेहः । किमाकृतिः शब्दार्थोऽथ व्यक्तिरिति । का पुनराकृतिः का व्यक्तिरिति । द्रव्यगुणकर्मणां सामान्यमात्रमाकृतिः । असाधारणविशेषा व्यक्तिः । कुतः संशयः । गौरित्युक्ते सामान्यप्रत्ययाद् व्यक्तौच क्रियासबंधात् । तदुच्यते । व्यक्तिः शब्दार्थ इति । कुतः । प्रयोगचोदनाभावात् । आलंभनप्रोक्षणविशसनादीनां प्रयोगचोदना आकृत्यर्थे न संभवेयुः । इति शबरः ॥

अटवण होते. आणि म्हणून अपभ्रंशापासून ज्ञान होतें. ही उपपत्ति कशी हि असो, जैमिनीच्या वेळीं प्राकृत भाषा प्रबळ झाल्या होत्या, आणि बौद्धादि बुद्धिवाद करणाऱ्यांनीं आपलें सर्व शास्त्रविवेचन प्राकृत भाषेंत चालवलें होतें. इतिहासदृष्ट्या या गोष्टीची योग्यता मोठी आहे. मूळ सस्कृत भाषा योग्य ठरविली खरी, परंतु प्राकृत भाषेंत बोलूंच नये असा कांहीं जैमिनीचा अभिप्राय नाहीं. या सबंधानें या पादाचें १०वें सूत्र पहावें.

corrupt form (a Prâkrita word) conveys some sense. Whatever the propriety and validity of this theory of the origin of the Prâkrita dialects, the fact is patent that the Prâkrita dialects predominated and attracted attention at the time of Jaimini, and that rationalistic controversies of the Bouddhas were conducted by means of the Prâkrita dialects—a fact historically of great importance. Though Jaimini seeks to establish the propriety of the original Sanskrita, yet he does not declare that the modern Prâkrita dialects are totally unfit even for

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लौकिक आणि वैदिक शब्दांचा ऐक्यविचार.

आकृतीच्या शक्तिविषयीं विचार.

३०. (अपभ्रंश आणि शुद्ध पदें यांच्या योगानें) कर्म कसें करावें हें समजतें, म्हणून त्या दोहोंचा अर्थ एकच आहे; कारण (अपभ्रंश कोणते, आणि शुद्ध पदें कोणतीं) हीं निवड करतां येत नाहीं. (पू० १.)

३०. या सूत्रापासून जें विवेचन चालू झालें आहे, त्याची योग्यता फार मोठी आहे. आकृति ती कोणती, आणि व्यक्ति ती कोणती, त्यांचा परस्परसंबंध काय, त्यांचे व्यावर्तक धर्म कोणते, असा विचार युरोपखंडीं पांचशें वर्षांपूर्वीं चालला असून अजूनाहि याविषयीं तेथें वादविवाद होतो. युरोपखंडांत पूर्वीच्या वादविवादांत आणि आतांच्या वादविवादांत इतकें अंतर आहे कीं तेथील वादविवाद करण्याची पद्धति बदलून त्याचा आकारहि बदलला आहे. आणि या वादविवादापासून उपयुक्त गहन विचार निष्पन्न झाले आहेत. या वादविवादाचा कटाक्ष काय, याचा विचार उपसंहारांत करूं. एथें फक्त त्याचें स्वरूपकथन केलें म्हणजे पुरे. वस्तुमात्रास नामरूप आहे. रूप म्हणजे त्या वस्तूचा आकार. नामाच्या योगानें वस्तु ओळखतां

THE SUBJECT OF THE IDENTITY OF SACRED (VAIDIKA) AND PROFANE (LOUKIKA) WORDS.

THE SUBJECT OF THE POWER OF A FORM.

30. (Corrupt words as well as original Sanskrita words) can declare how sacrificial works are to be performed. Therefore, the sense of both is the same, because (corrupt words) cannot be distinguished (from the pure original words.) (1. Statement of an opponent.)

ordinary conversation. In this connection, the tenth sûtra of this pâda may be seen.

30. The subject introduced by this sûtra is important. The controversy as to what is a form? what an individuality? as to their mutual relation, and their characteristic marks, was vehemently carried on in Europe about five hundred years ago. And yet it is not concluded. Yet the form and methods of the European controversy have now undergone important changes. Great practical results have, however, proceeded from this controversy, the bearings of which we will point out in the summary of this chapter. The description of its nature in this place will simply answer our purpose. Every thing known has a form as well as a name. Its form consists in its qualities. A name only serves to distinguish it from other things. Hence the name of a thing sums up its

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येते. याकरितां वस्तूंच्या नामांत काय तें त्याच्या सर्व धर्माचें बीज आहे. शब्दच काय तें आमचें प्रमाण असें वैयाकरण लोक म्हणतात. ह्या त्यांच्या म्हणण्याचा अर्थ काय? वस्तूचें नाम मात्र वास्तविक आहे. आणि त्या नामाच्या परीक्षेवरून त्या वस्तूचे सर्व धर्म कळतात. यांच्या उलट वाद करणारे पंडित असें म्हणतात कीं वस्तूचें रूप वास्तविक, आणि तिच्या नामाच्या विचारांत कांहीं तात्पर्य नाहीं. म्हणून आकृति म्हणजे काय, हें सांगितलें पाहिजे. घोडा असें म्हटलें असतां प्रत्यक्ष एखाद्या घोड्याची आपणास आठवण होऊन घोडा या पदार्थाचें ज्ञान होतें. अथवा कोणत्याहि घोड्याच्या स्वरूपाची आठवण न होतां घोड्याचा आकार एकदम लक्षांत येतो. कारण घोड्याचें एकंदर स्वरूप मनुष्याच्या मनांत पूर्वींच वसत आहे. यावरून हा घोडा असें मनुष्यास ओळखतां येतें. आतां, असा जो घोड्याचा सामान्य आकार, आणि जो आकार सर्व घोड्यांस सारखाच लागूं पडतो, आणि सर्व घोड्यांत सारखाच आढळतो, त्या आकारास आकृति म्हणावें. दुसरें, या आकृतिज्ञानाची उत्पत्ति कशी, हें सांगतांना पंडितांत दुफळी आढळते. कोणी असें म्हणतात कीं नाना वस्तु पाहिल्यानें वस्तूचा सामान्य आकार लक्षांत येतो, आणि आकृतिज्ञान होतें, म्हणून व्यक्तिज्ञान हेंच आकृतिज्ञानाचें कारण आहे. यावर कांहीं पंडित असें म्हणतात कीं एकादी नवीनच वस्तु पाहण्यांत आली, तरी ती अमुकच जातीची अशी ओळखतां येते. याकरितां व्यक्तिज्ञाना-

qualities. Grammarians believe in words only. How is their belief to be understood? how is it to be interpreted? They believe that the name of a thing is real, and the examination of a name discovers all the qualities of the thing of which it is a name. Philosophers opposed to the grammarians assert, on the contrary, that the form of a thing is real, and that the examination of its name is useless. Hence the discussion of the nature of a form is historically important. We know a horse to be a horse because we are reminded of an individual horse when the word—horse—is generally pronounced. This is one view. Again, we know a horse to be a horse, because the form of a horse permanently exists in the human mind. The form which is thus innate in the human mind, which is common to all horses, and by which a horse is known to be a horse, is called an Âkriti. This is another view. Philosophers are divided on the subject of the origin of the notion of a form. Some thinkers hold that continued observation of a variety of horses produces the general idea of a horse, and that, therefore, the knowledge of individuals is the cause of the knowledge of a form; and others hold that when a thing is seen for the first time, it is recognized to be such and such, and that, therefore, the knowledge of individuals is not the cause of the knowledge of a form. Again, the philosophical difficulty that the observation of individual things, however varied, and however long continued, can never exhaustively

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बरून आकृतिज्ञान होत नाहीं. दुसरी अशी अडचण आहे कीं कितीहि वस्तूंची परीक्षा केली तथापि सर्व वस्तु त्या परीक्षेंत सांपडल्या असें म्हणतां येणार नाहीं. आणि सर्व वस्तूंचें जोंपर्यंत ज्ञान झालें नाहीं, तोंपर्यंत हें ज्ञान सामान्य असेंहि म्हणतां येणार नाहीं. म्हणून सामान्य ज्ञानाचा आकार वस्तुमात्रापासून भिन्न असून स्वतंत्र, वास्तविक आणि नित्य आहे. या स्वतंत्र, वास्तविक आणि नित्य आकृतीच्या योगानें एखाद्या व्यक्तीचें ज्ञान होतें. आणि ती अमुकच आहे असें ओळखतां येतें. याविषयीं पुनः उदाहरण घेऊं या. यज्ञसमयीं पशु मारावा, आणि त्याचें मांस अग्नीस अर्पण करावें. अशा प्रसंगीं हा पशु एखादी व्यक्ति आहे कीं आकृति आहे ? एखादी विशेष व्यक्ति आहे, असें म्हणावें तर एक पशु पळून गेला तर दुसरा आणतां येतो, दुसरा पळून गेला तर तिसरा आणतां येतो. बरें पशु व्यक्ति नाहीं, आकृति आहे असें म्हटलें तर आकृति बाह्येंद्रियगोचर नसल्यामुळें आकृतीस धरावें कसें आणि मारावें कसें ? पशूस व्यक्ति म्हटलें तरी अडचण येते, आणि आकृति म्हटलें तरी अडचण येते. तथापि मीमांसक लोक पशु आकृतिच आहे असें मानतात. अशी व्यवस्था ते कशी करितात हें पुढील सूत्रावरून स्पष्ट समजेल. ज्या सूत्राचा विचार चालला आहे तें पूर्वपक्षसूत्र आहे. त्याचा भाष्यकार दोन प्रकारें अर्थ करतात. त्यांत मुख्य विचार करण्याजोगीं पदें तीन आहेत—प्रयोगचोद-

include all the individual things of the same species. And so long as all things are not observed, it cannot be said that the whole species is observed, and that the knowledge of a generality is accurately correct. Hence a form consisting in the knowledge of a generality is independent, real, and eternal. An individual thing is known and recognized by means of such a form. An illustration will throw light on this subject. The statement that an animal is to be killed at the time of a sacrifice and its flesh is to be offered to the God—fire—is to be considered. In interpreting it, there are two alternatives :—is the animal mentioned a particular individual animal ? or is it the mention of a form ? If the former alternative be accepted, no animal can be killed when the animal secured runs away. If the latter alternative be accepted, no animal can be caught and killed, as a form is not visible and has no material existence. Thus there is a hitch in accepting either alternative. Yet the Mîmânsakas hold that the animal mentioned represents a form. The next sûtra will elucidate their doctrine. The sûtra under examination is the statement made by an opponent. Commentators interpret it in two ways. In the original Sanskrita sûtra, there are three terms deserving particular attention. Prayoga-chodanâ-bhâva, Arthaikatva, and Avibhâga. Prayoga means a sacrificial work, Chodanâ, injunction or explanation, Bhâva, existence. Prayoga-chodanâ-bhâvât is the first part of the sûtra and means "from the existence of the explanation of a sacrificial

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अद्रव्यशब्दत्वात् ॥ ३१ ॥ (पू० २)

पदानि । (अर्थैकत्वम्) अ-द्रव्य-शब्दत्वात् ॥

पदार्थः । द्रव्यवाचकः शब्दः=द्रव्यशब्दः । नास्ति द्रव्यशब्दो यस्मिंस्तत्=अद्रव्यशब्दं । तस्य भावः=तत्त्वम् । तस्मात्=अद्रव्यशब्दत्वात् ॥

वाक्यार्थः । अर्थैकत्वं वर्त्तते । कुतः । द्रव्याश्रयशब्दाभावात् ॥

भावार्थः । अर्थैकत्वेन शब्दानामनेकार्थत्वं नास्तीति दर्शितम् । अनेकार्थत्वं त्वाकृतित्वं ज्ञापयति । गौः गौः गौः इत्युक्तं चेत् प्रत्येकस्मिन् गोशब्देऽर्थः प्रतीयते । अतोसकृदुच्चारितानां गोपदानामेक एवार्थः । सोऽर्थो व्यक्तिमाश्रयाति । कुतः । षड् देया द्वादश देयाश्चतुर्विंशतिर्देया इत्युक्तं चेत् षडादिभिः संख्याभिर्न ह्याकृतिर्युज्यते । परंतु कश्चिदपि द्रव्यविशेषो देय इत्यपेक्षितम् ॥

नाभावात्–हें प्रथम पद आहे. त्याचा अर्थ कर्माचें विधान असल्यामुळें. अर्थैकत्व हें दुसरें पद आहे. त्याचा अर्थ शब्दांचा एक अर्थ. अविभागात् हें तिसरें पद आहे. त्याचा अर्थ विभाग नसल्यामुळें. अशीं पदें पाडल्यानें जसा आम्ही सूत्रार्थ केला आहे, तसाच होतो. कर्म कसें करावें, हें कळतें. कशानें कळतें? अशी आकांक्षा उत्पन्न झाली कीं प्राकृत भाषेंतील अपभ्रंशपदानें कळतें, म्हणून अपभ्रंशामध्यें आणि मूळ संस्कृतामध्यें योग्यतेचा भेद नाहीं. असा पूर्वपक्ष काढण्याचा हेतु काय, हें सांगितलें पाहिजे. बुद्धिवादी असें म्हणूं लागले होते कीं वे-

work." The second part of the sûtra is *arthaikatva* which means "the unity of signification." The third part is *avibhâgât* which means "from the absence of division." When the sûtra is divided into these three parts, it is interpreted as we have translated. Thus the way in which a work is to be performed is determined by the signification. The question is:—the signification of what? Of the corrupted forms of Sanskrita words as the former are used in the Prâkrita dialects. Hence between corruptions and original Sanskrita words, there is no distinction as based upon their purity or correctness. What is the purpose

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३१. वस्तूचा आश्रय करून शब्द रहात नाहीं, म्हणून (आकृति आणि व्यक्ति यांचा अर्थ एकच.) (पू० २.)

31. (There is the identity of a form and an individuality), because a name is independent of a thing. (2. Statement of the opponent.)

दांतीलच मूळ संस्कृत शब्दाची मोठी प्रतिष्ठा नाहीं, कोणत्याहि रीतीनें अर्थ समजला म्हणजे झालें. अपभ्रंशांनींहि अर्थ समजतो, म्हणून अपभ्रंशांची आणि वैदिकपदांची प्रतिष्ठा सारखीच आहे. अविभाग म्हणजे ऐक्य. असा पूर्वपक्ष दोनहजार वर्षांपूर्वी निघाला होता, आणि मराठीसारख्या प्राकृत भाषेची योग्यता, आणि वेदाच्या भाषेची योग्यता सारखी असें म्हणणें पडलें, ही गोष्ट वाचकांनीं लक्षांत ठेवण्याजोगी आहे. पुनः सूत्रांतील प्रयोगचोदनाभाव याची प्रयोग, चोदना आणि अभाव अशीं पदें पाडून (आकृत्यर्थ घेतला असतां) कर्मविधान संभवत नाहीं म्हणून आकृत्यर्थ तोच व्यक्त्यर्थ (अर्थैक्य), कारण कर्मप्रसंगीं आकृति आणि व्यक्ति यांत भेद करतां येत नाहीं. असा भाष्यकार सूत्राचा दुसरा अर्थ करतात. एका सूत्राचे दोन अर्थ होतात ही गोष्ट आध्यात्मिक इतिहासदृष्ट्या लक्षांत ठेवण्याजोगी आहे. कारण एकाच ग्रंथापासून परस्पराशीं विरुद्ध अशीं दोन मतें भाष्यकार काढतात. या गोष्टीपासून प्राचीन मताचें अवलंबन करण्याचा आमचे लोकांचा किती झोंक आहे हें सिद्ध होतें.

३१ उदाहरणावरून स्पष्ट समजेल. दहा

of such a statement of the opponent? Rationalists had declared that the sacred words of the Vedas had not any exclusive title to purity, and that the idea conveyed by words was important, no matter by what words it was done. As the corruptions or words in the Prâkrita dialects conveyed ideas, there could be no distinction between sacred and profane words: they were equally pure and equally important. Avibhâga means the absence of division, that is, identity. This declaration was made in India at least 2000 years ago, and Prâkrita dialects like Marâthî were elevated to the importance of the language of the Vedas. This fact in the history of Indian philosophy deserves attention. Again, the first part of the sûtra is divided into Prayoga, Chodanâ, and Abhâva, and is interpreted into, "the absence of a sacrificial injunction" as determined by a word signifying a form. Hence the unity of signification "consists in the identity of a form and an individuality," because no distinction can be made between a form and an individuality at the time of a sacrifice. This is the second interpretation of the same sûtra. The fact that the same sûtra admits of two interpretations is important in the history of Indian philosophy, for often two systems of thought

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अन्यदर्शनाच्च ॥ ३२ ॥ (पू० ३.)

पदानि । (अर्थैकत्वम्) अन्य-दर्शनात्, च ॥

पदार्थः । अन्यस्य दर्शनम्=अन्यदर्शनम् । तस्मात्=अन्यदर्शनात् । च=पुनः ॥

वाक्यार्थः । पुनः । गोसदृशपदानां व्यक्तिवाचकता । कुतः । अन्यस्य (द्रव्यस्य) प्राप्तेः ॥

भावार्थः । यदि किंचिद् द्रव्यं नश्येत् तर्हि तद्धर्ममन्यद् द्रव्यं प्राप्नुयात् । पूर्वोक्तद्रव्यस्याकृतिवाचकता भवेच् चेत् तस्य नाशे कुतः पुनः प्राप्तिः* ॥

आकृतिस्तु क्रियार्थत्वात् ॥ ३३ ॥ (सि०)

पदानि । (अर्थैकत्वम्) आकृतिः, तु, क्रिया—अर्थत्वात् ॥

पदार्थः । आकृतिः=(त्रिंशसूत्रं द्रष्टव्यम्) । तु=न । क्रियार्थः=क्रियायाः प्रयोजनम् । तस्य भावः=तत्त्वम् । तस्मात्=क्रियार्थत्वात् ॥

वाक्यार्थः । न। क्रियाप्रयोजनत्वादाकृतिः ॥

भावार्थः । आकृतिः शब्दार्थः । यदि व्यक्तिः शब्दार्थो भवेद् व्यक्त्यंतरे न प्रयुज्येत । अथ व्यक्त्यंतरे प्रयुज्यते न तर्हि व्यक्तिः शब्दार्थः । इति शबरः ॥

---

* अत्र शबर उदाहरति यदि पशुरुपाकृतः पलायेत । अन्यं तद्वर्णं तद्वयसमालभेत इति । यद्याकृतिवचनः शब्दो भवेदन्यस्यालंभो नोपपद्येत । अन्यस्यापि पशुद्रव्यस्य सैवाकृतिस्तस्माद् व्यक्तिवचन इति ॥

द्यावेत, वीस द्यावेत, असें म्हटलें असतां आकृतीचा बोध होत नाहीं, परंतु झाला तर कांहीं व्यक्तीचाच बोध होतो. म्हणून शब्द आकृतिवाचक नाहींत. सूत्रांत "अद्रव्यशब्द" म्हणून एक पद आहे.

and belief diametrically opposed to each other are founded on the same philosophical treatise,—a circumstance which illustrates an important phase of Indian conservatism.

31. An illustration will ex-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३२. आणि दुसरे स्थळीं दिसून येतें, म्हणून (आकृति आणि व्यक्ति यांचा अर्थ एकच.) (पू० ३.)

३३. नव्हे (शब्द योजण्याचा हेतु) क्रिया आहे, म्हणून (शब्दाचा अर्थ) आकृति आहे. (सि०)

32. (There is the identity of a form and an individuality) because another object is seen. (3. Statement of the opponent.)

33. No, because an action is the purpose (for which names or words are used), (the names represent) a form. (Final statement.)

त्याचा अर्थ कोणत्याहि वस्तूचा आणि शब्दाचा नित्यसंबंध नाहीं.

३२. उदाहरणावरून सूत्रार्थ स्पष्ट समजेल. यज्ञाकरतां सिद्ध केलेला पशु पळून गेला तर त्याच रंगाचा, त्याच वयाचा दुसरा पशु आणतां येतो. म्हणून पशु हें नांव आकृतिवाचक नाहीं. कारण एकसारख्या दोन आकृति कधींच नसतात जर नांव आकृतिवाचक असलें तर एका आकृतीचा नाश झाल्यावर तशीच दुसरी आकृति कोठून आणतां येईल?

३३. सामान्य शब्दाचा अर्थ आकृति कीं व्यक्ति? ह्या वादविवादाचा या सूत्रानें आचार्य निर्णय करतात. शब्दाचा अर्थ व्यक्ति केला तर घोडा आणा अशा प्रकारच्या सर्व वाक्यांचा अर्थच होणार नाहीं. कारण एकच घोडा आहे असा शब्दार्थ होईल. आणि तो घोडा नसला म्हणजे आणणें ही क्रियाच संभवणार नाहीं. पुनः कोणी अशी कोटी काढील कीं हा मनुष्य मद्रासी आहे असें म्हटलें असतां मद्रास शहराचें ज्ञान होऊन तेथें

plain the sûtra. When it is said that twenty or thirty are to be given, no form is meant. At any rate, the numbers refer to individual things. A name, therefore, does not express a form. The term Adravyashabda is used in the original Sanskrita sútra. It signifies the absence of a thing and is interpreted into the statement that there is no permanent relation between a thing and a name.

32. An illustration will explain the sútra. When an animal prepared for a sacrifice runs away, another animal of the same colour, and of the same age can be procured and substituted for it. Therefore, the name of an animal is not expressive of a form, for there cannot be two identical forms. Hence one animal having disappeared, another could not be substituted for it, if the name of an animal expressed a form.

33. Jaimini concludes by means of this sûtra the controversy whether a common or generic name represents a form or an individuality. If a name represented an individuality only, the statement such as "bring a horse"

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

न क्रिया स्यादिति चेदर्थांतरे विधानं न द्रव्यमिति चेत् ॥ ३४ ॥ (उ० १.)

पदानि । न, क्रिया, स्यात्, इति, चेत्, अर्थ-अन्तरे, विधानम्, न द्रव्यम्, इति, चेत् ॥

पदार्थः स्पष्टः ॥

वाक्यार्थः । न क्रिया संभवेदिति चेत् । पुनः । अर्थांतरे विधानं न द्रव्यमिति चेत् ॥

भावार्थः । अनेन सूत्रेणोत्तरसूत्रमवतारयति सूत्रकारः । अत्र द्वे दले स्तः । न क्रिया स्यादिति चेदित्येकं । अर्थांतरे विधानं न द्रव्यमिति चेदित्यन्यत् । एतयोर्द्वयोर्दलयोर्द्वितीयतृतीयपूर्वपक्षौ परिहरिष्येते ॥

तदर्थत्वात्प्रयोगस्याविभागः ॥ ३५ ॥ (उ० २.)

पदानि । तत्-अर्थत्वात्, प्रयोगस्य, अ-विभागः ॥

पदार्थः । तदर्थत्वात्=आकृतिप्रयोजनत्वात् । प्रयोगस्य=क्रियानुष्ठानस्य ॥

वाक्यार्थः । शब्दस्याकृत्यर्थत्वादनुष्ठानस्य विभागो न भवति ॥

भावार्थः । शब्दा आकृतिवचनाः । क्रियानुष्ठानसमये व्यक्तेराकृत्यासंबंधः । तेनानुष्ठानमवकल्पते । व्यक्तौ प्रयुक्तायामाकृतिः संबध्यते ॥

एवं 'षड् देया गावो दक्षिणा'–इति दक्षिणाद्रव्ये संख्ययाऽप्रयोक्तव्ये गाव इत्याकृतिवचनो विशेषकः । तथा 'अन्यं'–इति विनष्टस्य प्रतिनिधेरन्यत्वसंबंधः, तत्र पशुशब्द आकृतिवचनः, आकृत्या विशेक्ष्यतीति । इति शबरः ॥

॥ प्रथमाध्यायस्य तृतीयः पादः समाप्तः ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३४. क्रिया नाहीं म्हटलें तर; [आणि] दुसऱ्या वस्तूविषयीं [जें] सांगितलें [तें] द्रव्य नाहीं म्हटलें तर. [उ० १.]

३५. [शब्दाचा] अर्थ आकृति असल्यामुळें कर्मानुष्ठानाचा विभाग होत नाहीं. [उ०२]

34. If no action can be implied, (and) if the other object represented (by a name) be not a thing, then—(1. Reply.)

35. Because a name represents a form, the performance of an action cannot be divided. [2. Reply.]

राहणारा असें विशिष्ट ज्ञान होतें. तसेंच घोडा असें म्हटलें म्हणजे आकृतीचें ज्ञान होऊन तद्विशिष्ट व्यक्तीचें ज्ञान होतें, असा प्रकार नाहीं. कारण मद्रासी या शब्दाचे जसे दोन भाग मानतां येतात—एक भाग मद्रास आणि दुसरा ईप्रत्यय, तसें घोडा या पदाचे दोन भाग मानतां येत नाहींत,—एका भागाचा अर्थ व्यक्ति आणि दुसऱ्या भागाचा अर्थ आकृति. म्हणून आकृतिविशिष्ट व्यक्तीचें ज्ञान शब्दापासून होत नाहीं. पण यावर असें कोणी म्हणेल कीं घोडा म्हटलें कीं दोन विषयांचें ज्ञान होतें—एक घोडेपणा आणि दुसरें घोडा. या दोहोंमध्यें विशेषण विशेष्यभाव मानतां येईल. अशा कोट्या शबरस्वामींनीं आपल्या भाष्यांत केल्या आहेत. जैमिनीचा सिद्धांत इतकाच कीं शब्द आकृतिवाचक आहेत.

३४. या सूत्राचीं दोन दळें पडतात. त्यांच्या योगानें पुढील सूत्राचें अवतरण होतें. या दोन दळांत दोन शंका घेतल्या आहेत. पहिल्या दळामध्यें अशी शंका घेतली आहे कीं शब्दार्थ व्यक्ति आहे असें म्हट-

would mean nothing, for the name represents an individual horse, that is, the theory of a name expressing individuality being accepted, it is implied that there is only one horse corresponding to the one which the name—horse—expresses. When such a horse is not to be had, the action of bringing a horse is impossible. Again, it may be said that when a man is called a Londoner, the last name conveys the notion of a man as well as that of the town to which he belongs. In like manner, when the name—horse—is used, it conveys the notion of an individuality as well as a form. This is not true, because as the name Londoner consists of two parts—*London* and *er*, so the name—horse—can not be divided into two parts—the one representing an individuality, and the other, a form. Therefore, a name does not convey a compound notion representing a form and an individuality. Again, if it be said that the name—horse—conveys two notions—that of an individual horse and that of a generic horse, then it may be admitted that there are two notions—the one being a quality of the

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लें तर क्रिया संभवत नाहीं असें कसें? पुनः दुसरी शंका अशी आहे कीं शब्दाचा अर्थ व्यक्ति असा केला असतां ती व्यक्ति नाहींशी झाल्यावर दुसरी एखादी व्यक्ति घेतां येते, हें कसें? या दोन दळांच्या योगानें मागील दुसऱ्या आणि तिसऱ्या पूर्वपक्षांचा जैमिनीनें उपसंहार केला आहे, आणि त्यांचें एकदम उत्तर पुढील सूत्रीं दिलें आहे. वरील सूत्राची पदव्यवस्था, आणि अर्थव्यवस्था मनाजोगी करतां येत नाहीं असें आम्हांस वाटतें.

३५. शब्दाचा अर्थ आकृति आहे. गाय असें म्हटलें असतां कोणी एका विशेष गाईचें ज्ञान होत नाहीं, परंतु सामान्य गाईचें ज्ञान होतें. आणि गाय आण असें म्हटलें म्हणजे व्यक्तीचा आणि आकृतीचा संबंध होतो, आणि तेणेंकरून गाय आणणें ही क्रिया घडते. म्हणून शब्दाची क्रियासंबंधानें आकृतिवाचकता स्पष्ट होते, असें जैमिनीचें मत आहे

other—expressed by a name. Such points are discussed by Shabara in his commentary. Jaimini's last statement is that a name conveys the notion of a form.

34. The sûtra consists of two parts which introduce the next sûtra. The two parts raise two separate objections. The first part asks if the sense of a word represented an individuality, how could an action be impossible? The second part again asks—how could a thing be substituted for a thing that is destroyed, if a name represented an individuality only? By means of these two parts, the second and the third statements made by the opponent in the 31st and 32nd sûtras are summarized, and re-stated. The two objections are removed at once in the next sûtra. We have not been able to analyze and explain the sûtra under consideration to our satisfaction.

35. A name or a word expresses a form. When the word —Cow—is pronounced, no individual cow is referred to; but a common or generic notion of a cow is conveyed. When, however, the sentence—Bring a cow—is used, the relation between a form and an individuality is expressed. Hence the action of bringing a cow is performed. The power of a name conveying the notion of a form, is therefore, perceived, when the name is combined with an action. This is the doctrine of Jaimini.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपसंहार.

हल्लीं लोकांमध्यें संहिता, ब्राम्हण, उपनिषदें, कल्पसूत्रें, स्मृति, पुराणें अशीं अनेक पुस्तकें शास्त्रदृष्टया प्रमाण मानण्याची रीति पडली आहे. ही रीति कितपत शुद्ध आहे, हा विचार आतां केव्हां केव्हां लोक करितात. परंतु बुद्धिवाद करणाऱ्या आणि जे प्रचार चालू आहेत तेच योग्य आहेतअसें म्हणणाऱ्या लोकांत जैमिनिच्या वेळीं वादविवाद होत असे. मागील पादाच्या उपसंहारांत ह्या दुफळीचें वर्णन केलें आहे. या पादाच्या उपसंहारांत ह्या वादविवादाचा आकार बदलून बुद्धिवाद करणारांनीं असें अंगीकारिलें कीं कां होईना, शाब्द प्रमाण ग्राह्य आहे. परतु शाब्दप्रमाणाच्या योगानें एक श्रुतिच काय ती मानण्यास योग्य होईल, असें जरी म्हटलें तरी संहितादि आणि पुराणान्त सर्व ग्रंथ मान्य आहेत असें म्हणण्यास अडचण आहे. अलीकडे लोकांत पुराणोक्त आचार फार चालतात, परंतु जैमिनीनें पुराणांचा विचार मुळींच केला नाहीं. पुष्कळ व्रतादि कर्मं पुराणांत वर्णिलीं आहेत. हीं पुराणोक्त कर्मं गाळलीं तर लोकांना पुष्कळ प्रसिद्ध चाली सोडाव्या लागतील. अशी अलीकडे पुराणांची योग्यता असतां हि पुराणांविषयीं जैमिनीच्या मीमांसेंत एक चकार शब्दहि नाहीं, ही गोष्ट वाचकांनीं लक्षांत ठेवण्याजोगी आहे. पुराणांपेक्षां स्मृतींची योग्यता मोठी आहे, त्यांविषयीं जैमिनि काय म्हणतो हें पाहूं या. स्मृति ह्या श्रुतींपेक्षां तर दुर्बळ खऱ्याच, परंतु बुद्धिवाद करणा-

SUMMARY.

Now-a-days, the people generally believe in all works of antiquity such as the Sanhitâs, the Brâhma*n*as, the Upanisads, the Kalpa-sûtras, the Sm*r*itis and the Purâ*n*as, the injunctions of which are considered to be religiously authoritative. But they have also begun to scrutinize, though very rarely, the grounds on which the authority of the works is founded. Controversies between rationalists and dogmatists,—the two schools of thinkers described in the summary of the last chapter,—were, however, frequent at the time of Jaimini. The rationalists, sometimes shifting their grounds of opposition, admitted for the sake of argument that the evidence of testimony was acceptible, and declared that though the authority of the works known as Shrutis might be established by testimony, yet the other works of antiquity could not be easily recognized as authoritative. Now-a-days, though the Purâ*n*as which diffusely describe ceremonies and daily rites, mostly regulate the religious practices of the people, yet Jaimini does not even once mention them. The people of India would have to omit many rites and ceremonies now carefully performed, if the Purâ*n*as be not recognized as authoritative. The omission of the Purâ*n*as from the exhuastive work of Jaimini is significant when the all-absorbing importance of the Purâ*n*as at the present time is considered. The declarations of Jaimini on the subject of the Sm*r*itis, the authority of which is

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रे ज्या कोट्या करीत, त्या कोट्यांच्या योगानें जैमिनीच्या पक्षास असें म्हणावें लागलें कीं, ज्या ज्या स्मृतिवचनांत आपमतलबीपणा अढळतो तीं तीं स्मृतिवचनें सर्वथैव अयोग्य, आणि अमान्य आहेत. इतकी संधि बुद्धिवाद करणाऱ्यांला मिळाली, तरी पुरे. जैमिनीच्या पक्षाला कर्मकांडाचा आणि आचारादिकांचा अभिमान मोठा. अभिमानी पंडितांनीं असें पत्करिलें कीं आपमतलबीपणामुळें स्मृतींतील कांहीं अंश त्याज्य आहेत. एवढ्यानेंच बुद्धिवाद करणाऱ्यांचें वर्चस्व ठरलें. अस्तु. जैमिनीच्या पूर्वीच आचार्यांचा लोकांच्या मनावर चांगला पगडा बसला होता, यांत आश्चर्य नाहीं. पाणिनीसारखे वैयाकरण आचार्यांत गणले जात होते. आचार्यांनीं केलेली व्यवस्था, अनुगम, सूक्ष्म विचार, ब्रम्हनिरूपण, आणि नाना प्रकारच्या उपपत्ति ह्या प्रबळ असल्यामुळें आचार्यांची योग्यता मोठी असें पतंजलीसारखे पंडित मानतात. पतञ्जलि आपल्या व्याकरणमहाभाष्यांत वारंवार असें म्हणतो कीं "छंदोवत् सूत्राणि." याचा अर्थ जशी संहितादि ग्रथांची योग्यता, तशीच आचार्यांच्या मूळ सूत्रांची योग्यता. जैमिनीच्या वेळीं असेंहि म्हणण्याचा प्रचार पडला होता कीं आचार्यांचें वचन म्हटलें म्हणजे खरें. आचार्य कधींहि अप्रमाण प्रतिपादन करणार नाहींत, असें सर्व लोकांच्या मनांत पक्कें बिंबलें होतें. आचार्यांनीं जे ग्रंथ रचले त्यांत कल्पसूत्रें मुख्य आहेत. हीं कल्पसूत्रें वेदांगांत मोडून तीं श्रौतसूत्रें या नांवानें

essentially greater than that of the Purâ*n*as, deserve attention. Though the Sm*r*itis are over-ruled by the Shrutis, yet their authority was recognized by the school of Jaimini, whom the arguments of the rationalists compelled to admit that those rites and ceremonies in the Sm*r*itis which encourage selfishness of the sacrificers, and which sanction unreasonable gifts to them are to be condemned and abandoned. The rationalists cannot but be gratified by such an admission. The school of Jaimini is the staunch advocate of the doctrines of spiritual efficacy of *works*. Now, when advocates made the admission that parts of the Sm*r*itis were to be abandoned, it is plain that the rationalists triumphed over them. Suffice it to remark that it is not wonderful that even before Jaimini rationalistic Âchâryas should have established their influence over the minds of the people, for they included in their number such grammarians as Pâ*n*ini, and on account of their logical adjustment of principles, their grasping generalizations, their nice distinctions, their dissertations on the nature of *essence*, and their varied theories for the explanation of phenomena observed, great scholars like Patanjali admire the superior intellectual powers of the Âchâryas. Patanjali often observes in his Mahâbhâ*s*ya that the sûtras composed by the Âchâryas are as if they were revealed. It was customary at the time of Jaimini to say that the statements of the Âchâryas were very trust-worthy, for the people firmly believed that they were never guilty of enunciating

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसिद्ध आहेत. या कल्पसूत्रांची योग्यता काय समजायाची, असा वाद सहजच उत्पन्न झाला. जैमिनीचें म्हणणें आहे कीं कल्पसूत्रें प्रमाण नाहींत, कारण त्यांत असत् नियम आहेत. (१.३, १२.) सूत्र पहा. असत् नियम तें काय? असें विचारल्यास भाष्यकार असें म्हणतात कीं कल्पसूत्रांस वेदांसारखे स्वर नाहींत. आतां उपनिषदांची योग्यता काय समजावयाची? जैमिनीनें उपनिषदांचें निराळें वर्णन केलें नाहीं, आणि कुष्मांडादि होमांचे आणि कांहीं व्रतांचें वर्णन उपनिषदांत आहे. तेव्हां कर्मकांडाशीं उपनिषदांचा संबंध असून जैमिनीनें त्यांचें वर्णन कां केलें नाहीं? याचें एवढेंच उत्तर आहे कीं ब्राम्हणग्रंथांतच उपनिषदांचा अंतर्भाव करतात, आणि ब्राम्हणग्रंथांविषयीं जैमिनीचें काय मत आहे तें त्यानें (१.२,५३.) सूत्रीं सांगितलें आहे. ब्राम्हणग्रंथांत मन्त्रांचा अनुवाद केला आहे. आतां मन्त्र अवशिष्ट राहिले. मन्त्र म्हणजे ऋक्संहिता आणि यजुःसंहिता. यांचा विचार (२.१.) पादांत केला आहे. आम्ही जसें वर्णन केलें आहे, अशी वास्तविक ग्रंथव्यवस्था असावी, कारण जैमिनीनें असेंच वर्णन केलें आहे. जैमिनीचें म्हणणें कां मानावें? जैमिनि शिष्ट आहे म्हणून. या विचाराचें पर्यवसान शिष्टाचार ध्यावा असें सध्यां झालें आहे. आतां आर्य लोकांच्या प्राचीन इतिहासावरून याविषयीं विचार केला तर बरें. धर्म म्हणजे काय याचें वर्णन करतांना व्याकरणमहाभाष्यांत

any sophism. Among the works of the Âchâryas, the Kalpa-sûtras, being reckoned as limbs of the Vedas and known as Shrouta-sûtras, occupy an important place. Now a question naturally arose—Are the Kalpa-sûtras necessarily acceptible? and are they necessarily authoritative? Jaimini distinctly states that the Kalpa-sûtras are not authoritative for they partake of false rules—Vide (I. 3, 12.) In reply to the question what are these false rules? the commentators remark that the Kalpa-sûtras like the Vedas are not accented. The next question is—are the Âra*n*yakas necessarily authoritative? Though Jaimini does not distinctly refer to them, yet such rites—as the purificatory sacrifice called the Kusmâ*n*da are described only in the Âra*n*yakas. Though they best inculcate sacrifices and rites, the special subjects of which authors like Jaimini treat, yet he does not speak of them. The question is natural—how is this? The reply is that the Âra*n*yakas are considered to be the essential parts of the works called Brâhma*n*as. Jaimini propounds his views of the authority of the Brâhma*n*as in his sûtra (I. 2, 53.) The Brâhma*n*as are works which reproduce the Mantras which alone are to be considered now.

The Mantras are the contents of the *R*ik and Yajus-sanhitâs. Jaimini examines these in (1. 2.) The authority of religious works ought to be adjusted as we have stated, for Jaimini settles their claims to authoritativeness in the same way. But why are the statements of Jaimini himself to

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पतञ्जलि असें जरी म्हणतो कीं ऋषींचे जे सांप्रदाय तेच धर्म, तरी शिष्टाचार घ्यावा असें त्यांचें मत आहे. शिष्टाचार घेतला पाहिजे, कारण शिष्ट ज्याप्रमाणें अर्थ करतात त्याप्रमाणें न केला तर धरबंध रहाणार नाहीं. या शिष्टांचें (१.३,१.)सूत्रीं विशेष वर्णन केलें आहे. आणि अजून विलायतेसारख्या सुधारलेल्या देशांत शिष्टांची योग्यता किती आहे याविषयीं वादविवाद होतो. आणि या वादविवादांत ग्लाड्स्तन्सारखे विद्वान् राजकारस्थानी पडतात, ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे. शिष्ट जें म्हणतील तेंच घ्यावें. मग प्रमाणाची योग्यता काय? प्रमाणाची योग्यता मोठी आहे. सप्रमाण युक्तिवाद आणि शिष्टाचार यांमधील तारतम्य काय हें सांगतांना जैमिनि असें स्पष्ट म्हणतो कीं म्लेच्छादिकांचा आचार सप्रमाण असला म्हणजे तो अंगीकारावा. जें जें शिष्ट म्हणतील तें तेंच शिरसामान्य करावें असा अर्थ नाहीं. युक्ति, प्रयुक्ति, प्रमाण यांच्या योगानें पूर्ण विचार करून आणि शिष्टाचाराकडे लक्ष पोंहचवून जो निर्णय करावयाचा तो करावा. या संबंधानें या पादामध्यें शास्त्रशब्दाचे दोन अर्थ आढळतात, ते विचार करण्याजोगे आहेत. परंपरेनें आलेले आचारच अथवा मतेंच कायतें शास्त्र असा एक अर्थ आहे. जैमिनीच्या पक्षाचे पंडित असा अर्थ करतात. बुद्धिवाद करणारे शास्त्रशब्दाचा दुसरा अर्थ करतात. युक्तिप्रयुक्तीला धरून सबळ प्रमाणावरून जी व्यवस्था करतां येते, तिचें नांव शास्त्र.

be accepted? Because Jaimini is an educated scholar: he is a *shista*. Thus the last conclusion in the mean-time, is that "authority in matters of opinion" is supreme. Let us seek a little light from the history of the ancient Âryas on the vexed question. Though Patanjali asserts that the customs of the *Ris*is, the seers of the Mantras, are authoritative, yet he admits that the power of the educated (Shi*s*tas) is great. It is necessary to recognize the authority of the educated or different interpretations of the same text would produce much confusion and unsettle the notions of right and wrong. We have particularly described the educated in (I. 3, 1.) The question of the authority of the educated is interesting; for even in Europe civilized as it is, such questions are mooted, and controversies—with which distinguished statesmen like Gladstone are connected—take place. Now if the authority of the educated (Shi*s*tas) be recognized, what is the propriety of evidence or of proof? The importance of evidence or proof is great. In settling the relative claims of authority as opposed to independent logical investigation, Jaimini admits that a custom of barbarians like the Mlechchhas when based on proper and sufficient evidence, deserves to be adopted. Hence it is not true that every statement of the Shi*s*tas is to be implicitly accepted without any independent examination. But the wild spirit of independent investigation is to be moderated by attention to the customs as interpreted and understood by the Shi*s*tas, the educated leaders

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्याकरणमहाभाष्यांत पतञ्जलि असें म्हणतो कीं "शास्त्रं नाम व्यवस्था," याचा अर्थ शास्त्र म्हणजे व्यवस्था. वादविवाद करतांना जैमिनीला बुद्धिवाद करणारांचें म्हणणें पुष्कळवेळ पत्करावें लागतें. आणि बुद्धिवादाच्या समोर होळीसारखे देशाचार मुळींच टिकत नाहींत, असें सिद्ध होऊन जैमिनीनें निर्णय केला आहे कीं जे जे धर्म आचरायाचे, ते ते सर्व लोकांनीं आचरावे, अथवा मुळींच त्यांचा त्याग करावा. परंतु देशाचार आहेत असें म्हणून कांहीं कांहीं आचार चालतात, ते अगदीं अयोग्य आहेत. आणखी प्राकृत भाषेची योग्यता काय? हा हि विचार या पादांत झाला आहे. बुद्धिवाद करणारांचें म्हणणें कोणीकडून अर्थ समजला म्हणजे झालें, आणि केवळ शिष्टाचारास अनुसरून चालणारांचें म्हणणें असें कीं संस्कृत शुद्ध पदेंच योजिलीं पाहिजेत. बौद्ध लोक पाली व मागधी भाषांची शास्त्रविचारांत योजना करूं लागले होते. या संबंधानें आणि इतिहासदृष्ट्या या वादविवादाची योग्यता मोठी आहे. पुढें शब्दाचा जो अर्थ होतो तो आकृतिवाचक समजावा कीं व्यक्तिवाचक समजावा असा सूक्ष्म विचार उत्पन्न झाला. व्याकरणमहाभाष्यांत पतञ्जलीनें मोठ्या बारिक नजरेनें वारंवार हा विचार केला आहे. जोंपर्यंत भाषेची फोड झाली नाहीं, आणि शब्दाच्या अर्थशक्तीचा पूर्ण विचार झाला नाहीं तोंपर्यंत व्यावहारिक सूक्ष्म शास्त्रविचार करतां येतील असें म्हणणें व्यर्थ आहे. म्हणून व्यवहारदृ-

of society. Thus the spirit of conservatism or dogmatism is reconciled with that of reform or rationalism. In the course of a controversy between dogmatism and rationalism, the term Shâstra is used in two senses specially deserving to be examined. All the customs established and followed constitute the Shâstra or a code of social rules. This is the sense in which the term is based by the school of Jaimini. Rationalists, on the contrary, mean by it the adjustment of a social question in conformity with common sense and logic. The latter view of the signification of the term Shâstra is propounded by Patanjali. Jaimini is often compelled in the course of a controversy to yield to his rationalistic opponents, the fire of whose logic such local customs as the Ho*l*i could not stand. Jaimini condemns local customs and states that every social custom is to be followed either universally or to be totally abandoned; but that local customs, no matter what they may be, are every way improper. Again, the subject of the propriety of the vernacular dialects is discussed in this chapter. The rationalists stated that the sense conveyed by words was important, no matter to what language the words themselves belonged. The dogmatists, on the contrary, asserted that it was necessary that pure Sansk*r*ita words should be exclusively used. In religious discourses and rites, the Bouddhas freely used a vernacular dialect called Pâli. This controversy is historically important. The next question discussed in

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ष्ट्या देखील शब्दाचा अर्थ आकृति करावा कीं व्यक्ति करावा, असा विचार करणें अवश्य आहे. आणि चारपांचशें वर्षांपूर्वी युरोपांतील पंडितलोक मोठ्या आवेशानें हा विचार करीत, म्हणूनच आज युरोपी विद्या सर्व प्रकारें प्रबळ झाली आहे. आणि अशा विचारपद्धतीचा इतिहास हल्लींच्या युरोपी पंडितास चांगला ठाऊक असतो, म्हणून त्यांच्या विचारांत सामर्थ्य, पोक्तपणा, दूरदृष्टि आणि उपयुक्तता हे गुण अढळतात. यावरून निदान इतिहासदृष्ट्या तरी जैमिन्यादिकांचें म्हणणें काय आहे हें समजून घेणें हा आमचा धर्म आहे.

this chapter is—what is the power of the sense of a word? Does it convey the knowledge of a form as contradistinguished from the knowledge of an individuality? This controversy, in one sense, forms the back-bone of most of the discussions of the great commentary of Patanjali. We will conclude this summary of the different topics discussed by Jaimini in the third chapter with the remark that it is impossible to discuss intricate practical or philosophical questions so long as such subjects as the power of the sense of a term are not discussed and settled and so long as lingual forms are not systematically and assiduously analyzed. Hence even from a practical point of veiw, the abstruse discussion whether the sense of a term represents a form or an individuality is interesting and important. About four hundred years ago, such questions were vehemently discussed in Europe. These discussions, we believe, originated a spirit of positive investigation which has already achieved great results. Again, European scientific scholars possess a critical knowledge of the history of philosophy—a qualification which imparts to their thoughts a power, a depth, an enlarged vision, and a practicality, which characterize the scientific spirit of the 19th century. Hence it is our duty to know what the veiws of thinkers like Jaimini are, at least more for the purpose of history than for that of religion.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

॥ अथ प्रथमाध्याये चतुर्थः पादः ॥

अथोद्भिदादिशब्दानां यागनामताऽधिकरणम् ॥

उक्तं समाम्नायैदमर्थ्यं तस्मात् सर्वं तदर्थं स्यात् ॥ १ ॥ (पू०)

पदानि । उक्तं, समाम्नाय–ऐदमर्थ्यं, तस्मात्, सर्वं, तदर्थं, स्यात् ॥

पदार्थः । उक्तं (द्वितीयपादे प्रतिपादितमित्यर्थः) । समाम्नायस्य ऐदमर्थ्यं=समाम्नायैदमर्थ्यं । समाम्नायस्तु श्रुतिः । अयमर्थो यस्य स=इदमर्थः । तस्य भावः=ऐदमर्थ्यं । तदर्थं=तस्मै इदं ॥

वाक्यार्थः । श्रुतेर्यागार्थत्वं प्रतिपादितं तस्मात् सर्वं यागार्थं भवेत् ॥

भावार्थः । वाक्यमात्रं विधित्वेनार्थवादत्वेन गुणवादत्वेन मंत्रत्वेन च वर्णितं । अत एव यद् यद् वेदे प्राप्नोति तत् तद् विधित्वमर्थवादत्वं गुणवादत्वं मंत्रत्वं च प्रकाशयति । अत उद्भिदा यजेतेत्यस्मिन् स्थले उद्भिदा द्रव्येण यागं कुर्यादित्याकारकं विधानं प्राप्नोति । अत्र वैयधिकरण्येनोद्भित्पदेन गुणविधानं क्रियते । न तूद्भिदा यागेन यजेतेत्याकारकं सामानाधिकरण्यमस्ति । अत उद्भिदादयः शब्दा गुणविधायकाः । इति पूर्वपक्षोक्तिः ॥

अनुसंधेयानि वेदवाक्यानि ॥

उद्भिदा यजेत ॥ ॥ बलभिदा यजेत ॥

॥ अभिजिता यजेत ॥

विश्वजिता यजेत ॥

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहिल्या अध्यायाचा चवथा पाद.

१. वेदाचें (यागादि कर्म) हेंच प्रयोजन सांगितलें आहे. म्हणून सर्व यागार्थ आहे. (पू०)

१. मूळ संस्कृत सूत्रांत ऐदमर्थ्य हें पद विचार करण्याजोगें आहे. इदं आणि अर्थ यांपासून तें उत्पन्न झालें आहे. समासघटित इदं म्हणजे हें, अर्थ म्हणजे प्रयोजन. यप्रत्ययाचा अर्थ पणा असा आहे. ज्याचें हें प्रयोजन आहे त्यावरील धर्म असा अर्थ निष्पन्न झाला. कोणतेंहि वाक्य म्हटलें म्हणजे तें अपूर्व अर्थ दाखविणारा विधि तरी असावें, अथवा विधीचें विशेष वर्णन करणारा अर्थवाद असावें, अथवा यज्ञसमयीं योग्यार्थाची आठवण करणारा मन्त्र असावें. म्हणून उद्भिदानें याग करावा, अभिजितानें याग करावा, विश्वजितानें याग करावा, अशा निरनिराळ्या द्रव्यांनीं याग करावा असें वर्णन असल्यामुळें या वाक्यांनीं कर्माच्या गुणाचें वर्णन होतें. वाक्यार्थ करते वेळीं असाच अर्थ घ्यावा. म्हणजे ह्या तृतीयान्तपदानें वैयधिकरण्य घ्यावें किंवा सामानाधिकरण्य घ्यावें, असा विचार येऊन पडला. वैयधिकरण्य, आणि सामानाधिकरण्य हे शब्द मराठींत प्रचारांत आणले असतां शास्त्रीय विचारास मोठें साहाय्य होईल. व्यधिकरण म्हणजे ज्या विषयाचें त्या विषयावर प-

THE FOURTH CHAPTER OF THE FIRST BOOK.

1. (It is) said (that) this (a sacrifice) is the purpose of the Vedas. All is, therefore, for this purpose (for a sacrifice.) (Statement of an opponent.)

1. In the original Sanskrita sûtra, the term *Aidamarthyam* is used. It is made up of *idam* and *artha*. The first in composition means *this* and the last means a purpose. The affix *ya* in Sanskrita corresponds to *ness* in English. The whole compound signifies the quality of that of which this is the purpose. Any sentence whatever is either an original statement (Vidhi) or an explanatory statement (Arthavâda) or a reminder of the proper sense at the time of a sacrifice (a mantra.) Hence the sentences :—One should sacrifice with an Abhijit, one should sacrifice with a Vishvajit, and one should sacrifice with an Udbhid. Thus the different things like Abhijit and Vishvajit mentioned describe a quality of a sacrifice. In interpretation, the same sense is to be taken. The point at issue is whether the instrumental case in the sentences is independent of or identical with the action (verb of the sentence) that is whether the instrumental is a case of Vaiyadhikaranya or Sâmânâdhikaranya. The last two terms though used in philosophical Sanskrita are likely to facilitate all discussion. The Vaidika

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अपिवा नामधेयं स्याद् यदुत्पत्तावपूर्वमविधायकत्वात् ॥२॥ (सि०)

पदानि । अपिवा, नामधेयं, स्यात्, यत्–उत्पत्तौ, अ–पूर्वं, अ-विधायकत्वात् ॥

पदार्थः । अपिवा=न । नामधेयं=संज्ञा । यस्य उत्पत्तिः=यदुत्पत्तिः । तस्यां=यदुत्पत्तौ । अपूर्वं=विधिः (विधित्वं निरूपितपूर्वं) अविधायकत्वात्=विधानसामर्थ्याभावात् ॥

वाक्यार्थः । (तदर्थं) न । संज्ञा भवति । संज्ञोत्पत्तौ सत्यां विधिः प्राप्नोति । कुतः । तस्या विधानसामर्थ्याभावात् ॥

भावार्थः । उद्भित्सदृशां पदानां संज्ञात्वेऽङ्गीकृत उद्भिदा यजेतेत्याकारकाणां वाक्यानां विधित्वापत्तिः । कुतः । संज्ञया किंचिदपि विधानं न प्रकाश्यते ॥

नामधेयं स्यादिति प्रतिजानीमहे । एवमविहितमर्थं विधास्यति ज्योतिष्टोमाद् यागांतरं । श्रुतिश्चैवं यागमभिधास्यति । इति शबरः सूत्रार्थं वर्णयांचकार । उद्भेदनं प्रकाशनं पशूनामनेन क्रियत इत्युद्भिद्यागः । एवमाभिमुख्येन जयादभिजित् । विश्वजयाद् विश्वजित् । एवं सर्वत्र । तस्मात् कर्मनामधेयान्येवंजातीयकानि । इति शबरः ॥

र्यवसान न घडतां दुसऱ्या निराळ्याच विषयाशीं संबंध घडतो. समानाधिकरण म्हणजे ज्या विषयाचें त्या विषयावरच पर्यवसान होतें. या विषयांवरील जे धर्म त्यांस अनुक्रमें वैयधिकरण्य आणि सामानाधिकरण्य असें म्हणावें. उद्भिदानें याग करावा असें वेदवाक्य आहे. त्याची दोन प्रकारची व्यवस्था होते. वैयधिकरण्यधर्म स्वीकारला असतां उद्भिद्रूप द्रव्यानें याग करावा, असा अर्थ होतो. सामानाधिकरण्यधर्म स्वीकारला असतां उद्भिद्रूप याग करावा असा अर्थ होतो. वैयधिकरण्यधर्माच्या योगानें उद्भिद्पदा-

text is :—One should sacrifice with Udbhid. It can be adjusted in two ways. If Udbhid be considered independent of the action of sacrificing, it would mean that a sacrifice is to be performed with a thing called Udbhid. If the instrumental case signified identity of the action and the sacrifice, then it would mean an Udbhid sacrifice. A thing—the means of a sacrifice—is essentially different from the action of sacrificing itself on the principle of Vaiyadhikara*n*ya. The sacrifice of the name of Udbhid is identical with the action of sacrificing on the principle of Sâmânâdhikara*n*ya. The oppo-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. नव्हे. ही यागाची संज्ञा, कारण संज्ञा योजल्यानंतर अपूर्व विधीचें वर्णन. तें संज्ञेनें होत नाहीं.

2. No, this (Udbhid &c.) is the name of a sacrifice, a name being created, a statement is original—which a mere name cannot make.

चा द्रव्यावर अन्वय करावा लागतो, आणि उद्भिदामध्यें आणि द्रव्यामध्यें भेद आहे. सामानाधिकरण्याचे योगानें उद्भिद् हेंच यागाचें नांव असें निष्पन्न होतें. या सूत्रांत पूर्वपक्षकार असें म्हणतो कीं वैयधिकरण्यधर्माचा स्वीकार करून उद्भिदादि द्रव्यानें याग करावा, असा अर्थ केला असतां उद्भिद् हें यागाचें साधन होतें, आणि याग या पदाचे गुण दाखवितें. यावर जैमिन्याचार्य असें म्हणतात कीं सामानाधिकरण्यधर्माचा स्वीकार करून उद्भिद् हें यागाचें नांव आहे असा अर्थ करावा. उद्भिदादि पदांचा अर्थः—ज्या यागानें पशूंचें ज्ञान होतें तो उद्भिद्याग. ज्या यागानें विशेष जय मिळतो तो अभिजिद्याग. ज्या यागानें सर्वत्र जय मिळतो तो विश्वजिद्याग. हा जैमिनीचा अर्थ आहे. यावर पूर्वपक्षकार असें म्हणतो कीं उद्भिदादि हीं वस्तूंचीं नांवें आहेत. आणि या वस्तूंनीं याग सिद्ध होतो, म्हणून या वस्तु यागाचा गुण दाखवितात.

२. या सूत्रांत आचार्य मागील पूर्वपक्षाचें समाधान करतात. संस्कृत भाषेच्या पद्धतीप्रमाणें तृतीयाविभक्तींचा क्रियेशीं संबंध असतां काय अर्थ करावा हा विचार चालला आहे. "यजेत" या क्रियेशीं संबंध असतां तृतीयांत पदाचा केव्हां केव्हां यागविशेष असा अर्थ सिद्ध होतो.

nent in this sûtra holds that Udbhid is not identical with the action of sacrificing, but is the means of it, and this shows a quality of the action. Jaimini in reply says that Udbhid is the name of a sacrifice. The meanings of the terms *Udbhid*, *Vishvajit* and *Abhijit* are :—*Udbhid* is a sacrifice which produces the knowledge of cattle. *Vishvajit* is a sacrifice which secures success every where. Abhijit is a sacrifice which secures success on a particular occasion. This is the way Jaimini interprets these terms. In reply to this, the opponent holds that Udbhid, Vishvajit and Abhijit are the names of things used in a sacrifice— because the things are the means of a sacrifice, therefore they show a quality of a sacrifice. The point of the discussion of the meaning of the instrumental case is developed in the sûtra to come.

2. In this sûtra, Jaimini seeks to refute the statement made by the opponent in the former sûtra. The question under discussion is what is the sense of the instrumental case as used in Sanskrita. The case when used along with the verb *to sacrifice*—simply names the sacrifice according to Sanskrita idiom. Sometimes, it shows the means of a sacrifice. The same idiom is met with in English. " Let us play at Blind man's buff." In this instance, the ablative relation expressed by

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अथ चित्रादिशब्दानां यागनामधेयताऽधिकरणं ॥

यस्मिन् गुणोपदेशः प्रधानतोऽभिसंबंधः ॥ ३ ॥

पदानि । यस्मिन्, गुण–उपदेशः, प्रधानतः, अभिसंबंधः ॥

पदार्थः । गुणोपदेशः=गुणस्य उपदेशः । प्रधानतः=मुख्येन । अभिसंबंधः=नित्यसंबंधः ॥

वाक्यार्थः । यस्मिन् वाक्ये गुणो विधीयते तत्र मुख्येन कर्मणा तस्य गुणस्य संबंधः । अतः कर्मनामधेयं ॥

भावार्थः । चित्रया यजेत पशुकाम इत्याकारके स्थले यद्यपि चित्रयेति पदेन गुणः प्रकाश्यते तथाप्यस्य गुणस्य प्रधानेन कर्मणा नित्यसंबंधात् प्रधाने कर्मणि गुणविधानं पर्यवस्यते । अतश्चित्रादिपदानां कर्मनामधेयत्वं ॥

अनुसंधेयानि वेदवाक्यानि ॥

चित्रया यजेत पशुकामः । तै. सं. २, ४, ६. १.

त्रिवृद् बहिष्पवमानं ।

पंचदशान्याज्यानि ।

सप्तदशपृष्ठानि ।

अवयवप्रसिद्ध्याऽजिगमनादाज्यानि । कथमाजिगमनमिति । अर्थवादवचनात् । यदाजिमीयुस्तदाज्यानामाज्यत्वमिति । स्पर्शवचनात् पृष्ठानि पवमानार्थमन्त्रकत्वाद् बहिःसंबंधाच्च च बहिःपवमानं । दधि मधु पयो घृतं धानास्तंडुला उदकं । इति नानाविधद्रव्यत्वाच्च चित्रा । तस्मादेवंजातीयकानि कर्मनामधेयानि । इति शबरः ॥

केव्हां केव्हां तृतीयान्त पदानें ज्या द्रव्याचें वर्णन होतें तें द्रव्य घेऊन त्याच्या साधनानें याग करावा असा अर्थ सिद्ध होतो. मराठी भाषेंतहि असा प्रचार आढळतो. लपंडावानें खेळूं या वाक्यांत लपंडाव हें

at simply expresses the name of a play. "Blind man's buff" is not the means of a play so much as the name of the play itself. Again "let us play at Bat and ball." In this instance, bats and balls are the means of a play.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रादिशब्दांचा अर्थ यागाचें नांव याविषयीं विचार.

३. ज्या वाक्यांत गुणांचें वर्णन असतें, त्या वाक्यांत गुणांचा आणि मुख्य कर्माचा संबंध असतो. [म्हणून त्या गुणवाचक पदांनीं यागाच्या नामाचें वर्णन होतें.]

THE SUBJECT OF TERMS LIKE CHITRÂ BEING THE NAMES OF SACRIFICES.

3. (Inthe sentences) in which qualities are described, the qualities are connected with the principal predicate (the qualities, therefore express the name of a sacrifice).

खेळाचें नांव आहे. लपंडाव हें कांहीं खेळाचें साधन नाहीं. लपंडावानें खेळूं याचा लपंडाव खेळ खेळूं असा वाक्यार्थ होतो. पुन: विटिदांडूनें खेळूं या स्थळीं विटीदांडू हें खेळाचें साधन आहे. विटी दांडू ज्या खेळांत आहेत तो खेळ खेळूं असा त्याचा अर्थ होतो. या वाक्याचा अर्थ करतांना (ज्यांत आहे तो) अशीं बाहेरचीं पदें भरतीस घालावीं लागलीं. अशीं बाहेरचीं पदें घालावीं लागलीं म्हणजे त्यास मीमांसक लक्षणा असें नांव देतात. लक्षणा म्हणजे काय हा विचार केला पाहिजे. एका अंशाचें ग्रहण करून त्याच्या योगानें सर्व वस्तूचें वर्णन केलें, म्हणजे लक्षणा होते. जसें:— रस्त्यानें हजारों पताका चालली आहे, म्हणजे हजारों पताका घेणारे वारकरी चालले आहेत असा अर्थ होतो. लक्षणेचे तीन प्रकार प्रसिद्ध आहेत. त्यांचा विचार पुढें करूं. या ठिकाणीं जी लक्षणा होते तीस मत्वर्थीय लक्षणा असें

The ablative relation in this case expresses a different sense from that in the other case. The latter sentence which simply means "let us play (that in which bats and balls are used) at Bat and ball"—thus involves a case of illipsis (Laksanâ) which means the representation of a whole by means of describing a part only. Thus in the instance, the road is crowded with flags, the word flags means flag-bearers. Three kinds of illipsis or Laksanâ are known, and they will be considered in the sequel. The case of illipsis as developed in the instance of the play at "bat and ball" is called the Matvarthîya Laksanâ, because it expresses "that in which it is" and conveys the sense of the termination *Mat* or *Vat* called by Pánini *Matup*. Now the remarks are to be applied to the interpretation of Vaidika texts. "One ought to sacrifice with Soma." In this instance, the Matvarthîya Laksanâ is to be employed. The Mîmânsakas do not approve of the employment of Laksanâ in exegeties. On

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि.

अथाग्निहोत्रादिशब्दानां यागनामताऽधिकरणं ॥

(तत्प्रख्यन्यायः)

तत्प्रख्यं चान्यशास्त्रं ॥ ४ ॥

पदानि । तत्-प्रख्यं, च, अन्य-शास्त्रं ॥

पदार्थः। सा प्रख्या यस्य=तत्प्रख्यं । च=पुनः । शास्त्रं=अनुशासनं=विधानं । अन्यत् शास्त्रं=अन्यशास्त्रं=अन्यविधानं ॥

वाक्यार्थः । पुनः अन्यविधानं वर्तते । अतस्तत्प्रख्यं नामधेयं ॥

भावार्थः । अन्यैर्विधानैर्गुणो वा विधिर्वा ज्ञाप्यते । अतो विचार्यमाणेन वाक्येन न गुणो वा विधिर्वा प्रकाश्यते । किं तर्हि । नामधेयत्वं ॥

अनुसंधेयानि वाक्यानि ॥

अग्निहोत्रं जुहोति स्वर्गकामः ।

आघारमाघारयाति । (तै. सं. ६.३,७,३.)

यदग्नये च प्रजापतये च सायं जुहोति ।

चतुर्गृहीतं वा एतदभूत्तस्याघारमाघार्या-इति ।

इंद्र ऊर्ध्वोद्धर । इत्याघारमाघारयति ।

यदग्नये च प्रजापतये च सायं जुहोतीति देवताविधानं । चतुर्गृहीतं वा एतदभूत् । तस्याघारमाघार्येत्याघारे च द्रव्यविधिः । अविदितवेदनं च विधिरित्युच्यते । विदितं चात्रान्यतो गुणविधानं । तस्मान्न न गुणविधी । कर्मनामधेये तु संभवतः । इति शबरः ॥

म्हणतात. कारण तिच्यापासून "ज्यांत आहे तें" असा अर्थ निष्पन्न होतो. विटीदांडूनें खेळूं या ठिकाणीं विटीदांडू ज्या खेळांत आहेत तो खेळ खेळूं असा अर्थ होतो असें पूर्वी सांगितलेंच आहे.

the contrary they condemn it. Hence the instrumental case expresses the name of a sacrifice as the interpretation by means of ellipsis is to be avoided. The determination of a particular sense of the instrumental case is

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आतां अग्निहोत्रादि शब्द यागांचीं नांवें याविषयीं विचार.

४. पुनः दुसरीकडून विधि सिद्ध होतो, म्हणून तें (नामधेय) तत्प्रख्य आहे.

NOW THE SUBJECT OF THE WORDS LIKE AGNIHOTRA BEING THE NAMES OF SACRIFICES.

4. Again, an original statement being else-where made, It (its name) is called conventional.

सोमानें याग करावा असें वेदवाक्य आहे. या स्थळीं मत्वर्थीय लक्षणा मानावी लागते. मीमांसकांचें म्हणणें असें आहे कीं लक्षणा न मानतां तृतीयेचा अर्थ करावा. आणि असें केलें असतां त्या तृतीयांत पदाचा अर्थ यागाचें नांव आहे असा निष्पन्न होतो. सर्व भाषांत तृतीयेच्या अर्थाविषयीं पंचाईत पडते, म्हणून तृतीयाविभक्तीच्या अर्थाकडे वाचकांनीं लक्ष द्यावें.

३. तृतीयादि विभक्तींनीं त्या त्या विभक्तींचा अर्थ समजावा, कीं कर्माचें नाम आहे असें समजावें हाच विचार चालू आहे. तृतीयादि विभक्तींच्या योगानें क्रियेचा गुण दाखविला जातो. म्हणून तृतीयांत पदें अर्थवादांत मोडावीत? कीं त्यांचा स्वतंत्र अर्थ करून तीं कांहीं कर्माचीं नामें आहेत? असा विचार करणें अवश्य पडलें. तृतीयांतपदाचा अर्थ उद्देश्य करावा, आणि विधेय करूं नये म्हणजे वाक्यभेदादि दोष येत नाहींत, असा सूत्रार्थ आहे. पुढील सूत्रावरून या वादविवादाचें स्वरूप नीट समजेल.

४. या सूत्रानें जो विचार केला आहे त्यास तत्प्रख्यन्याय असें मीमांसक म्हण-

difficult in every language. The instrumental corresponds to a certain extent with the ablative case in Latin—the same relation being expressed by means of different prepositions in English. Every educated gentleman has to learn one or more foreign languages. Hence the discussion may prove interesting. At least it points out what syntactical relation deserves attention.

3. The subject whether the instrumental case expresses the name or the means of a sacrifice is still continued. The instrumental case as well as the other cases show the qualities of the predicate. Hence the question is necessarily raised:—is the instrumental case to be considered to enlarge the predicate or to form an essential part of the body of the subject. The sense of the sûtra is that the instrumental case is a part of the subject and is not connected with the predicate. This adjustment obviates the exegetical difficulty consisting in the division of a sentence. The following sûtra will throw light on this discussion.

4. The principle enunciated in this sûtra is known among the Mîmânsakas as Tat-prakhyanyâ-

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूत्राणि,

अथ श्येनादिशब्दानां यागनामधेयताऽधिकरणं ॥

(तद्व्यपदेशन्यायः)

तद्व्यपदेशं च ॥ ५ ॥

पदानि । तत्-व्यपदेशं, च ॥

पदार्थः । व्यपदेशः=सादृश्यं । तेन व्यपदेशः यस्य तत्=तद्व्यपदेशं॥

वाक्यार्थः । (श्येनादिना प्रसिद्धेन) सादृश्यात् कर्मनामधेयं ॥

भावार्थः । यथा वै श्येनो निपत्यादत्ते। एवमयं द्विषंतं भ्रातृव्यं निपत्यादत्ते । यमभिचरंति श्येनेन । इति निपत्यादत्ते । इत्यनेन सादृश्येन श्येनशब्दो यागे । यथा सिंहो देवदत्तः इति । तस्मात् कर्मनामधेयं । इति शबरः ॥

अनुसंधेयानि वेदवाक्यानि ॥

अथैष श्येनेन अभिचरन् यजेत ।

अथैष संदंशनेन अभिचरन् यजेत ।

तात. हें कर्माचें नाम आहे, असं दुसऱ्या वर्णनावरून सिद्ध होतें, असा सूत्राचा अर्थ आहे. म्हणजे हें नांव आहे असें प्रसिद्धच आहे, असा भावार्थ आहे. "ज्याला स्वर्गाची इच्छा आहे तो अग्निहोत्र करतो" या वेदवाक्यांतील अग्निहोत्र हें कर्माचें नांव आहे, असें दुसऱ्या वेदवाक्यावरून कळतें. या सूत्रापासून जैमिनि नवा विषय काढून नामाची उत्पत्ति कशी झाली हें दाखविती.

ya—a name which can be best rendered into English by the principle of conventionality. A description else-where given shows that a sacrifice is known by a particular name, that is, the conventional name is well-known. For instance, " He who wishes for happiness, sacrifices an Agnihotra-sacrifice. " Another independent Vaidika text determines the word Agnihotra in the obove Vaidika text to be the name of a sacrifice. Jaimini enters on a new discussion from this sûtra, and points out the origin of names.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नांव.	रुपये.	आणे.	प्रति.
H. H. The Chief of Jamkhindi ...	5	०	1
Major W. E. West	5	6	I
The Secretary Native Library Miraj	5	6	1
रा॰ सा॰ तपीदास दपाराम मेहेते...	५	६	१
,, ,, प्रभाकर रामचंद्र	५	६	१
,, ,, वासुदेव बल्लाळ खेर.	५	६	१
,, ,, बाबाजी कृष्ण गोखले...	५	६	१
,, ,, माधवराव गंगाधर चिटणीस...	५	६	१
H. C. Macnee Esqr.	5	०	1
,, ,, गंगाराम भाऊ म्हसके....	५	०	१
Rajana Lingu Esqr.	5	०	1
Ardesar Hormasji Esqr.	5	०	1
Rev. R. Stothert	5	०	1
Venkata Narasaya	5	6	1
रा॰ सा॰ गणेश रघुनाथ शास्त्री, धार...	५	६	१
,, ,, विष्णू गंगाधर फडके....	५	६	१
,, ,, गोविंद केशव साबदे.	५	६	१
,, ,, रामचंद्र धोंडदेव वेलणकर.	५	६	१
,, ,, विठ्ठल नारायण फाटक.	५	६	१
,, ,, नारायण रामचंद्र जोगळेकर...	५	६	१
P. Moorsagose Moodelliar Esqr. ...	5	6	1
रा॰ सा॰ जगन्नाथ इच्छाराम.	५	६	१
,, ,, दाजी श्रीपत नागपुरकर.	५	०	१
C. P. Laksmipati Nayadu Esqr. ...	5	6	1
रा॰ सा॰ रघुनाथ रामचंद्र सामंत.	५	२८६	१

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Register No. 131 of 1877.

सूचना.

	रुपये.	आणे.
वर्षाची वर्गणी, अगाऊ	५	०
एका अंकास	०	८

पुण्याबाहेर राहणारांस टपाल हंशिलाबद्दल दर वर्षाचे ६ आणे खेरीज पडतील. मागाहून वर्गणी घेतली जाणार नाहीं.

ग्रंथकर्त्यास अथवा म्यानेजरास जीं पत्रें लिहावयाचीं, तीं "षड्-दर्शनचिंतनिका—आफिस, पुणें, सदाशिव पेंठ, घर नंबर ६४१" या पत्यावर लिहावीं. वर्गणी वगैरे संबंधीं पत्रें याच पत्यावर पाठवावींत.

	Rs.	A.
For one year, in Advance... ...	5	0
Single copies.	0	8

Besides six annas for postage at the rate of half an anna for a copy.

N. B. The subscription is to be paid *in advance.* No accounts of arrears can be kept.

All letters should be addressed to the Manager of the *Saddarshana*-Chintanikâ-Office, Poona, Sadashive Petha, House Municipal No. 641.

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६२१/६६ ७३,६४६

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. Gurukul Kangri Collection, Haridwar